(सभापतीस्थानी तालिका सभापती ॲड. उषा दराडे)

पृ. शी. : उरण तालुक्यातील जेएनपीटी प्रकल्पग्रस्तांना सिडकोच्या साडेबारा टक्के योजनेप्रमाणे भूखंड वाटप न होणे

मु. शी. : उरण तालुक्यातील जेएनपीटी प्रकल्पग्रस्तांना सिडकोच्या साडेबारा टक्के योजनेप्रमाणे भूखंड वाटप न होणे या विषयावर श्री जयंत प्र. पाटील, वि. प. स. यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा

तालिका सभापती : या अल्पकालीन चर्चेसंबंधी औपचारिक प्रस्ताव मांडता येणार नाही. या चर्चेसाठी मी 1 तास 15 मिनिटांचा वेळ दिलेला आहे. सूचना देणारे सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील आपली सूचना वाचतील आणि भाषण करतील.

श्री. जयंत प्र. पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदया, मी नियम 97 अन्वये आपल्या अनुमतीने पुढील विषयावर अल्पकालीन चर्चा उपस्थित करतो.

"उरण तालुक्यातील (जि.रायगड) 95 गावांतील 62 हजार 250 कुटुंबांची जमीन शासनाने सिडको मार्फत संपादित करणे, त्यापैकी 1125 एकर जमीन जे.एन.पी.टी.स हस्तांतरित करणे, राज्य शासनाने प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना संपादित जमिनीच्या बदल्यात साडेबारा टक्के भूखंड देण्याचे धोरण जाहीर करुनही 30 वर्षानंतरही जेएनपीटी प्रकल्पग्रस्तांना सिडकोच्या साडेबारा टक्के योजनेप्रमाणे भूखंड वाटप न होणे, गावठाण विस्तारांचा प्रश्न अद्यापही प्रलंबित असणे, सिडको हद्दीत प्रकल्पग्रस्तांनी गरजेपोटी बांधलेली घरे नियमित करण्याची घोषणा शासनाने करुनही त्याची अंमलबजावणी न होणे, तसेच भूमीहीन, शेतमजूर, बारा बलुतेदार व तत्सम घटकांना भूखंड देण्याबाबत निर्णय होऊनही कार्यवाही न होणे, संतप्त शेतकऱ्यांनी दि.23 मार्च, 2011 रोजी जेएनपीटी बंदर व सिडको परिसर संपूर्ण बंद पाडण्याचा निर्णय होणे व दिनांक 7 मार्च, 2011 ते दिनांक 18 मार्च, 2011 पासून गावोगावी उत्स्फूर्त सभा व साखळी उपोषण करण्याचा निर्णय घेण्यात येणे, मात्र याबाबत राज्य शासनाकडून निश्चित असा निर्णय जाहीर न झाल्याने शेतकऱ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. तरी, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना व कार्यवाही."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ MMP/

श्री. जयंत प्र. पाटील

सभापती महोदया, रायगड जिल्ह्यातील उरण आणि पनवेल या दोन तालुक्यातील जमिनी 30 वर्षापूर्वी हस्तांतरित करण्यात आल्या. पनवेल तालुक्यातील जमिनी तर जवळजवळ 40 वर्षापूर्वी हस्तांतरित करण्यात आल्या. 1967 साली सिडको स्थापन झाले आणि त्या नंतर एकरी 3 हजार रुपये भावाने या जमिनी त्या वेळी राज्य शासनाने घेतल्या. त्या संदर्भात 1984 साली जेएनपीटीच्या निमित्ताने तीव्र आंदोलन झाले. जवळजवळ तीन महिने ते आंदोलन चालू होते. त्या आंदोलनामध्ये संपूर्ण रायगड जिल्ह्याने उरण आणि पनवेल तालुक्यातील शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात साथ दिली. त्या वेळेला हजारो शेतकरी तुरुंगामध्ये गेले. आंदोलकांवर गोळीबार झाला. जासई येथे झालेल्या गोळीबारात जवळजवळ 5 लोक हुतात्मे झाले. पागोटे, जासई आणि चिरले या तीन गावांमध्ये शेतकऱ्यांचे रक्त सांडले. त्या वेळी हजारो शेतकरी नाशिक आणि येरवडा येथील तुरुंगामध्ये जेरबंद होते. या आंदोलनाच्या निमित्ताने मी स्वत: जवळजवळ 25 दिवस येरवड्याच्या जेलमध्ये जेरबंद झालेला कैदी आहे. त्या वेळी आयुष्यामध्ये मी पहिल्यांदा जेलमध्ये गेलो. त्यावेळी सत्याग्रहींना साध्या कैद्यांची वागणूक देण्यात आली. मी चुकत नसेल तर आपण सुध्दा त्या वेळेला त्या आंदोलनाला पाठिंबा दिला होता. महाराष्ट्रातील सर्व शेतकरी संघटना तसेच डाव्या पक्षाच्या कार्यकर्त्यांनी या आंदोलनाला मोठ्या प्रमाणावर पाठिंबा देऊन त्या वेळेला एक व्यापक आंदोलन उभे राहिले. राज्यातील विविध संघटना आणि पक्षांनी या आंदोलनाला पाठिंबा दिला. किंबहुना परराज्यातून सुध्दा काही शेतकरी नेते या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी आले आणि त्या नंतर राज्य शासनाने एकरी 40 हजार रुपये भाव देण्याचे तत्व ठरविले. एकरी 27 हजार भाव होता पण जेएनपीटीच्या वेळी एकरी 40 हजार रुपये भाव आणि साडेबारा टक्के विकसित जमीन शेतकऱ्यांना परत देण्याचा निर्णय झाला. त्या आंदोलनामुळे हा एक ऐतिहासिक निर्णय त्या वेळी झाला. देशामध्ये पहिल्यांदा भूसंपादन केलेली जमीन विकसित करुन ती शेतकऱ्यांना देण्याचा निर्णय त्या वेळी राज्य शासनाने घेतला. मी चुकत नसेल तर त्या वेळी कै. वसंतदादा पाटील मुख्यमंत्री होते. मी त्या वेळेला त्या बैठकीला उपस्थित होतो. त्या वेळी मी लहान होतो पण जे शिष्टमंडळ त्यावेळी गेले त्यामध्ये मी एक कार्यकर्ता म्हणून उपस्थित होतो. ती बैठक तीन-चार तास चालली. त्या बैठकीमध्ये हा निर्णय घेण्यात आला.

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील....

सभापती महोदय, मी आज या ठिकाणी चर्चा का उपस्थित केली आहे ते सांगतो. तेथील तिसरी पिढी शासनाकडे नोकरी मागत आहे. त्या तालुक्यातील 12.5 टक्के जमीन परत द्यावी असे सांगत आहे. यापूर्वीच्या दोन पिढ्या आंदोलने करुन, मागण्या करुन गेल्या आहेत. परंतु आज पर्यंत राज्य शासनाने त्याची कोणतीही दखल घेतली नाही. जवळजवळ 95 गावातील 62,250 कुटुंबीयांची जमीन संपादन करण्यात आली. पण आजही 27 हजार कुटुंबीयांना 12.5 टक्के जमीन मिळालेली नाही. 27 हजार कुटुंबीयांना 12.5 टक्के जमीन देण्यास शासन अपयशी ठरले आहे.

त्या भागामध्ये सिडको ही संस्था आल्यावर जमिनींचे भूसंपादन करण्यात आले. त्यावेळी आम्हाला जमिनीचे महत्व कळले नाही. परंतु शैक्षणिक संस्थेच्या नावाखाली अल्प किंमतीमध्ये, नाममात्र किंमतीमध्ये, 1 रुपये या दराने अनेक ट्रस्टना 30 वर्षापूर्वी जागा देण्यात आली. माननीय मंत्री डॉ.पतंगराव कदम यांच्याकडे ती दृष्टी होती, आमच्याकडे नव्हती. जिल्ह्यातील बाहेरच्या संस्थांना ह्या जागा देण्यात आल्या, मग वारणा तूप असेल, आणखी कोणती संस्था असेल, या संस्थांना ती दिली गेली. काही हौसिंग सोसायट्यांना अल्प किंमतीत जागा देण्यात आली. पीएपीच्या संस्थांना अल्प किंमतीमध्ये जागा देण्यात आली हे सर्व रेकॉर्डवर आहे. त्यावेळी जे राजकर्ते होते त्यांना अल्प किंमतीत शैक्षणिक संस्थेच्या नावाखाली कोट्यवधी किंमतीची जागा देण्यात आली.

सभापती महोदय, मी एक डिपार्टमेंटल स्टोअर चालवितो. डिपार्टमेंटल स्टोअरची एक चेन आहे. मग अपना बाजार असेल, रायगड बाजार असेल, वारणा बाजार असेल, ही स्टोअर्स सहकारी तत्वावर चालविली जातात. कंझ्यूमर्स चळवळीत काम करणाऱ्या या संस्था आहेत. मी एक डिपोर्टमेंटल स्टोअर चालविण्यासाठी एकरी 1 रुपया या दराने शासनाकडे जागा मागितली होती. मला या दराने जागा देण्यात आली नाही. माझ्या संस्थेला 12.5 कोटी रुपये एका एकरसाठी द्यावे लागले. एवढी रक्कम मी भरु शकत नाही, परंतु डेव्हलपरने ही रक्कम भरल्यानंतर तेथे फूड स्टोअर सुरु केले आहे.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील....

सभापती महोदय, त्या भागात जशा शैक्षणिक संस्थांना जागा देण्यात आल्या तशाच अनेक वर्तमानपत्रांनाही जागा देण्यात आल्या आहेत. मग दैनिक सामना असेल, दैनिक लोकमत असेल. मी माझ्या तालुक्यात एक वर्तमानपत्र चालवितो. माझ्या आजोबांनी हे वर्तमानपत्र सुरु केलेले आहे. हे वर्तमानपत्र गेली 37 वर्षे सुरु आहे. या वर्तमानपत्रासाठी मी जागा मागितली होती, पण अजून पर्यंत मला जागा मिळालेली नाही. जागा मिळण्यासाठी मी ईबीसीचे प्रमाणपत्र दिलेले आहे. माझ्या जिल्ह्यात लिडिंगला असलेले व दररोज 30-40 हजार प्रतींचा खप असलेले ते वर्तमानपत्र आहे. त्याला जागा मिळाली नाही, देऊ नका, मला काही फरक पडत नाही. पण ज्यांचा या शेत जमिनीशी संबंध नाही, पण राज्यकर्ते आहेत त्यांच्या वर्तमानपत्रांना जागा दिलेली आहे. त्यांनी ती जागा विकासकांना दिली आणि विकासकाने त्यातून करोडो रुपये कमविले आहेत. त्यामुळे या सर्व जागांबाबत सभागृहात चर्चा झाली पाहिजे. त्या बाबत मंत्री महोदयांनी स्पष्ट व योग्य उत्तर दिले पाहिजे.

सभापती महोदय, पीएपीची एक संस्था आहे. काँग्रेस पक्षाचे श्री.भूषण पाटील नावाचे कार्यकर्ते आहेत. त्यांनी अभियांत्रिकी महाविद्यालय सुरु केले. त्यावेळी त्यांनी तत्कालीन मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख आणि सर्व पक्षाच्या लोकप्रतिनिधींना बोलविले होते.

यानंतर श्री.शिगम....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील...

आता तत्व बदलले आहे. माझी या निमित्ताने अशी मागणी आहे की, ज्यांनी एकरी 1 रुपया प्रमाणे जमीन घेतली ते आज विद्यार्थ्यांकडून भरमसाठ फी घेऊन कोटयवधी रुपये कमवित आहेत. त्यांच्याकडून बाजारभावाने त्या जमिनीची किंमत शासन घेणार आहे काय, हा खरा प्रश्न आहे. त्या शैक्षणिक संस्थामध्ये कमीत कमी प्रकल्पग्रस्तांच्या मुलांना सवलतीने प्रवेश द्यावा अशी आम्ही मागणी केलेली होती. ब्रिचकॅण्डी हॉस्पिटल, बॉम्बे हॉस्पिटल, जसलोक हॉस्पिटल या सारख्या मोठमोठ्या हॉस्पिटल्सना सरकारने जागा आणि अन्य सोयीसुविधा दिल्यानंतर त्यांनी त्या हॉस्पिटलमध्ये दारिद्र्य रेषेखालील रुग्णांसाठी, ज्यांचे उत्पन्न 25 हजार रुपयाच्या आत आहे, अशा गरीब रुग्णांसाठी 10 टक्के खाटा राखून ठेवाव्यात आणि त्यांच्यावर मोफत औषधोपचार करावेत असे नियम करण्यात आले. त्या नियमांचे पालन होत नसल्याचे या सभागृहामध्ये झालेल्या चर्चेवरुन निदर्शनास आल्यानंतर चौकशी करण्यासाठी माननीय मंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दोन्ही सभागृहाची संयुक्त समिती नेमण्यात आली. ती समिती जसलोक हॉस्पिटलची पाहणी करीत असताना त्या हॉस्पिटलच्या मॅनेजरने समितीला दुरुत्तरे करुन समितीचा अवमान केला होता आणि त्याला सभागृहाने शिक्षाही ठोठावलेली होती. मग अशा प्रकारचे नियम ज्या लोकांनी 1 रुपया एकरने सरकारकडून जागा घेतलेली आहे त्यांच्या बाबतीत शासन करणार आहे काय ?

सभापती महोदय, 30-35 वर्षापूर्वी ग्रामीण भागामध्ये शिक्षणाच्या बाबतीत तेवढी वैचारिक उंची नव्हती. त्या काळात शिक्षणाचा मोठ्या प्रमाणात प्रचार झालेला नव्हता आणि शिक्षण घेण्याची लोकांची आर्थिक कुवत देखील नव्हती. आपल्या मुलांना दर्जेदार शिक्षण देण्याची पालकांची मानसिकता नव्हती. पण आज चित्र बदलले आहे. आज त्या भागातील ज्या लोकांची जमीन गेलेली आहे, जे प्रकल्पग्रस्त झालेले आहेत, ज्यांनी रक्त सांडलेले आहे त्यांच्यासाठी हे सरकार काही करीत नाही. फक्त गोडगोड बोलून आश्वासने दिली जातात. कृती मात्र काही केली जात नाही. म्हणून या सर्व गोष्टींचा शासनाने विचार केला पाहिजे. सभापती महोदय, ही चर्चा येथे उपस्थित करण्याची वेळ का आली ? गेल्या आठवड्यामध्ये मी नियम 289 अन्वये सूचना दिली होती. त्या सूचनेला अनुलक्षून माननीय सभापतींनी या चर्चेला परवानगी दिली. त्याबद्दल मी माननीय सभापतींना धन्यवाद देतो, त्यांचे आभार मानतो. त्यांनी प्रकल्पग्रस्तांच्या प्रश्नासंबंधी काम केलेले

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील....

आहे. प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न सोडविण्याच्या बाबतीत ते नेहमी आग्रही राहिलेले आहेत. परवा उरण आणि पनवेल तालुक्यातील शेतक-यांनी जेएनपीटी बंद करण्याचे आंदोलन केले. जेएनपीटीचे काम बंद करण्याचा निर्णय शेतक-यांनी घेतला. माननीय केन्द्रीय कृषी मंत्री श्री. शरद पवारयांनी मध्यस्ती करुन शेतक-यांच्या नेत्यांना आश्वासन दिले की, जेएनपीटीच्या संदर्भात साडेबार टक्क्याचे तत्व मान्य करु. प्रश्न असा आहे की, शेतक-यांची जागा सिडकोने घेतली आणिती जेएनपीटीला हस्तांतरित केली. सिडकोचे म्हणणे असे आहे की, ज्या भावाने सिडकोने शेतक-यांकडून जमीन घेतली त्याच भावाने ती जेएनपीटीला दिली त्यामुळे साडेबारा टक्के जागा जेएनपीटीकडून घ्यावी. आमचे म्हणणे असे आहे की, सिडकोने ती जागा शेतक-यांकडून घेतलेली असल्यामुळे शेतक-यांना साडेबारा टक्के जागा देण्याची जबाबादारी सिडकोची आणि राज्य शासनाची आहे.

सभापती महोदय, गेल्या 30 वर्षामध्ये या ठिकाणी विविध प्रश्न निर्माण झालेले आहेत. आम्ही गावठाण विस्ताराची मागणी केली होती. 12 गावांना मालंड बोलले जाते. त्या गावांची परिस्थिती एकदम भयानक आहे. जसकार असू द्या, सोनारी असू द्या, बेटकळ असू द्या, पागोटे असू द्या किंवा बोकडवीरा असू द्या, या गावामध्ये गावठाण विस्तारासाठी जागाच राहिलेली नाही. पुढील 100 वर्षाचा विचार करुन गावठाण विस्तार केला जातो. शंभर वर्षानंतर काय होणार हे गृहीत धरुन गावठाण विस्तार केला जातो. या गावामध्ये गावठाण विस्तार नाही. त्या ठिकाणी गाव खाली आणि भराव वर अशी परिस्थिती आहे.

...नंतर श्री. गिते...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखापाठी नाही

(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री.रामनाथ मोते)

श्री. जयंत प्र.पाटील...

सभापती महोदय, सोनार अळीमध्ये गेलात तर आपल्याला दिसून येईल की, एक मीटर मातीचा भराव त्या ठिकाणी टाकलेला आहे. हे गाव खाली आहे, त्या गावाच्या चारही बाजूने भराव टाकण्यात आलेला आहे. माननीय मंत्री महोदय, आपण आपल्या मतदार संघात जाताना ही गावे आपण बघता, त्यामुळे या गावाची परिस्थिती काय झालेली आहे याची आपल्याला कल्पना असेलच. या गावांमध्ये ड्रेनेजचा प्रश्न मोठया प्रमाणात निर्माण झालेला आहे. त्या ठिकाणच्या कोणत्याही गावात ड्रेनेजची व्यवस्था नाही. या गावाच्या चारही बाजूने भराव टाकलेला असल्यामुळे ड्रेनेजच्या पाण्याचा निचरा होत नाही. दोन, तीन मैल भराव असल्यामुळे ड्रेनेजचा प्रश्न निर्माण झालेला आहे. याबाबतीत शासनाने गांभीर्याने लक्ष घालण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, गावठाण विस्ताराची कामे झालेली नाहीत. या गावात साडेबारा टक्के जमीन मिळेल. या गावामध्ये राहणाऱ्या बारा बलुतेदारांकडे जमीन नव्हती. त्यांना साडेबारा टक्के जमीन देण्याचे तत्व सुध्दा त्यावेळेला मान्य केले होते. या बारा बलुतेदारांनी कोठे रहावयाचे हा खरा प्रश्न त्या ठिकाणी निर्माण झालेला आहे. या गावातील लोकांना शैक्षणिक सुविधा नाहीत. बाहेरचे लोक येऊन त्या ठिकाणी स्थानिक झाले, त्यांना पूर्णपणे सुविधा दिल्या जातात. म्हणून कॉ. भूषण पाटील यांनी त्या ठिकाणी शैक्षणिक संस्था काढली. त्यांना खरी शंभर टक्के पीएपी आहे. जे तत्व 30 वर्षापूर्वी होते, त्या तत्वाप्रमाणे त्यांना जमिनी दिल्या गेल्या पाहिजेत अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, त्या ठिकाणी स्मशानभूमीचा प्रश्न निर्माण झालेला आहे. तेथे दफनभूमीचा प्रश्न निर्माण झालेला आहे. त्या ठिकाणच्या आजू-बाजूला वस्ती झालेली आहे. त्या ठिकाणी मोठे वेअर हाऊसेस झाले आहेत. तर त्या ठिकाणी स्मशानभूमी कोठे करावयाची या बाबतीत पुनर्विचार करण्याची वेळ आज आलेली आहे. अनेक जिव्हाळयाचे प्रश्न त्या ठिकाणी निर्माण झालेले आहेत. ते प्रश्न सोडविण्याच्या बाबतीत शासनाने पुढाकार घ्यावा अशी माझी शासनास विनंती आहे.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील...

सभापती महोदया, उरण तालुक्यातील शेवा गाव आहे. ज्या ठिकाणी जे.एन.पी.टी.प्रत्यक्ष काम करीत आहे. ज्या ठिकाणी जे.एन.पी.टी.ची जेट्टी आहे. तेथे शेवा गाव असून तेथे संपूर्णपणे कोळी लोकांची वस्ती आहे. त्या गावाचे स्थलांतर करुन मोरा आणि उरण या मार्गालगत वसविले आहे. सदर गाव नव्याने वसविल्यापासून तेथील घरांना मोठया प्रमाणात वाळवी लागलेली आहे. ती वाळवी अजूनपर्यंत गेलेली नाही. या सभागृहाचे सदस्य श्री. हुसेन भाई हे मंत्री होते. त्यांना त्या गावात मी घेऊन गेलो. त्यांनी त्या गावाची वस्तुस्थिती बघितली आहे. त्या गावातील घरांना शंभर टक्के वाळवी लागलेली आहे, परंतु त्याबाबतीत मात्र सिडकोकडून कोणत्याही प्रकारची दखल घेतली जात नाही. सिडकोकडून फक्त आश्वासन दिले जाते, परंतु कार्यवाही मात्र होत नाही. त्या गावातील घरांना वाळवी लागू नये यासाठी उपाययोजना केली की, पुन्हा एका महिन्यात तेथील घरांना वाळवी लागते. या बाबतीत प्रत्येक वेळी आश्वासन दिले जाते. मला या बाबतीत सांगावयाचे आहे की, या गावाचे पुन्हा दुसरीकडे स्थलांतर करावे लागेल. त्या शिवाय हा वाळवीचा प्रश्न सुटणार नाही. सदरहू गाव दुसरीकडे स्थलांतरित करण्याबाबत सिडकोने तातडीने कार्यवाही करावी अशी माझी या निमित्ताने मागणी आहे.

सभापती महोदय, साडेबारा टक्क्यांच्या बाबतीत शासनाचे नेमके धोरण काय आहे, स्थानिक प्रकल्पग्रस्तांना साडेबारा टक्क्यांचे भूखंड शासन किती कालावधीत देणार आहे, साडेबारा टक्के जमिनीच्या बाबतीत काही कालबध्द कार्यक्रम शासनाने आखलेला आहे काय, या ठिकाणच्या 27 हजार प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना साडेबारा टक्के जमीन द्यावयाची आहे, ती किती कालावधीत देणार आहात, याचा खुलासा माननीय मंत्री महोदयांनी आपल्या उत्तराच्या भाषणात करावा. प्रकल्पग्रस्तांची ही तिसरी पिढी असून ती जमीन मागते आहे. परंतु त्या पिढीला अजूनपर्यंत जमिनी मिळत नाही. त्या जमिनी मिळण्यासाठी चौथ्या पिढीची वाट बघावी लागेल की काय अशी शंका आमच्या मनात येऊ लागलेली आहे. त्या विभागातील जमिनीचा भाव सोन्याच्या भावापेक्षा जास्त झालेला आहे. आज उरण आणि पनवेल शहरातील जमिनीचे भाव काय आहेत याची माननीय नगरविकास राज्यमंत्र्यांना चांगली माहिती आहे. या दोन्ही शहरांमध्ये आज जमिनी शिल्लक राहिलेल्या नाहीत.

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव : उरण आणि पनवेल शहरातील जमिनीचे भाव काय आहेत याची मला कशी काय माहिती असेल ?

श्री.जयंत प्र.पाटील : आपण जमिनीच्या किंमती ठरविता. आपल्याकडे जमिनीं सदर्भातल्या फाईल्स येतात. इमारतींच्या किंमती देखील आपण ठरविता. नगरविकास विभागाचे अधिकारी आणि सिडकोचे अधिकारी तुम्हाला जमिनींच्या किंमती बाबत माहिती देत असतील. त्यामुळे तुम्हाला जमिनीच्या भावांची माहिती असलीच पाहिजे.

श्री. भास्कर जाधव : ज्या हेतूने मला विचारले गेले, त्यामुळे मी माझे मत व्यक्त केले.

श्री.जयंत प्र.पाटील : माननीय नगरविकास राज्यमंत्र्यांना सांगू इच्छितो की, आपण अतिशय क्लिन आहात. त्यामुळे तुम्हाला आम्ही वेळोवेळी सर्टिफिकेट देत असतो. इतर मार्गाच्या बाबतीत आपण आम्हाला बोलण्याची संधी कधीच उपलब्ध करुन दिली नाही. या ठिकाणी मी थोडे विषयांतर करुन सांगतो की, सभागृहामध्ये विभागाकडून चांगल्या प्रकारे ब्रिफींग घेऊन अतिशय सुंदर असे उत्तर देण्याचा माननीय नगरविकास राज्यमंत्र्यांचा लौकिक आहे.

यानंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील.....

आमच्यासारख्या आमदारांना ते सुध्दा अडवू शकतात. पुरवणी प्रश्न विचारावयाचा असल्यास आम्हाला देखील विचार करावा लागतो. तुमची प्रतिमा मला माहिती आहे. म्हणून तुम्ही तीन वेळा निवडून आलेले आहात. मी त्या अर्थाने आपल्याला बोललेलो नाही आणि कधीच बोलणार नाही. तुम्ही चळवळीत काम करणारे कार्यकर्ते आहात. तुम्ही उत्तर द्यायला आल्यामुळे आमची वेगळी अपेक्षा आहे. त्यादृष्टीने आम्ही चर्चा करीत आहोत.

सभापती महोदय, 12.5 टक्के जमीन कशी देणार याबद्दल शासनाकडे कार्यक्रम तयार आहे का? आज सिडकोचे अधिकारीच एजंट बनलेले आहेत. सिडकोच्या अधिकाऱ्यांनी कोट्यवधी रुपयांची मालमत्ता गोळा केली आहे. त्या अधिकाऱ्यांनी केलेल्या कामाबद्दल मंत्री महोदय उत्तर देणार आहेत. आमचा डेव्हलपमेंटला विरोध नाही. आमचे हेच म्हणणे आहे की, हजारो एकर जागेची आवश्यकता का भासते? आमच्या भागात टाटा आणि रिलायन्स कंपनीचे वीज प्रकल्प उभारले जात आहेत. सभापती महोदय, मी दोन महिन्यापूर्वी हॉलंडला गेलो होतो. तेथे 300 एकर जागेमध्ये 500 मे.वॅट वीज प्रकल्प उभारण्यात आल्याचे मी प्रत्यक्ष पाहिले आहे. असे असताना आमच्याकडील कंपन्यांना 5 हजार एकर जागा कशासाठी पाहिजे? 5000 एकर जमीन संपादन करुन 500 एकर जागेत प्लॅंट उभा करायचा आणि उर्वरित 4500 एकर जागा रियल इस्टेटसाठी वापरायची याच दृष्टीकोनातून जमिनी घेतल्या जात आहेत. आम्ही विकासाला कधी विरोध केलेला नाही. एसईझेड प्रकल्पांना आमचा विरोध नाही. ज्या ठिकाणी हजारो एकर जमीन ओसाड पडून आहे त्या ठिकाणी एसईझेड प्रकल्प का उभारले जात नाहीत? माननीय आदिवासी विकास मंत्री सभागृहात उपस्थित आहेत. त्यांच्या जिल्हयात भरपूर माळरान जमीन उपलब्ध आहे. तेथे इंन्फ्रास्ट्रक्चर तयार करा. त्या ठिकाणी हायवे तयार करा, आठ पदरी रस्ते बांधा, रेल्वेचे जाळे उभारा. जगामध्ये 300 कि.मी.प्रती तास या वेगाने धावणाऱ्या रेल्वे आहेत. अशा रेल्वेमधून मंत्री महोदयांनी प्रवास केलेला आहे. लॉजिस्टीक स्वस्त पडले पाहिजे हाच शासनाचा उद्देश आहे आणि त्या दृष्टीने शासनाला प्रयत्न करता येतील. जगामध्ये जल वाहतुकीसारखी स्वस्त सेवा नाही. जल वाहतुकीनंतर रेल्वे वाहतूक सगळ्यात स्वस्त आहे. रेल्वेने माल वाहतूक करण्यासाठी प्रती कि.मी.करिता प्रती टन 1 रुपया खर्च येतो. याचा विचार का होत नाही?

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील.....

सभापती महोदय, विनाकारण आम्हाला बदनाम केले जाते. आम्ही प्रत्येक प्रकल्पाला विरोध करतो असे सांगितले जाते. आमचा विरोध नाही. मंत्री महोदयांनी आमची बाजू ऐकून घ्यावी. आम्ही विटा, सांगोला येथे जाऊन आलो आहोत. हजारो माळरान जमीन तेथे उपलब्ध आहे. त्या भागात लॉजिस्टीक करा. मुंबईहून एका तासामध्ये तेथे पोहोचता येईल. मंत्री महोदय परदेशात जाऊन आलेले आहेत. हाँगकाँग येथे फोशिना बंदर आहे. मी त्या बंदराला वर्षातून दोन-तीन वेळा भेट देत असतो. फोशिना बंदर व्यवस्थापनाशी माझ्या कंपनीने टायअप केलेले आहे. 400 कि.मी.चा प्रवास 45 मिनिटात होतो, असे आठ पदरी रस्ते हाँगकाँगला तयार केले आहेत. त्या दृष्टीने नियोजन केले पाहिजे. बीओटी तत्वावर काम करणारे भरपूर लोक आहेत. शासनाला एकही पैसा खर्च करावा लागणार नाही. श्रीगोंदा येथे आठ पदरी रस्ते करण्यासाठी भरपूर भांडवलदार तयार आहेत. परंतु तुम्हाला डेव्हलपमेंटसाठी जागा घेऊन रियल इस्टेटसाठी वापर करावयाचा आहे. सिडकोकडील जागा संपली आहे. सिडकोचा आता पेण आणि अलिबागवर डोळा आहे. पेण येथे 5 ते 10 लाख रुपये प्रती एकर भावाने जागा संपादन करायची आणि हजारो कोटी रुपयांना संपादित केलेली जागा विकायची, सिडकोच्या अधिकाऱ्यांनी लाल दिव्याच्या गाड्या फिरवायच्या. आम्ही 12.5 टक्के जागेची मागणी केली की अधिकारी सांगतात आमचे काम नाही. मागाहून देऊ असे सांगणार. आता आम्ही शहाणे झालो आहोत. तिसरी पिढी आता काम करावयास लागली आहे.

नंतर एफ.1..

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील.....

आता आम्हाला कळायला लागले की, मार्केटमध्ये जागेला किती भाव आहे. आमची मुले आता वेबसाईटवर जाऊन जगात काय चालले याची माहिती घेऊ लागले आहेत, त्यामुळे निदान आता तरी सरकार आम्हाला अशा प्रकारे फसवू शकत नाही. माझ्या रायगड जिल्हा सहकारी बँकेकडे 800 कोटी रुपये पडून आहेत. शासनाने तसा प्लॅन जाहीर केला तर आम्हीच फायनान्स करुन आमच्या जमिनीवर इमारती बांधू शकतो. त्यासाठी आता अंबानी किंवा हिरानंदानीसारख्या मोठमोठ्या बिल्डरांची गरज नाही तर आम्हीच हिरानंदानी निर्माण करु शकतो, फक्त शासनाने तसा मनोदय व्यक्त करुन प्लॅन जाहीर करावा अशी माझी विनंती आहे. असा प्लॅन जाहीर करुन ज्याप्रमाणे खाजगी विकासकाला जास्तीचा एफएसआय सरकार देते तोच एफएसआय आम्हाला सुध्दा द्या, आम्ही सुध्दा तो विकास करु शकतो. म्हणून आमचा विकासाला विरोध नाही हे मी पुन्हा सांगू इच्छितो. रायगड जिल्ह्यातील शेतकऱ्याला त्याच्या जमिनीच्या मोबदल्यात 12 कोटी रुपये मिळाले तर काय परिस्थिती होणार आहे हे देखील शासनाने लक्षात घेतले पाहिजे. आज अलिबागसारख्या ठिकाणी सुध्दा जेथे 800 रुपयाचा भाव होता तेथे आता प्रति चौरस फुटाचा भाव 3500 रुपये इतका आहे. समुद्र किनाऱ्याच्या जागेची किंमत तर 20 कोटी रुपये हेक्टर अशी आहे. यावरुनच लक्षात येईल की, मार्केटमध्ये जमिनीचे भाव कोठून कोठे गेले आणि यापुढे कोठपर्यंत जाणार आहेत. अशा परिस्थितीत शासनाने आमच्या शेतकऱ्यांची 12.5 टक्के विकसीत जमीन लवकरात लवकर देण्याचे काम केले पाहिजे अशी मी विनंती करतो. यामध्ये शासनाचे अधिकारी मात्र एका ठिकाणी भराव टाकतात, नंतर तोच भराव पुन्हा काढून बाजूच्या जागेत टाकून पुन्हा खड्डा निर्माण केला जातो व त्याची स्वतंत्र बिले काढली जातात. मी उगाच बोलत नाही तर माझ्याकडे यासंबंधीचे पुरावे सुध्दा आहेत. हे ऐकून लॉबीत बसलेले अधिकारी सुध्दा हसतात, कारण त्यांना ती गोष्ट पटते, त्यांनाही वस्तुस्थिती माहीत आहे. अशा प्रकारे करोडो रुपयाची रॉयल्टी अलिबाग जिल्ह्यात मिळते. ही रॉयल्टी चार चार ठिकाणी वापरली जाते. रेल्वे, सिडको आणि जेएनपीटीला तीच रॉयल्टी वापरुन महिन्याला रायगड जिल्हाधिकाऱ्याला 10 कोटीची रॉयल्टी मिळत असेल. अशी परिस्थिती असतानाही शासन यासंबंधीचे धोरण निश्चित करीत नाही. शासन फक्त पैसे कसे मिळतील असेच धोरण ठरविण्याचा विचार करीत आहे. पण ज्यांच्या जिवावर

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील.....

सिडको उभी राहिली त्यांना गेल्या 30 वर्षात सुध्दा देय असलेली 12.5 टक्के जमीन शासन देऊ शकत नाही, ही गोष्ट पुरोगामी म्हणविणाऱ्यांना भूषणावह नाही. ज्या शेतकऱ्यांच्या नावावर आपण राज्य करतो, ज्यांच्या हितासाठी बोलतो त्यांच्या हितासाठी मात्र अजुनही ही जमीन देऊ शकत नाही हे दुर्दैव आहे, याबाबत योग्य अशी भूमिका शासनाने घेतली पाहिजे, अशी माझी विनंती आहे. तसेच याबाबत शासनाचे कोणते नियोजन आहे, सिडकोचा विस्तार कोठपर्यंत नेणार आहे, मेट्रोपोलिटन सिटीचा पहिला टप्पा, दुसरा टप्पा कोठपर्यंत नेणार आहे, खोपोलीपर्यंत मुंबई जाणार आहे असे आम्हाला समजले. अशा वेळेस आमच्या जमिनीची किंमत किती येणार आहे याचाही विचार करणे आवश्यक आहे. मी ज्यावेळेस उत्तर रायगडमध्ये जातो तेव्हा प्रत्येकाला सांगतो की जमीन विकू नका आणि विकण्याची गरज वाटलीच तर मी आपल्याला बँकेकडून पैसे देतो पण आपली जमीन विकून पैसे मिळविण्याचा प्रयत्न करु नये. आमच्या माहितीप्रमाणे मुंबई खोपोलीपर्यंत जाणार आहे, तर तिकडे माणगावपर्यंत जाणार आहे. अशा प्रकारे शासनाने पूर्वी एक रुपया दराने जागा घेतली त्याचे रेकॉर्ड आहे. शासनाला खऱ्या अर्थाने विकास करावयाचा असेल तर अशा सर्व बाबींचा विचार करणे आवश्यक आहे. परवा सुध्दा सभागृहात मी बोललो होतो की शैक्षणिकदृष्ट्या ज्याची गुणवत्ता वाढली तोच या जगात तग धरु शकतो.

यानंतर श्री. जुन्नरे ....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील ...

त्यामुळे तशा प्रकारची योजना तयार करण्याची आवश्यकता आहे. या ठिकाणी परप्रांतीय येऊन जागा खरेदी करीत आहेत. या ठिकाणी पाच वर्षाने काय परिस्थिती निर्माण होणार आहे याची माहिती परप्रांतीयांना आहे. शेतक-यांचे शासनाने प्रबोधन केले तर येथील शेतकरी जमीन विकणार नाही. परंतु राज्य शासन शेतक-यांचे प्रबोधन करीत नाही. आपण 4 एफएसआय कोठ पर्यंत देणार आहात ते तरी आम्हाला समजू द्या. एमएमआरडीएचा 4 एफएसआय कोठल्या एरियात, कोठपर्यंत देणार आहात याची आम्हाला माहिती हवी आहे. आम्ही यासंदर्भात आपल्या घरी आलो होतो त्यावेळेस तुमचे अधिकारीही उपस्थित होते तेव्हा मी दोन वेळा विचारले होते की, 4 एफएसआय कोठपर्यंत आहे तेव्हा अधिका-यांनी पटकन फाईल बंद केली होती. त्यामुळे 4 एफएसआय एवढया एवढया भागामध्ये मिळणार आहे हे जनतेला एकदा कळू द्या. माझ्या जमिनीची किंमत किती आहे त्याची माहिती आम्हाला मिळाली पाहिजे. आमच्या जमिनी रिलायन्स वाला घेईल व नंतर आम्हाला समजेल की, आमच्या जमिनीत 4 एफएसआय येणार होता. पनवेल परिसरात आर झोन कोणत्या परिसरात आहे याची आम्हाला माहिती मिळाली पाहिजे. जमीन विकण्याच्या अगोदर रिझर्व्हेशन दाखवले जाते परंतु शेतक-याने जमीन विकल्याबरोबर त्या जमिनीवरील रिझर्व्हेशन उठवले जाते. सर्व क्षेत्राची माहिती जनसामान्यांना कळण्यासाठी जमिनीच्या संदर्भातील सर्व माहिती वेबसाईटवर टाकली गेली पाहिजे अशा प्रकारची भूमिका शासनाने घेण्याची आवश्यकता आहे.

या विषयाच्या संदर्भात सन्माननीय केंद्रीय मंत्री श्री. शरद पवार साहेबांनी दिल्ली येथे एक बैठक आयोजित केली होती. या बैठकीसाठी सर्वपक्षीय शेतक-यांचे नेते दिल्लीला गेले होते. गेल्या सहा महिन्यापूर्वी याच विषयाच्या संदर्भात आंदोलन झाले होते त्यावेळेस सुध्दा अशाच प्रकारचे आश्वासन देण्यात आले होते. जेएनपीटी आता म्हणत आहे की, यासंदर्भात केंद्र शासनाची परवानगी लागणार आहे. केंद्र सरकारची परवानगी मिळवून देण्याचे आश्वासन गेल्या आठवडयात दिल्लीच्या बैठकीत केंद्र सरकारच्या वतीने माननीय केंद्रीय कृषी मंत्री श्री. पवार साहेबांनी दिलेले आहे. या कामाची गती आणि कालमर्यादा ठरविण्याची नितांत आवश्यकता आहे. जेएनपीटी मधील स्थानिक लोकांच्या नोक-यांचा प्रश्न आहे, त्यांना ट्रेनिंग देण्याचा प्रश्न आहे. या ठिकाणी ट्रेनिंग

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील ...

मिळत नसल्यामुळे आम्ही शैक्षणिक कॉलेज काढण्याची अनुमती मागतो आहेत. कॉलेज काढण्याच्या कामी मदत करण्याचे आश्वासन आम्हाला देण्यात आलेले आहे. आज जेएनपीटीमध्ये करोडो रुपयांचा व्यवहार होत आहे. परंतु या ठिकाणच्या लोकांना म्हणावा तसा आर्थिक, शैक्षणिक फायदा होत नाही. या ठिकाणी नागरी सुविधांचा प्रश्न मोठया प्रमाणात निर्माण झालेला आहे. या चर्चेच्या निमित्ताने मी राज्य शासनास एवढीच विनंती करतो की, 12.5 टक्क्याचा प्रश्न, स्थानिक प्रश्न, 12 बलुतेदारांचा प्रश्न निर्माण झालेला आहेत. बलुतेदारांची परिस्थिती अत्यंत शोचनीय झालेली आहे. गावातील काही ठराविक मंडळी पैसे कमावित आहेत परंतु जो गरीब आहे, जो आपल्या पर्यंत पोहचू शकत नाही त्यांना सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात माननीय मंत्री महोदयांनी ठोस निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. माननीय मंत्री महोदयांच्या कारकिर्दीमध्ये 12.5 टक्क्याचा प्रश्न सुटला तर त्यांच्या कारकिर्दीत तो ऐतिहासिक निर्णय होईल अशी अपेक्षा व्यक्त करुन मी माझे विचार पूर्ण करतो.

जय हिंद, जय महाराष्ट्र..

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. एस.क्यू. ज़मा यांचे हिदी भाषण...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी तालिका सभापती ॲड.उषा दराडे)

श्री एस. क्यु. जमा (विधानसभा द्वारा निर्वाचित) : सभापति महोदया, विधान परिषद नियम 97 के अंतर्गत हमारे वरिष्ठ माननीय सदस्य श्री जयंत पाटील जी ने रायगड जिले के उरण तालुका से संबंधित एक महत्वपूर्ण विषय यहां पर उपस्थित किया है. प्रस्ताव में बताया गया है कि करीब 30 वर्ष पहले सिडको ने वहां के लोगों की जमीन अधिग्रहित की थी तथा प्रकल्पग्रस्त लोगों को वहां पर साड़े बारह टक्के भूखंड देने का आश्वासन भी शासन ने दिया था. लेकिन वह आश्वासन सरकार की ओर आज तक भी पूरा नहीं किया गया है.

सभापति महोदया, जो बातें माननीय सदस्य जयंत पाटील साहब ने यहां पर बतायी हैं, उन बातों को मैं यहां पर दोहराना नहीं चाहूंगा. सिर्फ दो-तीन बुनियादी बातों का जिक्र ही मैं यहां पर करना चाहूंगा. मैं बताना चाहूंगा कि काफी विचार करने के बाद केंद्र की हमारी यूपीए सरकार ने दिनांक 31 अक्तूबर 2007 को आर एण्ड आर समिति बनायी. एसईजेड से संबंधित कानून सन् 2005 में बनाया गया था. उसके हिसाब से जितनी भी लेंड एक्वायर होगी, उस लेंड का 80 परसेंट भाग प्रोसेसिंग जोन के लिए होगा और 20 परसेंट भाग नॉन प्रोसेसिंग जोन के लिए होगा.

30 वर्ष पहले रायगड जिले में सिडको ने जमीन अधिग्रहित की. वह जमीन उन्होंने एसईजेड एक्ट के अंतर्गत नहीं ली. बल्कि उन्होंने वह जमीन लेंड एक्वीजिशन एक्ट के अंतर्गत ली. क्योंकि उस समय एसईजेड एक्ट था ही नहीं. हमारा जो लेंड एक्वीजीशन एक्ट है वह अंग्रेजों के जमाने में सन् 1894 में बनाया गया था और लेंड एक्वीजिशन एक्ट के सेक्शन 4,7,8,9 के अंतर्गत कम्पलसरी एक्वीजिशन राइट था.

किसी पब्लिक इंटरेस्ट के लिए यदि सरकार को जमीन लेनी है, सरकार को स्टील प्लांट बनाना है, रेलवे ट्रेक डालना है या पाब्लिक इंटरेस्ट का कोई दूसरा काम यदि सरकार को करना है तो लेंड एक्वीजिशन का अधिकार सरकार ने लेंड एक्वीजिशन एक्ट के माध्यम से अपने हाथ में लिया. लेकिन उस एक्ट में यह प्रोवीजन बिल्कुल नहीं है कि आप गरीब

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री जमा....

किसान की लेंड एक्वायर करके वह जमीन आप किसी दूसरे बड़े डॅवलपर या किसी बड़ी सॉफ्टवेअर कंपनी को वह जमीन दे दें और उस जमीन को विकसित करके वे बड़ी कंपनिया उस जमीन से खूब पैसा कमायें. लेकिन जिस विषय को माननीय सदस्य ने यहां पर चर्चा के लिए रखा है, वहां पर ऐसा ही हुआ है. वहां पर सिडको ने किसानों की जमीन ली. उन्होंने वह लेंड जेएनपीटी को दी तो यह बात हम समझ सकते है, क्योंकि वह काम पब्लिक इंटरेस्ट में है लेकिन यहां पर तो लैंड एक्वायर करने के बाद वह जमीन ज्यादा पैसे लेकर प्राइवेट कंपनी या बड़े बिल्डरों को दी गयी है. सिडको को हुए इस बड़े आर्थिक लाभ का कोई भी फायदा हमारे गरीब किसानों को नहीं दिया गया है. उस समय यह निर्णय लिया गया था कि साड़े बारह टक्के डॅवलपप लैंड वहां के संबंधित किसानों को दी जाएगी. परन्तु 30 साल बाद भी वह डॅवलप लेंड उन किसानों को नहीं दी गयी. यही वजह है कि भारत सरकार लैंड एक्वीजिशन एक्ट में बड़े पैमाने पर बदलाव करना चाहती है. उस बारे में चर्चा हो रही है. वह प्रस्ताव अभी पेंडिंग है. लेकिन सोचा जा रहा है कि कौन-कौन से नये प्रावधान करके गरीब किसानों को फायदा पहुंचाया जा सकता है.

लैंड एक्वीजिशन एक्ट में अभी पुनर्वसन का प्रावधान नहीं है. इसीलिए हमारी सरकार उस एक्ट में बड़े पैमाने पर सुधार करना चाहती है. किसानों को बाजार भाव से पैसे दिलाने के लिए हमारी केन्द्रीय सरकार ने दिनांक 31 अक्तूबर 2007 को आर एण्ड आर. पॉलिसी बनायी थी. उस पॉलिसी में मार्केट रेट से पैसे दिलाने का कॉंसेप्ट है. सभी राज्यों के पब्लिक सेक्टर्स को यह आदेश दिया गया है कि मार्केट रेट से ही किसानों को मुआवजा दिया जाये. हमारा कहना है कि इस बात की कोशिश की जाए कि प्रकल्पग्रस्त हर परिवार के एक व्यक्ति को सरकारी नौकरी दी जाये. नौकरी देना यदि संभव नहीं है तो मुआवजे के तौर पर एक अच्छी खासी नकद रकम प्रकल्पग्रस्त किसानों को दी जाये.

तालिका सभापती : सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छिते की, नियम 97 अन्वये अल्पकालीन चर्चा माननीय मंत्र्यांच्या उत्तरासह 11.15 वाजता संपवावयाची असल्यामुळे त्यांनी थोडक्यात आपले विचार मांडावेत. जमा साहब दो तीन मिनट के अंदर आप अपना भाषण समाप्त

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापति..

कर दीजिए, क्योंकि माननीय सदस्य श्री दलवाई साहब भी यहां पर भाषण करना चाहते हैं.

श्री एस. क्यु. जमा : ठीक है, सभापति महोदया, इस विषय पर बोलते हुए मैं यही बता रहा था कि ये सब बातें उस एक्ट में नहीं होने की वजह से भारत सरकार ने यह आर एण्ड आर पॉलिसी सन् 2007 में बनायी. सभी राज्यों से कहा गया कि आप इसका पालन करें. किसानों ने एसईजेड का विरोध पूरे देश में किया है. महाराष्ट्र हो या पश्चिम बंगाल, सभी जगह उसका विरोध हुआ. हमारे नागपुर में भी उसका विरोध हुआ. एसईजेड के अंतर्गत एक लाख रुपए या डेढ़ लाख रुपए या सिर्फ 80 हजार रुपए प्रति एकड़ के हिसाब से किसानों की बहुत अच्छी जमीन सरकार ने ली और केवल 6 महीने बाद ही, वह कीमती जमीन सरकार ने 20 लाख रुपए या 30 लाख रुपए प्रति एकड़ के हिसाब से बड़े बिल्डर्स या सॉफ्टवेयर की बड़ी कंपनियों को बेच दी.

हम जानना चाहते हैं कि किसानों ने क्या पाप किया है. यदि आपने उनकी जमीन एक लाख रुपए या डेढ़ लाख रुपए प्रति एकड़ के हिसाब से ली और उसी जमीन को आप डॅवलप करके 20 लाख रुपए या 30 लाख रुपए प्रति एकड़ के हिसाब से दूसरे लोगों को दे रहे हैं तो आपको होने वाले इस बड़े फायदे की रकम का कुछ हिस्सा आप किसानों को क्यों नहीं दे रहे हैं ? जब हमने मिहान कार्गो हब का मामला उठाया तो हमें बताया गया कि यह एग्रीड प्रिंसिपल है कि सिडको द्वारा साढे 12 परसेंट डॅवलप लैंड किसानों को दी जाएगी. लेकिन अभी इसको लागू नहीं किया गया है. मिहान कार्गो के प्रश्न पर भी यहां चर्चा होने वाली है. माननीय मंत्री महोदय से मैं अनुरोध करूंगा कि इन बातों पर सरकार द्वारा तुरंत निर्णय लिया जाना चाहिए. यहां पर हमारे माननीय सदस्य श्री जयंत पाटील साहब ने भी कहा कि सरकार ने सिर्फ एक रुपए का टोकन लेकर बहुत सारी जमीन शिक्षण संस्थाओं को लीज पर दी है. यह आपने अच्छा किया क्योंकि ऐसा करने से शिक्षा का बहुत प्रसार हमारे राज्य में हुआ है तथा हमारा राज्य और भी आगे बढ़ा है. हमारे राज्य में हायर एज्यूकेशन तथा टेक्नीकल एज्यूकेशन का बहुत विस्तार हआ है. इन संस्थाओं को आपने जो जमीन दी, उसकी आलोचना हम नहीं करना चाहते. हम यह नहीं कहते कि आपने उनको जमीन क्यों दी. हमारा सिर्फ इतना ही कहना है

...4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री जमा....

कि उन संस्थाओं ने इस जमीन का उपयोग यदि कमर्शियल फायदे के लिए किया है तो कोई एक कानून बनाकर उन संस्थाओं पर लेवी लगायी जाये, ताकि कुछ पैसा सरकार को मिल सके और उस पैसे का उपयोग हमारी सरकार अपने राज्य में शिक्षा का और अधिक विस्तार करने के लिए भी कर सकती है. मुझे पूरी उम्मीद है कि वे संस्थाएं इतनी सक्षम जरुर हैं कि 2-4 या 5 परसेंट लेवी वह सरकार को आसानी से दे सकती हैं. ऐसा करने से हजारों करोड़ रुपए सरकार को आसानी से मिल सकते हैं.

इसके अलावा प्रकल्पग्रस्त लोगों को साढे बारह परसेंट डॅवलप लैंड देने का जो कॉंसेप्ट है, उस बारे में भी सरकार को जल्द से जल्द निर्णय लेना चाहिए. रायगड के बारे में यदि कोई उचित निर्णय सरकार लेती है तो प्रकल्पग्रस्तों के दूसरे अनेक मामले भी सरकार आसानी से सुलझा सकती है. मेरे इन सुझावों के बारे में माननीय मंत्री महोदय जरुर उत्तर देंगे, ऐसी मुझे उम्मीद है.

माननीय सभापति महोदया, आपने मुझे बोलने का मौका दिया इसके लिए आपको भी बहुत-बहुत धन्यवाद.

-0-

.....आया - 1

अशुधारित प्रत / प्रसिद्धीपूर्वी नाही

श्री. हुसेन दलवाई (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी अतिशय चांगल्या प्रकारे हा विषय सभागृहामध्ये उपस्थित केला आहे.त्यामुळे या विषयावर मी जास्त वेळ बोलणार नाही. वर्षानुवर्षे हा प्रश्न प्रलंबित राहिलेला आहे. त्यामुळे या महाराष्ट्रामध्ये प्रकल्पग्रस्तांच्या बाबतीत असे वातावरण निर्माण झाले आहे की, प्रकल्पग्रस्तांना आम्ही भरपाई देऊ असे सांगावयाचे प्रत्यक्षात त्यांना काहीच द्यावयाचे नाही. शेतकऱ्यांना अशा प्रकारची वागणूक मिळत असल्यामुळे आणि लोकांचा शासनाच्या आश्वासनांवर विश्वास न राहिल्यामुळे आज कुणीही प्रकल्पाला जमीन देण्यास तयार होत नाही. त्यामुळे राज्यामध्ये नवीन उद्योग येणे बंद झाले आहे. सन 1984 मध्ये त्यावेळचे शेकापचे आमदार श्री. दि. बा. पाटील यांनी या प्रश्नासाठी लढा दिला होता, त्यामध्ये 5 जण हुतात्मे झाले होते व असंख्य लोक तुरुंगात गेले होते. त्यानंतर शासनाला साडे बारा टक्के जमीन देण्याबाबतचा निर्णय घ्यावा लागला. आज जेएनपीटी, सिडको सारखे मोठ मोठे प्रकल्प या मधून उभे राहिले आहेत. रायगड जिल्हा मुंबईच्या शेजारी आहे, हाच केवळ त्या जिल्ह्याचा गुन्हा आहे. या लोकांनी सिडकोला जमिनी दिल्यामुळे नवी मुंबई सारखे शहर उभे राहिले, जेएनपीटी सारखे मोठे बंदर उभे राहिले. आज त्याठिकाणी रिलायन्स कंपनी सुध्दा मोठया प्रमाणामध्ये शेतकऱ्यांच्या जमिनी घ्यावयास लागली आहे. त्या काळात शेतकऱ्यांकडून 100 ते 500-600 रुपये एकर या भावाने जमिनी विकत घेण्यात आल्या. शेतकऱ्यांकडून घेण्यात आलेल्या या जमिनी दुसऱ्यांना विकून त्यामधून मोठया प्रमाणात नफा कमावितात व आपला धंदा करतात. रिलायन्स कंपनीने सुध्दा त्यांच्या उद्योग व्यवसायासाठी जमीन घेतली तर गोष्ट वेगळी आहे. परंतु या कंपनीने शेतकऱ्यांकडून कमी भावामध्ये जमीन विकत घेऊन त्या जमिनीवर घर बांधणी प्रकल्प उभा करुन त्यामधून पैसे कमाविणार आहे. हे प्रकार शासनाने बंद केले पाहिजेत. अशा प्रकारे ज्या शेतकऱ्यांच्या अतिरिक्त जमिनी घेण्यात आल्या आहेत त्यांचा प्रश्न शासनाने सोडविला पाहिजे.

सभापती महोदय, त्या भागातील प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करीत असतांना त्या ठिकाणी आयटीआय सारख्या तत्सम संस्था निर्माण करुन तेथील तरुणांना प्रशिक्षित करुन त्यांना नोकऱ्या उपलब्ध करुन दिल्या पाहिजेत.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हुसेन दलवाई . . . .

आम्हाला तेथे उद्योगधंदा द्यावा, तेथेच नोकरी द्यावी आणि तसे का होऊ शकत नाही. त्याठिकाणी बाहेरच्या भागातील सुरक्षा रक्षक कशासाठी ठेवले जातात ? जर तेथील कोणी सुरक्षा रक्षक म्हणून काम करण्यास तयार असतील तर त्यांना घेण्यात यावे अशी या लोकांची साधी मागणी आहे. सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील साहेबांना माहिती आहे की, मी गेली 3-4 वर्षे उरण येथील मच्छिमारांचा प्रश्न घेऊन सतत संबंधितांकडे खेटे घालत आहे. पण त्याबाबत निर्णय होत नाही. त्याठिकाणी सिडको आहे, जे.एन.पी.टी.आहे, ओ.एन.जी.सी. या संस्था प्रकल्पग्रस्तांना काही ना काही रक्कम देण्यास तयार आहेत. पण प्रत्यक्षात सरकारच याबाबतीत निर्णय घेत नाही. मी सदनाचा जास्त वेळ घेणार नाही. आज या चर्चेच्या निमित्ताने माननीय मंत्री महोदयांनी यासंबंधात काही ठोस आश्वासन दिले पाहिजे. केवळ आश्वासन नाही तर आम्ही हे करु असे सांगितले पाहिजे. आता तेथे पुन्हा लढा सुरु होणार आहे. आपल्याला पुन्हा तेथे कोणी हुतात्मे व्हावयास पाहिजेत काय ? तेथील लोकांनी परत जेलमध्ये जावे असे वाटते काय ? सरकारची विश्वासार्हता वाढेल यासाठी माननीय मंत्री महोदय ठोस आश्वासन देतील अशी मी अपेक्षा करतो.

. . . .जे-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, याठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी सिडकोच्या संदर्भात म्हणजे प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना संपादित जमिनीच्या बदल्यात साडेबारा टक्के भूखंड देण्याचे जे धोरण जाहीर केलेले आहे त्या अतिशय महत्वाच्या विषयावर चर्चा उपस्थित केलेली आहे. परंतु त्याअनुषंगाने मुंबईच्या जवळ एम.एम. आर. डी.ए.चा जो भाग आहे म्हणजे आता अलिबागपर्यंत तिसरी मुंबई विकसित होत आहे, त्यामुळे येथील जमिनीचे महत्व वाढलेले आहे.

सभापती महोदय, याबाबत मला दोनच मुद्दे मांडावयाचे आहेत. तसेच हा विषय देखील गंभीर आहेच. कारण प्रकल्पग्रस्तांना सांगितल्यानंतर, कबूल केल्यानंतर, जाहीर केल्यानंतर त्याबाबत अंमलबजावणी होत नाही आणि गरीब शेतकऱ्यांना अडचणीमध्ये आणले जाते.त्याच पध्दतीने हजारो एकर जमिनी घेतल्या जातात. ठाणे जिल्ह्यामध्ये विमानतळासाठी एम.आय.डी.सी. च्या जमिनी घेतलेल्या आहेत. निरनिराळया प्रोजेक्टसाठी घेतलेल्या आहेत आणि त्या जमिनी 15-20 वर्षे तशाच पडून आहेत. तसेच दापचरी प्रकल्पाबाबत सदनामध्ये जाहीर करण्यात आले की, आपण आता दापचेरी प्रकल्प बंद केलेला आहे. पण त्यावेळी तेथील आदिवासींच्या जमिनी अतिशय अल्प मोबदला देऊन घेण्यात आल्या आहेत आणि त्या जमिनी देखील तशाच पडून आहेत. त्यामुळे या चर्चेच्या निमित्ताने मला सांगावयाचे आहे की,निरनिराळया प्रोजेक्टसाठी जमिनी घ्याव्या लागतात, अशा प्रकारे त्या-त्या भागातील शेतकऱ्यांच्या, आदिवासींच्या जमिनी निरनिराळया प्रोजेक्टसाठी घेण्यात येतात. परंतु जर ते प्रोजेक्ट होत नसतील किंवा रद्द झाले असतील मग एकतर त्या जमिनी शेतकऱ्यांना परत करावयास पाहिजेत. यासाठी निरनिराळया प्रकारची आंदोलने होत असतात आणि हे आदिवासी गरीब असतात. डहाणू, तलासरी भागातील आदिवासी अतिशय गरीब आहे. येथील आदिवासींच्या जमिनी दापचरी प्रकल्पासाठी घेण्यात आल्या आहेत. पण तो प्रकल्प होत नसेल तर त्या जमिनी आदिवासींना परत द्यावयास पाहिजेत. याठिकाणी मलंगपट्टीमध्ये निरनिराळया विभागांनी विविध प्रोजेक्टसाठी हजारो एकर जमीन घेतलेली आहे. परंतु प्रत्यक्षात तेथे प्रोजेक्ट होणार नाहीत. त्यामुळे या जमिनी दुसऱ्यांना न देता पुन्हा संबधित शेतकऱ्यांना दिल्या जाव्यात अशा प्रकारचे मी माननीय मंत्री महोदयांना निवेदन करु इच्छितो. धन्यवाद.

. . . .जे-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव (वन राज्यमंत्री) : सभापती महोदया, याठिकाणी सदनाचे ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.जयंतरावजी पाटील यांनी नियम 97 अन्वये सिडको आणि जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्टसाठी शेतकऱ्यांच्या विकसित केलेल्या ज्या जमिनी संपादित करण्यात आलेल्या आहेत, त्यापैकी त्यांना साडेबारा टक्के जमिनी परत मिळाव्यात, त्याचा मोबदला मिळावा. त्यांना तेथे रोजगार मिळावा आणि त्या भागातील प्रत्येक गोष्टीमध्ये त्यांचा प्राधान्याने हक्क असावा अशा प्रकारचा प्रस्ताव सदनासमोर मांडलेला आहे.

सन्माननीय सभापती महोदया, उरण, ठाणे आणि पनवेल या तीन तालुक्यामध्ये 95 गावांमध्ये आणि जवळजवळ 344 कि.मी. म्हणजे 34,000 हेक्टर क्षेत्रामध्ये वसलेला हा सिडको प्रकल्प आहे. सिडकोचा प्रकल्प वसविण्याच्या पाठीमागे कारण असे आहे की, मुंबई शहरावर तसेच मुंबई शहरातील नागरिकांना द्याव्या लागणाऱ्या वाढत्या नागरी सुविधा यामुळे तेथील प्रशासनावर येणारा वाढता ताण आणि वाढत असणारी लोकसंख्या लक्षात घेता पर्यायाने दुसरे एखादे नवी मुंबई किंवा पर्यायी मुंबई सारखे शहर वसविण्यात यावे अशा उद्देशाने 1970 मध्ये नव्या मुंबईमध्ये सिडको प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली. आज आपण सिडकोचे एकंदरीत वैभव आणि वर्णन करीत आहोत. परंतु आपण थोडे मागे देखील गेले पाहिजे. 1970 मध्ये जेव्हा सिडको प्राधिकरण तयार करण्यात आले आणि त्या माध्यमातून अनेक प्रकारची डेव्हल्पमेंट झालेली आहे.

यानंतर कु.थोरात . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव...

काही उणिवा प्रत्येक गोष्टीमध्ये रहात असतात, त्याप्रमाणे यामध्येही राहिल्या असतील. काही दोषही असतील, चांगले काम करीत असतांना सुध्दा कळत न कळत काही उणिवा राहिल्या असतील हे नाकारण्याचे काही कारण नाही. पण त्यावेळी 20 लाख लोकांची वस्ती असलेले आणि या 20 लाख लोकांना चांगल्या प्रकारच्या नागरी सुविधा देणारे एक शहर वसविणे हा या पाठीमागचा उद्देश होता. महाराष्ट्र शासनाने त्यावेळी या प्राधिकरणाला केवळ पाच कोटी रुपये दिले होते. पाच कोटी रुपये देऊन नवीन शहर वसविण्याकरिता हे प्राधिकरण तयार करण्यात आले होते. आता 20 लाख लोकसंख्येची मर्यादा या शहराने कधीच ओलांडलेली आहे. हे शहर
झपाटयाने वाढत आहे. आता 40 लाख लोकांची सोय आणि 40 लाख लोकांची वस्ती वसविण्याच्या दृष्टीने त्यांना लागणाऱ्या 21 व्या शतकातील अद्ययावत सोयी- सुविधा उपलब्ध करुन देणे, पुढच्या 50-60 वर्षाचा विचार करुन आणखी नवीन नवीन सोयी उपलब्ध करुन देणे या उद्देशाने या ठिकाणी सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्यात येत आहेत.

सभापती महोदय, या शहरामध्ये या सोयी-सुविधा उपलब्ध करुन दिल्या जात असताना जेएनपीटी हा विषय, खऱ्या अर्थाने सिडकोचा विषय नव्हता. परंतु हा विषय समोर आला. हे जवाहरलाल नेहरु ट्रस्ट म्हणजे हे जुने न्हावाशेवा बंदर आहे. हे बंदर विकसित करावयाचे असेल तर या ठिकाणी सिडको जमिनी संपादित करीत असल्यामुळे या न्हाव्हाशेवा प्रकल्पा करिता सुध्दा सिडकोने जमिनी संपादित कराव्यात, अशा प्रकारचा एक विचार समोर आला. त्याप्रमाणे सिडकोने जमिनी संपादित केल्या. एकूण 2579 हेक्टर इतकी जमीन सिडकोने संपादित केली. त्या 2579 हेक्टर जमिनी पैकी 1125 हेक्टर जमीन खाजगी शेतकऱ्यांकडून घेतलेली आहे. बाकीची जमीन शासनाची आहे किंवा त्या ठिकाणी काही मिठागरे होती त्यापैकी ही जमीन आहे. परंतु 1125 हेक्टर जमीन या जेएनपीटी करिता सिडकोने संपादित केली होती. सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी आज अलीबाग येथील एक एकर जमिनीचा भाव 20 कोटी रुपये असल्याचे संगितले आहे. उरण येथे नव्हे, वाशीमध्ये नव्हे तर त्यापुढे जाऊन अलीबाग येथील जमिनीचा भाव आज 20 कोटी रुपये असल्याचे सांगितले आहे. त्या काळामध्ये पर एकर 40 हजार रुपये भाव देण्यात यावा अशी शेतकऱ्यांची मागणी होती. त्याप्रमाणे शासनाने पर एकरी 40 हजार रुपये भाव दिला नाही. पण त्यावेळी पर एकर 30 हजार रुपये भाव शेतकऱ्यांच्या जमिनीला दिला. अर्थात

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव....

आता या जमिनीचे मोल अनमोल आहे. अनन्यसाधारण आहे. शेतकरी आपल्या जमिनीकडे स्वत:च्या आईप्रमाणे पाहतो यामध्ये दुमत असण्याचे काही कारण नाही. परंतु 1970 साली सोन्याचा भाव 120 रुपये तोळा होता. म्हणजे ज्यावेळी सोन्याचा भाव 120 रुपये तोळा होता, त्यावेळी शासनाने येथील जमिनीला पर एकरी 30 हजार रुपये भाव दिला आहे. याचा अर्थ त्या शेतकऱ्याला सर्व मोबदला दिला असे मी मान्य करीत नाही तरी सुध्दा त्या काळामध्ये शेतकऱ्यांच्या जमिनीला चांगला भाव दिलेला आहे.

सभापती महोदय, त्यानंतर दुसरा एक प्रश्न समोर आला तो असा की, शासनाने आहे तशा जमिनी विकत घेतल्या आणि त्या विकसित केल्या. या विकसित केलेल्या जमिनीला जे इन्फ्रास्ट्रक्चर लागते मग ते वीज असेल, पाणी असेल आणि रस्ता असेल या सोयी-सुविधा निर्माण करुन या जमिनी विकसित केलेल्या आहेत. या विकसित केलेल्या जमिनीपैकी 25 टक्के जमीन आम्हाला परत द्यावी अशा प्रकारची एक मागणी समोर आली. ही मागणी नव्हती तर फक्त ती चर्चाच होती. त्यानंतर एक खूप मोठे आंदोलन झाले. त्यानंतर जेएनपीटी जर मागणी करीत आहे तर त्याप्रमाणे आपण सुध्दा आपल्या शेतकऱ्यांना का देऊ नये अशा प्रकारचा निर्णय सिडकोने घेतला आणि त्यानंतर दिनांक 6 मार्च, 1990 साली सिडकोने आणि महाराष्ट्र शासनाने निर्णय घेतला की, एकूण जेवढी जमीन ॲक्वायर केलेली आहे त्यापेकी नव्हे तर प्रत्यक्षपणे जो शेतकरी शेती करीत होता, प्रत्यक्षपणे जो शेतकरी ती जमीन कसत होता त्या शेतकऱ्याला एकूण घेतलेल्या जमिनी पैकी विकसित केलेली साडे बारा टक्के जमीन परत देण्यात यावी. त्यामुळे जेएनपीटीमधील शेतकऱ्यांचा आग्रह अधिक वाढला. त्यानंतर हे प्रकरण हायकोर्टात गेले. सन 2001 साली हायकोर्टाने असा निर्णय दिला की, जेएनपीटीमध्ये जमिनी गेलेल्या शेतकऱ्यांना सुध्दा साडे बारा टक्के जमीन परत देण्यात यावी. त्याच्या विरोधात सिडको सुप्रीम कोर्टात गेली. त्यावेळी सिडकोचे म्हणणे असे होते की, या जमिनी जेएनपीटी करिता घेतलेल्या जमिनी आहेत, सिडको करिता घेतलेल्या नाहीत. सिडकोने या जमिनी संपादित करण्यासाठी त्यांना मदत केलेली आहे. जेएनपीटी हे केंद्र शासनाच्या अखत्यारीत असल्यामुळे हा निर्णय केंद्र शासनाने घेतला पाहिजे आणि या जमिनी केंद्र शासनाने त्याना दिल्या पाहिजेत. त्या द्यावयाच्या की नाही याबाबतचा निर्णय केंद्र शासनाने घ्यावा,.....

यानंतर श्री. बरवड....

अशोधित प्रत / अशोधित प्रत नाही

श्री. भास्कर जाधव .....

अशा प्रकारचा सिडकोचा जो दावा होता तो जानेवारी, 2011 मध्ये सुप्रीम कोर्टाने मान्य केला आणि केंद्र शासनाने त्यांना या जमिनी परत दिल्या पाहिजेत अशा प्रकारचा निर्णय कोर्टाने दिला. त्या अनुषंगाने या राज्याचे माननीय मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण यांच्याकडे मंत्रालयामध्ये 21 मार्च, 2011 रोजी एक बैठक झाली. त्या बैठकीला केंद्र शासनाचे काही अधिकारी सुध्दा उपस्थित होते. त्या वेळी केंद्राचे शिपिंग खात्याचे मंत्री सुध्दा त्या बैठकीला हजर होते. त्या नंतर या संदर्भात दिल्लीला केंद्रीय कृषी मंत्री आदरणीय श्री. शरदचंद्रजी पवार यांच्याकडे बैठक झाली. सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी उल्लेख केल्याप्रमाणे त्या ठिकाणी सर्वपक्षीय बैठक झाली. त्या बैठकीमध्ये असा निर्णय झालेला आहे की, जेएनपीटीने विकसित केलेली साडेबारा टक्के जमीन शेतकऱ्यांना द्यावी. सन्माननीय सदस्य म्हणतात त्याप्रमाणे सभागृहात अनेक वेळा हा निर्णय झालेला आहे अशातील भाग नाही. याकरिता एकूण 160 हेक्टर जमीन लागणार आहे. ही 160 हेक्टर जमीन सुध्दा आयडेंटिफाय करण्यात आलेली आहे. त्याकरिता 140 कोटी रुपये खर्च सुध्दा झालेले आहेत. या चर्चेच्या निमित्ताने मी आपल्याला आश्वासित करु इच्छितो की, या संदर्भातील नोटिफिकेशन सुध्दा निघालेले आहे. जिल्हाधिकाऱ्यांमार्फत या संदर्भातील जमिनी आयडेंटिफाय करणे आणि त्या जमिनी त्या त्या शेतकऱ्यांना देणे याची कार्यवाही सुध्दा आता लवकरच सुरु होईल. येत्या सहा महिन्यांमध्ये ही कार्यवाही जवळजवळ पूर्ण होईल असे मी आपल्याला शासनाच्या वतीने आश्वासित करु इच्छितो. गेली कित्येक वर्षे ज्या शेतकऱ्यांनी, ज्या नेत्यांनी हा संघर्ष आणि लढा सातत्याने चालविला, शेतकऱ्यांच्या हिताकरिता सातत्याने हा जो प्रयत्न केला, मग तो सभागृहामध्ये असेल किंवा सभागृहाच्या बाहेर असेल, आंदोलनाच्या माध्यमातून असेल, या सगळ्यांना न्याय देण्याचे काम केंद्र सरकार असेल, राज्य सरकार असेल आणि आपण सर्वांनी मिळून केलेले आहे. हा प्रश्न लवकरच निकाली निघेल अशा प्रकारची ग्वाही मी आपल्याला देतो. गेली कित्येक वर्षे प्रलंबित असलेला जो प्रश्न आहे तो मार्गी लागलेला आहे, अशा प्रकारची ग्वाही मी आपल्याला देतो.

सभापती महोदय, या चर्चेच्या निमित्ताने सन्माननीय सदस्यांनी अन्य अनेक प्रश्न उपस्थित केले. सिडकोने संपादित केलेल्या ज्या जमिनी आहेत त्या पैकी ज्या साडेबारा टक्के जमिनी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव ....

शेतकऱ्यांना परत द्यावयाच्या होत्या त्या जमिनी सुध्दा पूर्ण देऊन झालेल्या नाहीत अशा प्रकारचा मुद्दा सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केला. कोणते शेतकरी या जमिनी घेण्यासाठी पात्र आहेत त्यांची व्याख्या मी मघाशी आपल्याला सांगितली. जे शेतकरी प्रत्यक्षपणे शेती कसत होते ते शेतकरी पात्र आहेत अशा प्रकारची व्याख्या आपण केलेली आहे. अशा प्रकारचे 37 हजार 493 शेतकरी जमीन पुन्हा मिळण्याकरिता पात्र ठरलेले आहेत. त्यांना 870 हेक्टर जमीन शासनाने किंवा सिडकोने देणे लागते. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, अजून 27 हजार शेतकऱ्यांना जमीन परत मिळालेली नाही. पण वस्तुस्थिती तशी नाही. आता केवळ 3 हजार 785 शेतकरी जमीन देण्याकरिता बाकी राहिलेले आहेत. आज जवळजवळ 870 हेक्टर पैकी 700 हेक्टर जमीन साडेबारा टक्केप्रमाणे शेतकऱ्यांना देऊन झालेली आहे. म्हणजे 87 ते 88 टक्के शेतकऱ्यांना जमिनी दिलेल्या आहेत. उर्वरित शेतकऱ्यांना जमिनी देण्यामध्ये काही तांत्रिक अडचणी सुध्दा असतील. काही बाबतीत कोर्टकचेऱ्यांचा प्रश्न असेल, काही बाबतीत खातेदार कोण, त्याचा मालक कोण, सातबाराला नावे कोणाची आहेत इत्यादी वेगवेगळ्या कारणास्तव 13 टक्के प्रकरणे अजूनही प्रलंबित आहेत. ती प्रकरणे सुध्दा लवकर मार्गी लावण्याचा प्रयत्न सिडकोचा विभाग करीत आहे, अशा प्रकारची मी आपल्याला ग्वाही देतो.

सभापती महोदया, सन्माननीय सदस्यांनी मांडलेल्या आणखी दोन तीन मुद्यांबाबत मी सांगू इच्छितो. ज्या साडेबारा टक्के खाजगी जमिनी द्यावयाच्या आहेत त्या संदर्भातील विषय सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी मांडला. त्या नंतर सन्माननीय सदस्यांनी दुसरा प्रश्न बारा बलुतेदारांसंबंधी मांडला. जे बारा बलुतेदार आहेत आणि जे भूमीहीन होते,

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव...

ज्यांच्या स्वत:च्या जमिनी नव्हत्या पण तेथे वर्षानुवर्षे रहात होते, अन्य छोटा मोठा व्यवसाय करीत होते. बारा बलुतेदारांची व्याख्या सर्वांना माहीत आहे. 1994 साली त्यांना 40 चौ.मी. जमीन देण्याचा शासनाने निर्णय घेतला. दुसऱ्या बाजूला 1970 साली ह्या संपादित झालेल्या जमिनी आहेत. 1970 ते 1994 पर्यंत खूप मोठा कालावधी उलटून गेला होता. 1970 साली हे बारा बलुतेदार कशा प्रकारे रहात होते, ते या व्याख्येत बसतात किंवा नाही, त्यांना 40 चौ.मी. जागा देताना ती नक्की कोणाला द्यावी हे शोधणे जिकरीचे झालेले आहे. दुस-या बाजूला तेथील जागेला सोन्यापेक्षा महत्व आले, कित्येक पटीने जागेचे भाव वाढले. त्याचे मी मघाशी उदाहरण सांगितले आहे. त्यामुळे 1 इंच इंच जागा मिळावी आणि त्यासाठी प्रत्येक जण आपला हक्क कसा प्रस्थापित करता येईल, ही जागा मिळण्यासाठी मीच कसा पात्र असू शकतो असा प्रत्येकाचा प्रयत्न असतो. तो प्रयत्न चुकीचा आहे असे मी मानत नाही. परंतु शासकीय नियमानुसार ती जागा देण्याकरिता पात्र आहे किंवा नाही हे ठरविण्यात बराच कालावधी गेल्यामुळे सिडकोला ते जिकिरीचे होऊन बसले आहे. त्यासाठी 1970 सालातील मतदार यादी मिळविणे, रेशन कार्डे घेणे, त्या काळी जे जुने लोक होते त्यांच्याकडून पुरावे गोळा करणे असा व्यापक कार्यक्रम नजिकच्या काळात सुरु करीत आहोत. 12.5 टक्के जमिनी देण्याचे काम 87 टक्के पूर्ण झाले असल्यामुळे हा कार्यक्रम व्यापक प्रमाणात घेणे आवश्यक आहे. या कार्यक्रमाला अधिक गती येईल असे मी आश्वासन देतो. असा कार्यक्रम विभागामार्फत राबविण्यात येईल अशी ग्वाही देतो.

सभापती महोदय, गरजेपोटी बांधलेल्या घरांसंबंधीचा मुद्दाही मांडण्यात आला आहे. सिडकोने जमीन संपादन केल्यावर शेतकऱ्यांनी त्या जमिनीचा मोबदला सुध्दा घेतला आहे. परंतु नंतरच्या काळामध्ये ती जमीन विकसित केली गेली नाही. त्या जमिनींचे पूर्ण मोजमाप करता आले नाही. सिडकोने त्या जमिनी खरेदी केल्या हे खरे आहे, पण सिडकोला एवढ्या मोठया व्यापक क्षेत्राची स्वत:ची मालकी प्रस्थापित करण्याची कार्यवाही करता आली नाही. नंतरच्या काळामध्ये लोकांनी गरजेपोटी घरे बांधली. ती घरे कायम करावी यासह विविध मागण्या होत्या, त्यामुळे शासनाने 22.1.2010 रोजी अशा प्रकारचा निर्णय सुध्दा घेतला आहे. हा निर्णय अंमलात आणणे अवघड झालेले आहे. आपण अर्थ असा लावतो की, ज्यांनी ज्यांनी गरजेपोटी बांधली ती घरे.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/ MMP/

श्री.भास्कर जाधव...

मघाशी सन्माननीय सदस्यांनीच सांगितले की, तेथे बाहेरुन मोठ्या प्रमाणात लोक आले आहेत. गरज म्हणजे काय हे सुध्दा समजून घेणे आवश्यक आहे. त्यामुळे शासनाने त्यासंबंधी परिपत्रक काढले की, प्रकल्पग्रस्तांनी गरजेपोटी घरे बांधली ती घरे. याचा अर्थ ज्यांना घर नाही म्हणून घर बांधले असेल तर ती कायम करता येणार नाही. ते करणे अडचणीचे होईल. पण गरजेपोटी बांधलेली घरे कायम करण्यातही अडचण येऊ लागली. विभागाचे अधिकारी गरजेपोटी बांधलेल्या घरांचा शोध घेऊ लागले त्यावेळी त्यांच्या अंगावर लोक येऊ लागले. आम्ही गरजेपोटी घर बांधले आहे असे म्हणू लागले. आम्हाला गरज होती म्हणून आम्ही गरजेपोटी दुकान सुरु केले आहे. तेही कायम करावे असे सांगू लागले. आम्ही गरजेपोटी गाड्या घेतल्या आहेत, या गाड्यांच्या चालकांसाठी व क्लिनरसाठी घरे बांधली आहेत ती कायम करावीत, गरजेपोटी लोकांना राहण्यासाठी चाळी बांधल्या त्याही कायम कराव्यात अशी मागणी करु लागले. आता गरज या शब्दाची व्याप्ती वाढलेली आहे. प्रकल्पग्रस्तांनी गरजेपोटी बांधलेली घरे असे म्हटलेले आहे. हे काम आता जिकरीचे होत आहे. त्यातून मार्ग काढण्याचे काम सुरु केले आहे. लोकांनी स्वत:हून पुरावा दिला पाहिजे. कारण अधिकारी तेथे जाऊ शकत नाही. म्हणून लोकांकडून पुरावे मागण्याचे आम्ही काम करीत आहोत. या संबंधी दुसरे पाऊल उचलण्याची आवश्यकता आहे ते उचलले जाईल आणि मार्ग सुध्दा काढला जाईल.

सभापती महोदय, तेथील प्रकल्पग्रस्तांना प्राधान्याने नोकरीमध्ये प्राधान्य दिले पाहिजे. तेथे होणाऱ्या ॲक्टिव्हीटीमध्ये व डेव्हपमेंटमध्ये सामावून घेतले पाहिजे.

यानंतर श्री.शिगम....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. भास्कर जाधव...

अनेक प्रकरणामध्ये आणि अनेक गोष्टीमध्ये सिडको त्या त्या लोकांना सामावून घेण्याचे काम करीत आहे. शैक्षणिक आणि सामाजिक संस्थांना किती भूखंड दिले गेले असे सन्माननीय सदस्यांनी विचारले. एकूण 26 लोकांना भूखंड दिलेले आहेत ही वस्तुस्थिती आहे. हे भूखंड 1 रुपया या नाममात्र दराने देण्यात आल्याचेही सन्माननीय सदस्यांनी सांगितले. ती वस्तुस्थिती असेलही, मी ती नाकारीत नाही. 1965-1970 च्या काळामध्ये शैक्षणिक संस्था उभ्या करण्याची गरज असावी. त्या काळात तो भाग विकसित झालेला नव्हता. म्हणून कोणी तरी पुढे यावे आणि शैक्षणिक संस्था उभ्या कराव्यात यासाठी तसा निर्णय घेतला असावा. सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी चालविलेल्या वर्तमानपत्राला जवळपास 78 वर्षे होऊन गेली. त्याठिकाणी 78 वर्षे दैनिक चालविणा-या स्थानिक रहिवाशाला वर्तमानपत्र चालविण्यासाठी जागा मिळत नाही आणि अन्य वर्तमानपत्र व्यावसायिकांना मात्र जागा मिळते असा मुद्दा या ठिकाणी उपस्थित करण्यात आला. सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांना वर्तमानपत्रासाठी जागा का मिळाली नाही याची चौकशी निश्चितपणे केली जाईल. सभापती महोदय, 30 हजार विद्यार्थ्यांसाठी 16 कोटी 80 लाख रुपये विद्यावेतनावर खर्च केलेले आहेत. 2100 विद्यार्थ्यांना संगणक प्रशिक्षण दिलेले आहे. त्यासाठी 58लाख रुपये खर्च करण्यात आलेले आहे. या उपरही ज्या काही चुकीच्या गोष्टी घडत आहेत त्यांची सुध्दा चौकशी सुरु झालेली आहे. ती बाब काही लपून राहिलेली नाही. त्या त्या वेळच्या एमडीकडून चौकशी झालेली आहे. शंकरन समिती नेमलेली आहे, सुनील सोनी त्या ठिकाणी चौकशी करीत आहेत. काही प्रकरणे सीआयडीकडे देखील सोपविलेली आहेत. विभागाचे प्रधान सचिव हे देखील काही प्रकरणांची चौकशी करीत आहेत. काही चुका झालेल्या आहेत हे मी कबूल केलेले आहे, मी ते नाकारीत नाही. परंतु झालेल्या चुका भविष्यात होऊ नये यासाठी अधिकचा प्रयत्न केला जातोय. त्याठिकाणी मेट्रो रेल नेण्याचा प्रयत्न होत आहे. एक आंतरराष्ट्रीय स्तरावरचे विमानतळ उभे रहात आहे, अशा प्रकारची चांगली कामे त्या ठिकाणी होत आहेत. अशा कामांसाठी कुणाला तरी योगदान द्यावे लागते. कुणी तरी योगदान दिल्या शिवाय हे घडत नाही. ज्ञानेश्वरांनी असे म्हटलेले आहे की, "इवलेसे रोप लावियेले द्वारी, तयाचा वेलू गेला गगनावरी". या ज्ञानेश्वर माऊलींच्या आईवडिलांना देखील जलसमाधी घ्यावी लागली. हा इतिहास आपणा सर्वांना माहीत

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आहे. मला हे सांगायचे आहे की, कुणी तरी सोसल्या शिवाय, कुणी तरी भोगल्या शिवाय आणि कुणी तरी त्रास सहन केल्या शिवाय कुणाचा विकास होत नाही, कुणाला लाभ मिळत नाही ही वस्तुस्थिती आहे. कुठे तरी धरण बांधल्या शिवाय कुणाला पाण्याचा लाभ मिळत नाही, कुणी तरी शाळेला जागा दिल्या शिवाय त्या शाळेत गावातील मुले शिकू शकत नाहीत, कुणी तरी पाण्याची टाकी बांधण्यासाठी आपली स्वत:ची जागा दिल्या शिवाय गावाला पाणी मिळत नाही, ही वस्तुस्थिती आहे. म्हणून काही चांगले घडवायचे असेल तर काही सोसल्या शिवाय, त्याग केल्या शिवाय काहीच मिळत नाही. येथील लोकांनी केलेल्या त्यागामुळेच आजचे हे सिडकोचे वैभव उभे राहिलेले आहे. त्या त्यागाची आम्हाला आठवण आहे, अभिमान आहे. ज्या 5 जणांनी हौतात्म्य पत्करलेले आहे त्या पाच जणांचे मी स्मरण करतो, त्यांना मी श्रध्दांजली अर्पण करतो. सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र. पाटील यांना मी सांगेन की, रायगडवासीयानी सोसलेल्या त्यागातून आणि सोसलेल्या भोगातून आजचे हे जे वैभव उभे राहिलेले आहे त्याची महाराष्ट्र निश्चितच आठवण ठेवील अशा प्रकारची मी ग्वाही देतो.

सभापती महोदय, अनेक सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी मुद्दे उपस्थित केलेले आहेत. सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी, लोकांच्या घेतलेल्या जमिनी परत का दिल्या जात नाहीत, अशी विचारणा केली. मी त्यांना सांगू इच्छितो की, आता एक एक इंच जमीन घेणे किती जिकिरीचे होऊन बसलेले आहे याची त्यांना देखील कल्पना आहे. त्यामुळे घेतलेल्या जमिनी पुन्हा परत देणे शक्य होत नाही. विकासाच्या दृष्टीने जमिनी मिळणे आता कठीण झालेले आहे. विशिष्ट उद्देशासाठी घेतलेल्या जमिनीचा दुरुपयोग केला जात असेल तर त्याबाबतीत काही करता येईल काय अशी सन्माननीय सदस्यांनी विचारणा केली. त्यासंदर्भात निश्चितपणे जबाबदारी आणि काळजी घेतली जाईल अशा प्रकारची मी ग्वाही देतो.

सन्माननीय सदस्य श्री. हुसेन दलवाई यांनी, यामध्ये शासनाचे किती अशी त्यांच्या भाषेमध्ये विचारणा केली. त्यांनी उपस्थित केलेल्या मच्छीमारांच्या प्रश्नाबाबत कालच या सभागृहामध्ये लक्षवेधी विचारण्यात आलेली होती. मच्छीमारांच्या प्रश्नाबाबत देखील अतिशय उचित अशा प्रकारचा निर्णय घेण्याचे शासनाचे धोरण आहे. त्या संदर्भात आपण वेगळया पध्दतीने बोलू. परंतु तूर्त या

..3.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव...

सिडको मध्ये तसेच जेएनपीटीमध्ये जमिनीचा साडेबारा टक्के परतावा हा सहा महिन्यात मिळेल. सिडकोमध्ये 87 टक्के लोकांना साडेबारा टक्के जमिनीचा परतावा मिळालेला आहे.

...नंतर श्री. गिते...

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव...

उर्वरित लोकांना देखील परतावा देण्याचे काम लवकरच करण्यात येईल. त्या ठिकाणी गरजेपोटी बांधलेली घरे कायम स्वरुपी कशी करता येतील यादृष्टीने कायद्याच्या चौकटीत बसवून त्यासंदर्भातील निर्णय घेतला जाईल अशा प्रकारची ग्वाही देतो. त्या ठिकाणच्या स्थानिक लोकांना रोजगार कसा मिळेल याकडे देखील गांभीर्याने लक्ष देण्यात येईल.

श्री.जयंत प्र.पाटील : 4.0 एफ.एस.आय.देण्याच्या बाबतीतील माहिती कृपया सांगावी.

श्री. भास्कर जाधव : 4.0 एफ.एस.आय.हा सिडकोला लागू केलेला नाही. सिडकोला रेसिडेन्शीयल 1.0 एवढा एफ.एस.आय.लागू आहे. तसेच सिडकोच्या कमर्शियल कम रेसिडेन्श्ीयल यासाठी 1.5 एफ.एस.आय.लागू करण्यात आलेला आहे. सिडकोला यापेक्षा जास्त एफ.एस.आय.लागू करण्यात आलेला नाही.

श्री.जयंत प्र.पाटील : एमएमआरडीए च्या बाबतीतील माहिती देण्यात यावी.

श्री. भास्कर जाधव : एमएमआरडीएचे कार्यक्षेत्र सिडकोच्या विभागात नाही. एमएमआरडीएचे कार्यक्षेत्र वेगळे आहे. सिडकोचे कार्यक्षेत्र वेगळे आहे. सन्माननीय सदस्यांनी दुसरा प्रश्न विचारला आहे की, वडखळ पर्यंत सिडकोच्या वसाहती वाढविण्याचा शासनाचा विचार आहे काय ? या बाबतीत सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपण सिडकोला जमिनी देऊन सहकार्य केले तर त्या संबंधाने विचार करण्यात येईल. शासनाचा तुर्त तरी तसा विचार नाही. परंतु नगरविकास खात्याच्या राज्यमंत्री म्हणून एक गोष्ट निश्चितपणे सांगतो की, सिडकोने नवी मुंबईत अतिशय चांगले काम केलेले आहे. मी स्वत: जाऊन सिडकोच्या कामांची पाहणी केली. मी माननीय मुख्यमंत्री महोदयांसमोर एक विषय मांडणार आहे. सिडकोने औरंगाबाद शहरात काम केलेले आहे. नाशिकमध्ये काम केलेले आहे. सिंधुदुर्ग जिल्हयातील ओरस येथे शासकीय कार्यालयांचे बांधकाम देखील सिडकोने केलेले आहे. परंतु सिडकोला बाहेर घेऊन जाण्याचा माझा स्वत:चा विचार आहे. सिडकोच्या माध्यमातून नवीन उत्तम शहर वसविण्याचा माझा स्वत:चा विचार आहे. आम्ही तूर्त तरी तुम्हाला त्रास देणार नाही अशा प्रकारची ग्वाही देतो. या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी अतिशय चांगला विषय उपस्थित केला त्याबद्दल त्यांना धन्यवाद देतो. या ठिकाणी सन्माननीय सदस्यांकडून जे काही प्रश्न उपस्थित केले, त्या प्रश्नांना शासनाकडून न्याय देण्याचा

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव...

निश्चितपणे प्रयत्न करण्यात येईल अशा प्रकारची पुन्हा ग्वाही देतो आणि माझे उत्तराचे भाषण पूर्ण करतो.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदया, सन्माननीय नगरविकास राज्यमंत्र्यांनी अतिशय चांगल्या पध्दतीने, अभ्यासपूर्ण असे उत्तर या ठिकाणी दिलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील तसेच आम्हा सर्व सदस्यांचे समाधान होईल अशा प्रकारचे त्यांनी उत्तर दिलेले आहे. मी त्यांचा आभारी आहे. या ठिकाणी प्रकल्पग्रस्तांच्या पाल्यांना विद्यावेतन दिले जाते. ती रक्कम आपणाकडून दिली जात आहे. या संदर्भात माझा एवढाच प्रश्न आहे की, या ठिकाणच्या विद्यार्थ्यांना विद्यावेतन वेळेवर मिळत नाही. विद्यावेतन वेळेवर मिळत नाही म्हणून प्रकल्पग्रस्तांच्या पाल्यांना आंदोलन करावे लागते, उपोषण करावे लागते. मी तीन वेळा सिडकोच्या कार्यालयात गेलो. तेव्हा सिडकोच्या अधिकाऱ्यांनी विद्यावेतनाच्या संदर्भात कार्यवाही केली. हा प्रकल्पग्रस्तांच्या पाल्यांचा विषय आहे. प्रकल्पग्रस्तांच्या पाल्यांची विद्यावेतनाची रक्कम सिडको प्रशासनाने वेळेवर उपलब्ध करुन दिली तर त्यांना आंदोलन करावे लागणार नाही. प्रकल्पग्रस्तांच्या पाल्यांना वेळेवर विद्यावेतन मिळावे म्हणून आपणाकडून सिडको प्रशासनाला आदेश देण्यात येतील काय ?

श्री. भास्कर जाधव : सन्माननीय सदस्य श्री. रामदास मोते यांचा मुद्दा अत्यंत महत्वाचा आहे. विद्यावेतनाची रक्कम वेळेवर देण्यासंदर्भात सिडको प्रशासनाला केवळ सूचना करण्यात येणार नाही तर त्या बाबतची अंमलबजावणी करण्यात येईल.

तालिका सभापती (ॲड.उषा दराडे) : अल्पकालीन चर्चा आता संपली आहे. आता सभागृहाची विशेष बैठक स्थगित होत आहे. सभागृहाची बैठक सकाळी 11.30 पुन: सुरु होईल.

(सभागृहाची बैठक सकाळी 11.13 ते 11.30 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

यानंतर श्री. भोगले

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

स्थगितीनंतर

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

पृ.शी./मु.शी.: तोंडी उत्तरे

पुणे शहरातील बेकायदेशीर जलक्रीडा केंद्राबाबत

(१) * १३९९८ श्री.मोहन जोशी , श्री.हुसेन दलवाई , श्री.विजय सावंत : सन्माननीय जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील पानशेत जलक्रीडा केंद्रात दोघा भावंडांचा बुडुन मृत्यू झाला असतानाही बेकायदेशीरपणे आजूबाजूच्या सरकारी जमिनींवर अतिक्रमण करुन जलक्रिडा केंद्र सुरु केल्याचे माहे जानेवारी, २०११ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बेकायदेशीर जलक्रीडा केंद्रे व अतिक्रमणांबाबत तसेच पानशेत जलक्रीडा केंद्रातील दोन भावंडांच्या मृत्यूबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, त्यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.रामराजे नाईक-निंबाळकर : (१) होय. परवानाधारकाने बंदी असतानाही बेकायदेशीररित्या बोटी चालविण्याचा प्रयत्न केला होता.

(२) १) पानशेत जलाशयामध्ये जलक्रीडा केंद्रासाठी परवानगी देण्यात आलेली होती. मात्र अपघातानंतर पोलीस तपास चालू असून जलक्रीडा केंद्र बंद करण्यात आलेले आहे.

२) जलक्रीडा केंद्राजवळ करण्यात आलेले अतिक्रमण खात्यामार्फत काढण्यात आलेले आहे.

३) भावंडांच्या मृत्यूबाबत बोट परवानाधारक यांच्यावर पोलीस स्टेशनला एफ आय आर दाखल झालेला आहे.

(३) जलक्रीडा केंद्र बंद करण्यात आले असून वरीलप्रमाणे चौकशी पोलीस खात्यामार्फत सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.मोहन जोशी : सभापती महोदय, पानशेत आणि खडकवासला येथील जलाशयामध्ये जलक्रीडा अंतर्गत बेकायदेशीरपणे बोटी चालविल्या जातात. दरवर्षी अनेक निरपराध नागरिकांचे या जलाशयामध्ये बुडून मृत्यू होत आहेत. एक वर्षापूर्वी ऐन उमेदीच्या काळातील दोन सख्ख्या बहीण भावाचा जलविहार करीत असताना शासनाच्या बेपर्वाईमुळे जलाशयात बुडून मृत्यू झाला. या जलक्रीडा केंद्रासाठी शासनाने परवानगी दिली होती का, असल्यास त्याचे नियम काय आहेत, सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक ती उपकरणे तेथे उपलब्ध होती का, निरपराध लोकांचे बळी जाऊ नयेत यासाठी जलक्रीडा केंद्रावर बंदी घालण्यात येईल काय?

..२..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.१३९९८.....

श्री.रामराजे नाईक-निंबाळकर : सभापती महोदय, मुंबईतील दोन तरुण भाऊ-बहिणीचा करुण अंत या पानशेत जलाशयामध्ये झाला ही वस्तुस्थिती आहे. सन्माननीय सदस्यांनी काळजी व्यक्त केली आणि काही धोरणात्मक प्रश्न विचारण्याचा प्रयत्न केला आहे. कृष्णा खोरे पाटबंधारे विकास महामंडळाला कायद्यांतर्गत जलक्रीडा किंवा वॉटर स्पोर्टस् चालविण्याचे अधिकार देण्यात आलेले आहेत. ही परवानगी देत असताना करारनामा करुन संबंधित व्यक्तींना अनुमती दिली जाते. या प्रकरणामध्ये जलक्रीडा केंद्र चालविण्यासाठी श्री.पासलकर यांना करारनामा करुन कृष्णा खोरे पाटबंधारे विकास महामंडळाने परवानगी दिली होती.

नंतर क्यू.१..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 13998..... श्री. रामराजे नाईक-निंबाळकर....

करारात ज्या अटी असतात त्यानुसार सुरक्षिततेच्या दृष्टीने लाईफ जॅकेट महत्वाचे असते. अपघात झाल्यानंतर ही जबाबदारी बोट चालकाची असते ती पार पाडली नाही. पोलीस चौकशी ज्याप्रमाणे निष्पन्न झाले त्यानुसार बोटचा मालक श्री. पासलकर यांनी हे लाईफ जॅकेट्स पुरविले नव्हते त्यामुळे दोघा भावंडांचा अंत झाला. त्यात एक पाण्यात बुडून मेला तर त्याची बहीण बोट चालकाने किनाऱ्यावर आणून हॉस्पिटलमध्ये नेल्यानंतर मृत घोषित करण्यात आले. त्यानंतर रितसर चौकशी करुन कलम 304 (ए) प्रमाणे बोट चालकाला तुरुंगात टाकले व नंतर त्याला जामीन मिळाला. ही घटना सन 2009 मध्ये घडली होती. त्यानंतर सन 2010 मध्ये असेही लक्षात आले की, या बोट चालकाचा परवाना बंद करण्यात आला आहे. कारण त्याने महसुली आकार भरलेला नव्हता म्हणून जिल्हाधिकाऱ्यांनी परवानगी नाकारली होती. तरी देखील या बोट चालकाने अतिक्रमण करुन हे केंद्र सुरुच ठेवले म्हणून जलसंपदा विभागाने पोलिसांना तसेच जिल्हाधिकाऱ्यांना कळवून हे केंद्र बंद करण्यात आले. तसेच प्रिकॉशन म्हणून आणि श्री. पासलकर यांची पार्श्वभूमी पाहता तो विभागाला जुमानत नाही त्यामुळे त्याच्या बोटी जप्त करुन हा प्रश्न कायमस्वरुपी सोडविण्यात येईल.

श्री. अरुण गुजराथी : महोदय, हे जलक्रीडा केंद्र कोणत्या वर्षी व कोणत्या ठेकेदाराने ते सुरु केले, नियमानुसार त्याने कोणत्या अटी व शर्तींची पुर्तता केली नाही ? कारण आपण म्हटले की बोट चालविण्याची परवानगी नसतानाही ठेकेदाराने बोट सुरु ठेवली होती. तसेच त्याच्याकडे किती बोटी होत्या, आणि अशा प्रकारे अनधिकृतपणे बोटी चालवित होता तर यापूर्वीच त्या ठेकेदारावर कारवाई का केली नाही ?

श्री. रामराजे नाईक-निंबाळकर : महोदय, सन्माननीय सदस्यांनी ठेकेदाराने पाळावयाच्या अटींचा जो तपशील विचारला तेवढी माहिती सध्या माझ्याकडे नाही, ती माहिती नंतर सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल. त्यात लाईफ जॅकेटची अट होती व त्यानुसार लाईफ जॅकेट पुरविले नव्हते एवढीच सध्या माहिती आहे, उर्वरित माहिती नंतर पटलावर ठेवली जाईल.

श्री. दिवाकर रावते : महोदय, शासनाने कृष्णा खोरे पाटबंधारे विकास महामंडळ निर्माण केल्यानंतर त्याला आवश्यक तेवढा निधी दिला जाईल असे सभागृहात सांगितले, ही गोष्ट खरी

....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 13998..... श्री. दिवाकर रावते .....

आहे. सभागृहात तसेच संपूर्ण व्यवहारात मराठी भाषेला प्राधान्य देण्यात यावे असे धोरण असताना सुध्दा शासनाने या प्रश्नाच्या उत्तरामध्ये "एफआयआर" सारखे इंग्रजी शब्द सर्रास वापरलेले दिसतात त्याऐवजी "प्राथमिक चौकशी अहवाल" असा शब्दप्रयोग करता आला असता. पण तसे न करता सरकारकडून वारंवार इंग्रजीचा सर्रास वापर होत असतो आणि विधान मंडळाला सुध्दा ते सहन करण्याची सवय लागली, हे कुठे तरी थांबले पाहिजे. याबाबत मी नेहमीच सभागृहात वारंवार प्रश्न उपस्थित करुन शासनाच्या निदर्शनास आणून देत असतो तरीही फरक पडत नाही. म्हणून माझी विनंती आहे की, आपण पीठासीन अधिकारी म्हणून जेव्हा असे इंग्रजी मिश्रीत प्रश्न येतात ते आपण स्वीकारु नयेत. असे केले तरच हे प्रकार थांबू शकतील. तरी देखील भविष्यात अशी परिस्थिती निर्माण झाली आणि सभागृहात इंग्रजी भाषा वापरलेले प्रश्न आले तर जाहीर रित्या फाडून त्यांची होळी करण्यात येईल. त्यामुळे सभागृहात औचित्याचा प्रश्न वगैरे निर्माण झाला तर त्याला सुध्दा तोंड देऊ.

श्री. रामराजे नाईक-निंबाळकर : महोदय, प्रश्नाला दिलेल्या उत्तरात "एफआयआर" सारखे जे अन्य इंग्रजी शब्द वापरले आहेत, त्याची दखल घेऊन भविष्यात असा इंग्रजीचा वापर करण्यात टाळण्यात येईल.

श्री. रामनाथ मोते : महोदय, सन्माननीय सदस्यांनी अत्यंत गंभीर प्रश्न विचारलेला असून त्या अनुषंगाने मी शासनाला असे विचारु इच्छितो की, बोट चालकाकडे बोट चालविण्याचा परवाना होता असे उत्तरात म्हटले आहे. पण परवाना नसताना देखील बेकायदेशीर बोट चालविण्याचा प्रयत्न श्री. पासलकर यांनी केला याचा अर्थ काय ? या संपूर्ण प्रकरणाची जबाबदारी ज्या बोट चालकाची होती त्याच्याविरुध्द सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला काय ? त्याचबरोबर ज्या दोन भावंडांचा मृत्यू झाला त्यांच्या नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे ?

यानंतर श्री. जुन्नरे .....

अशुद्धीत पत्र / मुद्रितशोधनासाठी नाही

ता.प्र.क्र.: 13998 .....

श्री. रामराजे नाईक-निंबाळकर : सभापती महोदय, श्री. पासलकर यांच्यावर 2010 मध्ये बोटी चालविण्याची बंदी घातलेली असतांना सुध्दा त्यांनी बोटी चालवण्यचा प्रयत्न केला होता. त्यामुळे त्यांच्या बोटी जप्त केल्या जातील असे उत्तर मी अगोदर दिलेले आहे. यासंदर्भात संबंधितांविरुध्द गुन्हा नोंद झाला असून त्यांना या प्रकरणामध्ये अटक झाली होती व त्यांना यासंदर्भात जामीन सुध्दा मिळालेला आहे. त्यामुळे असा प्रकार या पुढे होणार नाही याची काळजी घेतली जाईल. सन्माननीय सदस्यांनी मृत बालकांच्या आई-वडीलांना नुकसान भरपाई मिळण्याच्या संदर्भात प्रश्न विचारला आहे, माननीय मुख्यमंत्र्यांकडे हा विषय उपस्थित केला जाईल व नुकसान भरपाई देण्याचा प्रयत्न केला जाईल.

डॉ. नीलम गो-हे : सभापती महोदय, या ठिकाणी जो प्रश्न उपस्थित करण्यात आलेला आहे त्याचा हेतू चांगला असला तरी यासंदर्भात शासनाचे यासंदर्भात जे धोरण आहे त्या धोरणाच्या विसंगत उत्तर येत आहे असे वाटते. पानशेत जलक्रीडा केंद्र व पानशेत मध्ये मोठया प्रमाणात पर्यटक येत असतात. सुरक्षित बोटीची सोय पर्यटकांना हवी असते. जे बोटीचा व्यवसाय करतात त्याच्यावर सातत्याने ॲक्शन घेतली जात आहे परंतु उपकार्यकारी अभियंता श्री. बोलभट्ट यांनी यासंदर्भात कोणती देखरेख केलेली आहे, श्री. पासलकर यांना अडविण्याचा प्रयत्न करण्यात आला होता काय ? जलक्रीडा केंद्रांना कायमची बंदी अशा प्रकारचे उत्तर असू शकत नाही. जलक्रीडा केंद्रावर बोटी चालवत असतांना बोटी सुरक्षितपणे कशा चालवल्या जातील यासाठी आपला विभाग काय उपाययोजना करीत आहे ? तसेच लाईफ सर्व्हरची नेमणूक केली नसेल तर परत परत लोकांचा जीव जातच राहील त्यामुळे या ठिकाणी लाईफ सर्व्हर किती नेमलेले आहेत, या ठिकाणचे लाईफ सर्व्हर घटनेच्या वेळी कोठे होते ?

श्री. रामराजे नाईक-निंबाळकर : सभापती महोदय, करार नाम्याप्रमाणे आम्हाला जे काही करणे शक्य होते ते आम्ही केलेले आहे. या ठिकाणी लाईफ गार्ड नेमण्याची आवश्यकता आहे. लाईफ गार्ड नेमले गेले नसतील तर त्यंची नेमणूक केली जाईल. दुसरे असे की, जलक्रीडा केंद्र बंद करणे हे सुध्दा आम्हाला मान्य नाही. परंतु परवाना धारक जर बेकायदेशीरपणे वागत असेल तर त्यासाठी आम्ही स्पेशल यंत्रणा नेमणार आहोत. एक्झीक्युटीव्हकडे ब-याच सब डिव्हीजन असतात त्यांना या सर्व कामावर लक्ष ठेवणे जमणार नाही.

.....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्यामुळे पानशेत, वरसगाव तसेच जेथेजेथे अशा प्रकारची जलक्रीडा केंद्र आहेत तेथे लाईफ गार्ड नेमला जाईल. करारनाम्याचे एक्झीक्यूशन बघण्याची दक्षता निश्चितपणे घेण्यात येईल.

श्री. जयंत प्र.पाटील : जलक्रीडा केंद्रे बंद करण्याचे शासनाचे धोरण नाही असे मंत्री महोदयांनी सांगितल्या बद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. आपल्या विभागात बोटी चालविण्यासाठीचे टेक्नीकल ज्ञान असणारे अधिकारी नाहीत ही वस्तुस्थिती आहे. जलक्रीडा केंद्र सुरु करीत असतांना महाराष्ट्र मेरिटाईम बोर्ड (एमएमबी) कडून नॉर्म्स तपासण्याची जबाबदारी सोपविण्यात येईल काय. ज्या प्रमाणे बोटी चालविण्यासाठीचे नॉर्म्स असतात तशा प्रकारचे नॉर्म्स या जलक्रीडा केंद्रातील बोटी चालकांवर घालण्यात येतील काय ? ज्यावेळेस पासलकर यांना जलक्रीडा केंद्राचा ठेका देण्यात आला होता त्यावेळेस टेंडर काढण्यात आले होते काय, टेंडर काढले गेले असेल तर किती निविदा आल्या होत्या ?

श्री. रामराजे नाईक-निंबाळकर : सभापती महोदय, यासंदर्भातील टेंडर फायनल करतांना एमएमबीचे व्हेरिफिकेशन घेऊनच ठेका दिला जाईल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो. यासंदर्भात किती टेंडर आले होते याची माहिती आता माझ्याकडे उपलब्ध नसल्यामुळे ही माहिती मी सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

हरकतीच्या मुद्यासंबंधी

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, काल सायंकाळच्या वेळेस आपण चेअरवर नव्हता. ज्यावेळेस अर्थखात्यावरील चर्चा पूर्ण झाली होती त्यानंतर उत्तराच्या वेळेस सन्माननीय सदस्य श्री. रावते साहेबांनी हरकतीचा मुद्दा उपस्थित केला होता. त्या मुद्याद्वारे राज्यपालांनी निदेश दिल्यानंतरही ते निदेश सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले नव्हते हा मुद्दा आम्ही उपस्थित केला होता. माननीय वित्तमंत्री महोदयांचे अर्थसंकल्पावरील भाषण दोन दिवस पुढे ढकलण्याची आम्ही विनंती केली होती. जोपर्यंत सभागृहाच्या पटलावर माननीय राज्यपालांचे निदेश ठेवले जात नाही तोपर्यंत अर्थ राज्य मंत्र्यांनी बजेटवर भाषण करु नये असे आम्ही काल सांगितले होते. खरे म्हणजे 10 एप्रिल, 2011 रोजी माननीय राज्यपालांनी राज्य सरकारकडे निदेश पाठविले होते. 10 तारखेपासून ते 29 तारखेपर्यंत राज्य सरकारकडे माननीय राज्यपाल महादयांचे निदेश पडून राहिले होते. हा सभागृहाचा, माननीय राज्यपालांचा तसेच घटनेचाही अवमान झालेला असल्यामुळे काल आम्ही माननीय वित्त मंत्र्यांच्या भाषणाच्या वेळेस बर्हिगमन केले होते. या विषयाच्या संदर्भात आम्ही माननीय राज्यपाल महोदयांची भेट मागितली असून त्यांनी आम्हाला 12.30 वाजता वेळ दिलेली आहे. माननीय राज्यपाल महोदयांना भेटण्यासाठी आम्ही आता जात आहोत त्यामुळे वेगळा काही अर्थ काढू नये एवढेच मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

यानंतर श्री. गायकवाड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी. : तोंडी उत्तरे (पुढे चालू)

पुणे येथील बाल गुन्हेगारांना संवदेनशील पध्दतीने हाताळून त्यांच्यात जागरुकता निर्माण करणेबाबत

(२) * १३९६० श्रीमती दिप्ती चवधरी : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील बाल गुन्हेगारांना ताब्यात घेताना त्यांची हाताळणी संवेदनशील पध्दतीने होण्याची तसेच बाल गुन्हेगारी प्रतिबंधक कायद्याबद्दल सर्वच स्तरावर जागरुकता निर्माण करण्याची गरज असल्याचे स्वयंसेवी संस्थेच्या प्रतिनिधींनी मत व्यक्त केल्याचे माहे जानेवारी, २०११ मध्ये वा त्या दरम्यान आढळून आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बाल गुन्हेगारांमध्ये जागरुकता निर्माण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा. फौजिया खान, प्रा.वर्षा गायकवाड यांच्याकरिता: (१) होय.

दै.टाईम्स ऑफ इंडिया (पुणे आवृत्ती) या वृत्तपत्रामध्ये दि.२४ जानेवारी, २०११ रोजी याबाबतची बातमी प्रसिद्ध झालेली आहे.

(२) १. बाल न्याय अधिनियमाच्या परिणामकारक अंमलबजावणी करणेकरिता आणि बाल न्याय पद्धतीची प्रभावी अंमलबजावणी महाराष्ट्र राज्यात होणेसाठी राज्यातील ३५ जिल्ह्यांमधील बाल न्याय मंडळांचे अध्यक्ष व सदस्यांसाठी एकत्रितरित्या प्रशिक्षण कार्यक्रम मा.उच्च न्यायालय, मुंबई, महिला व बाल विकास विभाग आणि युनिसेफ यांचे संयुक्त विद्यमाने जुलै-ऑगस्ट २०१० या कालावधीमध्ये घेण्यात आलेला आहे.

२. गृहविभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई यांचे शासन परिपत्रक क्र.जेजेए-१२०९/प्र.क्र.८७२/विशा-६ दिनांक ०६ ऑक्टोबर, २०१० अन्वये राज्यातील सर्व पोलीस आयुक्त, सर्व पोलीस अधिक्षक यांना बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २००० नियम २००२ मधील तरतूदींनुसार पोलीस विभागांशी संबधित तरतूदी सर्व पोलीस अधिकारी / कर्मचारी यांच्या निदर्शनास आणून या कायद्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करणेबाबत, त्याचप्रमाणे आवश्यकतेप्रमाणे बाल न्याय मंडळासमोर संबंधित विशेष पोलीस अधिकारी यांना हजर राहण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत.

३. मुलांचे निरिक्षणगृह, शिवाजीनगर, पुणे-५ येथे १० डिसेंबर, २०१० रोजी आयोजित करण्यात आलेल्या मानवी हक्क दिन कार्यक्रमासाठी उपस्थित असलेल्या पुण्यातील सर्व स्वयंसेवी संस्थाना बाल न्याय अधिनियमाबाबत जागृतता करण्यात यावी असे सांगण्यात आले आहे.

४. पोलीस आयुक्तालय, पुणे येथे दि.०७ डिसेंबर, २०१० रोजी झालेल्या CAB (City advisory board) च्या बैठकीमध्ये सर्व पोलीसांना प्रशिक्षण देण्याबाबत पोलीस उप आयुक्तांना सूचना देण्यात आल्या, तसेच पुरावा सादर केल्यास तात्काळ कार्यवाही करण्यात येईल असेही सांगण्यात आले आहे.

५. संस्थेत दाखल असलेल्या मुलांनाही बाल न्याय अधिनियम व बालकांचे हक्क याबाबत माहिती दिली जाते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती दीप्ती चवधरी : सभापती महोदय, बाल गुन्हेगारी दिवसेंदिवस वाढत आहे आणि ही एक अतिशय गंभीर समस्या बनत चालली आहे. किरकोळ गुन्हयापासून ते गंभीर गुन्हयापर्यत अनेक गुन्हयामध्ये बाल गुन्हेगार आढळून येत असतात. त्यांना वेळीच योग्य ते मार्गदर्शन मिळाले नाही तर त्यांच्या आयुष्याची वाताहात होण्याची शक्यता असते. या संदर्भात मला माननीय मंत्र्यांना स्पेसिफिक प्रश्न विचारावयाचे आहेत. दिवसेंदिवस बाल गुन्हेगारी वाढत चालली आहे तिला रोखण्यासाठी शासनाने काय कार्यवाही केली आहे , बाल गुन्हेगारांमध्ये अवअरनेसचा कॅम्पेन करणारी योजना शासनाच्या विचाराधीन आहे काय , त्याच बरोबर राज्यामध्ये पुरेशी रिमांड होम्स आहेत काय , बाल गुन्हेगारांवर चांगले संस्कार घडविण्यासाठी रिमांड होममध्ये कोणते प्रयत्न केले जातात, बाल गुन्हेगारांच्या संदर्भात धोरण ठरविण्याकरिता शासन एखादी समिती नेमणार आहे काय ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी अत्यंत महत्वाचा प्रश्न उपस्थित केलेला आहे. बाल गुन्हेगारी कमी करण्यासाठी शासनाने प्रयत्न करण्याची गरज आहे आणि तसा प्रयत्न शासनाकडून नेहमीच होत आहेत. प्रत्येक जिल्हयात ज्युवेनाईल जस्टीस बोर्ड स्थापन करण्यात आले असून उच्च न्यायालयाचे निवृत्त जज्ज त्याचे अध्यक्ष आहेत. त्याचबरोबर चाईल्ड वेल्फेअर कमिटी स्थापन करण्यात आली आहे. ज्या मुलांची काळजी घेण्याची आवश्यकता आहे वा त्यांना संरक्षण देण्याची आवश्यकता आहे अशा मुलांसाठी प्रत्येक जिल्हयामध्ये चाईल्ड वेल्फेअर कमिटी स्थापन करण्यात आली आहे. यासाठी संवेदनशीलतेची गरज आहे हे सुध्दा खरे आहे. त्याचप्रमाणे या मुलांबरोबर कसे वागावयाचे याबाबतीत समाजामध्ये तसेच पोलिसांमध्ये अवेअरनेस होण्याची गरज आहे.एखाद्या मुलाने जर चूक केली असेल तर त्यांनी कोणताही गुन्हा केलेला नाही असे समजून त्याना शिक्षा करावयाची नाही तर त्यांचे कौन्सिलींग करावयाचे आहे,सात वर्षापेक्षा कमी वयाच्या मुलांवर चार्जशीट दाखल करावयाचे नाही, 24 तासामध्ये त्यांना पोलीस स्टेशनमधून घरी पाठवावयाचे आहे. इतकेच नव्हे तर त्यांना बेडया घालावयाच्या नाहीत. अशा प्रकारच्या अवेअरनेससाठी शासनाने प्रयत्न केलेले आहेत. पुणे विभागाच्या संदर्भात कोणते प्रयत्न करण्यात आलेले आहेत या संबंधीचा खुलासा प्रश्नाच्या उत्तरामध्ये करण्यात आला आहे. काही एनजीओ बरोबर अवेअरनेस कॅम्प घेण्यात आलेले आहेत. राज्यामध्ये किती रिमांड होम्स

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आहेत असा प्रश्न सन्माननीय सदस्यांनी विचारलेला आहे. त्या बाबतीत मी त्यांना सांगू इच्छिते की ज्युवेनाईल जस्टीस ॲक्ट खाली ऑब्झर्व्हेशन होम्स स्थापन करण्यात आले असून शासकीय ऑब्झर्व्हेशनची संख्या 60 आहे आणि एनजीओजची ऑब्झर्व्हेशन होम्स 4 हजार 875 मंजूर केलेली असून त्यापैकी 2 हजार 943 कार्यरत आहेत .

श्री.दीप्ती चवधरी : ही संख्या पुरेशी आहे काय ?

प्रा.फौजिया खान :बाल गुन्हेगाराची संख्या विचारात घेता या संस्था पुरेशा आहेत असे मला वाटते.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, समाज व्यवस्थेतील बालकांचे स्थान आणि त्यासाठी आवश्यक असलेली तरतूद या दृष्टीने हा प्रश्न अतिशय महत्वाचा वाटतो. जनजागरण मोहिम वेगवेगळया ठिकाणी शासनाने घेतलेली आहे.तसेच पोलीस दलालासुध्दा सूचना देऊन यासबंधीची जागरुकता त्यांच्यामध्ये निर्माण करण्यात येत आहे ही गोष्ट चांगली आहे. परंतु आज मोठया प्रमाणावर ग्रामीण भागातील लोक शहरी भागाकडे स्थलांतरित होत आहेत त्यामुळे शहरीकरण वाढत आहे. रोजगार न मिळाल्यामुळे जी कुटुंबे शहरामध्ये येत असतात त्यांची मुले रस्त्यावर फिरत असतात ...

नंतर श्री सरफरें.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 13960...

श्री. हेमंत टकले...

त्यांच्यामध्ये गुन्हेगारी प्रवृत्ती असते, त्यांच्याकडून छोटया छोटया चोऱ्या करण्याचे प्रकार होत असतात. अशाप्रकारे स्थलांतरित वस्त्यांमधील मुलांसाठी काही विशेष उपक्रम राबविण्याची आवश्यकता आहे. यामध्ये टाटा इन्स्टिटयूट ऑफ सोशल सायन्सेस सारख्या संस्थेच्या सहयोगाने पथदर्शी प्रकल्प राबविण्याच्या दृष्टीने कोणत्या प्रकारचे समुपदेशन आवश्यक आहे याबाबत माहिती घेऊन आपण संशोधनात्मक पाऊल उचलणार आहात काय?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, याबाबत सन्माननीय सदस्यांबरोबर चर्चा करण्यात येईल आणि त्यांनी केलेल्या चांगल्या सूचनांबाबत विचार करण्यात येईल.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, शहरामध्ये गुन्हेगार प्रवृत्तीची मोठी माणसे लहान लहान स्ट्रीट चिल्ड्रन्सना हाताशी धरुन त्यांना मोबाईल चोरण्यासारख्या गोष्टी करण्यास प्रवृत्त करतात. तेव्हा अशा लहान मुलांना वाम मार्गाला लावण्याचे काम करणाऱ्या गुन्हेगारांना शोधून त्यांच्यावर तातडीने कारवाई करणार काय?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, गृह विभागाच्या वतीने प्रत्येक जिल्ह्यामध्ये जापू नावाचे एक केंद्र अशा लहान मुलांसाठी सुरु करण्यात आले आहे. माननीय सदस्यांनी सांगितलेल्या इतर उपायांबाबत गृह विभागाकडून विचार करण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ठाणे जिल्ह्यातील बालकांचे मृत्यू रोखण्यासाठी स्वतंत्र प्रशासकीय यंत्रणा राबवून करावयाची कार्यवाही

(३) * १२८५५ श्रीमती अलका देसाई , श्री.सुभाष चव्हाण , डॉ.सुधीर तांबे , श्री.हुसेन दलवाई , श्री.विजय सावंत , श्रीमती दिप्ती चवधरी , श्री.चरणसिंग सप्रा , श्री.प्रकाश बिनसाळे , श्री.हेमंत टकले , ॲड. उषाताई दराडे , श्री.विक्रम काळे , श्री.रमेश शेंडगे , श्री.अरुण गुजराथी : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हयात दरवर्षी शेकडो आदिवासी बालकांचे कुपोषणामुळे व भुकेमुळे मृत्यू होत असून आदिवासी व ग्रामीण भागासाठी स्वतंत्र प्रशासकीय यंत्रणा गेल्या २५ वर्षापासून नसल्यामुळे आज आदिवासी लोकांचे मृत्यू होत असल्याचे तसेच अस्तित्वात असलेल्या उपाययोजनांची अंमलबजावणी प्रभावीपणे होत नसल्याचे माहे जानेवारी, २०११ मध्ये वा त्यादरम्यान आढळून आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या जिल्ह्यातील आदिवासी पाडयांसाठी स्वतंत्र प्रशासकीय यंत्रणा राबविण्याबाबत तसेच कुपोषणामुळे व भुकेमुळे वाढत असलेले बालकांचे मृत्यूचे प्रमाण रोखण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा. फौजिया खान, प्रा.वर्षा गायकवाड यांच्याकरिता : (१) हे खरे नाही.

एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत अंगणवाड्यातील ६ महिने ते ३ वर्ष वयोगटातील बालके, गरोदर स्त्रिया व स्तनदा माता यांना उपचार शास्त्रभूत आहार (THR) व ३ ते ६ वर्ष वयोगटातील बालकांना बचतगट / महिला मंडळे यांच्यामार्फत सकाळचा नाश्ता व गरम ताजा आहार पुरविण्यात येत आहे. या व्यतिरिक्त खालील उपाययोजनांची अंमलबजावणी करण्यात येत आहेत :-

१) ठाणे जिल्ह्यात माहे सप्टेंबर, २०१० ते फेब्रुवारी, २०११ या कालावधीत १०७५ ग्राम बालविकास केंद्रे सुरु करुन मध्यम व तीव्र कमी वजनाच्या बालकांना अतिरिक्त आहार व औषधोपचार करण्यत आले आहेत.

२) अंगणवाडीतील सर्व बालकांची ३ महिन्यातून एकदा तर तीव्र कमी वजनाच्या मुलांची दरमहा आरोग्य तपासणी बालरोग तज्ञांकडून करुन संदर्भ सेवा दिल्या जातात.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

३) गट पातळीवर अंगणवाडी सेविका व आरोग्य कर्मचारी यांची दरमहा श्रेणी वर्धनासाठी आढावा सभा घेऊन उपाययोजना केली जाते.

४) तालुका पातळीवर दरमहा वैद्यकीय अधिकारी, बाल विकास प्रकल्प अधिकारी, मुख्यसेविका आरोग्य कर्मचारी यांची सभा घेऊन आढावा घेण्यात येतो.

५) लायन्स क्लब या स्वयंसेवी संस्थामार्फत मोखाडा प्रकल्पात कमी वजनाच्या मुलांसाठी विशेष आहार दिल्यानेच कमी वजनाचे मुलांचे प्रमाण २३% वरुन १२% पर्यंत आणणेत यश आलेले आहे.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, मंत्रालयापासून दोन तासाच्या अंतरावर असलेल्या ठाणे जिल्ह्यातील आदिवासी लोकांना, कुपोषित बालकांना वेळेवर अन्न व औषधे मिळण्याच्या बाबतीत एवढा विलंब होण्याची कारणे काय आहेत? दुसरा प्रश्न असा की, त्या विभागामध्ये गेल्या २५ वर्षापासून नेमण्यात आलेले अधिकारी आज सुध्दा आहेत, त्यांच्यावर आपण कोणती कारवाई करणार आहात? तिसरा प्रश्न असा की, या लेखी उत्तरामध्ये टीएचआर प्रकारचा शास्त्रशुध्द आहार बचत गटामार्फत कुपोषित बालकांना देण्यात येणार आहे असे म्हटले आहे. तर मग हा आहार गेल्या २५ वर्षामध्ये त्या बालकांना कां देण्यात आला नाही?

सभापती : माननीय सदस्यांनी दोनच प्रश्न विचारावेत. तिसरा प्रश्न डेव्हलप करुन विचारीत असतांना सुरुवातीचे दोन प्रश्न आपण विसराल आणि मंत्री महोदय देखील विसरतील.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, मी प्रश्न विसरणार नाही...

सभापती : म्हणून मला आपल्याला असे सांगावयाचे आहे की, सुरुवातीच्या दोन प्रश्नांची उत्तरे मंत्री महोदयांनी द्यावीत. आणि गरज लागल्यास पुन्हा प्रश्न विचारण्यास मी आपल्याला परवानगी देईन.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, मी शेवटचा फक्त एकच प्रश्न विचारते. कोणत्या संस्था खाऊ बनविण्याचे काम करीत आहेत त्या संस्थांची नावे सांगणार काय?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, बचत गटांनी धान्याची जेवढी उचल केली आहे त्याची आकडेवारी माझ्याजवळ आहे. त्यानुसार एप्रिलमध्ये जिल्ह्याची तांदळाची मागणी 8 हजार 128 क्विंटल होती. गव्हाची मागणी 6 हजार 975 क्विंटल होती. त्यापैकी त्यांना तांदूळ 8300

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सरफरे)

ता.प्र.क्र. १२८५५....

प्रा. फौजिया खान.....

क्विंटल प्राप्त झाला आणि गहू 6 हजार क्विंटल प्राप्त झाला. त्यापैकी बचत गटाने 4673 क्विंटल उचल केली, म्हणजे 56 टक्के उचल केली. तसेच, त्यांनी जुलै महिन्यामध्ये 79 टक्के उचल केली आणि ऑक्टोबरमध्ये 114 टक्के उचल केली आहे. सदरचे धान्य घेण्याबाबत त्यांच्यावर सक्ती न करता बीपीएलच्या दरामध्ये उपलब्ध होणारे धान्य त्यांच्या मर्जीनुसार बचत गटांना घेता येते. तसेच, माननीय सदस्यांनी अधिकाऱ्यांच्या संदर्भात प्रश्न विचारला आहे. परंतु त्यांनी स्पेसिफिक कोणत्या अधिकाऱ्यांबाबत प्रश्न विचारला आहे हे जर सांगितले तर त्याबाबत काय करावयाचे ते ठरविता येईल.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीपाठी नाही

तसेच कोणत्या महिला संघटना आणि बचत गटाला कामे दिलेली आहेत याची माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

ॲड.उषाताई दराडे : सभापती महोदय, ठाणे जिल्ह्यामध्ये एकूण किती कुपोषित बालके आहेत, त्यांची ग्रेड काय आहे, तीव्र कमी वजनाची एकंदर मुले किती आहेत, तसेच श्रेणी वर्धनाच्या बाबतीत प्रयत्न करण्यात आलेला आहे असे सांगण्यात आले, याबाबतीत किती केसेस यशस्वी झालेल्या आहेत ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, मला सांगावयास आनंद होत आहे की, आपण ठाणे जिल्ह्यामध्ये शासनाचे जे विविध उपक्रम राबविण्याच्या दृष्टीने जे प्रयत्न करीत आहोत, त्याच्यातून आपल्याला फायदा होत असल्याचे दिसत आहे. याठिकाणी सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न विचारला आहे, त्याबाबतीत सांगावयाचे तर सध्या त्यामध्ये तीन प्रकारची टक्केवारी अस्तित्वात आहे आणि ती म्हणजे सर्वसाधारण बालके, मध्यम कमी वजनाची बालके आणि तीव्र कमी वजनाची बालके. जूनमध्ये सर्वसाधारण बालकांची संख्या 3,26,222 इतकी होती आणि फेब्रुवारीमध्ये ही संख्या वाढल्याचे दिसत आहे. ही संख्या 68 टक्क्यावरुन 80 टक्के झालेली आहे. मध्यम कमी वजनाची बालके जून 2010 मध्ये 25 टक्के होती आणि फेब्रुवारी 2011 मध्ये हे प्रमाण 18 टक्क्यावर आलेले आहे. तसेच तीव्र कमी वजनाची बालके आहेत, जून 2010 मध्ये त्यांची टक्केवारी 5.68 इतकी होती, परंतु आपण ही टक्केवारी 2 टक्क्यापर्यंत आणू शकलो आहोत.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, कुपोषणाचा प्रश्न हा मातेच्या सुदृढपणावर अवलंबून असतो. अनेक वेळा स्त्रियांवर मातृत्व लादले जाते.गरोदरपणामध्ये स्त्रियांची काळजी घेण्याच्या दृष्टीने शासन काय करीत आहे ? आपण आदिवासी भागामध्ये किंवा झोपडपट्टयांमध्ये पहातो, तेव्हा स्त्रियाच ॲनॅमिक असतात किंवा अतिशय बारीक असतात. तसेच अतिशय लहान वयामध्ये मुले झाल्यानंतर ते मूल जन्मत:च कुपोषित असते. नंतर परत जर ती माता गरोदर राहिली तर शासनाने याबाबतीत मोठया प्रमाणात कौन्सिलिंग केले पाहिजे. तिला पटवून सांगितले पाहिजे.अशा वेळी शासनाने कौन्सिलिंगसाठी जास्त प्रयत्न केले पाहिजेत.यादृष्टीने कोणते प्रयत्न केले जात आहेत.एक मूल झाल्यावर पुन्हा दुसरे होते,मग तिसरे होते आणि लागोपाठ गरोदरपणा मुळे स्त्रियांना जो त्रास होतात.अशा वेळी कुपोषित बालकांचे प्रमाण रोखण्यासाठी कौन्सिलिंग ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.12855 . . . .

श्रीमती विद्या चव्हाण . . . .

करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणते प्रयत्न केले आहेत ?

श्रीमती फौजिया खान : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी महत्वाचा प्रश्न उपस्थित केलेला आहे आणि हे खरे आहे की, आजपर्यंत आपण कुपोषणाकडे एक आरोग्याची समस्या म्हणून पहात होतो. पण ही आरोग्याची समस्या नसून कुपोषणाची जी वेगवेगळी कारणे आहेत त्याचा सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केलेला आहे.यामध्ये समाजाने सहभागी झाल्याशिवाय लोकांना हे समजणार नाही की, मुलींची लवकर लग्न करता कामा नयेत, ब्रेस्ट फिडींगबाबत व्यवस्थित प्रॅक्टीसेस पाहिजे, पहिल्या मुलामध्ये आणि दुसऱ्या मुलामध्ये ठराविक अंतर असावे, इन्स्टीट्युशनल डिलीव्हरीज् म्हणजे रुग्णालयामध्ये प्रसूती व्हावयास पाहिजेत आणि याबाबतीत जी काही अंधश्रध्दा असेल तर ती दूर व्हावयास पाहिजे यासाठी शासन प्रयत्न करीत आहे. शासनाची एक उपलब्धी अशी आहे की, गेल्या 5-6 वर्षापूर्वी रुग्णालयामध्ये प्रसूती होण्याचे प्रमाण 53 टक्के होते आणि आज आपण ते प्रमाण 91 टक्क्यापर्यंत आणलेले आहे. त्यामुळे एका विषयाच्या बाबतीत आपल्याय यश मिळवू शकलो. त्याशिवाय ज्या अंगणवाडी कार्यकर्त्या आहेत तसेच "आशा" मार्फत लोकांना सेन्सेटाईज् करण्याच्या बाबतीत देण्यात येणाऱ्या ट्रेनिंगमध्ये तो विषय असतो. तसेच शासनाने एका महत्वाच्या विषयाबाबत असा निर्णय घेतलेला आहे. याबाबतीत माननीय मुख्यमंत्री महोदयांकडे एक बैठक झाली होती आणि त्यावेळी सर्व माननीय मंत्री महोदय उपस्थित होते. त्यामध्ये असे ठरविण्यात आले की, यासाठी नोडल विभाग करावे आणि सगळया विभागाचे, सगळया योजनांचे कन्व्हर्शन्स् होऊन सामाजिक विषयावर फोकस करुन त्यादृष्टीने कार्यक्रम ठरविणे गरजेचे आहे.त्याप्रमाणे महिला व बालविकास विभागाला तसे आदेशित करण्यात आले असून तो आता नोडल विभाग झाला आहे. तसेच आदिवासी विभाग असो किंवा कृषी विभाग असो त्यांच्या ज्या सर्व योजना आहेत, त्या फोकस करण्यासाठी आता महिला बालविकास विभाग काम करणार आहे.

यानंतर कु.थोरात . . . .

अशुधारित प्रत / अशुद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.12855.....

प्रा. फौजिया खान...

आता महिला व बालकल्याण विभाग ते काम करणार आहे. मुख्य सचिवांकडे एक कोअर समिती स्थापन करण्यात आलेली आहे. रिजनल लेव्हलवर समित्या आहेत. गाव पातळीपर्यंतच्या कम्युनिटीचा सहभाग घेऊन याबाबत कशा प्रकारे उपाययोजना करता येईल याबाबतीतील कार्यवाही चालू आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राज्यातील ऐतिहासिक किल्ल्यांचा व पर्यटनाचा विकास होण्याबाबत

(४) * १२८६५ श्री.सुभाष चव्हाण , श्री.राजन तेली, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.मनीष जैन : सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मोठ्या प्रमाणात असलेल्या ऐतिहासिक किल्ल्यांकडे पुरातत्व विभाग दुर्लक्ष करीत असल्याने पर्यटनाचा विकास झाला नसल्याचे माहे जानेवारी, २०११ मध्ये वा त्या दरम्यान आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील ऐतिहासिक किल्ल्यांचा व पर्यटनाचा विकास होण्याबाबत तसेच पर्यटनाचा विकास करण्यास दुर्लक्ष करणाऱ्या पुरातत्व विभागावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) राज्यातील पर्यटन स्थळांना पर्यटकांनी भेटी दिल्यास राज्याचे उत्पन्न वाढून तेथील स्थानिकांना रोजगार व व्यापाराच्या संधी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) राज्यातील पर्यटन स्थळे विकसित करण्यासाठी पर्यटन क्षेत्रातील तज्ञ लोकांची समिती स्थापन करुन पर्यटन स्थळांच्या विकासाचा कृती आराखडा तयार करुन त्याप्रमाणे अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,

(५) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.संजय देवतळे : (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) पर्यटकांच्या भेटीमुळे पर्यटनस्थळांच्या स्थानिक अर्थव्यवस्थेत जसे, उपहारगृहे, लॉजेस व इतर सुविधा पुरवठादारांच्या उत्पन्नात निश्चित भर पडत आहे. तसेच रोजगार व व्यापाराच्या नवीन संधी उपलब्ध होत आहेत. याशिवाय राज्य शासनाने सुरू केलेल्या न्याहरी व निवास योजनेमुळे स्थानिक नागरिक / ग्रामस्थांचे उत्पन्नातही भर पडत असून या योजनेअंतर्गत वाढता प्रतिसाद मिळत आहे.

(४) राज्य शासनाने पर्यटनक्षेत्रातील तज्ञ व्यक्तींचा एक अभ्यास गट स्थापन केला असून या गटाच्या दोन बैठका संपन्न झाल्या आहेत व या अभ्यास गटाचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील उपाययोजना करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. सुभाष चव्हाण :सभापती महोदय, उत्तरात असे म्हटले आहे की, "हे खरे नाही" सभापती महोदय, हे उत्तर संपूर्णत: चुकीचे आहे. पुरातत्व विभागाच्या अखत्यारीत अनेक किल्ले येतात, त्यांची दुरुस्ती करणे अत्यंत गरजेचे आहे. राष्ट्रीय संपत्ती म्हणून काही किल्ले भारत सरकारच्या अखत्यारीत आहेत. म्हणून भारत सरकारची याबाबतीत वेळोवेळी परवानगी घेतली आहे काय, परवानगी मिळण्यास विलंब होत असेल तर त्याबाबतीत पाठपुरावा केला आहे काय? माझा दुसरा प्रश्न असा आहे की, उत्तरामध्ये असे म्हटले आहे की,"तज्ज्ञ व्यक्तिचा एक अभ्यास गट स्थापन केला आहे." या तज्ज्ञ व्यक्ती कोण आहेत? ज्यांना पर्यटनाची आवड आहे, उदाहरणार्थ

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 12865...

श्री. सुभाष चव्हाण....

सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली, श्री. हुसेन दलवाई तसेच माझ्या सारखे इतर काही सन्माननीय सदस्य जे या चळवळीतील आहेत, अशा काही लोकप्रतिनिधींचा समावेश यामध्ये आहे काय, अभ्यास गटाच्या शिफारशी शासनाला कधी प्राप्त होणार आहेत आणि पर्यटनाच्या महसुलात शासन वाढ करणार आहे काय?

श्री. संजय देवतळे : सभापती महोदय,उत्तरात " हे खरे नाही" असे म्हटलेले आहे. मागील दहा वर्षात राज्य पुरातत्व विभागातून जवळपास 52.66 कोटी रुपये खर्च झालेले आहेत. केंद्र शासनाच्या एएसआय कडून 11.19 कोटी रुपये खर्च झालेले आहेत. त्यामध्ये विविध किल्ले आहेत.भारतीय पुरातत्व विभागाकडे जे किल्ले आहेत त्या ठिकाणी काम करण्यास अडचणी येतात, ते काम करु देण्यास आडकाठी करतात. त्या दृष्टिकोनातून निचितपणे वरिष्ठ अधिकाऱ्यांबरोबर मी स्वत: एक बैठक आयोजित करतो आणि यामधून मार्ग काढून ही कामे व्हावीत या करिता प्रयत्न केले जातील. दिनांक 5 ऑक्टोबर, 2010 रोजी व्यवस्थापकीय संचालक, एमटीडीसी, यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आली आहे. त्यामध्ये श्री. विठ्ठल कामत, श्री. कमेलश बॅरोट, श्रीमती अमरजा निंबाळकर, श्री. राजीव जालनापूरकर, श्री. संगीत शास्त्री, श्री. मानसिंग पवार, श्री. अश्विनी कक्कर, उप सचिव पर्यटन आणि सह व्यवस्थापकीय संचालक, एमटीडीसी या तज्ज्ञ व्यक्तिची समिती स्थापन करण्यात आलेली आह. जून, 2011 पर्यंत या समितीचा अहवाल येईल, तो अहवाल आल्या नंतर त्याची छाननी करुन ॲक्शन प्लॅन केला जाईल.....

श्री. हुसेन दलवाई : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी जी नावे घेतलेली आहेत ते सगळे हॉटेल मालक आहेत. ते त्यांच्या धंद्याच्या दृष्टीने सांगतील.

श्री. संजय देवतळे : सभापती महोदय, पर्यटकांसाठी पर्यटन स्थळे निवडणे हे काम यांच्याकडे दिलेले आहे. पुष्कळ पर्यटन स्थळे आहेत पण पर्यटनाला चांगल्या रीतीने चालना देता येईल अशी पर्यटन स्थळे निवडणे, तेथे मूलभूत सुविधा पुरविणे उदाहरणार्थ निवारे, रस्ते, वीज,

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 12865...

श्री. संजय देवतळे....

पाणी इत्यादी. तसेच पर्यटनस्थाळांच्या ठिकाणी वेगवेगळया ॲक्टिव्हिटीज साऊंड ॲण्ड लाईट शो, साहसी पर्यटनामध्ये ट्रेकिंग, पॅराग्लाईडिंग अशा विविध दृष्टिकोनातून ही तज्ज्ञ समिती आपला अहवाल सादर करील आणि त्यानंतर शासन त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करील.

श्री. राजन तेली : सभापती महोदय, महाराष्ट्रात जवळपास 350 गडकिल्ले आहेत. मंत्री महोदयांनी उत्तर देताना गेल्या दहा वर्षात फक्त 52 कोटी रुपये खर्च केले आहेत असे सांगितले आहे. विशेषत: सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये मुंबईपासून कोकणपर्यंत 107 किल्ले आहेत. मालवणच्या सिंधुदुर्ग किल्ल्या बद्दल आणि विजयदुर्ग किल्ल्याबद्दल या सभागृहात अनेक वेळा प्रश्न उपस्थित करण्यात आलेले आहेत. माझा प्रश्न असा आहे की, मालवणच्या किल्ल्याला खालून भगदाड पडलेले आहे. तसेच विजयदुर्ग किल्ल्याच्या बाबतीत देखील अशीच परिस्थिती निर्माण झालेली आहे त्यामुळे हे किल्ले् कदाचित कायमचेच ढासळून जातील काय, अशी भीती निर्माण झालेली आहे. 12 व्या वित्त आयोगाच्या माध्यमातून त्या ठिकाणी काम करण्यास सुरुवात केलेली आहे. पण पुरातत्व विभागाने सार्वजनिक बांधकाम विभागाकडे तक्रार केलेली आहे. सार्वजनिक बांधकाम खात्याला त्या ठिकाणी काम करु दिले जात नाही.

यानंतर श्री. बरवड...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 12865..... श्री. राजन तेली .....

माझा प्रश्न असा आहे की, या संदर्भात पुरातत्व खात्याच्या लोकांना बरोबर घेऊन असे जे गड-किल्ले आहेत त्यांच्या बाबतीत बैठक घेणार काय ? 350 गड-किल्ल्यांच्या बाबतीत केलेला हा जो खर्च केलेला आहे तो कमी आहे. या सर्व गोष्टी सातत्याने इतिहासजमा होत चाललेल्या आहेत त्या दृष्टीने शासन या गड-किल्ल्यांच्या संदर्भात वेगळे धोरण अवलंबिणार का, पुरातत्व खात्याला बरोबर घेऊन त्या खात्यामध्ये काही सुधारणा करणार का, त्यासाठी माननीय मंत्री महोदय पुढाकार घेतील का ?

श्री. संजय देवतळे : सभापती महोदय, यामध्ये राज्य संरक्षित स्मारके 258 आहेत. त्यामध्ये लेणी 14 आहेत, किल्ले 45 आहेत तसेच बाकीची मंदिरे आणि स्मारके आहेत. भारतीय पुरातत्व विभागाकडे 30 आहेत. सन्माननीय सदस्यांनी मालवण येथील सिंधुदुर्ग आणि विजयदुर्ग किल्ल्यांच्या बाबतीत प्रश्न विचारला. हे किल्ले इएसआयकडे आहेत. मी सांगितल्याप्रमाणे निश्चितपणे भारतीय पुरातत्व विभागाकडून काम करण्यामध्ये अडचणी येतात. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे एवढा खर्च झालेला आहे. आपल्याला माहीत आहे की, माननीय उपमुख्यमंत्री तथा वित्त मंत्र्यांनी आपल्या अर्थसंकल्पीय भाषणामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनाशी निगडित शिवनेरी, सिंहगड, प्रतापगड, रायगड असे जे किल्ले आहेत तसेच त्यांनी उभारलेले जे विजयदुर्ग, सिंधुदुर्ग किल्ले आहेत तसेच इतर किल्ल्यांकरिता शासनाने 20 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. त्याच बरोबर तेराव्या वित्त आयोगामधून सन 2011-2012 , 2012-2013 , 2013-2014 आणि 2014-2015 या चार वर्षात दरवर्षी 25 कोटी रुपये प्रमाणे 100 कोटी रुपये येणार आहेत. यामध्ये पैशाची अडचण नाही. पैसे आहेत परंतु त्यामध्ये भारतीय पुरातत्व विभागाकडून ज्या अडचणी येतात त्याकरिता निश्चितपणे त्यांचे जे संबंधित वरिष्ठ अधिकारी आहेत त्यांच्या बरोबर बैठक घेऊन या कामाला गती देण्याच्या दृष्टीने आणि यातून मार्ग काढण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले जातील आणि वेगवेगळे सदस्य मागणी करीत आहेत त्याप्रमाणे ही कामे करण्यात येतील.

श्री. हुसेन दलवाई : सभापती महोदय, या ठिकाणी पर्यावरण मंत्री यांनी उत्तर दिलेले आहे पण पर्यटन मंत्री वेगळे आहेत. पर्यटन मंत्री असे म्हणतात की, पुरातत्व विभागामुळे महाराष्ट्रामध्ये किल्ल्यांच्या संदर्भामध्ये काहीही निर्णय करता येत नाही आणि त्यामुळे पर्यटन वाढत नाही. माझे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असे म्हणणे आहे की, आपला विभाग तसेच पर्यटन विभाग यांनी एकत्र येऊन या संदर्भात विचार व्हावयास पाहिजे. पुरातत्व विभागाच्या संदर्भात अनेक वेळा चर्चा झालेली आहे. ते आपल्याला परवानगी देत नाहीत. त्या संदर्भात शासनाकडून काही खास प्रयत्न केले जाणार आहेत काय ? जसा किल्ल्यांच्या संदर्भात प्रश्न आहे त्याचप्रमाणे मी या सभागृहामध्ये दाभोळ येथील मशिदीच्या बाबतीत प्रश्न उपस्थित केला होता. त्या संदर्भात काही केले जाणार आहे का ?

श्री. संजय देवतळे : सभापती महोदय, मी सांगितल्याप्रमाणे जी काही किल्ल्यांची कामे झालेली आहेत त्यात काही कामे पर्यटन विभागाच्या निधीतून तर काही कामे पुरातत्व विभागाच्या निधीतून झालेली आहेत. आपण पर्यटन विभागाच्या अंतर्गत तज्ज्ञांचा गट नेमलेला आहे. किल्ल्यांच्या पर्यटनाला चालना मिळावी या दृष्टीकोनातून या अभ्यासगटामध्ये काम होणार आहे. ज्यावेळी त्यांचा अहवाल येईल त्यामुळे किल्ल्यांच्या पर्यटनाला सुध्दा चालना मिळेल. मी मघाशी सांगितल्याप्रमाणे निधीची काही कमतरता नाही. वित्त विभागाकडून निधी मिळत आहे तसेच पुरातत्व विभागाकडून पुढील 4 वर्षामध्ये 100 कोटी रुपये मिळणार आहेत. केंद्राकडून हा निधी मिळत असला तरी या वर्षी राज्य शासनाने 20 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. पुरातत्व विभागाकडून ज्या काही अडचणी येतात आणि कामे होत नाहीत, मग विजयदुर्ग असेल, सिंधुदुर्ग असेल, त्या संदर्भात निश्चितपणे मार्ग काढण्यात येईल आणि ती कामे करुन घेण्यात येतील.

श्री. अरुण गुजराथी : सभापती महोदय, या ठिकाणी जे उत्तर दिले आहे त्यामध्ये विकासाच्या संदर्भात निवास आणि न्याहारीची व्यवस्था तसेच काही ठिकाणी लॉजेस निर्माण केले असे म्हटले आहे. त्यामुळे किती पर्यटन वाढणार आहे ? पर्यटन वाढविण्यासाठी त्या ठिकाणी पायाभूत सुविधा निर्माण करुन दररोज हजारो पर्यटक येतील अशा पध्दतीचे कार्य करण्याच्या दृष्टीकोनातून आपला विभाग आणि पर्यटन विभाग या दोघांनी एकत्र येऊन निर्णय घेतला पाहिजे. आपण जी समिती नेमलेली आहे त्या समितीचा अहवाल त्वरेने कसा येईल तसेच जितका निधी केंद्र सरकार देते त्याच्या दुप्पट निधी राज्य शासनाकडून देऊन यातून हजारो लोकांना रोजगार कसा उपलब्ध होईल या दृष्टीने ही कार्यवाही सत्वर होईल का ?

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.12865....

श्री.संजय देवतळे : सभापती महोदय, निश्चितपणे होईल. जो अभ्यास गट नेमलेला आहे त्यामध्ये पर्यटन व किल्ले हे दोन्ही विषय घेतलेले आहेत. मी मघाशी सांगितल्या प्रमाणे पर्यटकांसाठी पर्यटन स्थळे विकसित करणे, त्यांना मूलभूत सुविधा निर्माण करुन देणे या गोष्टी त्यात आहेत. या अभ्यास गटाकडून लवकरात लवकर अहवाल प्राप्त होणे अपेक्षित आहे. त्यांनी जून महिन्यापर्यंत अहवाल सादर करतो असे सांगितले आहे. सन्माननीय सदस्यांनी न्याहरीची व्यवस्था करणे याबाबत प्रश्न मांडला आहे. यासाठी विविध जिल्ह्यात 724 लोकांना नेमले आहेत. जेथे कुटुंबे राहतात. त्यांची पाहणी करुन विभागाकडून त्यांना प्रमाणपत्र दिले आहे. त्यांनी रात्रीची राहण्याची व सकाळच्या न्याहरीची व्यवस्था करावयाची आहे. त्यामुळे त्या कुटुंबांना सुध्दा व्यवसायाची संधी मिळाली आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : केंद्रीय पुरातन विभागाकडून हे किल्ले राज्य पुरातन विभागाकडे वर्ग करण्याचे सरकारने आश्वासन दिले होते. त्या बाबत पुढे कोणती कार्यवाही झाली आहे ? या सभागृहात एका चर्चेच्या निमित्ताने राज्य शासनाकडे मागणी केली होती आणि मंत्री महोदयांनी सांगितले होते की, राजस्थान सरकारने त्यांचे असलेले पुरातन किल्ले केंद्रीय पुरातन विभागाकडून राज्य शासनाकडे वर्ग करण्यात यश प्राप्त केले आहे. त्यानुसार आपल्या प्रस्तावासंबंधी पुढे कोणती प्रगती झाली आहे, शासन काय करीत आहे ? पर्यटनासाठी शासनाने एक तज्ज्ञांची समिती नेमली आहे. या समितीमध्ये फाईव्ह स्टार हॉटेलचे मालक आहेत. ॲग्रो टूरिझमच्या माध्यमातून 350 किल्ले आहेत. विशेषत: ग्रामीण भागातील दरी, डोंगरात व कडी कपारात आहेत. या किल्ल्यांना ॲग्रो टूरिझम करण्याच्या दृष्टीने शासन प्रयत्न करील काय ?

श्री.संजय देवतळे : सभापती महोदय, शासनाने यासंबंधी तज्ज्ञांची समिती नेमलेली आहे. ती समिती शासनाला अहवाल देणार आहे. तो अहवाल तपासून त्याची छाननी करुन या कामाला गती देता येईल. जे असंरक्षित किल्ले व स्मारके आहेत, राज्य पुरातत्व विभाग व भारतीय पुरातत्व विभाग असे वेगवेगळे विषय आहेत. सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सूचनेबाबत निश्चितपणे बैठक घेतली जाईल. केंद्रीय पुरातत्व विभागाकडून अडचणी आणल्या जातात. राज्य पुरातन विभागाकडे हे किल्ले वर्ग करण्यासंबंधी शासनाकडून निश्चित प्रयत्न केले जातील.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

बीड जिल्हा रुग्णालयातील रुग्णाच्या हातात डॉक्टरांच्या निष्काळजीपणामुळे सलाईन सिंरिज राहिल्याबाबत

(५) * १३०७० प्रा.सुरेश नवले, श्री.राजन तेली , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप , श्री.धनंजय मुंडे : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्हा रुग्णालयात दिनांक २७ नोव्हेंबर, २०१० रोजी चिकनगुनियामुळे दाखल झालेला रुग्ण रोहन चव्हाण यांच्या हातात, रुग्णालयातील डॉक्टर व परिचारिकांच्या निष्काळजीपणामुळे ११ मि.मि.ची सलाईन सिरीज (इंटरकॅथ निडल) राहिल्याचे माहे डिसेंबर, २०१० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकारामुळे सलाईन सिरींजचा तपास लागत नसून शरीराच्या इतरत्र भागात निडल जाऊन रोहन चव्हाण यांच्या जिवीतास धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने उपचाराच्या वेळी हलगर्जी करणाऱ्या डॉक्टर व परिचारिकांवर कोणती कारवाई केली आहे तसेच रोहन चव्हाणवर कोणत्या पध्दतीचे उपचार करण्यात येत आहेत,

(५) अद्याप, या प्रकरणाची चौकशी अथवा याप्रकरणी कारवाई करण्यात आली नसल्यास, त्यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा.फौजिया खान, श्री.सुरेश शेट्टी यांच्याकरिता : (१) होय.

(२) नाही.

(३), (४) व (५) जिल्हा रूग्णालयातील चौकशी पथकाने केलेल्या चौकशीमध्ये रुग्णाच्या उपचाराच्यावेळी हलगर्जीपणा करणाऱ्या संबंधित वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कार्यवाही सुरू असून रूग्णांवर औरंगाबाद येथील शासनमान्य खाजगी रुग्णालय व जे.जे.रुग्णालय, मुंबई येथे उपचार करून रुग्णालयातून सुटी देण्यात आली आहे.

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, पहिल्या प्रश्नाला 'होय' असे उत्तर दिलेले आहे. याचा अर्थ असा आहे की, रोहन चव्हाण याच्या शरीरामध्ये सुई राहिली आहे. आतापर्यंत ती सुई सापडलेली नाही. जे.जे.रुग्णालयाने सुध्दा उपाययोजना करुन त्याला घरी परत पाठविले आहे. यासंबंधी वर्तमानपत्रात बातम्या आलेल्या आहेत. पिंड ही ब्रम्हांडाची आवृत्ती आहे. तिच्यामध्ये ही सुई कोठे जाऊन बसली आहे तिचा शोध घेतला आहे काय आणि त्याचे निष्कर्ष काय आहेत ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

3.....

ता.प्र.क्र.13070.....

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, पहिल्या प्रश्नाच्या उत्तरात दुरुस्ती आहे. यामध्ये 'होय' असे म्हटले आहे त्याऐवजी अंशत: खरे आहे असे वाचावे. रोहन चव्हाण याला 3-4 दिवस ताप येत होता म्हणून दिनांक 27 नोव्हेंबर रोजी दाखल करण्यात आले होते. त्याला सलाईन लावले होते. त्यानंतर दिनांक 29 नोव्हेंबर रोजी डिस्चार्ज देण्यात आला. तो घरी गेला त्यावेळी चांगला होता. परंतु ताप कमी होत नाही म्हणून त्याला घरच्या माणसांनी खाजगी डॉक्टरकडे घेऊन गेले होते. खाजगी डॉक्टरने सर्जनचा सल्ला घ्यावा असे सांगितले. सर्जनला त्याने असे सांगितले की, जेथे मला सलाईन लावले होते तेथे दुखत आहे. दिनांक 10.12.2010 रोजी जिल्हा रुग्णालयात आल्यावर तेथे त्याच्या रक्ताची व लघवीची तपासणी करण्यात आली. त्याठिकाणी "Foreign body in forearm" यासाठी त्याला दिनांक 11.12.2010 रोजी दाखल करण्यात आले. त्याचा एक्स-रे काढण्यात आला, पण त्यात सुई दिसली नाही. त्यामुळे वैद्यकीय अधिका-यांचे असे मत होते की, एक्स-रे काढला तरी त्यात सुई दिसणे अवघड असते. त्यामुळे त्यांनी त्याची सर्जरी केली. त्यामध्येही फॉरेन बॉडी दिसली नाही. काही ॲप्सेस ड्रेन झाले असेल. त्यामुळे वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्याला जे.जे.रुग्णालयात जाण्याचा सल्ला दिला होता.

यानंतर श्री.शिगम....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सिव्हिल सर्जनला न विचारता डॉक्टरांनी सल्ला दिला. सिव्हील सर्जनने रुग्णाला कलर डॉप्लर करुन सुई आहे की नाही हे पहाण्यास सांगितले. सुई तुटणे अशक्य आहे. कलर डॉप्लरमध्ये सुई दिसते असे सांगण्यात आले. माझे स्वत:चे मत असे आहे की, कलर डॉप्लरमध्ये आर्टिफॅक्ट पण दिसू शकते. कलर डॉप्लरमध्ये 11 एमएमची सुई आहे असे सांगण्यात आले आणि रुग्णाला औरंगाबाद येथे जाण्याचा सल्ला दिला. औरंगाबादमध्ये एमआरआय आणि कलर डॉप्लर करण्यात आले. त्यामध्ये फॉरिन बॉडी दिसली नाही. त्याठिकाणी एक्सेस पस ड्रेन करण्यात आला, सर्जिकल प्रोसिजर करण्यात आले. पालकांच्या मनात शरीरामध्ये सुई असेल तर ती कुठे गेली अशा प्रकारची भीती निर्माण झाली. रुग्णाला जे.जे.हॉस्पिटलला पाठविण्यात आले. तेथे एमआरआय करण्यात येऊन फॉरिन बॉडी नसल्याचे सांगण्यात आले. या प्रकरणाची संपूर्ण चौकशी केलेली आहे. रुग्णावरील उपचाराचा खर्च शासनाने केलेला आहे. रुग्णाला कोणताही खर्च करावा लागला नाही. औषधोपचारासाठी रुग्णाने केलेल्या खर्चाची प्रतिपूर्ती झालेली आहे. रुग्ण आता चांगला आहे. त्याला कोणताही त्रास नाही. रुग्णाला फक्त इतके तिकडे जाण्याचाच त्रास झालेला आहे. या प्रकरणी वैद्यकीय अधिका-याकडून किरकोळ प्रकारचे दुर्लक्ष झालेले आहे. त्याबद्दल त्याना शोकॉज नोटीस दिलेली आहे.

श्री. भाई जगताप : हा रुग्णाच्या जिवाशी खेळण्याचा प्रकार आहे. रुग्णावर तीन वेळा सर्जरी करण्यात आली. मी काही मेडिकलचा स्टुडण्ट नाही. परंतु माननीय मंत्री महोदय स्वत:चे मत कसे काय सांगू शकतात. खरे तर ते शासनाचे मत असायला पाहिजे. रुग्णावर तीन शस्त्रक्रिया झाल्या. सर्व खर्च शासनाने केलेला आहे याचा अर्थ शासनाने काही मेहरबानी केलेली नाही. डॉक्टर रुग्णाच्या जिवाशी खेळण्याचा प्रयत्न करीत आहेत. हलगर्जीपणा बद्दल वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचा-याला शोकॉज नोटीस दिल्याचे लेखी उत्तरामध्ये म्हटलेले आहे. म्हणजे डॉक्टरवर कारवाई करण्यासाठी रुग्णाच्या मरणाची वाट आपण पहात होता काय ? ही गोष्ट सहजासहजी घेऊन चालणार नाही. जर त्या रुग्णाच्या ठिकाणी कुणा आमदाराचा, कुणा मंत्र्याचा, कुणा उद्योगपतीचा मुलगा असता तर इतका हलगर्जीपणा घडला असता काय, तेव्हा हलगर्जीपणा बद्दल या डॉक्टरवर निलंबनाची कारवाई करण्यात येईल काय ?

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान : एक्सेस पस बाहेर काढला तरी त्याला शस्त्रक्रिया म्हटली जाते. या टेक्निकल गोष्टी आहेत. एमआरआयमध्ये सुई दिसून आली नाही. वैद्यकीय अधिका-याकडून फार मोठा निग्लिजन्स झालेला नाही. दोन ठिकाणी खाजगी दवाखान्यामध्ये एक्स-रे आणि तपासणी करण्यात आली. चौकशीमध्ये असे निदर्शनास आले की त्या डॉक्टरांनी सिव्हिल सर्जनला विचारले पाहिजे होते. याबाबतीत निलंबन हे संयुक्तिक नाही.

श्री. भाई जगताप : छापील उत्तरामध्ये हलगर्जीपणा झालेला असल्याचे नमूद केलेले आहे.

सभापती : हलगर्जी करणा-यांना शोकॉज नोटीस दिलेली आहे. याचा अर्थ त्यांनी आपल्या कर्तव्यामध्ये हलगर्जीपणा केलेला आहे असे दिसते. राज्य मंत्री महोदयांनी उत्तरामध्ये असे सांगितले की,

...नंतर श्री. गिते...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.13070....

मा.सभापती....

कलर डॉप्लरमध्ये सुई किंवा एखादा अंश असल्यासारखा रिपोर्ट आहे, असेही लिहिले आहे. आपण या बाबतीत सह संचालक, आरोग्य किंवा एखाद्या उच्चस्तरीय अधिकाऱ्यांकडून चौकशी करुन, या प्रकरणी ज्यांनी कुचराई केली असेल त्यांचे विरुध्द कठोर कारवाई करण्यात येईल काय ?

श्रीमती फौजिया खान : सभापती महोदय, सभागृहाची भावना लक्षात घेता या प्रकरणाची उप संचालक, आरोग्य यांच्या स्तरावरुन चौकशी करण्यात येईल. आपण कलर डॉप्लरबद्दल उल्लेख केलेला आहे.

सभापती : तुम्ही तुमच्याच उत्तरात कलर डॉप्लरचा उल्लेख केला आहे.

श्रीमती फौजिया खान : होय. कलर डॉप्लरच्या बाबतीत मी उल्लेख केला. कलर डॉप्लरच्या बाबतीत मी असेही सांगितले आहे की, त्याच्यात आपल्याला आर्ट इफेक्ट सुध्दा दिसू शकतो. तसेच एखादा स्कार देखील सुई सारखा दिसू शकतो. याचा मी माझ्या उत्तरात उल्ले्ख केलेला आहे.

प्रा.सुरेश नवले : कलर डॉप्लर खाजगी रुग्णांलयांमध्ये आहे. आपल्या सिव्हील हॉस्पिटलमध्ये नाही. कलर डॉप्लरमध्ये सुई आढळून आली असे माननीय आरोग्य राज्यमंत्र्यांनी या ठिकाणी सांगितले आहे. रुग्णाला फार त्रास झाला नाही अशीही माहिती या ठिकाणी दिली गेली. फिजीकल त्रास, जाण्या-येण्याच्या त्रास, त्यांच्या नातेवाईकांचा त्रास, आई वडिलांना त्रास, त्रास काही कमी असतो काय ? कलर डॉप्लर आहे खाजगी रुग्णालयात आहे, सिव्हील हॉस्पिटला नाही. सिव्हील हॉस्पिटलला कलर डॉप्लर तातडीने उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था केली जाईल काय ?

श्रीमती फौजिया खान : सभापती महोदय, कलर डॉप्लर पेक्षा जास्त ॲडव्हान्स टेस्ट ही एमआयआर आहे. त्या रुग्णाची एमआयआर टेस्ट औरंगाबाद येथे करण्यात आली, जे.जे.रुग्णालयात एमआयआर टेस्ट करण्यात आली होती. जी गोष्ट कोणत्याही टेस्टमध्ये दिसून येत नाही, ती गोष्ट एमआयआर टेस्टमध्ये दिसून येते. कलर डॉप्लर सिव्हील हॉस्पिटलमध्ये घ्यावे या बाबत सन्माननीय सदस्यांनी सूचना केली आहे, त्या सूचनेचा निधीच्या उपलब्धते प्रमाणे विचार करण्यात येईल.

------ 2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तारांकित प्रश्न क्रमांक 13495

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित.)

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

01-04-2011 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) Z-3

ABG/ प्रथम श्री. शिगम.. 12:20

तारांकित प्रश्न क्रमांक 13660

औरंगाबाद येथील घाटी रुग्णालयासाठी उभारण्यात

आलेली धर्मशाळा बंद झाल्याबाबत

(७) * १३६६० श्री.सतीश चव्हाण , श्री.एम.एम.शेख , श्री.विक्रम काळे : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथील घाटी रुग्णालय प्रशासनाने ठेकेदाराची मुदत संपल्याने ठेकेदाराकडून तीन वर्षापूर्वी घाटी रुग्णालयासाठी उभारण्यात आलेली धर्मशाळा बंद केल्याने रुग्णांचे व त्यांच्या सोबत येणाऱ्या कुटुंबांचे थंडीत हाल होत असल्याचे माहे डिसेंबर, २०१० मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार घाटी रुग्णालयात येणारे रुग्ण व त्यांच्या सोबत येणाऱ्या नातेवाईकांसाठी धर्मशाळेची सोय करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. डी.पी.सावंत, डॉ.विजयकुमार गावित यांच्याकरिता : (१) हे अंशत: खरे आहे.

(२) व (३) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, औरंगाबाद येथे रुग्णांच्या नातेवाईकांची गैरसोय होवू नये यादृष्टीने शासनाने सदर धर्मशाळा दिनांक १४/५/२००८ रोजी प्रायोगिक तत्वावर ११ महिन्याच्या कालावधीसाठी वोखार्ड या संस्थेस चालविण्यास काही अटी शर्तीस अधिन राहून मान्यता दिली होती.

तथापि, सदर संस्थेने कोणतीही कार्यवाही न केल्याने शासनाने दिनांक २८/१२/२०१० अन्वये श्री.गाडगे महाराज मिशन, मुंबई या सेवाभावी संस्थेस सदर धर्मशाळा चालविण्यास मान्यता दिली आहे. त्या संस्थेमार्फत धर्मशाळेची आवश्यक ती दुरूस्ती व रंगरंगोटीचे काम करण्यात येत आहे.

सदर काम अंतिम टप्प्यात असून लवकरच या धर्मशाळेमध्ये रुग्णांच्या नातेवाईकांची व्यवस्था होईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सतीश चव्हाण : सभापती महोदय, उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, सदर धर्मशाळा दिनांक १४.५.२००८ रोजी प्रायोगिक तत्वावर ११ महिन्याच्या कालावधीसाठी वोखार्ड या संस्थेस चालविण्यास दिली होती, परंतु त्या संस्थेने ती धर्मशाळा चालविली नाही. ती धर्मशाळा दिनांक २८.१२.२०१० अन्वये श्री.गाडगे महाराज मिशन,मुंबई या सेवाभावी संस्थेस चालविण्यास मान्यता दिली आहे. तसेच उत्तरात असेही म्हटले आहे की, सदर संस्थेमार्फत धर्मशाळेची आवश्यक ती दुरुस्ती व रंगरंगोटीचे काम करण्यात येत आहे. त्या धर्मशाळेत कोणत्याही प्रकारचे दुरुस्तीचे काम सुरु झालेले नाही. तीन वर्षे धर्मशाळा बंद असताना अधिकाऱ्यांनी काय केले ? त्या ठिकाणी हजारो रुग्ण असतात, त्यातील हजार, दीड हजार रुग्ण बाहेर झोपतात. तीन वर्षे धर्मशाळा बंद होती, त्यास कोण जबाबदार आहेत ? ही धर्मशाळा किती दिवसात चालू होणार ?

श्री. डी.पी.सावंत : सभापती महोदय, १९९७ मध्ये ही धर्मशाळा बांधण्यात आली. दिनांक ३१.७.१९९८ अन्वये सदर धर्मशाळा ११ महिन्याच्या कराराने नोंदणीकृत सेवाभावी संस्थांना चालविण्यासाठी देण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानंतर सुसंवाद मेडीकल सोशल डेव्हलपमेंट ऑर्गनायझेशन, औरंगाबाद या संस्थेने डिसेंबर २००४ पर्यंत धर्मशाळा चालविली. नंतर त्या संस्थेने भाडे थकविले. तसेच धर्मशाळेच्या स्वच्छतेकडे दुर्लक्ष केले. म्हणून त्या संस्थेकडून ती धर्मशाळा परत घेण्यात आली. त्यानंतर ही धर्मशाळा दिनांक १४.५.२००८ च्या पत्रान्वये वोकार्ड या संस्थेस ११ महिन्यांच्या करारावर चालविण्यासाठी देण्यात आली होती. या ११ महिन्यात वोकार्ड संस्थेने काहीच केले नाही, त्यांनी धर्मशाळा चालविण्यास स्वारस्य दाखविले नाही, म्हणून त्यांच्याकडूनही ही धर्मशाळा परत घेण्यात आली. दिनांक २८ डिसेंबर, २०१० रोजी श्री.संत गाडगेबाब मिशन, मुंबई या संस्थेस ही धर्मशाळा चालविण्यासाठी देण्यात आली. ही संस्था जे.जे.रुग्णालयातील धर्मशाळा गेल्या वीस वर्षापासून चालवित आहे. त्या संस्थेस धर्मशाळा चालविण्याचा चांगला अनुभव आहे. त्या संस्थेशी धर्मशाळा चालविणेसाठी करार केलेला आहे. सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, या धर्मशाळेत रंगरंगोटीचे काम चालू आहे. येत्या एक,दोन महिन्यात ही धर्मशाळा चालू होईल.

यानंतर श्री. भोगले...

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

आम्ला आरोग्य केंद्रात (ता.गेवराई,जि.बीड) जननी सुरक्षा योजनेच्या अनुदानात झालेला अपहार

(८) * १३३०३ ॲड. उषाताई दराडे , श्री.विक्रम काळे , श्री.हेमंत टकले , श्री.प्रकाश बिनसाळे , श्री.रमेश शेंडगे , श्री.सतीश चव्हाण , श्री.धनंजय मुंडे : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गेवराई तालुक्यातील (जि.बीड) आम्ला आरोग्य उपकेंद्रात जननी सुरक्षा योजनेच्या अनुदानाचा अपहार झाल्याची घटना माहे डिसेंबर, २०१० च्या शेवटच्या सप्ताहात उघडकीस आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर अपहारास जबाबदार असणाऱ्यांवर कोणती कडक कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा.फौजिया खान, श्री.सुरेश शेट्टी यांच्याकरिता : (१) गेवराई तालुक्यातील आम्ला आरोग्य उपकेंद्रात जननी सुरक्षा योजनेच्या अनुदानाचा अपहार झाल्याची श्री.व्ही.के.गाडे यांनी दि.१८.१२.२०१० रोजी जिल्हाधिकारी, बीड तथा अध्यक्ष, भ्रष्टाचार निर्मूलन समिती, बीड यांच्या कार्यालयाकडे केलेली तक्रार प्राप्त झाली आहे.

(२) होय.

(३) आरोग्य अधिकारी, लेखापाल व जिल्हालेखा व्यवस्थापक, ता.गेवराई यांच्या संयुक्त समितीमार्फत चौकशी केलेली आहे. सदर चौकशीत अनुदानाचा अपहार झाला नसल्याचे आढळून आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

ॲड.उषा दराडे : सभापती महोदय, शासनाने दिलेल्या उत्तरामुळे माझे समाधान झाले आहे. त्यामुळे मी उपप्रश्न विचारु इच्छित नाही.

ता.प्र.क्र.13435

(माननीय सदस्य अनुपस्थित)

ता.प्र.क्र.12829

(माननीय सदस्य अनुपस्थित)

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राज्यातील नद्यांचे प्रदूषण कमी करण्यासाठी केंद्र शासनाकडून जास्त निधी उपलब्ध करुन घेण्याबाबत

(११) * १३७६७ डॉ.दिपक सावंत , श्री.रामदास कदम , श्री.दिवाकर रावते , डॉ.निलम गोन्हे , श्री.महादेवराव महाडिक , प्रा.सुरेश नवले , श्री.राजन तेली , श्री.सुभाष चव्हाण , श्री.चरणसिंग सप्रा , श्री.माणिकराव ठाकरे , श्री.हुसेन दलवाई , श्री.विजय सावंत , डॉ.सुधीर तांबे , श्रीमती दिप्ती चवधरी , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप , श्री.पांडुरंग फुंडकर , श्री.जगदीश गुप्ता , श्री.संजय केळकर , डॉ.रणजित पाटील : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सर्वात जास्त २८ नद्या दुषित आहेत व केंद्र शासनाकडून २७ राज्यातील १५० नद्या स्वच्छ करण्यासाठी ४,०८५ करोड रुपये निधी देण्यात आला आहे. राज्यात सर्वात जास्त नद्या दुषित असतानाही सर्वात कमी १०६.९४ करोड रुपये मंजूर केले असुनही त्यातील फक्त ५२ करोड रुपये देण्यात आले ते सर्व व्यवस्थापनावर खर्च झाल्याचे माहे डिसेंबर, २०१० मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील दुषित नद्या स्वच्छ करण्यासाठी राज्याने केंद्र शासनाकडून जास्तीत जास्त निधी उपलब्ध करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) राज्याने दुषित नद्या स्वच्छ करण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, याप्रकरणी होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.संजय देवतळे : (१) केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या दिनांक ४.१०.२०१० च्या अहवालानुसार २८ नद्यांचे पट्टे प्रदूषित झाल्याचे दिसून येत आहे. राष्ट्रीय नदीकृती योजनेंतर्गत केंद्र शासनाकडून प्राप्त होणारा निधी शहरांना थेट उपलब्ध करुन देण्यात येतो व हा निधी प्रशासकीय मान्यता प्राप्त कामांवर खर्च होतो असे प्रगती अहवालावरुन दिसून येते.

या योजनेंतर्गत केंद्र शासनाकडून रुपये १३८४७.६६ लक्ष च्या कामास प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली असून रुपये ५६३०.८० लाख अनुदान सप्टेंबर, २०१० पर्यंत प्राप्त झाले आहे.

(२) व (३) राज्यातील दूषित नद्या स्वच्छ करण्यासाठी कृष्णा व गोदावरी नदीवरील ५ शहरांना तसेच तापी व पंचगंगा नदीवरील प्रत्येकी एका शहराला अनुदान प्राप्त झाले आहे.

पैठण व वाई शहराचे प्रस्ताव केंद्र शासनाकडे सादर करण्यात आले असून नागपूर शहराच्या प्रस्तावामध्ये सुधारणा करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, शासनाने दिलेल्या उत्तरामुळे माझे समाधान झाले आहे. त्यामुळे मी उपप्रश्न विचारु इच्छित नाही.

अशुद्धीत मत/शोधनासाठी नाही

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पाटबंधारे प्रकल्प निधी अभावी अपूर्ण अवस्थेत राहिल्याबाबत

(१२) * १२७७५ श्री.परशुराम उपरकर , श्री.रामदास कदम , डॉ.दिपक सावंत : सन्माननीय **जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पाटबंधारे प्रकल्प निधीअभावी अपूर्ण अवस्थेत असून या प्रकल्पांना कोकण पॅकेज अंतर्गत निधी देण्याचे मान्य करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) कोकण पॅकेजअंतर्गत निधी देण्याकरिता मा.राज्यपालांचे निर्देश अडचणीचे झाले आहेत, हे खरे आहे काय,

(३) यामुळेच कोकणातील पाटबंधारे प्रकल्पांना सिंचनाचा अनुषेश भरुन काढण्याकरिता कोकण पॅकेज अंतर्गत निधी देण्यात आला नाही हे खरे आहे काय,

(४) नरवडे पाटबंधारे प्रकल्पाला बंधाऱ्याऐवजी कालव्याद्वारे पाणी देण्याबाबत जिल्ह्याचे पालकमंत्री यांनी मागणी केली हे खरे आहे काय, याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे ?

श्री.राजेंद्र मुळक, श्री.सुनील तटकरे यांच्याकरिता : (१) कोकणच्या विकासाची गती वाढविण्यासाठी व त्या विभागात पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी कोकण विकास कार्यक्रम-२००९ जाहीर केला आहे. त्यामध्ये कोकण प्रदेशातील प्रगतीपथावरील ३९ पाटबंधारे प्रकल्पांसाठी सन २००९-१० ते २०११-१२ या तीन वर्षांसाठी रु.१५५०.०० कोटी निधी उपलब्ध करुन देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यात सिंधुदुर्ग जिल्ह्यातील १२ प्रकल्पांसाठी रु.८३८.५६ कोटी इतक्या निधीची तरतूद आहे.

(२) नाही.

(३) नाही, कोकण पॅकेज अंतर्गत सन २००९-१० मध्ये रु.४२९.०६ कोटी व सन २०१०-११ मध्ये फेब्रुवारी अखेरपर्यंत रु.३१८.४४ कोटी असा एकूण रु.७४७.५० कोटी एवढा निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. त्यामध्ये सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पॅकेज अंतर्गत प्रकल्पांसाठी रु.२८५.६० कोटीचा समावेश आहे.

(४) नाही.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये एकूण किती प्रकल्प निधीअभावी अपूर्णावस्थेत आहेत? पूर्ण झालेल्या प्रकल्पांच्या कालव्यांची कामे सुरु करण्याबाबत शासन निधी उपलब्ध करुन देणार आहे काय?

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, निधीची व्यवस्था करण्यात येईल.

श्री.राजन तेली : सभापती महोदय, कोकणात जवळपास ९४ प्रकल्प अपूर्ण आहेत. मागील तीन वर्षाचा आढावा घेऊन मंत्री महोदयांनी उत्तर दिले आहे. मी सभागृहाच्या निदर्शनास आणू इच्छितो की, तरंदळे पाटबंधारे प्रकल्पाचे ७५ टक्के काम पूर्ण झाले असून भूसंपादनाचे पैसे अद्याप दिले गेले नाहीत, त्यामुळे शेतकऱ्यांनी काम बंद पाडले. कोर्ले सातांडी प्रकल्पाचे घळभरणीचे काम पूर्ण झाले असून भूसंपादनाचे पैसे न दिल्यामुळे शेतकऱ्यांनी काम बंद पाडले. ८० टक्के कामे पूर्ण

..४..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

होऊनही भूसंपादनाचे पैसे दिले जात नाहीत. मागील अधिवेशनात शासनाने ठेकेदारांना ३५० कोटी रुपये द्यायचे सभागृहात कबूल केले होते तो निधी अद्याप दिला गेला नाही. शासनाची अशी भूमिका असेल तर पुढील २५ वर्षे हे प्रकल्प पूर्ण होणार नाहीत. एक एक प्रकल्प २५ वर्षे होऊनही पूर्ण झालेला नाही. तिलारी प्रकल्पाची तीच अवस्था आहे. ज्या प्रकल्पांचे ७५ ते ८० टक्के काम पूर्ण झाले आहे, ज्या प्रकल्पांचे घळभरणीचे काम पूर्ण झाले आहे अशा सर्व प्रकल्पांसाठी चालू आर्थिक वर्षात भूसंपादनाचे संपूर्ण पैसे दिले जातील काय?

श्री.राजेंद्र मुळक : या आर्थिक वर्षात साधारणत: ज्या प्रकल्पांचे ८० ते ९० टक्के काम पूर्ण झाले आहे अशी कामे पूर्ण करुन नवीन सिंचन क्षमता निर्माण करण्याचा शासनाचा उद्देश आहे. त्या अंतर्गत माननीय सदस्य श्री.राजन तेली यांनी सांगितल्याप्रमाणे कोकणातील ज्या प्रकल्पांचे ८० ते ९० टक्के काम पूर्ण झाले आहे, काही ठिकाणी ७५ टक्के काम पूर्ण झालेले आहे आणि भूसंपादनाच्या कामासाठी निधीची आवश्यकता आहे, शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदला द्यायचा आहे. निश्चित स्वरुपात पैसा उपलब्ध करुन देण्यात येईल.

<u>ता.प्र.क्र.१२७४१</u>

(माननीय सदस्य अनुपस्थित)

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राज्यात विविध ठिकाणी टाईल्स व्यापाऱ्यांनी शासनाची केलेली फसवणूक

(१४) * १३८२१ श्री.विनोद तावडे , श्री.चंद्रकांत पाटील , श्री.रामनाथ मोते , श्री.संजय केळकर : सन्माननीय **उप मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मुंबई, पुणे, नागपूर, अहमदनगर, कोल्हापूर, गोंदिया या ठिकाणच्या ९१ टाईल्स व्यापाऱ्यांनी बनावट सी फॉर्मच्या आधारे गुजरात राज्यातून खरेदी करुन महाराष्ट्रात विक्री केलेल्या टाईल्स वरील विक्रीवर कर भरला नसल्याचे आढळून आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी अन्वेषण विभागाने केलेल्या चौकशीत कोणते कर सल्लागार दोषी आढळले व त्यांची मान्यता रद्द करणेबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे,

(३) असल्यास, या प्रकरणी दोषी आढळलेले व्यापारी व कर सल्लागार यांच्याविरुध्द फौजदारी कारवाई करण्याचे निर्देश अन्वेषण विभागाने दिले आहेत, हे खरे आहे काय, असल्यास, सदर प्रकरणी फौजदारी कारवाई करण्यात आली आहे काय ?

श्री.राजेंद्र मुळक, श्री.अजित पवार यांच्याकरिता : (१) अंशत: खरे आहे.

राज्याच्या विविध भागातील ज्या ९१ टाईल्स व्यापाऱ्यांना अन्वेषण भेटी देण्यात आल्या त्यापैकी १६ व्यापाऱ्यांनी बनावट सी फॉर्मच्या आधारे खरेदी केलेल्या टाईल्सच्या महाराष्ट्रातील विक्रीवर कर भरला नसल्याचे आढळून आले आहे.

(२) या प्रकरणी अन्वेषण विभागाने केलेल्या चौकशीत श्री.दिव्येश भावसार, श्री.कृष्णा रावल व श्री.सुनिल भलाई हे करसल्लागार दोषी आढळले आहेत. यापैकी श्री.दिव्येश भावसार व श्री.कृष्णा रावल या मुंबईतील करसल्लागारांची मान्यता रद्द करण्यात आली असून श्री.सुनिल भलाई या पुणे येथील करसल्लागाराची मान्यता रद्द करण्याबाबत कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.

(३) होय.

सदर प्रकरणी ६५ व्यापारी व ३ करसल्लागारांविरुध्द संबंधित पोलीस ठाण्यामध्ये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, ६५ व्यापारी व ३ कर सल्लागारांविरुध्द पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केल्याचे उत्तरात म्हटले आहे. या ६५ व्यापाऱ्यांनी मोठ्या प्रमाणात शासनाचा कर बुडविला आहे. त्यांच्याकडून किती रक्कम वसूल केली आहे? बनावट सी फॉर्मच्या आधारे कर बुडविला जातो.

नंतर २बी.१...

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.: 13821 .....

श्री. विक्रम काळे ....

अशा प्रकारची चर्चा या सभागृहात अनेक वेळा झालेली आहे. हा प्रकार यापुढे होऊ नये यासाठी महाराष्ट्र शासनाच्या वतीने सी फॉर्मच्या बाबतीत उपाययोजना केली जाणार आहे काय ?

श्री. राजेंद्र मुळक : सभापती महोदय, राज्यामध्ये एकंदर 136 टाईल्स बनविणा-या उद्योगांना अचानक भेटी देण्यात आलेल्या असून प्राथमिक चौकशी अनुसार सदर व्यापा-यांकडे "क" नमुन्याचा वापर मोरबी येथील व्यपा-यांनी करुन तेथून अंदाजे 185 कोटी रकमेच्या टाईलची खरेदी केली असल्याची शक्यता दिसून आलेली आहे. सदर व्यापा-यांनी अशा प्रकारची खरेदी-विक्रीची नोंद न करता विक्री केल्याने अंदाजे 26 कोटी रुपयांची कर चुकवेगिरी झाली असल्याची शक्यता दिसून येते. या व्यापा-यांकडे देण्यात आलेल्या भेटीअन्वये अद्यापपर्यंत आगाऊ भरणा म्हणून अंदाजे 3.83 कोटी रुपये इतक्या कराची वसुली करण्यात आलेली आहे.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, उत्तरामध्ये मुंबईचे काही आयकर सल्लागार दोषी आढळून आल्यामुळे त्यांच्यावर आपण कारवाई करुन त्यांची मान्यता रद्द केलेली आहे. परंतु पुण्याचे श्री. सुनील भलाई दोषी आढळून आलेले आहेत परंतु त्यांच्यावर अद्यापपर्यंत कारवाई करण्यात आली नसून त्याला केवळ कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेली आहे. आपण ज्याप्रमाणे मुंबईच्या आयकर सल्लागारावंर कारवाई केली तशीच कारवाई आपण पुण्याच्या सुनील भलाई यांच्यावर करणार आहात काय ?

श्री. राजेंद्र मुळक : सभापती महोदय, तशाच प्रकारची कारवाई त्यांच्यावर देखील केली जाईल.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, ज्या व्यापा-यांनी 67 कोटी रुपये बुडवले होते त्या व्यापा-यांनी या टाईल्स इम्पोर्ट केल्या होत्या की, गुजरात राज्यातून आणल्या होत्या ? आपल्याकडे चीनमधून मोठया प्रमाणात टाईल्स इम्पोर्ट केल्या जात असल्यामुळे येथील स्थानिक टाईल बनविणा-यांचा जीवन मरणाचा प्रश्न निर्माण झाला आहे. चीनची टाईल्स इम्पोर्ट करुन बरेच व्यापारी कर चुकवेगिरी करीत असतात. त्यामुळे यासंदर्भात अशा व्यापा-यांवर कोणती कारवाई केली जाणार आहे ?

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.: 13821 .....

श्री. राजेंद्र मुळक : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी व्यापक प्रश्न विचारलेला आहे. या संदर्भातील पूर्ण माहिती घेऊन योग्य ती कारवाई केली जाईल व त्या संदर्भातील माहिती सन्माननीय सदस्यांना देण्यात येईल.

सभापती : प्रश्नोत्तराची वेळ संपली आहे.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशनच्या संबंधी

सभापती :सन्माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण यांना पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशन उपस्थित करावयाचा आहे त्यांनी आपला मुद्दा मांडावा.

श्री. सुभाष चव्हाण : सभापती महोदय, बुधवार दिनांक 30.3.2011 रोजी भारताने क्रिकेट मॅचमध्ये पाकिस्तानला पराभूत केल्यामुळे संपूर्ण देशाचे वातावरण आनंदमय झालेले आहे. टीव्ही वरुन आमचे नेते आनंदमय असल्याचे आम्ही बघितलेले आहे. प्रत्येक लोकप्रतिनिधींना उद्याच्या मॅचसाठी पास देण्यात यावेत अशी मी परवा मागणी केली होती. यासंदर्भात चेअरवरुन माननीय उप सभापती महोदयांनी क्रीडा मंत्र्यांना निदेशही दिले होते परंतु त्या निदेशाची अंमलबजावणी अद्यापपर्यंत झालेली नाही. त्यामुळे उद्याच्या मॅचचे 2-2 पासेस लोकप्रतिनिधींना उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात आपण शासनास निर्देश द्यावेत अशी विनंती आहे.

सभापती : सभागृहामध्ये सन्माननीय ग्रामविकास मंत्री श्री. जयंतराव पाटील उपस्थित आहेत. या विषयाच्या संदर्भात शासनाकडून यापूर्वीही काही प्रयत्न झालेले आहेत असे मी ऐकलेले आहे. त्यामुळे उद्याच्या मॅचचा एक एक पास दोन्ही सभागृहाच्या सन्माननीय सदस्यांना मिळण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावेत.

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, माझ्याकडे उपलब्ध असलेल्या माहिती प्रमाणे श्रीलंकेचे अध्यक्ष आणि त्यांचे संपूर्ण मंत्रिमंडळ मॅच पाहण्यासाठी येत आहे तसेच राष्ट्रपती महोदया व त्यांच्या बरोबर अनेक मान्यवर येणार आहेत. त्यामुळे सदस्यांसाठी तिकीट किंवा पास उपलब्ध होणे फार अवघड आहे.

यानंतर श्री. गायकवाड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत पाटील....

त्यामुळे जवळजवळ " नाही " असेच उत्तर आपण सर्वानी स्वीकारले पाहिजे. आज तुम्हाला निष्कारण आशेवर ठेवावयाचे आणि उद्या सकाळी आपली निराशा करण्यापेक्षा पास मिळणे 99 टक्के अवघड आहे. हे मी आपल्याला सांगतो. त्याचबरोबर टी.व्ही.वर मॅच अधिक चांगली दिसते असा निष्कर्ष अलीकडे निघालेला आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्यांसाठी सीसीआय च्या लॉनवर किंवा अन्य ठिकाणी मोठया स्क्रीनवर मॅच दाखविण्याची विशेष व्यवस्था निश्चित करण्यात येईल.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, आजच्या वर्तमानपत्रात अशी बातमी प्रसिध्द करण्यात आली आहे की. टी.व्ही.वर सुध्दा ही मॅच दाखविली जाणार नाही तेव्हा ही गोष्ट खरी आहे काय , खरी असेल तर टी.व्ही. वर ही मॅच दाखविण्यासंबंधीची कार्यवाही राज्य शासनाकडून केली जाईल काय ?

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, असे होणे शक्य नाही. ज्या चॅनलला मॅच दाखविण्याचे राईट मिळालेले असतील त्या चॅनलवरुन मॅच दाखविली जाईल. तो चॅनल आपण पहावो. इतर चॅनल्स उघडून पाहण्या पेक्षा ज्या चॅनलला मॅच दाखविण्याचे राईट मिळालेले आहेत तो चॅनल जर आपण उघडला तर आपल्याला मॅच दिसेल असे मला वाटते.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, क्रिकेटचे पास मिळतील हे गृहीत धरु नका असे माननीय मत्र्यांनी सांगितलेले आहे.वृत्तवाहिनीवर काल पासून अशी बातमी दाखविण्यात येत आहे की सर्व मंत्र्यांना क्रिकेटच्या मॅचचे पास देण्यात आलेले आहेत. मंत्री होण्यापूर्वी ते आमदार आहेत. त्यामुळे आज ते मंत्री आहेत याबद्दल आम्हाला निश्चितच आदर आहे,याबद्दल कोणाचेही दुमत असण्याचे कारण नाही. परंतु आमदारांना सापत्नपणाची वागणूक का दिली जात आहे. त्या ऐवजी सर्व आमदारांना सपत्नीक पास देण्यात यावा. तो पास देण्यात येणार आहे काय ?

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, मंत्री होण्यापूर्वी प्रत्येकजण आमदार असतो. प्रत्येकाला त्यातून जाणे आवश्यक असते. आम्ही आज आमदार झालो आणि दुस-या दिवशी सकाळी मंत्री झालो असे नाही.जवळपास दहा वर्षे त्यासाठी थांबावे लागले. सन्माननीय सदस्य श्री भाई जगताप सुध्दा कधी तरी मंत्री होणारच आहेत . त्यामुळे वेदना सहन करुन पुढे जाणे हाच राजकारणाच्या प्रवाहातील महत्वाचा भाग आहे.

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री जयंत प्र.पाटील यांनी जे सागितले ते खरे आहे. टी.व्ही. वर ही मॅच दाखविली जाणार नाही असे आजच्या लोकमत आणि सकाळ या वर्तमानपत्रात ठळकपणे लिहिलेले आहे. संबंधित चॅनलला मॅच दाखविण्याचे अधिकार देण्यात आलेले आहेत असे माननीय मंत्र्यांनी मघाशी सागितले आहे.तेव्हा नेमके कोणत्या चॅनलला हे अधिकार देण्यात आलेले आहेत याबाबतीत माननीय मंत्री खुलासा करतील काय ?

श्री.जयंत पाटील : क्रिकेट असोसिएशनचा किंवा क्रिकेट बोर्डाचा मी प्रवक्ता नाही.तरी देखील मी सांगू इच्छितो की ,त्यांनी ज्या चॅनलला राईट दिलेले आहेत त्या चॅनलवरुन मॅच दिसेल याची मला खात्री आहे.जर त्या चॅनलवरुन मॅच दिसली नाही तर त्याची जबाबदारी मी घेईन आणि सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांना मॅच दाखविण्याची व्यवस्था करीन.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.मु.शी : कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री.गुलाबराव देवकर (परिवहन राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचा सन 2009-2010 चा प्रशासन अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : प्रशासन अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

--

श्री.राजेंद्र मुळक (जलसंपदा राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने तापी पाटबंधारे विकास महामंडळ,जळगाव यांचा सन 2009-2010 चा बारावा वार्षिक वित्तीय अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : वित्तीय अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

--

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विदर्भ पाटबधारे विकास महामंडळ, नागपूर यांचा सन 2008-2009 चा बारावा वार्षिक वित्तीय अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : वित्तीय ृअहवाल सभागृहा समोर ठेवण्यात आला आहे.

--

नंतर श्री सरफरे

अशुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र मुळक (जलसंपदा राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाचा सन 2009-2010 चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी. : औचित्याचा मुद्दा

सभापती : आज शुक्रवार आहे व औचित्याचे मुद्दे मांडण्याचा दिवस आहे. काही सन्माननीय सदस्यांनी एकापेक्षा अधिक औचित्याचे मुद्दे मांडण्यासाठी माझ्याकडे परवानगी मागितली आहे. त्यापैकी प्राधान्याने एक औचित्याचा मुद्दा मांडण्यास त्यांना नक्की परवानगी मिळेल. तसेच, वेळ उपलब्ध असल्यास त्यांना पुढील औचित्याचा मुद्दा मांडण्यास परवानगी मिळेल, किंवा तो मुद्दा योग्य असल्यास त्याबाबत नंतर विचार करण्यात येईल.

तेव्हा आता सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

"सभापती महोदय, राज्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना रु.1750 चा पहिला हप्ता देण्याचा राज्य शासनाने निर्णय घेतला. राज्याच्या माननीय गृहमंत्र्यांनी जे कारखाने यापेक्षा कमी भाव देतील त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्याची घोषणा विधानसभेत केली. मराठवाडयातील तुळजापूर, कळंब, लोहा, कंधार, मेढा आणि रेणापूर या भागातील कारखान्यामध्ये पहिला हप्ता 1500 रुपयांपेक्षा कमी देण्यात येतो. त्यामुळे तेथील शेतकऱ्यांची खऱ्या अर्थाने पिळवणूक होत आहे. या करिता राज्य शासनाने या गोष्टीकडे तातडीने लक्ष दिले पाहिजे. याच परिसरातील विकास आणि मांजरा या कारखान्यामधून शेतकऱ्यांना 2 हजारापेक्षा जास्त पहिला हप्ता दिला जात आहे. किंबहुना मांजरा आणि विकास या कारखान्यांनी गेल्या वर्षीच्या सर्वसाधारण सभेमध्ये 2500 पेक्षा जास्त भाव शेतकऱ्यांना दिला आहे. ही भावामधील तफावत लक्षात घेता जे कारखानदार शेतकऱ्यांना भाव देत नाहीत त्यांची चौकशी करुन शेतकऱ्यांना रु.1700 चा पहिला हप्ता तातडीने देण्याबाबत राज्य शासनाने कारवाई करावी. तसेच, शेतकऱ्यांना अनेक कारखाने अंतिम पेमेंट देतच नाहीत. त्यामुळे शेतकऱ्यांच्या ऊसाला जो भाव मिळावयास पाहिजे तो मिळत नाही. त्यामधून शेतकऱ्यांची पिळवणूक होत असल्यामुळे शासनाने लक्ष घालून शेतकऱ्यांना योग्य भाव देण्याबाबत तातडीने उपाय योजना करावी अशी मी विनंती करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.मोहन जोशी यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.मोहन जोशी : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

"पुणे मुंबई एक्सप्रेस हायवेवर गेल्या तीन वर्षात सुमारे 27 टक्क्यांनी वाहनांची संख्या वाढून त्या व्दारे वाढलेले उत्पन्न हिशेबात न घेता टोलमध्ये तब्बल 18 टक्क्यांनी दरवाढ करण्याचा निर्णय टोलधारकांनी घेतला आहे. आज दिनांक 1 एप्रिल पासून त्याची अंमलबजावणी सुरु करण्यात येणार आहे. ही दरवाढ केल्यामुळे वाहन चालकांमध्ये आणि वाहन धारकांमध्ये कमालीची नाराजी पसरली आहे. सन 2007-08 मध्ये एक्सप्रेस हायवेवर 58 लाख वाहनांनी वापर केला. सन 2008-09 मध्ये 1 कोटी 4 लाख वाहनांनी वापर केला. तसेच, सन 2009-10 मध्ये 1 कोटी 15 लाख वाहनांनी त्याचा वापर केला. अशाप्रकारे वाहनांच्या संख्येत 27 टक्क्यांनी वाढ होऊन त्यांच्या उत्पन्नामध्ये अधिक वाढ झाली आहे. टोल वसूली करणाऱ्यांचे हित साधणारी ही वाढ असून वाहन धारकांवर आणि वाहन चालकांवर भुर्दंड टाकणारी असल्यामुळे ही वाढ रद्द करण्यात यावी. वाहन धारक आणि वाहन चालक यांच्या बाबतीत आज गंभीर प्रश्न निर्माण झाला असल्यामुळे हे सभागृह संपण्यापूर्वी या अन्यायकारक असलेल्या दरवाढीला तात्पुरती स्थगिती देण्यात यावी. या करिता एक समिती नियुक्त करुन वाढलेल्या वाहनांच्या संख्येचा विचार करुन सामान्य जनतेला दिलासा देण्याचे काम करावे अशी या औचित्याच्या मुद्दयाव्दारे आपणास विनंती करतो.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.मोहन जोशी यांनी अत्यंत महत्वाचा औचित्याचा मुद्दा उपस्थित केलेला आहे. सन्माननीय सदस्यांनी जो मुद्दा मांडलेला आहे तो मी लेखी स्वरुपामध्ये सन्माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्री श्री.छगन भुजबळ साहेब यांच्यापर्यंत पोहोचवीन, माझा विभाग पोहोचवेल. त्याचबरोबर सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील साहेब यांनी देखील जो औचित्याचा मुद्दा मांडलेला आहे, तो महत्वाचा आहे. त्याबाबत माननीय मंत्री महोदयांनी जरुर मदत करावी.

. . . .2 ई-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती . . . .

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.सुभाष चव्हाण : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

"वरळी (मुंबई) येथील समुद्रकिनाऱ्यावर असलेल्या शासकीय दूध डेअरीच्या इमारतींची अवस्था अत्यंत दयनीय झालेली आहे व दिवसेंदिवस ती अधिकच दयनीय होत चालली आहे. काही दिवसांपूर्वी सभागृहातील स्लॅब कोसळून झालेल्या अपघातात काही कर्मचारी जखमी झाल्याची घटना घडल्याने कर्मचारी जीव मुठीत घेऊन काम करीत आहेत.डेअरीची अवस्था दयनीय होत असल्याने केव्हाही अपघात होऊन मोठी हानी होण्याचा धोका निर्माण झाल्याने विद्यार्थ्यांच्या डेअरी सफरी बंद करण्यात आल्या आहेत. त्याचप्रमाणे डेअरीच्या बाजूलाच असणाऱ्या शासकीय वसाहती अत्यंत धोकादायक झाल्याने मागील पावसाळयात इमारत कोसळून झालेल्या अपघातात काही कर्मचाऱ्यांचा मृत्यू होऊन काही कर्मचारी जखमी झाल्याचे आढळून आले आहे.या वसाहतीतील बऱ्याच इमारतींना टेकू लागले असतानाही इमारतींची दुरुस्ती करण्यात येत नाही. दुरुस्तीसाठी 7 कोटी रुपयांची आवश्यकता असताना फक्त 25 लाख रुपये अनुदान दिले जात आहे. दूध डेअरी व शासकीय निवासस्थाने ही अतिशय मोक्याच्या ठिकाणी असल्यामुळे या जागेवर मोठमोठ्या विकासकांची नजर असल्याचे सर्वत्र बोलले जाते व त्यामुळे दूध डेअरी व शासकीय वसाहत यांची दुरुस्ती करण्यात येत नसल्याचा दाट संशय सर्वत्र निर्माण झाला आहे.या दूध डेअरीची व शासकीय वसाहत यांची दुरुस्ती करणे अत्यंत आवश्यक आहे.अशा या अतिशय गंभीर व महत्वाच्या विषयावर मी औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे."

. . . .2 ई-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.हुसेन दलवाई यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.हुसेन दलवाई : सभापती महोदय, मला औचित्याचा मुद्दा मांडावयाचा नाही.

सभापती : ठीक आहे.

. . . .2 ई-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर सन्माननीय सदस्या ॲड.उषाताई दराडे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

ॲड.उषाताई दराडे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे

"बीड शहरातील शहेशाहनगर, बार्शी रोड, अशोकनगर या परिसरातील वीज ग्राहकांना वीज कंपनीचे अधिकारी आणि कर्मचारी प्रत्यक्ष भेटून तुमची रिडिंग खूप झाली आहे. ती कमी करुन आणतो अशी कारणे देऊन गरीब आणि सर्वसामान्य ग्राहकांची नित्याने लूट करीत असून नित्याचा त्रास देण्यात येत असणे, शहरी भागाबरोबर ग्रामीण भागातील ग्राहकांकडून हे कर्मचारी पैसे वसूल करीत असणे, सदर प्रकरणी सखोल चौकशी करुन वीज कंपनीच्या अधिकारी /कर्मचारी यांचेवर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करण्यात येत असलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.

. . . 2ई-5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.राजन तेली यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.राजन तेली : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

"सिंधुदूर्ग जिल्ह्याच्या कणकवली तालुक्यात तरंदळे गावच्या प्रकल्पग्रस्तांनी लधु पाटबंधारे धरणाच्या कामाला मंजुरी देऊन माहे डिसेंबर,2005 पासून सुरु केलेले लधु पाटबंधारे धरणाचे काम सुमारे 70 टक्के पूर्ण झालेले असणे, त्यानुसार माहे सप्टेंबर, 2009 मध्ये महसूल विभागाने प्रकल्पग्रस्तांसाठी भूसंपादन जमिनीचे अंतिम निवाडयांची जाहीर केलेली 03.36 कोटी रुपयांची रक्कम जलसंपदा विभागाने महसूल विभागाकडे जमा न केल्याने त्यामुळे जमा असलेल्या रकमेतून प्रकल्पग्रस्तांना भूसंपादन जमिनीचा मोबदला अद्याप पर्यंत देण्यात आलेला नसणे, यापूर्वी तरंदळे धरणाकरिता भूसंपादनांचे चार निवाडयांचे प्रस्ताव करण्यात आलेले आहेत परंतु माहे डिसेंबर, 2006 मध्ये सुमारे 03.36 कोटी रुपयांची रक्कम तसेच अंतिम निवाडयानुसार आणखी सुमारे 08,23 कोटी रुपयांची रक्कम जलसंपदा विभागाने महसूल विभागाकडे जमा करणे आवश्यक असतांना ते करण्यात न आल्याने प्रकल्पग्रस्तांमध्ये तीव्र असंतोष पसरणे, सदर महसूल विभागाकडे जमा असलेल्या रक्कमेतून तरंदळे प्रकल्पासाठी करावयाच्या भूसंपादनातील चार निवाड्यांपैकी शक्यतो तेवढ्या निवाड्यांचे निर्णय करुन भूसंपादित ग्रामस्थांना रक्कमेचे वाटप करण्यासाठी तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता, यासाठी मी हा औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे.

. . . .2 ई-6

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : सन्माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे यांचा आणखी एक औचित्याचा मुद्दा आहे. पण मला असे वाटते की, एकाच दिवशी दोन,तीन,चार औचित्याचे मुद्दे मांडले जात नाहीत.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश बिनसाळे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.मुंबई शहरात ज्या पध्दतीने घरांच्या किंमती भरमसाठ वाढत आहेत,त्यामुळे आज सर्वसामान्य नागरिक हा म्हाडाने जी घरे बांधली आहेत,त्याकडे डोळे लावून बसलेला आहे.म्हणून मी हा औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे.मध्यंतरी वर्तमानपत्रामध्ये म्हाडाने बांधलेल्या घरांच्या लॉटरी संबंधात वेगवेगळया बातम्या प्रसिध्द होणे.त्यामुळे सामान्य जनतेमध्ये निर्माण होणारे गैरसमज याबाबत म्हाडाच्या घरांची लॉटरी नक्की केव्हा निघणार आहे व किती गाळे विक्रीसाठी उपलब्ध होणार आहेत.तसेच या सर्व इमारतींना भोगवटा प्रमाणपत्र मिळाले किंवा नाही,घरांच्या विक्रीची किंमत किती,याबाबतची माहिती सर्वसामान्य नागरिकांना मिळण्याची आवश्यकता,याबाबत शासनाने केलेली वा करण्यात येत असलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

यानंतर कु.थोरात . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: नियम 93 अन्वये सूचना

सभापती : सन्माननीय सदस्य श्री धनंजय मुंडे यांनी "परळी औष्णिक विद्युत केंद्रातील प्रकल्पग्रस्तांच्या वारसांना आष्टी पाटोदा केज, जि.बीड या प्रशिक्षण संस्थेमध्ये पाठविण्यात येणे, तथापि प्रशिक्षण अद्यापि सुरु न होणे म्हणून प्रकल्पग्रस्तांनी दिनांक 30 मार्च, 2011 पासून सुरु केलेले उपोषण " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री केशवराव मानकर,पांडुरंग फुंडकर, श्रीमती शोभाताई फडणवीस सर्वश्री संजय केळकर, धनंजय मुंडे, पाशा पटेल यांनी "गोंदिया जिल्ह्यातील आमगांव येथील बनगांवसह 47 गावांमध्ये राबविलेल्या प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेच्या सर्वेक्षणात तफावत असल्याचे दिसून येणे (25/2/11)" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री परशुराम उपरकर यांनी "सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मौजे डोंगरपाल येथील ग्रामस्थांच्या बागायती क्षेत्रात मायनिंग एजंटांनी अतिक्रमण करुन केलेले उत्खनन, ग्रामस्थांना न्याय मिळण्याऐवजी उलट प्रशासकीय कार्यालयातून दमदाटी करण्यात येणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी "आगामी 1 मे रोजी कामगार दिनाच्या दिवशी गिरणी कामगारांना म्हाडाच्या 6,948 सदनिकांचे वाटप केले जाईल अशी शासनामार्फत केली गेलेली घोषणा तथापि 19 गिरण्यांच्या अतिरिक्त जमिनीपैकी म्हाडाच्या वाटयाला येणारी जमीन अद्यापही न देणे." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री मनिष जैन, कपिल पाटील, जयंत पाटील यांनी "रात्र शाळांमधील गरीब आणि कष्टकरी विद्यार्थ्यांच्या प्रश्नांकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष परिणामी रात्र शाळा बंद पडण्याचे वाढत चाललेले प्रमाण " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील, जयंत पाटील यांनी "लोडशेडिंगमुळे ऐन परीक्षांच्या हंगामात वीज पुरवठा खंडित झाल्यामुळे विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर व शिक्षणावर होत असलेला परिणाम." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, धन्यवाद.

सभापती : यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, रामनाथ मोते, संजय केळकर, चंद्रकांत पाटील यांनी "नवी मुंबई येथील विकासकाने खोटया कागदपत्रांच्या आधारे बँकांकडून कर्ज घेऊन केलेली फसवणूक परिणामी घर घेऊ इच्छिणाऱ्या सामान्य खरेदीदारांवर नाहक कारवाई होण्याची शक्यता." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांनी "मुंबई-पुणे महामार्गावर उभारण्यात आलेल्या फूडमॉल्समध्ये पदार्थांचे दर दामदुप्पट भावाने आकारले जाणे, तेथे असलेली अस्वच्छता, काही फूडमॉलची मुदत संपूनही नव्याने निविदा मागविण्यात न येणे." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

लक्षवेधी सूचना क्रमांक 1 बाबत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : आजच्या कामकाज पत्रिकेवर दाखविण्यात आलेली लक्षवेधी सूचना क्रमांक 1 माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर यांची आहे. या लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात त्यांनी मला लेखी पत्र दिले असून सदर पत्रात नामदार राज्यपालांना भेटून आल्यानंतर ही लक्षवेधी सूचना चर्चेला घेण्यात यावी, अशी विनंती केलेली आहे. सदर विनंती मी मान्य केलेली आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, सन्मानीय विरोधी पक्ष नेते लक्षवेधी सूचना संपण्याच्या आधी या सभागृहात उपस्थित झाले नाही तर त्यांची लक्षवेधी सूचना लॅप्स होईल काय?

सभापती : आपण उपस्थित केलेला मुद्दा बरोबर आहे. पण सर्वसाधारणपणे लक्षवेधी सूचना लॅप्स करण्याच्या मानसिकतेत मी नाही.

यानंतर श्री. बरवड....

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : मुंबईतील पोलिसांसाठी असणाऱ्या मुंबई सेंट्रल येथील बी.आय.टी. चाळीच्या तीन इमारतींची झालेली दुरवस्था

मु. शी. : मुंबईतील पोलिसांसाठी असणाऱ्या मुंबई सेंट्रल येथील बी.आय.टी. चाळीच्या तीन इमारतींची झालेली दुरवस्था यासंबंधी श्री. मोहन जोशी, श्रीमती अलका देसाई, सर्वश्री हुसेन दलवाई, विजय सावंत, भाई जगताप, चरणसिंग सप्रा, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. मोहन जोशी (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मुंबईतील पोलिसांसाठी असणाऱ्या मुंबई सेंट्रल येथील बी.आय.टी. चाळीच्या 3 इमारतींमध्ये 180 चौरस फुटांच्या घरात पोलीस राहत असून या घरासाठी पोलिसांना कमीतकमी रुपये 5000/- मोजावे लागत असून या इमारतींची अत्यंत दुरवस्था झालेली असणे, या इमारतींच्या भिंती मोडकळीस आल्या असून फुटलेल्या ड्रेनेज लाईन, अपुरे पाणी, उंदीर, घुशी व डासांच्या साम्राज्याने या वसाहतीत राहणारे पोलीस शिपाई त्रस्त झाले असून या बाबत संबंधित प्रशासनाकडे वारंवार तक्रारी, निवेदन देऊनही अद्याप याकडे दुर्लक्ष करण्यात आल्याने या वसाहतीत राहणाऱ्या पोलीस शिपाई व त्यांच्या कुटुंबीयांमध्ये प्रशासनाबद्दल निर्माण झालेली तीव्र असंतोषाची भावना व चीड, याबाबत पोलीस विभागाने त्वरित लक्ष घालून याबाबत कारवाई व उपाययोजना करण्याची आवश्यकता, या बाबत राज्य शासनाची प्रतिकिया."

श्री. भास्कर जाधव (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

श्री. मोहन जोशी : सभापती महोदय, आपल्या समाजातील महत्वाचा घटक असलेल्या पोलिसांच्या संदर्भामध्ये शासनाकडून ज्या पध्दतीचे धोरण आखले गेले पाहिजे तसे होत नाही. मुंबईतील पोलिसांच्या वसाहती असतील, महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात असलेल्या पोलिसांच्या वसाहती असतील, त्यांची अतिशय भीषण अवस्था झालेली आहे. राज्याचे माननीय गृह राज्यमंत्री श्री. सतेज पाटील यांनी एक महिन्यापूर्वी पुणे येथील पोलीस लाईन वसाहतीला भेट दिली होती. त्यांनी स्वत:च्या डोळ्यांनी त्या ठिकाणी राहणाऱ्या पोलिसांच्या कुटुंबांची आणि घरांची अवस्था पाहिलेली आहे. या लक्षवेधी सूचनेमध्ये ज्या तीन इमारतींचा उल्लेख केलेला आहे त्या इमारतींमध्ये पोलीस राहतात. या इमारती 90 वर्षापूर्वी बांधलेल्या आहेत. 90 वर्षापूर्वी बांधलेल्या या इमारतींमध्ये 180 चौ.फुटाच्या खोल्यांमध्ये पोलिसांची कुटुंबे राहतात. वयाच्या 25 व्या वर्षी पोलीस खात्यामध्ये हवालदार म्हणून भरती झाल्यानंतर लग्न होऊन 40-50 वर्षामध्ये त्यांना मुले झालेली असतात, ती मोठी होतात, त्या मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न असतो, नंतर त्यांचेही लग्न होते. 180 चौ. फूट जागेमध्ये ही कुटुंबे कशा पध्दतीने राहतात ही शासनाने विचार करण्यासारखी गोष्ट आहे. माननीय मंत्री श्री. भास्कर जाधव हे अतिशय कार्यक्षम, तडफदार आणि समाजाचे भान असणारे मंत्री आहेत. समाजातील हा घटक वर्षातील 365 दिवस ड्युटीवर असतो. दिवाळी असेल, दसरा असेल, गणेशात्सव असेल त्यावेळी कधीही त्यांना घरी राहता येत नाही. कधी कधी त्यांना 24-24 तास ड्युटी करावी लागते. 90 वर्षापूर्वी बांधलेल्या त्या वसाहतीमधील पोलिसांच्या ज्या इमारती आहेत त्यांची पुनर्बांधणी करणे अतिशय आवश्यक आहे. ज्या पध्दतीने हॉस्पिटल असेल, शाळा असेल त्यांना शासन 4 एफएसआय देते त्या पध्दतीने या पोलीस वसाहतीला पुनर्बांधणीसाठी 4 एफएसआय देणार का ? त्याचप्रमाणे प्रत्येक पोलिसाचा 400 चौ.फुटाचे घर देणार का ? 23 रुपये प्रमाणे आपल्या विभागाकडून महानगरपालिका भाडे वसूल करते आणि आपण पोलिसांकडून मात्र दरमहा 5 हजार रुपये भाडे वसूल करता. ही तफावत दूर करुन हे भाडे त्यांना माफ करणार का ?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. मोहन जोशी यांनी पोलिसांच्या घरासंबंधी एकंदरीत जे चित्र या ठिकाणी उभे केले, ती वस्तुस्थिती आहे. ते पाहण्याची

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

RDB/

श्री. भास्कर जाधव ...

आवश्यकता नाही. कारण 1976 ते 1992 या काळात मी चिपळूण शहरामध्ये पोलीस वसाहतीच्या बाजूला भाड्याने राहात होतो. एखाद्या कोंडवाड्यासारख्या त्यांच्या त्या बैठ्या चाळी, त्या ठिकाणी असलेला संपूर्ण काळोख, त्यांच्या छोट्या-छोट्या खोल्या आणि दिवस-रात्र जागरण करुन आल्यानंतर त्यांची असलेली कौटुंबिक आणि मानसिक स्थिती मी अगदी जवळून पाहिलेली आहे. या लक्षवेधी सूचनेमध्ये मुंबईतील ज्या बी.आय.टी. चाळी आहेत त्या ठिकाणी असणाऱ्या 19 इमारतींपैकी ज्या 3 इमारती पोलीस वसाहतीकरिता दिलेल्या आहेत त्या संदर्भातील विषय आहे.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव....

सन्माननीय सदस्यांनी असा मुद्दा उपस्थित केला की, 1922 साली म्हणजे जवळपास 90 वर्षापूर्वी या चाळी बांधल्या आहेत. त्यामुळे या चाळींचा पुनर्विकास करणार काय असे विचारले आहे. त्याचे एका वाक्यात 'होय' असे उत्तर आहे. क्लस्टर डेव्हलपमेंट अंतर्गत नियम 33/9 अन्वये या इमारतींची पुनर्बांधणी करण्याचा प्रस्ताव महानगरपालिकेकडे आलेला आहे. त्याच्यावर गांभीर्याने विचार सुरु आहे. क्लस्टर डेव्हलपमेंट अंतर्गत आलेला प्रस्ताव ज्यावेळी स्वीकारला जाईल त्यावेळी त्यांना निश्चितपणे जादा एफएसआय मिळणार आहे. सन्माननीय सदस्यांनी त्या लोकांना 400 चौ.फुटांची घरे दिली पाहिजेत असे सांगितले आहे. त्यासंबंधीचा अंतिम निर्णय झालेला नाही. पण प्राथमिक स्वरुपाची चर्चा झाली असून त्यात किमान 400 ते 500 चौ.फुटांचे घर मिळाले पाहिजे असे मत मांडले गेले. क्लस्टर डेव्हलपमेंट अंतर्गत त्यांना 700 चौ.फुटांचे घर असावे अशी संकल्पना आहे. मूळ प्रस्ताव नियम 33/7 अन्वये आला होता. परंतु त्यात खूप गोंधळ झाला. 70 टक्के लोकांनी कंसेण्ट दिला नाही. त्यामध्ये काही लोकांनी तक्रारी केल्या. तेथील रहिवाशांनी सांगितले की, आम्ही सह्या केल्या नव्हत्या. त्यामध्ये 6 पोलीस दोषी आढळले, त्यांना निलंबित करावे लागले. अशा गोष्टी त्यात घडल्या आहेत. त्यामुळे तो प्रस्ताव मागे पडलेला आहे. पण हा प्रस्ताव लवकरात लवकर मार्गी लावण्याच्या दृष्टीने प्रयत्न केला जाईल आणि या चाळींचा पुनर्विकास करुन पोलिसांना चांगली घरे देण्याचा विचार केला जाईल.

सभापती महोदय, या चाळी बीआयटीच्या आहेत. त्यामुळे महापालिका त्यांच्याकडून दरमहा केवळ 23 रुपये घेते. शासकीय नियमानुसार शासकीय निवासस्थानात कर्मचारी रहात असेल तर त्याला घरभाडे भत्ता दिला जात नाही. या पोलिसांच्या वेतनातून महिन्याला 5 हजार, 4 हजार घरभाडे भत्ता कापला जातो असे म्हटले आहे. महानगरपालिकेकडून हा भत्ता घेतला जात नसला तरी महानगरपालिका मोठ्या प्रमाणत सोयी सुविधा देत आहे. महानगरपालिका या लोकांकडून पैसे घेत नसेल तर शासन का घेत आहे असा प्रश्न सकाळी माझ्या मनात आला. कायद्यानुसार मुंबई पोलीस आयुक्तांच्या नावावर ह्या इमारती आहेत, त्यामुळे त्यांच्या अखत्यारितीत ही बाब आहे. म्हणून त्यांच्याकडे विचारणा करण्याची कार्यवाही विभागाने केलेली आहे.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, पोलिसांच्या वसाहतींच्या संबंधीचा जिव्हाळ्याचा व गंभीर प्रश्न आहे. मंत्री महोदय असे म्हणाले की, मी त्या चाळींच्या बाजूला रहात होतो, पण मी त्या चाळीतच रहात होतो. माझे वडील पोलीस खात्यात होते. ज्या खोलीचा मंत्री महोदयांनी उल्लेख केला आहे त्या खोलीत माझे बालपण गेले आणि कॉलेज जीवन सुध्दा तेथेच गेले आहे. त्यामुळे आम्हाला त्या वेदना माहीत आहेत, चटके भोगलेल्यांपैकी आम्ही आहोत.

सभापती महोदय, या चाळींच्या पुनर्निर्माणाचा केवळ प्रश्न नाही. मंत्री महोदयांनी नियम 33/9 चा उल्लेख केला आहे. त्या नियमाखाली या इमारतींचा विकास होईल त्यावेळी प्रथम ही घरे त्यांच्या मालकीची होतील काय, त्याचप्रमाणे महानगरपालिका त्यांच्याकडून 23 रुपये घेत असली तरी शासनाने 20-25 वर्षे दरमहा 4 हजार, 5 हजार घरभाडे भत्ता कापून घेतलेला आहे. आज सर्वच पोलीस वसाहतींची कमी अधिक प्रमाणात स्थिती वाईट आहे. मी खालच्या सभागृहात असताना आम्हीच या इमारतींच्या पुनर्निर्माणाचा विषय मांडला होता. शासनाने ती कल्पना स्वीकारलेली आहे. मी मघाशी म्हटल्या प्रमाणे शासनाने पोलिसांकडून अनेक वर्षे लाखो रुपयांचा घरभाडे भत्ता कापून घेतला असल्यामुळे या घरांचे पुनर्निर्माण झाल्यावर पोलिसांना ती घरे मालकी तत्वावर देणार काय ?

यानंतर श्री.शिगम....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. भाई जगताप...

माझ्या माहिती प्रमाणे विधानसभेमध्ये आदरणीय सार्वजनिक बांधकाम मंत्री श्री. छगन भुजबळ साहेब यांनी वांद्रे येथील शासकीय कर्मचा-यांच्या बाबतीत अतिशय चांगला निर्णय घेतला..(अडथळा)...33(9) प्रमाणे जादा एफएसआय देत असताना त्याचा फायदा विकासला होतो आणि त्या फायद्यातून विकासक घरे बांधून देतो. तेव्हा पोलीस कर्मचा-यांच्या वसाहतीच्या बाबतीत शासकीय कर्मचा-यांच्या वसाहतीच्या बाबतीत धोरणात्मक निर्णय घेऊन त्यांना मालकी हक्काची घरे करुन देणार आहात काय ?

श्री. भास्करराव जाधव : पोलीस रहात असलेली घरे किंवा पुनर्विकासानंतर त्यांना मालकी हक्काची घरे द्यायची की नाही या संबंधी गृह विभागाने निर्णय घ्यायचा आहे. आता ते ज्या घरामध्ये रहात आहेत त्या घरांच्या दुरुस्तीच्या संदर्भातील बाब माझ्या विभागाकडे आहे. घरांच्या संदर्भात धोरणात्मक निर्णय गृह विभागाने घ्यावयाचा आहे. त्यामुळे याबाबतीत उत्तर देणे अवघड आहे. ही घरे व्यक्तीला न देता ती पोलीस विभागाला दिली जातात. एकाची बदली झाल्यानंतर दुसरा पोलीस त्या ठिकाणी राहाण्यास येत असतो...

श्री. जयंत प्र.पाटील : कर्मचारी वसाहतीमध्ये कर्मचारी शासकीय सेवेमध्ये असे पर्यन्तच राहू शकतो. आज मंत्री ज्या बंगल्यामध्ये राहात आहेत तो बंगला नावावर करा असे मंत्र्यांनी म्हटले तर तसे करता येईल काय ? उद्या आमदार निवासातील खोल्या आमदारांनी नावावर करा असे म्हटले तर त्या खोल्या त्यांच्या नावावर करता येतील काय ? त्या तशा करता येणार नाहीत. धोरणात्मक निर्णय जरी गृह विभागाने घ्यायचा असला तरी राज्यमंत्री महोदय शासनाच्या वतीने उत्तर देत आहेत. त्यांनी खोल्या नावावर करुन देता येणार नाही, असे स्पष्ट उत्तर दिले पाहिजे.

श्री. भास्कर जाधव : हा प्रश्न गृह विभागाचा असल्यामुळे तशा प्रकारचे उत्तर देणे अवघड आहे.

श्री. प्रकाश बिनसाळे : माननीय राज्य मंत्री महोदयांनी येथे उत्तर देताना 33(9)चा उल्लेख केला. या नियमांतर्गत विकासकाला अतिरिक्त एफएसआय दिला जातो. त्या अतिरिक्त एफएसआय मधून विकासकाला फायदा होईल, त्यातून विक्रीची घरे उपलब्ध होतील आणि त्यातून शासनाला फायदा होईल असा जो काही विचार आहे त्याला छेद देण्याचा प्रयत्न मी करीत आहे. माझा

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश बिनसाळे....

शासनाला सरळ आणि साधा प्रश्न आहे. आता सांगण्यात आले की, ज्या घराचे भाडे 23 रुपये आहे त्या घरासाठी शासकीय कर्मचा-याकडून एचआरअेपोटी 5 हजार रु. घेतले जातात. मी एक साधे उदाहरण सांगतो. 240 घरांची शासनाने स्वत: पुनर्बांधणी केली आणि तेथे 500 घरे झाली तर भाड्याच्या माध्यमातून शासनाला दरमहा अडीच कोटी रुपये मिळतील. शासनाने स्वत: 500 घरांचा प्रकल्प केला तर त्यासाठी 250 कोटी रुपये खर्च येईल. 10 टक्के रिटर्न ऑन इन्व्हेस्टमेंट धरली तरी वर्षाला 25 कोटी रु. येतात. तेव्हा शासनाने स्वत: हा प्रकल्प केला तर शासनाचा त्यामधून फायदा होईल आणि पोलिसांना देखील घरे मिळतील. अनेक पोलीस आज इ ोपडपट्टयातून रहात आहेत, त्यांच्या घरांचा प्रश्न सुटेल. तसेच ही घरे शासनाला तारण म्हणून देखील ठेवता येतील. म्हणून विकासकाची धन करण्यापेक्षा अशा प्रकारचा प्रोजेक्ट राबविण्याचा शासन विचार करील काय ?

...नंतर श्री. गिते....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, या संदर्भामध्ये अनेक वेळा चर्चा झालेली आहे. एस.आर.ए.स्कीमच्या बाबतीत अनेक वेळा चर्चा झालेली आहे. आता एस.आर.ए.स्कीम होत असताना म्हाडाने इमारती बांधण्याचे काम खाजगी विकासकाला न देता म्हाडाने स्वत:च काही प्रॉजेक्ट करावेत अशीही चर्चा सातत्याने या सभागृहात झालेली आहे. शासनाने या बाबतीत अंतिम निर्णय घेतलेला नसला तरी एस.आर.ए.चे काही प्रॉजेक्ट म्हाडाने स्वत: करावेत असा विचार शासनासमोर आलेला आहे. शासन स्वत:हून इमारतींची बांधकामे करील असे मला तरी वाटत नाही. सिडकोच्या क्षेत्रात सिडको इमारतींची बांधकामे करीत असते. एमएमआरडीएच्या कार्यक्षेत्रात ते स्वत: बांधकामे करीत आहे. आपल्याकडे म्हाडा ही विंग आहे, म्हाडा स्वत: इमारतींची बांधकामे करते. परंतु शासन स्वत:हून इमारतीचे कन्स्ट्रक्शन करील आणि स्वत: घरे उपलब्ध करुन देईल असे मला वाटत नाही.

श्री. प्रकाश बिनसाळे : म्हाडा हे प्राधिकरण शासनाच्या अखत्यारितील आहे. म्हाडा प्राधिकरणाकडून 2 ते 3 हजार कोटी रुपये बँकेत ठेवले जातात. म्हाडाकडे असलेले 240 कोटी रुपये अशा प्रॉजेक्टकरिता उपलब्ध करुन दिले तर 8 टक्के व्याज मिळण्याऐवजी 10 टक्के व्याज मिळेल. या गोष्टीचा शासन विचार का करीत नाही?

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, या गंभीर विषयाचे विषयांतर होत आहे असे मला वाटते. सदर प्रॉजेक्ट कोणी डेव्हलप करावा हा नंतरचा प्रश्न आहे. या संदर्भात राज्य शासनाने जो निर्णय घेतलेला आहे, त्या धर्तीवर म्हणजे ज्या प्रमाणे वांद्रे येथील रहिवाशांना घरे उपलब्ध करुन देताना प्राधान्य देण्यात येईल तसेच त्यांना ठराविक रक्कम ठरवून ती घरे उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. या संदर्भात माझे दोन स्पेसिफीक प्रश्न आहेत. वांद्रा येथील रहिवाशांच्या बाबतीत घेतलेल्या निर्णयाच्या धर्तीवर पोलीस ज्या ठिकाणी राहतात, त्या ठिकाणची घरे पोलिसांना उपलब्ध करुन देण्यात येतील काय? या ठिकाणी आपण सांगितले की, ते अधिकार गृह विभागाकडे आहे.मी विधानसभेचा सदस्य होतो. मला माहिती आहे की, या प्रश्नावर विधानसभा सभागृहात फार मोठा गदारोळ झाला होता. त्यानंतरच डी.सी.रुलच्या कलम 39 अन्वये क्लस्टर डेव्हलपमेंटचा निर्णय राज्य शासनाकडून घेण्यात आला. ही चर्चा विधानसभा सभागृहात उपस्थित झाली होती, त्यावेळी

2...

श्री. भाई जगताप...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्या चर्चेत मी सहभागी झालो होतो. त्यामुळे मला याची संपूर्णपणे माहिती आहे. शासनाने अशा प्रकारचा निर्णय घेतला तर 23 रुपये आणि 5 हजार रुपये यामधील जो फरक आहे, जो इतके वर्षे त्यांच्याकडून घेतला जातो आहे. ते पैसे घराच्या किंमतीमध्ये ॲडजस्ट केले जातील काय ?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, शेवटी पोलीस खाते वा शासनाचे अन्य खाते हे आपल्या कर्मचाऱ्यांना एच.आर.ए.देत असते. अपेक्षा काय असते की, एच.आर.ए.घेऊन त्यांने स्वत:च्या घराची सोय स्वत: करावी. शासकीय कर्मचाऱ्याने स्वत:च्या घराची स्वत: व्यवस्था केली तर त्याला एच.आर.ए. मिळतो. शासनाने त्या कर्मचाऱ्याची राहण्याची व्यवस्था केली तर त्यास एच.आर.ए.मिळत नाही. पोलीस वसाहतीमध्ये राहणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्याकडून नगरपालिकेने फक्त 23 रुपये भाडे घेतले, मात्र पोलीस खात्याने पोलिसांच्या पगारातून 5 हजार रुपये कापून घेतले आहेत, हा खरा विषय आहे. ते पैसे विभागाने पगारातून कापून घेतले. कदाचित विभागाचे म्हणणे असेही असू शकते की, आम्ही तुमची राहण्याची सोय केली. आम्ही ती घरे 23 रुपये भाडयाने देऊ किंवा 100 रुपये भाडयाने देऊ, हा विषय आमचा आहे. त्यामुळे आम्ही आमचे बघून घेवू, असेही विभागाचे मत असू शकते. खरे म्हणजे कन्सेप्ट अशी आहे की, आपण जर त्यांना राहण्यासाठी घराची सोय केली तर त्या कर्मचाऱ्यास एच.आर.ए.द्यावयाचा नाही. त्या कर्मचाऱ्याने स्वत: राहण्याची सोय केली तर त्यास एच.आर.ए.द्यावयाचा असा हा टेक्निकल मुद्दा आहे. तरी सुध्दा मी मघाशी म्हणालो की, पोलीस विभागास या बद्दल विचारणा करावी अशा निर्णयाप्रत मी आलेलो आहे. सन्माननीय सदस्यांनी वांद्रे येथील शासकीय वसाहतीच्या बाबतीत उल्लेख केला, त्याबाबतीत शासनाचा अंतिम निर्णय झालेला नाही. गिरणी कामगारांना मोफत घरे द्यावीत या बाबतीत अंतिम निर्णय अद्याप झालेला नाही. म्हणून शासन अशा पध्दतीने कन्स्ट्रक्शन करुन घरे उपलब्ध करुन देईल असे मला वाटत नाही.

उप सभापती : या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांनी भूमिका मांडली आहे. राज्य शासन काही प्रश्नांच्या बाबतीत फारकत करते, त्याचे एक उत्तम उदाहरण मी या ठिकाणी सांगू इच्छितो. ठाण्याच्या वर्तकनगर भागामध्ये म्हाडाची वसाहत आहे. या ठिकाणी म्हाडाच्या सात ते आठ इमारती आहेत. त्या इमारती गृह विभागाने पोलिसांच्या निवासस्थानासाठी

मा. उप सभापती....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

भाडयाने घेतल्या. आज त्या इमारतींची स्थिती अशी आहे की, त्या इमारती रिपेअर होऊ शकत नाहीत. या इमारती रिपेअर करण्याचे ठरविले तर पोलीस खात्याकडे पैसे नाहीत. गृह विभागाने म्हाडास भाडयापोटी जी रक्कम द्यावयाची होती, ती रक्कम थकविलेली आहे.

यानंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती.....

ही सगळी घरे पाहिली तर त्या ठिकाणी राहणारे पोलीस कर्मचारी देखील अत्यंत असुरक्षित आहेत. बरेच पोलीस कर्मचारी निवृत्त झाले. काहींची मुले त्या ठिकाणी रहात आहेत. गेल्या आठ वर्षात मी स्वत: या संदर्भात तत्कालीन गृहमंत्री, विद्यमान गृहमंत्री, पोलीस महासंचालक वगैरेंना पत्रे लिहिली आहेत. विशेष म्हणजे समाजातील अगदी सर्वसामान्य घटकाचा प्रश्न उपस्थित होतो त्यावेळी अधिकारी वर्ग नियमांवर बोट ठेवतो. या अधिकाऱ्यांच्या गृहनिर्माण संस्था व्यवस्थितपणे उभ्या राहिल्या आहेत. त्यांना कोणताही प्रतिबंध रहात नाही. वरळी, जुहू आणि इतर महत्वाच्या भागात हे अधिकारी रहात आहेत. त्यांना स्वत:च्या घरासाठी लागणारी मुबलक जमीन उपलब्ध होते. जे साधे पोलीस कर्मचारी आहेत, आपल्या मोठ्या कुटुंबासह छोट्याशा खोलीत एवढे भाडे देऊन रहात आहेत त्या सर्वसामान्यांचा विचार करण्याएवढी माणुसकीची जाण गृहखात्याला नसावी ही शरमेची बाब आहे. या प्रश्नाबाबत एकदा नव्हे तर चार-पाच वेळा बैठका झाल्या.

आजच्या उत्तराबद्दल मी निश्चितपणे मंत्री महोदयांचे अभिनंदन करतो. परंतु हा प्रश्न येथे संपत नाही. या प्रश्नावर उत्तर देण्यासाठी गृहमंत्री देखील सभागृहात उपस्थित असणे आवश्यक आहे. माननीय नगरविकास राज्यमंत्री यांनी दिलेल्या उत्तराने आमचे समाधान झालेले असले तरी प्रश्नाची पूर्तता होत नाही. म्हणून मी ही लक्षवेधी सूचना राखून ठेवतो आणि या प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी माननीय नगरविकास राज्यमंत्र्यांसह माननीय गृहमंत्र्यांनी देखील सभागृहात हजर असावे असे निर्देश देतो.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, मी आपले आभार मानतो.

श्री.मोहन जोशी : सभापती महोदय, मी आपले आभार मानतो. या राज्यातील सर्वात शेवटच्या घटकाचा जो प्रश्न होता त्यासाठी आपण जाणीवपूर्वक निर्देश दिले. खऱ्या अर्थाने या प्रश्नाबाबत गृहखात्याचा संबंध येतो. आपल्याला मी मनापासून धन्यवाद देतो.

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, या प्रश्नासंबंधी दोन तासाची चर्चा घेण्यात यावी. म्हणजे सर्व बाबी मांडता येतील. शासनाबद्दल ज्या शंका आहेत त्या माननीय सदस्यांना मांडता येतील.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती : चर्चा घेण्यासाठी वेळ उपलब्ध नाही. कामकाज सल्लागार समितीमध्ये कामकाज निश्चित केले जाते. या प्रश्नावर चर्चा घेण्याच्या दृष्टीने मी माननीय सभापतींना विनंती करतो. अन्यथा मी ही लक्षवेधी सूचना राखून ठेवली आहे. माननीय गृहमंत्री आणि माननीय नगरविकास राज्यमंत्र्यांनी चर्चेच्या वेळी सभागृहात उपस्थित रहावे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, हा विषय नियम 97 अन्वये चर्चेला घेता येईल. आपण व्यक्त केलेली भावना योग्य आहे. या वसाहतींसाठी अग्रक्रमाने जागा दिली पाहिजे. गृह विभागाच्या अखत्यारितील ज्या कर्मचारी वसाहती आहेत त्या वसाहतीतील घरे मालकी हक्काने द्यावयास लागलो तर वेगळे स्वरुप येईल. त्यांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थांसाठी वेगळी जागा द्यावी, हा मुद्दा आहे.

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, ताडदेव भागात महानगरपालिकेच्या सफाई कामगारांची वसाहत आहे. त्या वसाहतीची पुनर्बांधणी करुन तेथे राहणाऱ्या कर्मचाऱ्यांना ओनरशीप घरे देण्याबरोबर वसाहतीमध्ये 500 घरे असतील तर तेवढी घरे महापालिकेला बांधून दिली गेली. त्याच धर्तीवर बीआयटी चाळीसंबंधी योजना आणता येईल.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: वैद्यकीय शिक्षण शुल्कात दुप्पट वाढ झाल्याने गरीब विद्यार्थी वैद्यकीय शिक्षणापासून वंचित होणे.

मु.शी.: वैद्यकीय शिक्षण शुल्कात दुप्पट वाढ झाल्याने गरीब विद्यार्थी वैद्यकीय शिक्षणापासून वंचित होणे यासंबंधी सर्वश्री मनिष जैन, हुसेन दलवाई, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.मनिष जैन (जळगाव स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यात वैद्यकीय शैक्षणिक शुल्कात दुपटीहून जास्त केलेली वाढ. त्यांचा राज्यातील लाखो हुशार परंतु परिस्थितीने गरीब असलेल्या विद्यार्थ्यांना बसणारा फटका, शैक्षणिक शुल्काबरोबरच प्रवेश शुल्क वसतीगृह आणि ग्रंथालय शुल्कातही करण्यात आलेली वाढ त्यामुळे असे मोठ्या प्रमाणावर असलेले शुल्क भरण्याची कुवत नसलेल्या राज्यातील हुशार विद्यार्थ्यांचे भविष्य उध्वस्त होत असणे व त्यामुळे ग्रामीण भागातील कमी उत्पन्न असणाऱ्या पालकांच्या हुशार विद्यार्थ्यांचे डॉक्टर होण्याचे स्वप्न भंग होणे याबाबत विद्यार्थ्यांच्या भविष्यात निर्माण झालेला प्रश्न या प्रकरणी शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

डॉ.विजयकुमार गावीत (वैद्यकीय शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

नि वे द न

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

नंतर 2एल.1..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मनिष जैन : आज पर्यंत शासनाने वैद्यकीय फी कमी ठेवली होती परंतु आज अचानक काही ठिकाणी दुप्पटीने तर काही ठिक्राणी 6 पटीन वाढविण्यात आलेली आहे. महाराष्ट्रातील गोरगरीब जनतेच्या मुलांनी, शेतक-यांच्या मुलांनी शिक्षण घेऊ नये यासाठी शासनाने हे धोरण ठरविले आहे काय, वैद्यकीय फी वाढवून आपण त्या रकमेचा कशा प्रकारे वापर करणार आहात ?

डॉ. विजयकुमार गावित : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी प्रश्न उपस्थित केला आहे की, गोरगरीब मुलांना वैद्यकीय शिक्षण मिळू द्यावयाचे नाही काय ? मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, व्हीजेएनटी, ओबीसी, इबीसी तसेच फ्रिडम फायटरच्या मुलांना व शिक्षकांच्या मुलांना वैद्यकीय शिक्षणामध्ये 100 टक्के सूट देण्यात आलेली आहे. इबीसीची सूट असल्यामुळे सर्व गोरगरीब मुले या घटकांमध्ये मोडत असतात. याचा अभ्यास केला तर आपल्याला दिसून येईल की, फी मध्ये जी काही वाढ होते आहे त्यामध्ये खरे तर शासनाचेच इन डायरेक्टली नुकसान होत आहे. ही सर्व फी शासनालाच भरावी लागत असते. जवळ जवळ 80 ते 85 टक्के विद्यार्थ्यांना फीच्या माध्यमातून सूट मिळत असते. केवळ 15 ते 20 टक्के मुलांवरच फीचा भार पडणार आहे. ज्यांच्यावर भार पडणार आहे ते फी भरण्यास कॅपेबल आहेत. त्यामुळे मला वाटते की, ही जी फी वाढ करण्यात आलेली आहे ती योग्य आहे. फी मध्ये जी वाढ केलेली आहे तो पैसा डीनच्या स्तरावर वेगवेगळया शिक्षणासाठी, यंत्रसामुग्रीसाठी खर्च केला जाणार आहे. फी वाढविण्याच्या संदर्भातील महत्वाचे कारण असे आहे की, सर्वसाधारणपणे 7-8 वर्षामध्ये प्रत्येक रुग्णालयामध्ये मोठमोठाली यंत्रसामुग्री घेण्यात आलेली आहे. त्या यंत्राचे मेन्टेनंस करणे गरजेचे आहे. आपल्याला सर्व रुग्णालयामध्ये सर्व प्रकारच्या सुविधा उपलब्ध करुन द्यावयाच्या आहेत. एक गोष्ट मी आपल्याला सांगू इच्छितो की, शासन वैद्यकीय शिक्षण घेणा-या प्रत्येक मुलामागे 4.88 लक्ष रुपये खर्च करीत असते. डेंटलच्या एका मुलावर 1.92 लक्ष रुपये खर्च करीत असते व आयुर्वेदमध्ये शिक्षण घेणा-या प्रत्येक मुलावर 1.36 लक्ष रुपये खर्च करीत असते. खाजगी कॉलेजमधील फी 3 लाखापासून 6-7 लक्ष रुपये एवढी आहे. त्यामुळे वैद्यकीय फी च्या संदर्भात जी वाढ केलेली आहे ती योग्य आहे असे मला वाटते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, प्रश्न फी वाढीचा नाही. या ठिकाणी माननीय मंत्री महोदय असे म्हणाले आहेत की, ईबीसी, स्वातंत्र्य सैनिक, मागासवर्गीय, भटके विमुक्त जाती व शिक्षकांच्या मुलांना वैद्यकीय फी मध्ये 100 टक्के सूट देण्यात येते. परंतु या मुलांना केवळ कागदावरच मोफत फी दिली जाते. इबीसीची उत्पन्न मर्यादा केवळ 15 हजार रुपये आहे. त्यामुळे ईबीसीची मर्यादा आपण 2 लाख रुपये करणार आहात काय ? इबीसीची मर्यादा 2 लाख रुपये केल्याशिवाय गोरगरिबांच्या मुलांना वैद्यकीय शिक्षण घेता येणार नाही. ब-याच मुलांना शासकीय संस्थेत प्रवेश न मिळाल्यामुळे त्यांना नाइलाजास्तव खाजगी संस्थेत प्रवेश घ्यावा लागतो व त्यामुळे या मुलांना जेवढी फी खाजगी संस्थेत भरावी लागते तेवढी फी शासन भरणार आहे काय ?

डॉ. विजयकुमार गावित : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, इबीसीची मर्यादा आता 1 लाख रुपयांपर्यंत करण्यात आलेली असल्यामुळे या उत्पन्नामध्ये जवळपास सर्व घटक मोडतात. तसेच एस.सी. व एस.टी. चे विद्यार्थी खाजगी संस्थामध्ये शिक्षण घेतात त्यांच्या फी ची सुध्दा शासनामार्फत 100 टक्के प्रतिपूर्ती केली जाते व ओबीसीच्या मुलांची 50 टक्के फी ची प्रतिपूर्ती केली जात असते. ज्या संस्था कायम विनाअनुदानित आहेत त्यासाठी एक समिती तयार करण्यात आली असून त्या समिती मार्फत फी आकारली जात असते.

यानंतर श्री. गायकवाड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हुसेन दलवाई : सभापती महोदय, काही मेरिटमध्ये येतात परंतु ते गरीब घरातील असल्यामुळे वैद्यकीय शिक्षणापासून वंचित राहतात. या मुलांना वैद्यकीय शिक्षणापासून वंचित ठेवणारे शासनाचे धोरण आहे. ज्यांच्याकडे भरपूर पैसे आहेत अशा पालकाचा मुलगा जरी मेरिटमध्ये आला नाही तरी खाजगी संस्थांमध्ये पैसे देऊन प्रवेश घेऊ शकतो परतु एखादा गरीब घरातील मुलगा जरी मेरिटमध्ये आलेला असला तरी वैद्यकीय शिक्षण घेऊ शकत नाही . चांगले डॉक्टर्स निर्माण होता कामा नये असेच शासनाचे धोरण आहे. त्यामुळे अशा गरीब विद्यार्थ्याला बी.एस्सी.व्हावे लागते. ज्या कुटुंबामध्ये पती पत्नी दोघेही नोकरी करतात परंतु वैद्यकीय शिक्षण घेण्यासाठी लागणारे पुरेसे पैसे नसल्यामुळे मेरिटमध्ये आलेल्या मुलाला ते वैद्यकीय शिक्षण देऊ शकत नाहीत अशी मी अनेक कुटुंबे पाहिलेली आहेत. तेव्हा अशा मुलांवर फी वाढीचा अधिकचा भार टाकून मेरिटमधील विद्यार्थ्याला वैद्यकीय शिक्षणाच्या बाहेर काढण्याचे काम केले जात आहे असे माननीय मंत्र्यांना वाटत नाही काय ?

डॉ.विजयकुमार गावित : सभापती महोदय, मी सुरुवातीलाच सांगितले की इबीसी करिता एक लाख रुपयांची उत्पन्न मर्यादा ठरविण्यात आली आहे त्या व्यतिरिक्त इतर जे घटक आहे त्या घटकाचे उत्पन्न कितीही असले तरी फी भरण्यामध्ये शासनाने त्यांना सवलत दिलेली आहे फक्त इतर मागासवर्गीय विद्यार्थ्याना क्रिमिलिअरची अट घालण्यात आलेली असून ही मर्यादा आता साडेचार लाख रुपयाची करण्यात आलेली आहे.शासनाने वैद्यकीय फी मध्ये फारशी वाढ केलेली नाही . पूर्वी ही फी 18 हजार रुपये होती ती आता 40 हजार रुपये करण्यात आली आहे.एक लाख रुपया पेक्षा जास्त उत्पन्न असलेली व्यक्तीसुध्दा आपल्या मुलाला नर्सरीमध्ये घालण्याकरिता किती पैसे देत असते याचा देखील विचार केला गेला पाहिजे.विद्यार्थ्याना सर्व शैक्षणिक सुविधा उपलब्ध करुन दिल्या पाहिजेत, मेन्टेनन्ससुध्दा चांगल्या प्रकारे झाला पाहिजे असे सांगत असतांना फीमध्ये मात्र वाढ करण्यात येऊ नये असे म्हणणे बराबर नाही. शासनाने जी फी वाढ केलेली आहे ती सुध्दा फार कमी आहे असे मला वाटते.

श्री.हुसेन दलवाई : सभापती महोदय, अशा पध्दतीने माननीय मंत्र्यांनी बोलता कामा नये.समाजातील गरीब व हुशार विद्यार्थ्याना चांगल्या प्रकारचे वैद्यकीय शिक्षण मिळावयास पाहिजे याचा शासनाने विचार केला पाहिजे तो करण्यात येणार आहे काय ?

(उत्तर देण्यात नाही)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले : निवेदनामध्ये असे म्हटलेले आहे की, 2003 मध्ये जी फी होती ती 3 वर्षाकरिता निश्चित करण्यात आली होती. 2006 सालापासून 2012 पर्यत या फीमध्ये कोणतीही वाढ सुचविण्यात आली नाही. मध्यंतरीच्या कालावधीमध्ये कोणतीही फी वाढ केली जात नाही आणि पाच सहा वर्षानंतर एकदम फी वाढ केली जाते. असे न करता टप्याटप्याने दर दोन तीन वर्षानी फी वाढ करावयास पाहिजे.शैक्षणिक शुल्क वाढविण्यात आले आहे त्या बरोबर प्रवेश शुल्क वसतिगृहाचे शुल्क, ग्रंथालय शुल्क यामध्ये सुध्दा वाढ होणार आहे तेव्हा एकत्रित फी वाढीचा किती परिणाम होणार आहे याचासुध्दा विचार केला पाहिजे तेव्हा या सर्व शुल्कामध्ये किती टक्के वाढ करण्यात आली आहे ?

डॉ.विजयकुमार गावित : सभापती महोदय, सुरुवातीला प्रवेश शुल्क एक हजार रुपये होते त्या ऐवजी आता दीड हजार रुपये करण्यात आले आहे.जिमखाना शुल्क 500 रुपये होते ते तेवढेच ठेवण्यात आलेले आहे.वसतिगृहाचे शुल्क 2 हजार रुपये शुल्क होते ते प्रती वर्षी 4 हजार रुपये करण्यात आलेले आहे.ग्रंथालय अनामत एक हजार रुपये घेतले जात होते त्या ऐवजी दोन हजार रुपये घेतले जात आहे. सन्माननीय सदस्याना मी हे सांगू इच्छितो की, मधल्या काळात कोणत्या ना कोणत्या कारणामुळे फी वाढ करण्याचा निर्णय पुढे ढकलला गेला आहे.. राजकीय कारणामुळे ही फी वाढ उशिराने करण्यात आली आहे.सर्वाना ही वाढ परवडणारी असून ती योग्यच आहे असे मला वाटते.

उप सभापती : यानंतर विशेष उल्लेखाच्या सूचना घेण्यात येतील.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

विशेष उल्लेख

पृ.शी. ग्रॅन्ट रोड, मुंबई येथील जाफर मंजिल इमारतीची लिफ्ट कोसळून 8 कामगार जखमी होणे

मु.शी. ग्रॅन्ट रोड,मुंबई येथीज जाफर मंजिल इमारतीची लिफ्ट कोसळून 8 कामगार जखमी होणे या बाबत श्री.अलका देसाई,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

उप सभापती : माननीय सदस्या श्रीमती अलका देसाई यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्रीमती अलका देसाई (नामनियुक्त) :सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासबंधीची सूचना मांडते.

सभापती महोदय, माटुंगा येथे लिफ्ट कोसळून झालेल्या अपघातात सहा जणांचा मृत्यू झाल्याची घटना ताजी असतांना दिनांक 18.3.2011 रोजी वा त्या दरम्यान ग्रँट रोड मुंबई येथील मौलाना शौकत अली रोडवरील सुपर सिनेमासमोरील जाफर मंजिल या इमारतीमधील लिफ्ट कोसळून 8 कामगार गंभीर जखमी झाल्याची भयंकर घटना घडल्याचे आढळूल आले आहे. या कामगारांना मालवाहतूक करण्याच्या लिफ्टबाबत कोणतीही माहिती विकासकाने दिली नसून कामगारांच्या सुरक्षिततेबाबत विकासकाने कोणतीही उपाययोजना केलेली नाही. या इमारतीचे बांधकाम करणारे विकासक अपघात झाल्यानंतर फरार झालेले आहेत. या प्रकरणी सखोल चौकशी करुन दोषी व्यक्तीविरुध्द कारवाई करण्यासाठी मी ही विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. :वृत्तपत्रातून काम करणा-यां कर्मचा-यांचे वेतन वाढवून देणे

मु.शी. :वृत्तपत्रातून काम करणा-या कर्मचा-यांचे वेतन वाढवून देण्या बाबत ॲड.उषा दराडे,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

उप सभापती : माननीय सदस्या ॲड.उषा दराडे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

ॲड.उषा दराडे (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासबंधीची सूचना मांडते.

सभापती महोदय, देशामध्ये स्वातंत्र्यपूर्व काळापासून पत्रकारितेला विशेष महत्व आहे.

नंतर श्री.सरफरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. उषाताई दराडे...

स्वातंत्र्य संग्रामामध्ये वृत्तपत्रांनी देशाला स्वातंत्र्य मिळावे याकरिता लोक जागृतीचे फार मोठे काम केले. त्यांनी चळवळीमध्ये सहभाग घेऊन लोकशाहीच्या निकोप पणास टिकवून ठेवण्याचे काम केले असून त्याचा इतिहास सुवर्णाक्षरामध्ये निश्चितच लिहिला जाईल. परंतु वृत्तपत्रामधून काम करणाऱ्या पत्रकारांना फार कमी वेतन मिळते. एकीकडे टॉवर्स उभे रहात आहेत दुसरीकडे माझ्या जिल्ह्यात आणि तालुक्यात काम करणाऱ्या पत्रकारांना महिना एक हजार, दोन हजार, तीन हजार रुपये पगार दिला जातो. वृत्तपत्रे ही सामाजिक संस्कृतीचा आरसा आहेत. त्यांच्यावर राजकीय हल्ले होत असल्यामुळे शासनाने त्यांना संरक्षण देण्याबाबत एक वेगळे धोरण ठरविण्याची गरज आहे.ज्यामुळे वृत्त पत्रकार लाचार होणार नाहीत. पत्रकारितेचे अस्तित्व टिकविण्यासाठी,त्यांची प्रतिमा टिकविण्यासाठी शासनाने गंभीर पावले उचलली पाहिजेत. त्याचप्रमाणे त्यांना आर्थिक मदत कशी देता येईल या करिता शासनाने तातडीने उपाय योजना करणे आवश्यक आहे. अशी या औचित्याच्या मुद्दयाव्दारे शासनाला विनंती करते."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : दादर टर्मिनसला "भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर" यांचे नाव देणे

मु. शी. : दादर टर्मिनसला "भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर" यांचे नाव देणे याबाबत श्री सुभाष चव्हाण, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उप सभापती : मा□□य सदस्य श्री.सुभाष चव्हाण यां□ विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. सुभाष चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ मांडतो.

"भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे बालपण दादर स्टेशनच्या बाजूला असलेल्या "बदक" चाळीत गेले ती चाळ दादर स्टेशनच्या बाजूला आहे. डॉ. बाबासाहेबांचे मुंबईतील कार्यक्षेत्र सुध्दा लालबाग, परळ, परळगाव, वरळी, दादर येथे गेलेले आहे. त्या शिवाय डॉ. बाबासाहेबांचे निवासस्थान हिदू कॉलनीतील "राजगृह" हे देखील दादर टर्मिनसपासून 2 किलोमीटर अंतरावर आहे. बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाणानंतर त्यांचा अंत्यविधी दादर चैत्यभूमी येथे करण्यात आला. चैत्यभूमीला एवढे ऐतिहासिक महत्व असल्याने दादर टर्मिनसला "भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर" यांचे नाव देण्याबाबतची शिफारस राज्य शासनाने केंद्रीय रेल्वे प्रशासनाला करावी, अशी विनंती या विशेष उल्लेखाव्दारे मी करीत आहे"

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : सिंधुदुर्ग जिल्हयातील आंबोली घाटामध्ये पर्यायी रस्त्याला मान्यता देणे

मु. शी. : सिंधुदुर्ग जिल्हयातील आंबोली घाटामध्ये पर्यायी रस्त्याला मान्यता देण्याबाबत श्री.राजन तेली वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उप सभापती : मा□□य सदस्य श्री.राजन तेली यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. राजन तेली (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

"सिंधुदुर्ग जिल्ह्यातील आंबोली घाट येथील वेंगुर्ले-बेळगाव हा रस्ता महाराष्ट्र व कर्नाटक राज्याला जोडून असून आंबोली हे घाट पर्यटन स्थळ आहे. गेल्या पावसाळयात दिनांक 30 जुलै 2010 रोजी दरवर्षीपेक्षा जास्त पाऊस पडल्यामुळे रस्ता खचून गेल्याने आंबोली, चौकुळ, गेळे येथील रहिवाशांचे दळणवळणाचे अतोनात हाल होत आहेत. सदर बेंगर्ले बेळगाव या आंबोली घाटाच्या पर्यायी रस्त्या संदर्भात तेथील नागरिकांची वारंवार होत असलेली मागणी, तसेच आंबोली घाट दुरुस्त करुन पर्यायी रस्ता म्हणून दाणोली, केसरी, फणसवडे, नेनेवाडी, आंबोली या नव्या रस्त्याला मान्यता देण्यात यावी. या संदर्भात सार्वजनिक बांधकाम विभाग अभियंता (सिंधुदुर्ग) यांच्याकडून अद्यापपर्यंत या प्रस्तावास मान्यता न मिळाल्याने नागरिकांचे होणारे अतोनात हाल व पसरलेले चिंतेचे वातावरण, सदरहू शासनाकडे उपलब्ध असलेली पर्यायी जागा मार्गी लावून बांधकाम सुरु करण्यासाठी प्रस्तावास मान्यता देण्याबाबत शासनाने त्वरित दखल घेऊन करावयाची कार्यवाही या सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे लक्ष वेधण्यासाठी मी हा विशेष उल्लेख करीत आहे".

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : शहीद भगतसिंग यांच्या पत्राचा समावेश पाठयपुस्तक मंडळाने इतिहासाच्या पुस्तकामध्ये करणे

मु. शी. : शहीद भगतसिंग यांच्या पत्राचा समावेश पाठयपुस्तक मंडळाने इतिहासाच्या पुस्तकामध्ये करणे याबाबत श्री.हेमंत टकले वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उप सभापती : मा□□□य सदस्य श्री. हेमंत टकले यां□ विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ मांडतो.

"सभापती महोदय, थोर स्वातंत्र्यवीर शहीद भगतसिंग यांनी दिनांक 23 मार्च 1931 रोजी हौतात्म्य पत्करले, त्याच्या पूर्वसंध्येला आपल्या स्वातंत्र्य संग्रामातील राष्ट्रभक्तांना उद्देशून त्यांनी शेवटचे पत्र लिहिले. अवघ्या 23 वर्षाच्या या तरुणाने देश भक्तीचे सोनेरी पान अलंकृत केले आहे. परंतु शहीद भगतसिंग हा एक विचारवंत, तत्वज्ञानी, पत्रकार, लेखक, दूर दृष्टी असलेला परिपक्व तरुण होता हे फार कमी लोकांना माहीत असावे. त्यांनी फ्रान्स, रशिया, आयर्लंडमधील क्रांतीचा अभ्यास केला होता. त्यांच्या अखेरच्या पत्रातील मजकूर असा आहे की, "मित्रहो, मला जर जीवंत राहण्याची ओढ असायला हवी तर मी जगायला तयार आहे पण एका अटीवर, मला तुरुंगात किंवा गुलामगिरीत जगायचे नाही, माझे नाव आता "हिंदुस्थान इन्क्लाब पक्ष" म्हणून ओळखले जाते. आता हे नाव अशा शिखरावर आहे की, मी यापुढे जगलो तर अधिक उंच स्थानी जाणार नाही. आज लोकांना माझ्या दुबळेपणाची बाजू माहीतच नाही. पण मी जर हसतमुखाने मृत्यूला सामोरा गेलो तर भारतातील लाखो माता आपल्या उदरी भगतसिंग जन्माला आला असे म्हणतील. यामुळे स्वातंत्र्य लढयासाठी लाखोनी स्वातंत्र्य सैनिक तयार होतील त्यांच्यापुढे ब्रिटीश साम्राज्यालाही झुकावेच लागेल. एक खंत मात्र जरुर आहे. माझ्या दृष्टिपथात असलेले स्वतंत्र भारताचे आणि मानवतेचे खूप कार्य करणे राहून जाईल, माझ्या इतका सुदैवी आज कुणीही नाही. मला स्वत:चा अभिमान आहे, मी अखेरच्या त्या सोनेरी क्षणाची आतुरतेने वाट पहात आहे." अशा या ऐतिहासिक संदेशाच्या मुळापर्यंत जाऊन शोध घेऊन राज्याच्या पाठ्यपुस्तक मंडळाने आपल्या इतिहासाच्या पुस्तकात हा भाग समाविष्ट करावा अशी सूचना मी या विशेष उल्लेखाव्दारे शासनाला करीत आहे."

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशासकीय ठराव

पृ.शी.: स्पर्धात्मक परीक्षांमध्ये राष्ट्रीय स्तरावर उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये महाराष्ट्र राज्यातील विद्यार्थ्यांचे असलेले अत्यल्प प्रमाण

मु.शी.: स्पर्धात्मक परीक्षांमध्ये राष्ट्रीय स्तरावर उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये महाराष्ट्र राज्यातील विद्यार्थ्यांचे असलेले अत्यल्प प्रमाण या विषयावरील प्रा.सुरेश नवले वि.प.स. यांचा ठराव

प्रा.सुरेश नवले (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने खालील ठराव मांडतो.

राष्ट्रीय स्तरावरील भारतीय प्रशासकीय सेवा, भारतीय पोलीस सेवा राज्य स्तरावरील वैद्यकीय महाविद्यालयातील प्रवेश परीक्षा, लोकसेवा आयोग व तत्सम स्पर्धात्मक परीक्षांमध्ये राष्ट्रीय स्तरावर उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्र राज्यातील विद्यार्थ्यांचे अत्यल्प प्रमाण लक्षात घेता हे प्रमाण वाढविण्याच्या दृष्टीने उमेदवारांची योग्य प्रकारे व अद्ययावत पध्दतीने पूर्वतयारी करुन घेण्यासाठी राज्यातील सर्व माध्यमिक शाळांना चालू शैक्षणिक वर्षापासून सदर अभ्यासक्रम सुरु करुन 100 टक्के अनुदान देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

सभापती महोदय, हा विषय अत्यंत महत्वाचा असून मी आपल्या अनुमतीने या सदनासमोर मांडण्याचा प्रयत्न करणार आहे.

महाराष्ट्राची भावी प्रशासकीय ओळख आणि त्याचबरोबर देशालाही महाराष्ट्राची जी प्रशासकीय ओळख करुन द्यावयाची आहे त्यासंबंधीचा प्रयत्न यानिमित्ताने साध्य करण्याच्या दृष्टीने शासनाने प्रयत्न करावा असा मी आग्रह धरतो.

सभापती महोदय, या देशाला गुरु-शिष्याची परंपरा फार मोठी आहे म्हणजे जो शिष्योत्तम होता, तो सुध्दा गुरुंच्या आश्रमामध्ये जाऊन कष्ट करण्याचे धाडस आणि ज्ञान संपादन करण्याचा प्रयत्न करीत होता म्हणजे सांदिपनी ऋषींच्या आश्रमामध्ये जाऊन श्रीकृष्ण सुध्दा एक प्रकारे लाकडे गोळा करण्याचे काम करीत होता आणि श्रमाला प्रतिष्ठा देण्याचे काम श्रीकृष्णाने सुध्दा केले होते. कुशाग्र बुध्दीचा रणांगणावर तत्वज्ञान सांगणारा आणि शेवटी क्षत्रियांना मार्गदर्शन करणारा त्या ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले . . . .

काळातील तो तत्वज्ञ होता. आता दुर्दैवाने ती गुरु-शिष्य परंपरा राहिलेली नाही. भारताने विज्ञानाची कास निश्चितपणे धरली आहे.परंतु पाश्चिमात्य राष्ट्राच्या तुलनेमध्ये आम्ही विज्ञान फार उशिरा स्वीकारले आणि उशिरा विज्ञान स्वीकारल्यामुळे त्यांची जी संपन्नता आहे तसेच विज्ञानाच्या अनुषंगाने येणारे जे भौतिक सुख आहे ते सुध्दा आम्ही स्वीकारले आहे आणि तसे करीत असताना शेवटी ज्या काही कसोट्या आहेत त्या सर्वांनाच स्वीकाराव्या लागतील. सभापती महोदय, जर माननीय आरोग्य मंत्री महोदयांना असे वाटले की, मला इंजेक्शन द्यावयाचे आहे तर त्यांना ते देता येणार नाही. वैद्यकीय शिक्षणाच्या संबंधातील परीक्षा पास झाल्याशिवाय त्यांना इंजेक्शन देता येणार नाही. कारण ती गुणवत्तेची कसोटी आहे. या कसोटीवर उतरल्याशिवाय पुढे जाता येणार नाही. म्हणून भारतीय प्रशासकीय सेवेमधील ज्या कसोट्या आहेत, परीक्षा आहेत त्या म्हणजे एक प्रकारे बुध्दीमत्तेची मर्यादा आहे, ते निदान आहे आणि हे निदान ओलांडल्याशिवाय म्हणजे विद्यार्थ्यांनी परीक्षा पास झाल्याशिवाय भारतीय प्रशासकीय सेवेमध्ये दाखल होता येणार नाही ही वस्तुस्थिती आहे. रस्त्यावरुन जात असताना सहजपणे गाड्यांचे दिवे दिसतात, पिवळे दिवे दिसतात. या दिव्यांकडे पाहून रस्त्यावरील अनेक विद्यार्थ्यांना आणि लोकांना सुध्दा या दिव्यांचा मोह पडतो. मग या गाडीमध्ये मला बसता येईल काय ? असा विचार अनेक विद्यार्थी करतात आणि सहजपणे, कुतूहलाने त्या दिव्यांकडे पहात असताना त्यावर दृष्टी स्थिर होते आणि नकळत तो दिवा पुढे जातो. मग शेवटी विचारांचे एक चिंतन मनामध्ये सुरु होते की, मी देखील या दिव्यांचा विचार कधीतरी करु शकेन.महाविद्यालयाची उच्च पदवी प्राप्त झाल्यानंतर मी देखील लोकसेवा आयोगाची परीक्षा दिली होती. पण पाच-सहा मार्क कमी पडल्यामुळे मी अनुत्तीर्ण झालो आणि त्यामुळे विधान परिषदेमध्ये येण्याचा योग माझ्या नशिबी, प्राक्तनी, भाळी आला. परंतु जर हा योग आला नसता तर मंत्रालयामध्ये माननीय मंत्री महोदयांना ब्रिफींग करण्याचे काम मलाही आतापर्यंत करावे लागले असते. पण दुर्दैवाने माझ्यावर ती वेळ आली नाही हे एका अर्थाने बरे झाले असे मी मानतो.

सभापती महोदय, या सगळया उच्च पदवी संपादन केल्यानंतरच्या परीक्षा आहेत. याठिकाणी सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत उपस्थित आहेत. या विषयांच्या बाबतीत त्यांचा अभ्यासही गाढा आहे.

यानंतर कु.थोरात . . . .

अशुद्धीत प्रत / अशुद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले.....

महाराष्ट्रातील लाखो विद्यार्थी या परीक्षांचा विचार करतात. विचार करुन या परीक्षेकडे कानाडोळा करुन पुढे जातात, याचे कारण त्यांच्या मनामध्ये असणारा न्यूनगंड, त्यांच्या मनामध्ये असणारी हुरहुर, त्यांच्या मनामध्ये असणारी भीती हे आहे. ही परीक्षा दिल्यानंतर मी पास होऊ शकेल की नाही,अशी चिंता त्यांच्या मनामध्ये असते त्यामुळे ते त्या परीक्षेकडे न वळता इतर मार्ग स्वीकारतात आणि परीक्षा देत नाहीत. तेव्हा राज्य शासनाने या विद्यार्थ्यांच्या मनामधील न्यूनगंड, भीती दूर करण्याचा प्रयत्न केला तर महाराष्ट्रातील बहुतांश विद्यार्थी या परीक्षा पास होऊ शकतील आणि त्याचे परिणाम चांगले दिसू शकतील. महाराष्ट्रात खाजगी शिक्षण संस्था आहेत. काही खाजगी शिक्षण संस्थांमधून हे विषय शिकविले जातात. महाराष्ट्रातील विविध भागामध्ये खाजगी टयूशन्स सुध्दा चालतात त्यामध्ये भारतीय सेवेमध्ये सहभागी व्हा, आपल्याला नोकरी मिळवून देण्याचा आम्ही प्रयत्न करतो, असा आशावादही खाजगी टयुशन्समधून निर्माण केला जातो, तो काही प्रमाणात सत्य आहे तर बहुतांशी असत्य आहे. या खाजगी टयुशन्समधून गरिबांची मुले शिकू शकतील काय हा सगळयात मोठा प्रश्न आहे. जे धनवान आहेत, श्रीमंत आहेत, गर्भ श्रीमंत आहेत, त्यांची मुले या खाजगी टयूशन्समध्ये जाऊन टयूशन्स घेऊ शकतील. पैशांची ज्याला ददात नाही अशी मुले त्या ठिकाणी शिकू शकतील पण ज्यांच्याकडे संध्याकाळी खायची चिंता आहे परंतु गुणवत्ता आहे अशा मुलांनी काय करायचे हा सगळयात मोठा प्रश्न आहे. म्हणून यांच्यासाठी शासनाने प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी "वरिष्ठ प्रशासकीय सेवा अभ्यास केंद्र" सुरु केले तर मला वाटते त्याचा उपयोग निश्चितपणे चांगला होऊ शकेल. या अगोदर पूर्व परीक्षा घेण्याच्या दृष्टीने औरंगाबाद, नागपूर, मुंबई आणि कोल्हापूर या चार ठिकाणी अशी केंद्र सुरु केलेली आहेत पण त्यांची क्षमता फार कमी आहे. फक्त 60 विद्यार्थी एका केंद्रात प्रशिक्षण घेऊ शकतात. मराठवाडयात किती जिल्हे आहेत, त्यातून औरंगाबाद या ठिकाणी हे सेंटर आहे, त्याठिकाणी फक्त 60 विद्यार्थी शिक्षण घेणार असतील तर किती विद्यार्थी हे शिक्षण घेऊन बाहेर पडू शकतील याचा गांभीर्याने विचार केला पाहिजे. या अभ्यास केंद्राची संख्या निश्चितपणे वाढविली पाहिजे. प्रत्येक जिल्ह्यामध्ये ही केंद्रे सुरु करुन किमान 100 प्रशिक्षणार्थी या केंद्रामधून शिकू शकतील याचा विचार निश्चितपणे केला पाहिजे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले.....

सभापती महोदय, शासनाच्या वतीने वसतिगृहे चालविली जातात या वसतिगृहांमध्ये असणाऱ्या विद्यार्थ्यांना 1000 रुपये निर्वाह भत्ता दिला जातो. महागाई किती वाढली आणि निर्वाह भत्ता किती देतो याचाही विचार शासनाने करावा. महागाई निर्देशांकाप्रमाणे या विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता किंवा विद्यावेतन दिले तर त्याचा चांगला परिणाम होऊ शकेल. दैनंदिन गरजांची पूर्तता करण्याची क्षमता असेल इतका निर्वाह भत्ता असावा असा आग्रह मी या ठिकाणी करतो. असंख्य विद्यार्थी या परीक्षा देतात. परीक्षेमध्ये अपयश आले की, हे विद्यार्थी वाममार्गाकडे वळतात किंवा त्यांना नैराश्य येते, वैफल्य दाटते आणि वैफल्यापोटी मग व्यसनाधीनता त्यांच्या वाटयाला येते. या पासून विद्यार्थ्यांना परावृत्त करण्यासाठी शासनाने गंभीरपणे पाऊले उचलण्याची गरज आहे. या विद्यार्थ्यांच्या मनावर एक असा संस्कार घडवावा की, जेणे करुन हे विद्यार्थी वैफल्यग्रस्ततेत किंवा नैराश्येच्या गर्ततेमध्ये जाणार नाहीत, असा प्रयत्न केला तर निश्चितपणे याचे चांगले परिणाम महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांच्या वाटयाला येऊ शकतील. सभापती महोदय, महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील मुले परदेशातसुध्दा जातात. अमेरिकेतील सिलिकॉन व्हॅलीमध्ये किंवा सिटीमध्ये महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील असंख्य विद्यार्थी आहेत. ट्राऊझर्स आणि टोपी परिधान करणारे,खादीचा शर्ट धारण करणारे असे जे सामान्य विद्यार्थी आहेत,त्यांनी सुध्दा अमेरिका आणि इतर देशांमध्ये आपली गुणवत्ता सिध्द केलेली आहे. अशी गुणवत्ता सिध्द करणाऱ्या या मुलांना महाराष्ट्र लोकसेवा आयोग आणि भारतीय प्रशासकीय सेवा यामध्ये सहभागी करुन घेण्यासाठी प्रवृत्त करावे, अशी मी या ठिकाणी आग्रहाची विनंती करतो.

सभापती महोदय, एकूणच या देशातील आय.ए.एस. आणि आय.पी.एस. च्या परीक्षांमध्ये इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रातील मुलांची संख्या फार तोकडी आहे. बोटावर मोजता येईल एवढी कमी आहे. म्हणून मला या ठिकाणी अशी विंनती करावयाची आहे की, राज्य शासनाचा अधिकार हा सर्वश्रेष्ठ आहे. मंत्रिमंडळ सुप्रीम आहे. त्यामुळे या मंत्रिमंडळाने एक ठराव करावा आणि तो कठोरपणे राबवावा.

सभापती महोदय, 50 टक्के प्रमोशन आम्ही आमच्या राज्य शासनाच्या केडरमधील कर्मचाऱ्यांना देले.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तरच निश्चितपणे राज्यामध्ये राज्य शासनाचे जे कर्मचारी काम करतात ते भारतीय प्रशासकीय सेवेमध्ये दिसू शकतील. परंतु आपण 50 टक्के प्रमोशन देऊ शकणार का, या बाबतचे स्पष्टीकरण माननीय मंत्री महोदयांनी आपल्या उत्तराच्या भाषणामध्ये द्यावे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत जी मुले पास होतात, जे राज्य शासनाच्या सेवेमध्ये काम करतात तसेच इतरही जे कर्मचारी राज्य शासनाच्या सेवेमध्ये आहेत त्यांना आपण 50 टक्के बढती भारतीय प्रशासकीय सेवेमध्ये देण्याचा जर प्रयत्न केला, उदा. जिल्हाधिकारी वगैरे म्हणून बढती देण्याचा प्रयत्न केला तर भारतीय प्रशासकीय सेवेमध्ये आमच्या मुलांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढू शकेल. राज्यकर्ते येतात आणि जातात परंतु ही जी पोलादी चौकट आहे ती तशीच आहे. त्यामुळे ती चौकट तशीच राहणार आहे. आज सुरेश नवले या ठिकाणी असतील, प्रा. फौजिया खान मॅडम अतिशय बुध्दिमान आहेत, कुशाग्र बुध्दीच्या आहेत आणि कदाचित 10 वर्षानंतर त्या या ठिकाणी नसतील परंतु आज या ठिकाणी असणारा जो प्रशासकीय अधिकारी आहे तो 10 वर्षानंतर सुध्दा असणारच आहे. वयाच्या 60 वर्षापर्यंत तो अविरत प्रयत्न करतो किंवा कार्यरत असल्याचे दाखवतो, ती प्रशासकीय चौकट आपण मोडू शकणार नाही परंतु त्यामध्ये लवचिकता आणण्याचा प्रयत्न करावा आणि महाराष्ट्रातील भूमिपुत्रांना ही 50 टक्केची सवलत आपण द्यावी, अशी आग्रहाची विनंती मी करणार आहे.

सभापती महोदय, दिल्लीमध्ये अनेक लॉबीज काम करतात. दिल्लीमध्ये उत्तर भारतीयांची एक लॉबी आहे, दक्षिण भारतीयांची एक लॉबी आहे. अशा या लॉबीज काम करतात आणि आपल्या प्रशासकीय अधिकाऱ्यांना त्या ठिकाणी संधी देण्याचे काम करतात. आपण लॉबी निर्माण करण्याचा प्रयत्न करु नका परंतु आपल्या महाराष्ट्रातील जे गुणवंत विद्यार्थी आहेत त्यांच्या गुणवत्तेला चालना मिळेल, संधी मिळेल असे प्रयत्न आपल्याकडून व्हावेत ही या क्षणी मी अपेक्षा करतो वैद्यकीय शिक्षणाच्या ज्या परीक्षा आहेत त्यामध्ये देशभरात सामूहिक परीक्षा घ्याव्यात असा सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय आलेला आहे. त्याचा परिणाम महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना भोगावा लागणार आहे. कारण सीएसटीच्या माध्यमातून जे विद्यार्थी परीक्षेला जातात त्यांचा जो अभ्यासक्रम आहे तो अभ्यासक्रम डोळ्यासमोर ठेऊन सेंट्रल बोर्ड परीक्षा कंडक्ट करु शकेल, ही एक भीती आहे. आमच्या एस.एस.सी. बोर्डाचे विद्यार्थी त्या परीक्षेच्या एकूण गुणवत्तेमध्ये उतरु शकणार नाहीत अशी

..2...

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

RDB/

प्रा. सुरेश नवले ....

मला एक साधार भीती वाटते. त्यामुळे माननीय मंत्री महोदया, आपण सर्वोच्च न्यायालयामध्ये पुनर्विचाराची याचिका जर दाखल केली आणि सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या संदर्भात जर प्रयत्न केले तर आमच्या महाराष्ट्रामधील वैद्यकीय महाविद्यालयांमधून बाहेर पडणारे जे विद्यार्थी आहेत आणि जे परीक्षेमध्ये सहभागी होऊ इच्छितात त्यांना फायदा होऊ शकेल.

सभापती महोदय, सनदी परीक्षेच्या संदर्भात एक अहवाल सादर करण्यात आलेला आहे. विधानसभेमध्ये या प्रश्नावर सांगोपांग चर्चा झाली, विचारविमर्ष झाला आणि त्यानंतर विधानसभेची एक समिती गठीत करण्यात आली. त्या समितीने काही निष्कर्ष काढलेले आहेत ते मी आपल्यासमोर मांडतो. समितीने तीन प्रकारच्या शिफारशी केलेल्या आहेत. महाराष्ट्रीय मुलांना अशा परीक्षांना बसण्याकरिता प्रवृत्त करणे व अशा परीक्षांची आवश्यक माहिती विद्यार्थ्यांना लहानपणापासून पोहोचती करावी अशी ढोबळ मानाने पहिली शिफारस केलेली आहे. दुसरी शिफारस अशी आहे की, इयत्ता दहावी, बारावी व विद्यापीठ स्तरावरील अभ्यासक्रम नागरी सेवा परीक्षेच्या अभ्यासक्रमाशी सुसंगत करावेत. तिसरी शिफारस अशी आहे की, नागरी सेवा परीक्षेचे प्रशिक्षण देण्याकरिता एसआयएसीच्या धर्तीवर संस्था उभी करावी. त्यांनी पुढीलप्रमाणे आणखी काही शिफारशी केलेल्या आहेत. महाराष्ट्रामध्ये शासन सेवेत असणाऱ्या अधिकाऱ्यांना नागरी सेवा परीक्षेत किंवा महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षांना बसण्याकरिता दोन महिन्याची खास अर्जित रजा देय असल्याचे व जास्तीत जास्त चार महिने बिनपगारी रजा देय असल्याचे आदेश शासनाने काढावेत, अशा प्रकारची शिफारस या समितीने राज्य शासनाला केलेली आहे. नागरी सेवा परीक्षेच्या प्राथमिक व मुख्य परीक्षात उत्तीर्ण होऊन अंतिमत: न निवडला गेल्यास विद्यार्थ्यांना प्रोत्साहन म्हणून महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेला बसताना तितक्या वर्षाने वयोमर्यादा शिथिल करण्यात यावी. ही एक शिफारस त्यांनी केलेली आहे. नागरी सेवा परीक्षेला बसण्यासाठी लागणारे साहित्य इत्यादींच्या खर्चाकरिता व ग्रामीण भागातील विद्यार्थी शहरी भागात येऊन तयारी करणार असल्यास लागणारा खर्च यासाठी सवलतीच्या दराने बँकांनी कर्ज उपलब्ध करुन देण्याची योजना शासन स्तरावर आखून बँकांकडून मान्य करुन घ्यावी. अशी एक शिफारस केलेली आहे.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले ....

तिसरी महत्वाची शिफारस अशी आहे की, "बँकांचे कर्ज घेऊन नागरी सेवा परीक्षेत अंतिमरित्या उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांच्या कर्जाचे विशिष्ट मर्यादेपर्यंत परतफेड शासनाने करावी, तसेच शासनाच्या विद्या वेतन योजनेमार्फत सुध्दा अशा खर्चाची योजना विभागाने तयार करावी," त्याचप्रमाणे यासाठी कोअर ग्रुप म्हणजे कार्यकारी मंडळ स्थापन करावे अशी एक शिफारस आहे. सभापती महोदय, तसेच शासन जी काही कारवाई करणार आहे ती केल्यानंतर त्याबाबतचा अहवाल दोन्हीही सभागृहासमोर ठेवावेत अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत वर्ग-1 अंतर्गत उप जिल्हाधिकारी, उप निबंधक (सहकारी संस्था), उपमुख्य कार्यकारी अधिकारी, गट विकास अधिकारी, नगरपालिकेचे व नगरपरिषदेचे मुख्याधिकारी, पोलीस उप अधीक्षक, सहाय्यक पोलीस आयुक्त, विक्रीकर अधिकारी, वैद्यकीय अधिकारी, ज्युडिशिअल मॅजिस्ट्रेट, महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा वर्ग-1 व 2, महाराष्ट्र कृषी सेवा वर्ग-1 व 2 व वर्ग-2 (कनिष्ठ) या पदांच्या परीक्षा घेतल्या जातात. तसेच वर्ग-ब अंतर्गत तहसीलदार, गट विकास अधिकारी, महसूल अधिकारी, जिल्हा निरीक्षक (भूमि अभिलेख), अधीक्षक (दारुबंदी व उत्पादन शुल्क), सहाय्यक निबंधक (सहकारी संस्था), सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी, मुख्य अधिकारी (नगरपालिका व परिषद) व कक्ष अधिकारी या पदांच्या परीक्षा घेतल्या जातात.

सभापती महोदय, आयएएस व आयपीएस या पदांच्या परीक्षेशिवाय काही पदांसाठी देशातील युपीएससीमार्फत परीक्षा घेतल्या जातात. या पदांची माहितीच महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना नसल्यामुळे ते या परीक्षा देऊ शकत नाहीत. ही माहिती जिल्ह्यातील प्रत्येक विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी शासनाने जर प्रयत्न केला तर त्याचा फायदा राज्यातील बुध्दिमान मुलांना होऊ शकेल. मी मघाशी सांगितल्या प्रमाणे आयएएस व आयपीएस शिवाय ज्या परीक्षा होतात त्या सभागृहाच्या माहितीसाठी सांगू इच्छितो. Indian Administrative Service, Indian Foreign Service, Indian Police Service, Indian P and T Accounts and Finance

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले ....

Service, Group 'A', Indian Audit and Accounts Service Group 'A', Indian Customs and Central Excise, Indian Defence Accounts Service Group 'A', Indian Revenue Service Group 'A', Indian Ordinance Factories Service Group 'A' (Assistant Works Manager-Non Technical, Indian Postal Service Group 'A', Indian Civil Accounts Service Group 'A', Indian Railway Traffic Service, Group 'A', Indian Railway Accounts Service Group 'A', Indian Railway Personnel Service Group 'A', Posts of Assistant Security Officer Group 'A' in Railway Protection Force, Indian Defence Estate Service Group 'A', Indian Information Service (Junior Grade) Group 'A', Railway Board Secretariat Service Group 'B' (Section Officer's Grade), Armed Forces Headquarters Civil Service Group 'B' * (Section Officer's Grade), The Delhi, Andaman and Nicobar Islands, Lakshadweep, Daman and Diu and Dadra and Nagar Haveli Civil Service Group 'B', The Delhi, Andaman and Nicobar Islands, Lakshadweep, Daman and Diu and Dadra and Nagar Haveli Police Service Group 'B', Pondicherry Police Service Group 'B'. या पदांच्या परीक्षांचा यात समावेश आहे.

या सर्व परीक्षांना महाराष्ट्राचे विद्यार्थी बसावेत, त्यांना या सर्व परीक्षांची माहिती व्हावी, या दृष्टीने शासनाने प्रयत्न करावेत तशी घोषणा मंत्री महोदयांनी करावी अशी मी आग्रहाची विनंती करतो तसेच या ठरावाची अंमलबजावणी करावी, असा आग्रह धरतो आणि माझे भाषण संपवितो.

ठराव प्रस्तुत झाला.

3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजन तेली (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा.सुरेश नवले यांनी मांडलेल्या अशासकीय ठरावावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा.नवले यांनी चांगल्या विषयाला हात घातलेला आहे. भारतीय प्रशासकीय सेवेत महाराष्ट्रातील किती लोक आहेत, याचा विचार केला तर हे प्रमाण अत्यल्प असल्याचे दिसून येईल.

यानंतर श्री.शिगम....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजन तेली...

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना युपीएससी, एमपीएससी आणि अन्य स्पर्धात्मक परीक्षांची माहिती नसते. या स्पर्धात्मक परीक्षांसाठी कोठे वर्ग घेतले जातात याची त्यांना माहिती नसते. आमच्या कोकणातील 4 जिल्ह्यातील 10वी आणि 12वीचे विद्यार्थी 80 ते 85 टक्के गुण मिळवून उत्तीर्ण होतात. 4थी आणि 7वीच्या शिष्यवृत्ती परीक्षेमध्येही राज्यातील मुले मोठ्या संख्येने उत्तीर्ण होतात. म्हणून या निमित्ताने माझी शासनाला अशी विनंती आहे की, राज्यस्तरावर आणि विशेषत: देशस्तरावर युपीएससी, एमपीएससी आणि अन्य स्पर्धात्मक परीक्षांसंबंधीची माहिती राज्यातील विद्यार्थ्यांना करुन देण्याची व्यवस्था करावी. हे करणे शासनाला शक्य नसेल तर कोणती तरी एजन्सी नेमून त्या एजन्सीला हे काम द्यावे. आज आपल्या राज्यामध्ये वर्ग-1 आणि वर्ग-2 मधील तहसीलदार, उप विभागीय अधिकारी, विक्रीकर अधिकारी, पोलीस अधिकारी यांची असंख्य पदे रिक्त आहे. तांत्रिक पदे देखील मोठ्या प्रमाणावर रिक्त आहेत. पॉलिटेक्निक कॉलेजेस मध्ये 50 टक्के स्टाफ नसल्यामुळे ती बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. ही पदे भरण्याबाबत शासनाला विचारणा केली तर एमपीएससीला परीक्षा घेण्यास सांगितले आहे असे सांगितले जाते. परंतु एमपीएससीमधील घोटाळा देखील मागे उघडकीस येऊन त्यामध्ये कर्णिक, वाणी सारख्या व्यक्तींना अटक झालेली होती. परीक्षा घेऊन उमेदवार देण्याच्या बाबतीत एमपीएससी मार्फत कोणतीही कार्यवाही केली जात नाही असा माझा आरोप आहे. या निमित्ताने मला एवढेच सांगायचे आहे की, विविध विभागातील पदांची माहिती तसेच युपीएससी, एमपीएससी व स्पर्धात्मक परीक्षांची माहिती ग्रामीण भागातील प्रत्येक जिल्हयातील विद्यार्थ्यांना मिळण्याच्या दृष्टीने, त्यांना मुबलक पुस्तके, मार्गदर्शन इत्यादी गोष्टी मिळण्याच्या दृष्टीने शासनाने व्यवस्था करावी अशी विनंती करुन माझे दोन शब्द संपवितो.

....2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा. सुरेश नवले यांनी मांडलेल्या अशासकीय ठरावाला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा. सुरेश नवले यांनी एमपीएससी, युपीएससी, वैद्यकीय, अभियांत्रिकी आणि अन्य विविध स्पर्धापरीक्षा बाबत सर्वंकष माहिती दिलेली आहे. आज महाराष्ट्र आणि इतर राज्यांची तुलना केली तर या स्पर्धा परीक्षांमध्ये महाराष्ट्रातील विद्यार्थी उत्तीर्ण होतात. परंतु त्याही पेक्षा जास्त विद्यार्थी बाहेरच्या राज्यातील उत्तीर्ण होतात. हे असे का होते याचा महाराष्ट्र शासनाने अंतर्मुख होऊन विचार केला पाहिजे. मी एक उदाहरण देतो. एक उत्तर भारतीय सधन कुटुंब माझ्या चांगल्या परिचयाचे आहे. आई डॉक्टर आणि वडील खाजगी कंपनीमध्ये मोठ्या हुद्यावर नोकरीला आहेत. त्या कुटुंबातील मुलीच्या आईने सांगितले की, आता माझी मुलगी ग्रज्युएट झालेली आहे. तिला आयअेएस किंवा आयपीएस व्हायचे आहे. माझे पती घरी राहाणार असून मी तिला घेऊन बिहारला जाणार आहे. मी त्यांना विचारले, " तुम्ही बिहारलाच का जाता ?" त्यांनी सांगितले की, आम्ही बिहारमध्ये गेलो तरच आयअेएस ऑफिसर होता येईल. सभापती महोदय, बिहारमध्ये जाऊन आयअेएस आणि आयपीएस होणा-यांची संख्या खूप मोठी आहे. मला कोण्त्या राज्याबद्दल आक्षप घ्यावयाचा नाही. परंतु मला हेही सांगायचे आहे की, आयअेएस मधील मराठी टक्का आता घसरत चालला आहे. आपण एकीकडे असे म्हणत असतो की महाराष्ट्रामध्ये मराठी पोलीस अधिकारी मिळत नाही. मग जेव्हा पोलीस आयुक्ताचे पद रिक्त होते त्यावेळी आपण मराठी अधिकारी शोधत असतो कारण तो त्या रँकमध्ये नसतो. याचे कारण आपली शिक्षण पध्दती हे आहे. आपण आयअेएस आणि आपीएसकडे पहातच नाही. प्राथमिक किंवा माध्यमिक शिक्षणापासून विद्यार्थ्यांनी वेगळ्या प्रकारे शिक्षण घेण्यास सुरुवात केली, त्यांना वेगळे चॅनल दिले तर अशा स्पर्धा परीक्षांसाठी विद्यार्थी तयार होतील असे माझे मत आहे. आमच्या काळात 11वी ही एसएससी होती. 11वीला जो विद्यार्थी गणित विषय घेत असे तो इंजिनिअर किंवा अन्य तांत्रिक शाखे्कडे जात असे. आता तशी परिस्थिती राहिलेली नाही. आपली शिक्षण पध्दती बदलत चालली आहे. ती बदलत असताना आपले विद्यार्थी आपीएस आणि आयअेएस परीक्षामध्ये कसे टिकतील याचा विचार आपण करीत नाही.

...नंतर श्री. गिते...

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखी नोंदी

डॉ.दीपक सावंत...

सभापती महोदय, या ठिकाणी वैद्यकीय शिक्षण मंत्री उपस्थित आहेत. आपल्या राज्याने कॉमन सीईटीला विरोध केला होता. पण सुप्रीम कोर्टाने सांगितल्यानंतर वैद्यकीय शिक्षण खात्याचे मत आले नाही. ते का आले नाही याची मला माहिती नाही. मी या विषयावर शिक्षण परिषद घेतली. त्यावेळी श्री. तायडे साहेब त्या डायसवर होते. त्यावेळी वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या प्रश्नास उत्तर देताना श्री. तायडे साहेबांनी अतिशय ठासून सांगितले होते की, आम्ही कॉमन सीईटीला निश्चितच विरोध करु. परंतु आज तो विरोध दिसला नाही. ज्यावेळी हा निर्णय आला, त्या निर्णयाच्या बाबतीत माननीय वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांनी प्रतिक्रिया दिल्या नाहीत, तसेच आरोग्य संचालकांनी देखील या निर्णयाच्या बाबतीत काहीही प्रतिक्रिया दिल्या नाहीत. आज आपल्याला माहिती आहे की, 85 टक्के विद्यार्थी आपले असले तरी 15 टक्के विद्यार्थी बाहेर राज्यातून येणार आहे. या 15 टक्के विद्यार्थ्यांमध्ये महाराष्ट्राच्या बांधिलकीशी जवळीक साधणारे विद्यार्थी किती असतील ? आज एम.डी. आणि एम.एस. च्या बाबत काय होत आहे याची आपल्याला माहिती आहे. या क्षेत्रात मराठी टक्का घसरतो आहे. या राज्यातील विद्यार्थी बाहेर जात आहे. स्पर्धा परीक्षेच्या बाबतीत गेल्या वर्षी विद्यार्थी कोर्टात गेले. आपण एम.सी.एच. किंवा डी.एम.मध्ये बघितले तर त्या ठिकाणी देखील मराठी टक्का नाही. या 15 टक्क्यांमध्ये मराठी मुलगा या राज्यात येणार नाही.

श्री. दिग्विजय खानविलकर यांनी डी.एम.फाऊंडेशनला पूर्णपणे विरोध केला होता. त्यानंतर निर्णय आला होता. 50 टक्के आरक्षण काढून टाकण्यास सांगितले होते. 100 टक्के महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना केंद्राचा राखीव कोटा नको होता. कॉमन सीईटीच्या बाबतीत राज्य शासनाने खूप विचार केला पाहिजे. आपल्या राज्याचा अभ्यासक्रम, दिल्लीचा अभ्यासक्रम, कर्नाटक राज्याचा अभ्यासक्रम, पश्चिमेकडील राज्यांचा अभ्यासक्रम यामध्ये प्रचंड तफावत आहे. सीबीएसई आणि आयसीएसई बोर्डाची मुले असतील तर त्यांचा अभ्यासक्रम सारखाच असतो. एचएससी बोर्डाचा विद्यार्थी असतो तो इयत्ता 10 वी मधून इयत्ता 12 वी मध्ये गेलेला असतो, त्या विद्यार्थ्याने काय करावयाचे ? सीबीएसई आणि आयसीएसई या बोर्डाच्या धर्तीवर शालेय शिक्षण समान पातळीवर आणले पाहिजे. या राज्यातील मध्यमवर्गीय मुले आहेत, ती मुले एसएससी बोर्डाच्याच शाळेत जातात. ती मुले कॉमन सीईटी मध्ये टिकणार नाहीत अशी माझी खात्री आहे. अनेक वेळा

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत...

अभ्यासक्रमाच्या बाहेरील प्रश्न विचारले जातात. मग त्यांना ग्रेस गुण दिले जातात. आपल्या राज्याच्या सीईटी परीक्षेमध्ये अनेक वेळा घडलेले आहे. ज्या प्रमाणे मेडीकलची सीईटी आहे तशी इंजिनिअरींगची सीईटी आहे.त्यात देखील तशीच परिस्थिती आहे. आपण एआयसीटी केले, त्याचा फायदा महाराष्ट्राला किती झाला ? आपण कॉमन बोर्ड केले, त्याचा किती फायदा झाला या गोष्टीचा शासनाने विचार केला पाहिजे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली यांनी सांगितले की, कोकणातील विद्यार्थी या स्पर्धा परीक्षेमध्ये टिकत नाही. आपण सगळे कोकणातील आहोत. कोकण म्हटले तर रत्नागिरी, मुंबई, ठाणे, रायगड, सिंधुदुर्ग हे सगळे जिल्हे आले. सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली यांनी सिंधुदुर्ग जिल्हयाचा उल्लेख केला. परंतु मी संपूर्ण कोकण असे म्हणतो आहे. कोकणचा विद्यार्थी अशा स्पर्धा परीक्षेमध्ये उत्तीर्ण होत नाही ही वस्तुस्थिती आहे. त्याचे कारण विद्यार्थ्यांमध्ये जागरुकताच नाही. आपल्याकडे शाळांची अतिशय वाईट परिस्थिती आहे. प्रथम या शाळांचा दर्जा सुधारण्याकडे शासनाने लक्ष दिले पाहिजे असे माझे मत आहे.

सभापती महोदय, एमपीएससी बोर्डाचे अध्यक्ष श्री.शशिकांत कर्णीक होते. आज एमपीएससी बोर्ड किती बदनाम झाले आहे याची सगळयांना माहिती आहे.

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. मोहन जोशी)

यानंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखापाठी नाही

डॉ.दीपक सावंत.....

आज सभागृहात आरोग्य राज्यमंत्री, वैद्यकीय शिक्षण मंत्री उपस्थित आहेत. त्यांच्याकडून नेहमी उत्तर दिले जाते की, लोकसेवा आयोगाकडून पदे भरण्यात येत आहेत. कोणताही विभाग असो, त्या त्या विभागाचे मंत्री महोदय हेच उत्तर देतात की, लोकसेवा आयोगाकडून पदे भरण्यात येत आहेत. परंतु लोकसेवा आयोगाकडून सहा-सहा महिने निकाल जाहीर होत नाहीत. लोकसेवा आयोगाच्या अध्यक्षपदी श्री.कोकाटे यांची नियुक्ती झाल्यानंतर आम्हाला अपेक्षा होती की, वेळेवर निकाल जाहीर होतील. परंतु काहीही सुधारणा झालेली नाही. लोकसेवा आयोगाच्या परीक्षेला बसलेला उमेदवार प्रशासकीय सेवेत असेल तर राज्य स्तरावरील परीक्षा पास होऊन प्रशासकीय सेवेत जायला नकार देतो. अशी वैद्यकीय क्षेत्रातील अनेक उदाहरणे मला माहिती आहेत. लोकसेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण होऊनही राज्य सेवेतील अपॉईंटमेंट न स्वीकारता खाजगी सेवेला प्राधान्य देतात. वेतनातील तफावत याला कारणीभूत आहे. खाजगी प्रॅक्टिस करुन भरपूर पैसा मिळतो. तेवढे उत्पन्न सरकारी सेवेत मिळत नाही. म्हणून मला विनंती करावयाची आहे की, प्राथमिक, माध्यमिक शाळा, आयसीएसई, सीबीएसई, एसएससी बोर्ड यांचे सिलॅबस एकाच पातळीवर आणणे ही काळाची गरज आहे. कॉमन सीईटीबद्दल पालकांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. परीक्षेचे मूळ रुप लोकांसमोर आले पाहिजे. ते कसे आणणार हा प्रश्न शासनाने सोडवायचा आहे. प्रशासकीय सेवेसाठी शासनाने वेगळे वर्ग सुरु करावेत. विशेषत: ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी प्रशासकीय सेवेत जाण्याकरिता विशेष मोहीम म्हणून तालुका आणि जिल्हा पातळीवर प्रशिक्षण केंद्रे उघडावीत. प्रशासकीय सेवेच्या परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांना विशेष प्रशिक्षण द्यावे. तरच हा ठराव फलदायी ठरेल एवढे सांगून माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक) : सभापती महोदय, माननीय सदस्य प्रा.सुरेश नवले यांचे मी अभिनंदन करतो, आभार मानतो. त्यांनी एका महत्वाच्या प्रश्नाला अशासकीय ठरावाच्या माध्यमातून वाचा फोडली आहे.

सभापती महोदय, या सभागृहात शिक्षण खात्यावर आम्ही अनेकदा चर्चा केली आहे. माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी सांगितल्याप्रमाणे उत्तरेकडील आणि दक्षिणेकडील राज्ये प्रामुख्याने प्रशासकीय सेवेमध्ये अधिक अग्रणी आहेत. विशेष म्हणजे बिहार, झारखंड, उत्तरप्रदेश आणि दिल्लीचे प्रमाण अधिक आहे. दक्षिणेकडील केरळ राज्य पुढे आहे. याचे मुख्य कारण असे की, त्यांनी प्राथमिक स्तरापासून अभ्यासक्रमाची रचना ही एन.सी.आर.टी.च्या धर्तीवर केली आहे. त्यांनी एन.सी.एफ.चा स्वीकार केला आहे. महाराष्ट्राने मात्र या गोष्टीकडे दुर्लक्ष केले आहे. महाराष्ट्रातील मुले केवळ प्रशासकीय सेवेत मागे आहेत असे नव्हे तर वैद्यकीय शाखेमध्ये, ज्ञान तंत्रज्ञानाच्या नवीन शाखांमध्ये, आय.आय.टी.मध्ये कोणती मुले पुढे येतात? बिहारमधील मुले पुढे आली म्हणून आम्हाला आकस नाही. स्थानिक आणि परप्रांताचा वाद पुढे करावयाचा नाही. सुरुवातीपासून आपण अभ्यासक्रमाची व्यवस्था आपल्या राज्यात उपलब्ध करुन देत नाही. खरे म्हणजे या प्रश्नाला आपण हात घालत नाही. डॉ.दीपक सावंत यांनी जो मुद्दा मांडला तो महत्वाचा आहे. आपण नववी, दहावी, अकरावी व बारावीचा अभ्यासक्रम राष्ट्रीय अभ्यासक्रमाच्या आधारे करायचे प्रयत्न करीत आहोत. सुरुवात झाली आहे. परंतु तेवढे पुरेसे नाही. पहिली ते आठवीपर्यंत एक अभ्यासक्रम आणि पुढे नवीन अभ्यासक्रम आल्यानंतर खेडयापाडयातील मुले टिकत नाहीत. ग्रामीण भागातील शाळांमध्ये हा अनुभव आहे. पहिली ते आठवीपर्यंत सुरुवात करावी लागेल. ज्या नवीन शाखा तयार झाल्या आहेत त्या संदर्भात स्पर्धात्मक परीक्षेच्या दृष्टीने माध्यमिक+ 2 या दोन्ही स्तरावर अभ्यासक्रमाची पुनर्रचना करावी लागेल. गणित आणि सायन्स या विषयामध्ये अधिक लक्ष घालावे लागेल.

नंतर 2व्ही.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील ...

आपले समाजशास्त्रसुध्दा अधिक प्रगल्भ करावे लागेल कारण त्यामध्येसुध्दा आपण मागासलेलो आहोत. आपल्या मुलांना चार उत्तरे नीट देता येत नाहीत परंतु इतर राज्यातील मुले मात्र चांगल्या प्रकारची उत्तरे देतात. सभापती महोदय, सी.बी.एस.ई आणि आय.सी.एस.ई. ची पुस्तके मी पाहिली असून ही पुस्तके अतिशय लहान आहेत. त्याचे फक्त 20 पाठ असतात व स्वाध्यायाची पाच पाने असतात .आपल्याकडे नेमके उलटे आहे. आपल्याकडे 40 ते 50 पाठांचे पुस्तक असते आणि स्वाध्यायाचे अर्धे किंवा एक पान असते. त्यामुळे हा अभ्यासक्रम कसा तरी पूर्ण करण्याचा ताण विद्यार्थ्याप्रमाणेच शिक्षकांवरसुध्दा येतो परंतु प्रत्यक्षात हातात काहीही येत नाही. तेव्हा जे मूलभूत यूनिट शाळेमध्यें शिकवावयास पाहिजे होते ते कधीच शिकवले जात नाही. ज्यावेळी कमी पाठ घेऊन त्याचा अधिक खोलवर जाऊन अभ्यास केला तर हा कन्सेप्ट क्लिअर होईल असे मला सांगावयाचे आहे.पण आपल्याकडे मात्र मोठी पुस्तके ठेवण्यात आलेली आहेत. इतर राज्याच्या तुलनेने आपल्या राज्यातील शिक्षक अतिशय सरस आहेत. आपल्या राज्यात विद्यापीठाचे शिक्षण अतिशय चांगले असल्यामुळे इतर राज्यातील विद्यार्थी हे शिक्षण घेण्याकरिता आपल्या राज्यात येत असतात .आपल्याकडे शालेय अभ्यासक्रमामध्ये ज्या त्रृटी आहेत त्यामुळे कितीही चांगल्या शाळा असल्या व कितीही चांगले शिक्षक असले तरी मुलांना नेमके जे द्यावयास पाहिजे ते आपण देऊ शकत नाही.

सभापती महोदय, याकरिता या अभ्यासक्रमाची पुनर्रचना तातडीने करण्यात आली पाहिजे. नववी, दहावी आणि अधिक दोन स्तरावरील अभ्यासक्रमाची पुनर्रचना करण्यास शासनाने सुरुवात केलेली आहे परंतु ती तेवढीशी पुरेशी नाही. त्यामुळे पहिली ते आठवीच्या अभ्सासक्रमाची पुनर्रचना करण्यास सुरवात करावी तसेच सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी सांगितल्याप्रमाणे दुस-या बाजूला नवीन शाखांकडे विद्यार्थ्यांनी जाण्यासाठी त्यांचा दृष्टीकोन तयार केला पाहिजे. त्यासाठी वेगळे वर्ग घेण्यात आले पाहिजे. दिल्ली येथील आय.ए.एस. अधिकारी महाराष्ट्रातील मुलानी मुलाखती कशा द्याव्यात याचे प्रशिक्षण देतात व त्यासाठी मॉक इन्टरव्हयू घेत असतात.आपल्या महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हयात असणा-या आय.ए.एस.अधिका-यांनी पुढाकार घेऊन अशा प्रकारचे काम करावे.राज्यातील अनेक मुले हुशार व प्रतिभासंपन्न असतात परतु पुढे कसे जावयाचे हे त्यांना माहीत नसते म्हणून ते अडकतात तेव्हा हा अडथळा पार पाडण्याकरिता

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आपल्या राज्यातील अधिका-यांनी जबाबदारी घेणे आवश्यक आहे असे मला सांगावयाचे आहे.

सभापती महोदय,सी.एस.टी. जवळ आय.ए.एस. परीक्षेचे प्रशिक्षण देण्यासबंधीचे एक केन्द्र सुरु करण्यात आलेले आहे .तेवढे एक केन्द्र पुरेसे नाही.त्यामुळे प्रत्येक जिल्हयामध्ये अशा प्रकारचे केन्द्र सुरु करण्याची आवश्यकता असून ते केन्द्र सुरु करण्यामध्ये माननीय मंत्र्यांनी पुढाकार घ्यावा असे मला सांगावयाचे आहे. यासाठी फारसे पैसे लागतील असे मला वाटत नाही. कोणतीही नवीन योजना सुरु करावयाची असेल तर त्यासाठी लागणा-या पैशाचा प्रश्न नेहमीच येत असतो परंतु ही केन्द्रे सुरु करण्यासाठी पैसे लागणार नसल्यामुळे ती त्वरित सुरु करावीत.पैसे नाहीत म्हणून किती वर्षे या मुलांना मागे ठेवणार आहोत, त्यामुळे महाराष्ट्र राज्य किती मागे गेलेले आहे? आज सगळयाच क्षेत्रामध्ये आपले राज्य मागे गेलेले आहे.ज्ञानाच्या क्षेत्रात ,विज्ञानाच्या क्षेत्रात ,तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात तसेच प्रशासकीय सेवा, पोलीस सेवा, संरक्षण सेवा, आय.ए.एस. सेवा आणि परराष्ट्र सेवा इत्यादी सगळया ठिकाणी आपण मागे आहोत . देश चालविण्यासाठी लागणारी जी सात आठ क्षेत्रे आहेत त्या क्षेत्रात आपण मागे आहोत.याचे मुख्य कारण अभ्यासक्रम हेच आहे तेव्हा या अभ्यासक्रमात सुधारणा करण्याचे आव्हान शासनाने स्वीकारले पाहिजे एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

--

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय,या ठिकाणी मांडण्यात आलेल्या अशासाकीय ठरावावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. सन्माननीय सदस्य प्रा.सुरेश नवले यानी अशासकीय ठरावाच्या निमित्ताने एका महत्वाच्या व गंभीर विषयाला वाचा फोडण्याचा फक्त प्रयत्नच केलेला नाही तर त्यांनी आपल्या समोर आरसाच ठेवलेला आहे.

सभापती महोदय, आपण स्पर्धात्मक अभ्यासक्रमाच्या बाबतीत नेहमीच बोलतो .सन्माननीय सदस्य श्री कपिल पाटील म्हणाले त्या प्रमाणे फक्त सात आठ अभ्यासक्रम आपल्या डोळ्यासमोर येत असतात. परंतु त्यांनी जवळजवळ 20 अभ्यासक्रम या ठिकाणी वाचून दाखवले असून हे सगळे अभ्यासक्रम देशातील जडणधडणीमध्ये महत्वाची भूमिका अदा करणारे आहेत. त्यांतील बरेचसे अभ्यासक्रम मला सुध्दा माहीत नव्हते ही गोष्ट प्रांजळपणाने कबूल करण्यामध्ये मला जराही कमीपणा वाटत नाही.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुरेश नवले हे प्राचार्य असून त्यांनी भाषणाची सुरुवात अतिशय सुंदरपणे केली आहे. इतकेच नव्हे तर आमच्या डोळ्यात त्यांनी अंजन घालण्याचा प्रयत्न केला आहे.शासनाने या विषयाची गंभीरपणे दखल घेऊन या अभ्यासक्रमाची माहिती सर्वाना दिली पाहिजे. अलीकडे आपल्याकडे करिअर गाईडन्सचे फॅड निघालेले आहे. या करिअर गाईडन्सच्या नावाने काही व्यक्ती पोलिटीकली काही प्रयत्न करीत असतात. त्या मेळाव्यामध्ये काही भाषणे होतात परतु ख-या अर्थाने विद्यार्थ्यानी नेमके काय केले पाहिजे याचे त्यांना मार्गदर्शन मिळत नाही.विद्यार्थ्याना नेमकी कोणत्या क्षेत्रात संधी उपलब्ध आहे याची माहिती त्यांना मिळत नाही. आम्ही सुध्दा काही वेळेस करिअर गाईडन्सचे मेळावे आयोजित करीत असतो परतु आयएएस होण्यासाठी किंवा आयपीएस होण्यासाठी तसेच वैद्यकीय आणि इंजिनिअरीग क्षेत्रात जाण्यासाठी काय करावे लागेल एवढेच त्यांना सांगितले जाते.

.

नंतर श्री.सरफरे

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री.भाई जगताप...

या व्यतिरिक्त आपल्याला कुणी तरी मोठे व्हावयाचे आहे हे विद्यार्थ्यांना सांगण्याची भूमिका राज्य शासनाने घेतली पाहिजे. माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी सांगितल्याप्रमाणे त्याची सुरुवात शाळेतून झाली पाहिजे. पंरतु आम्ही एसएससी झाल्यानंतर हे सर्व करावयास जातो, एसएससी नंतर आपण करियर गाइडन्स करतो. देशाच्या तुलनेत या राज्यातील विश्व विद्यालयीन शिक्षण बऱ्यापैकी चांगले आहे. परंतु याची सुरुवात अशा पध्दतीने झाली पाहिजे की, ज्यामुळे या मुलांना त्याची जाण असेल. त्यांनी शालेय जीवनामध्ये मार्गक्रमण करीत असतांना आपल्याला इंजिनिअर बनावयाचे आहे की, डॉक्टर बनावयाचे आहे की, एअरोनॉटिक्समध्ये जायचे आहे हे त्या मुलाने ठरवावयाचे आहे. हा अभ्यासक्रम आपण केंद्र शासनाच्या नवीन शैक्षणिक धोरणानुसार तयार करण्याचे ठरविले आहे आणि म्हणून हीच योग्य वेळ आपण ठरवून त्या अभ्यासक्रमामध्ये या सर्व गोष्टी अंतर्भूत केल्या तर भविष्यात आपल्याला कोणकोणत्या संधी उपलब्ध होणार आहेत याचे त्यांना मार्गदर्शन मिळेल.

सभापती महोदय, या ठिकाणी आपण नेहमी ज्या गोष्टीचा उल्लेख करतो त्या बाबत मी सांगू इच्छितो की, या क्षेत्रामध्ये इतर राज्यातील विद्यार्थी पुढे असून मराठी टक्का घसरत चालला आहे, हा विषय देखील चिंता करण्यापेक्षा जास्त चिंतन करण्याचा आहे. या ठिकाणी दुसऱ्या राज्यातील कुणी विद्यार्थी शिकत असेल तर तो या देशाचे वैभवच आहे, तो या देशाच्या सेवेमध्ये काम करीत आहे. तर मग आपल्यापेक्षा तो वेगळे काय करीत आहे, किंवा आपल्यापेक्षा त्याचे वेगळे काय आहे? हे समजून घेऊन ते आपल्या विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन देणे आपल्याला अभिप्रेत आहे. प्राचार्यांना देखील तेच अभिप्रेत असावे असा माझा स्वत:चा समज आहे. अशा प्रकारच्या अभ्यासक्रमामध्ये आपण लक्ष घालावे अशी माझी आपणास विनंती आहे.

सभापती महोदय, आपल्या राज्यामध्ये अशाप्रकारचे गायडन्स देणारे 5 सेंटर्स आहेत. या राज्यामध्ये 33 जिल्हे असल्यामुळे जिल्हा हा केंद्रबिंदू धरुन याची आपण जिल्हा पातळीवर सुरुवात केली तर नंतर आपल्याला तालुका पातळीवर जाता येईल, किंवा गाव पातळीवर जाता येईल. याबाबत सभागृहामधील माझ्या सर्व सहकाऱ्यांनी देखील हेच सांगितले आहे. तेव्हा माझी आपणास विनंती आहे की, आपण अशाप्रकारचे गायडन्स देण्याची सुरुवात जिल्हा स्तरावर करावी जेणेकरुन भविष्यामध्ये त्या विद्यार्थ्याला योग्य मार्गक्रमण करता येईल एवढे सांगून आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले आभार व्यक्त करुन माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, माननीय सदस्य प्रा.सुरेश नवले यांनी एक महत्वाचा अशासकीय ठराव मांडला आहे, त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, त्यांनी या ठरावामध्ये असे म्हटले आहे की, "महाराष्ट्र राज्यातील विद्यार्थ्यांचे अत्यल्प प्रमाण लक्षात घेता हे प्रमाण वाढविण्याच्या दृष्टीने उमेदवारांची योग्य प्रकारे व अद्ययावत पध्दतीने पूर्वतयारी करुन घेणे". या मध्ये शासनाने या सर्व गोष्टी करण्याबाबत आपण धरलेला आग्रह योग्य आहे. परंतु मी आपल्या निदर्शनास हे देखील आणू इच्छितो की, महाराष्ट्रामध्ये ठाणे महानगरपालिकेतर्फे या सर्व लोकांची पूर्व तयारी करण्यासाठी सी.डी.देशमुख इंस्टिटयूट सुरु करण्यात आली असून ती अत्यंत यशस्वीपणे कार्यरत आहे. साधारणपणे महानगरपालिका म्हटली की, त्यामध्ये निरनिराळे अधिकारी असतात, राजकारणी लोक असतात. परंतु अशा या सुंदर इंस्टिटयूटमधून मागील दहा वर्षात जवळ जवळ दोन ते तीन डझन विद्यार्थ्यांची प्रशासकीय सेवेसाठी निवड झाली आहे. मागील वर्षी आठ विद्यार्थ्यांची प्रशासकीय सेवेसाठी निवड झाल्याबद्दल मी त्यांचा सत्कार केला आहे. कोकणातील चिपळूणच्या श्रीमती अश्विनी जोशी यांना मुंबईला बोलावून त्यांच्या हस्ते या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. मला आपल्याला हे सांगावयाचे आहे की, अशाप्रकारे जर आपण स्थानिक स्वराज्य संस्थेला एन्करेज केले तर राज्यातील 23 महानगरपालिकांमधून अशी इंस्टिटयूट सुरु होऊ शकते. या बाबतीत महानगरपालिकेने त्यांना फक्त स्वायत्तता दिली पाहिजे. ठाणे महानगरपालिकेने त्या ठिकाणी सी.डी.देशमुख इंस्टिटयूटला स्वायत्तता देऊन ती पूर्णपणे स्वतंत्र करण्यात आली आहे. आज त्या ठिकाणी देशाच्या कानाकोपऱ्यातील असंख्य मुले पूर्व तयारीसाठी येतात. अशाप्रकारे आपल्याला देखील शासनाच्या वतीने व्यवस्था निर्माण करुन विद्यार्थ्यांची पूर्वतयारी करुन घेता येईल.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर . . ..

सभापती महोदय, दुसरे म्हणजे आपण सूचना करतो, त्या आवश्यक असतात. पण काही संस्था, काही एन.जी.ओ.असतात. शासनाने त्यांना सुध्दा अनुदान दिले, त्यांना मदत केली तर त्या संस्था सुध्दा पूर्वतयारी करु शकतील. मराठी टक्का घटण्याबाबतचा एक विषय आहे.परंतु शासनाने निरनिराळया विषयांना प्रोत्साहन देण्याबाबतचे जे काम आहे, ते जर निरनिराळया पध्दतीने सुरु ठेवले तर यामध्ये आपल्याला निश्चितपणे उपयोग होईल. पहिली ते आठवी मधील जो अभ्यासक्रम आहे त्याबाबत अनेक सन्माननीय सदस्यांनी शासनाला सूचना केलेल्या आहेत. त्या अनुषंगाने जर शालेय शिक्षण घेत असतानाच विद्यार्थ्यांना अगोदर प्रशिक्षण किंवा मार्गदर्शन मिळाले तर ते सोयीचे होईल. आपल्या सर्वांच्या माहितीसाठी सांगतो की, मी गेली 15-20 वर्षे स्वत: करिअर गायडन्स्च्या बाबतीत एक पुस्तिका काढत आहे. यासंबंधात उगाचच मेळावे वगैरे घेऊन त्यामध्ये भाषणे न करता जर या पुस्तिका हजारो मुलांना दिल्या तर त्याचा उपयोग होतो. मला आपल्याला हे सांगण्यास आनंद वाटत आहे की, मला यासंबंधात अमेरिकेमधून पत्रे आली आहेत. येथील विद्यार्थी ही पुस्तिका वाचून त्या-त्या ठिकाणी गेले आणि त्यांना त्यामध्ये यश मिळाले आणि ते अमेरिकेपर्यंत पोहोचले. तेव्हा विद्यार्थ्यांना शाळेमध्ये शिकत असताना जर मार्गदर्शन केले तर त्याचा विद्यार्थ्यांना त्याचवेळेस निश्चितपणे उपयोग होऊ शकतो.त्याचबरोबर 21 व्या शतकामध्ये आज आय.टी.पासून आर्मीपर्यंत वेगवेगळया प्रकारचे कोर्सेस उपलब्ध आहेत. सन्माननीय सदस्य प्रा.सुरेश नवले साहेबांनी आपल्याला प्रशासकीय सेवेच्या संदर्भातील कोर्सेसची यादी वाचून दाखविली आहे. परंतु 850 प्रकारचे विविध अभ्यासक्रम आणि 850 प्रकारचे आय.टी.पासून आर्मीपर्यंतचे विविध कोर्सेस आहेत. मी आपल्या माहितीसाठी हे देखील सांगू इच्छितो की, मी माझ्या स्वत:च्या वेब साईट मध्ये "करिअर-गुरु" म्हणून स्लॉट टाकलेला आहे. त्यामध्ये केवळ कोर्सेसची नावेच नाही तर त्यासाठी आपल्याला कशा पध्दतीने आणि काय-काय करावे लागेल याची माहिती आहे. तसेच हे कोर्सेस कुठे उपलब्ध आहेत, त्यासाठी कोणत्या क्वॉलिफीकेशनची गरज आहे ? याचीही माहिती आहे.अशा वेळी जर आपण या माध्यमांचा उपयोग केला तर मग आपण मराठी टक्का मागे आहे असे म्हणून रडत बसतो आणि मग बिहारी टक्का वाढलेला आहे म्हणून चर्चा करतो, याला काही अर्थ नाही.जर मराठी टक्का वाढवावयाचा असेल तर आपल्याला त्यासाठी झिजावे लागेल आणि शासनाच्या बरोबर अशासकीय संस्थांना देखील काम करावे लागेल जेणेकरुन आपली मुले विविध क्षेत्रामध्ये पुढे येण्यासाठी त्याचा उपयोग होऊ शकेल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर . . ..

सभापती महोदय, मला या विषयाबाबत दोनच सूचना करावयाच्या आहेत. सन्माननीय सदस्यांनी एम.पी.एस.सी. आणि यु.पी.एस.सी. च्या विषयांबाबत सांगितले. एम.पी.एस.सी. बोर्डाच्या संबंधात बऱ्याच प्रकारच्या स्पर्धा परीक्षा झालेल्या आहेत. परंतु यु.पी.एस.सी.च्या ठराविक परीक्षा या ठराविक वेळेलाच असतात. त्यामुळे ज्या विद्यार्थ्याला आपले करिअर करावयाचे असते त्यांचे उद्दिष्ट नक्की असते. तशाच प्रकारे एम.पी.एस.सी.ने सुध्दा वर्षामधील परीक्षेच्या बाबतीत ठराविक तारखा किंवा महिने आणि या परीक्षांचे निकाल जाहीर होण्याची तारीख ठरविली तर ते सोयीचे होईल. तसेच परीक्षेबरोबर त्याचे निकालाच्या तारखा ठरविल्या तर ते सोयीचे होणार आहे. मला याची कल्पना आहे की, सहा-सहा महिने, आठ-आठ महिने, दहा-दहा महिने परीक्षांचे निकाल न लागल्यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान झालेले आहे.कारण रिझल्ट लागत नाही तोपर्यंत त्यांना त्यांचे करिअर ठरविता येत नाही. त्यांना आपण पुढे काय करावे हे कळत नाही. यामुळे एम.पी.एस.सी.ने देखील यु.पी.एस.सी.च्या धर्तीवर परीक्षा घेण्याच्या बाबतीत आणि रिझल्ट जाहीर करण्याच्या बाबतीत टाईम टेबल ठरविले तर या विद्यार्थ्यांना बाकीच्या परीक्षांना बसणे सोयीचे होईल. आर्मीच्या देखील बऱ्याच परीक्षा असतात, त्या देखील देता येतील आणि त्याचा विद्यार्थ्यांना निश्चितपणे उपयोग होऊ शकतो.

सभापती महोदय, माझा शेवटचा मुद्दा असा आहे की, आता एम.पी.एस.सी.चे बोर्ड पुन्हा अस्तित्वात आलेले आहे. मध्यंतरी त्याठिकाणी बऱ्याच जागा भरावयाच्या होत्या. त्यामुळे कितीतरी दिवस काही बाबी पेंडींग होत्या. यामुळे तेथील व्यवस्था देखील सक्षम करण्याच्या दृष्टीने प्रयत्न केला तर त्याचा फायदा होऊ शकतो. हा अत्यंत महत्वाचा विषय असून शासनाने त्याकडे गंभीरपणे लक्ष दिले पाहिजे. आपल्या मराठी मुलांचा आय-क्यू आणि ई-क्यू देखील चांगला आहे. फक्त त्यांना प्रोत्साहन देण्याची, मार्गदर्शन करण्याची गरज आहे आणि आपण त्यांना ते वेळच्यावेळी करु शकलो तर हा मराठी टक्का बघता-बघता निश्चितपणे पुढे जाऊ शकतो एवढेच या चर्चेच्या निमित्ताने सांगतो. धन्यवाद.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आदरणीय प्राचार्य आणि सन्माननीय सदस्य श्री.सुरेश नवले साहेब यांना मनापासून धन्यवाद देतो की, त्यांनी या ठरावाच्या माध्यमातून एक अत्यंत महत्वाचा विषय सदनामध्ये चर्चेसाठी उपस्थित केलेला आहे. हा ठराव वाचल्यानंतर सन्माननीय सदस्यांनी ज्या उद्देशाने हा ठराव मांडलेला आहे, त्यातून आपल्यासमोर तीन मुद्दे येतात. एक म्हणजे आय.ए.एस.अधिकारी, आय.पी.एस.अधिकारी किंवा वैद्यकीय क्षेत्र या सर्व ठिकाणी आपल्या महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांचे प्रमाण अत्यंत अल्प आहे ही वस्तुस्थिती आहे.

सभापती महोदय, त्यांनी दुसरा महत्वाचा मुद्दा मांडला आहे की, अभ्यासक्रमाच्या माध्यमातून या विद्यार्थ्यांना सर्व क्षेत्रातील स्पर्धा परीक्षांच्या बाबतीत माहिती देण्याची आवश्यकता आहे.

यानंतर कु.थोरात . . ..

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते...

अभ्यासक्रमामध्ये याचा समावेश करावा, अशा प्रकारचा विषय किंवा मुद्दा या ठरावाच्या माध्यमातून या ठिकाणी मांडण्यात आलेला आहे. माझा तिसरा मुद्दा असा आहे की, अशा प्रकारे अभ्यास क्रमांमध्ये हा विषय सुरु केला असता याबाबतीत शासनाचा आता पर्यंतचा अनुभव असा आहे की, पर्यावरण हा विषय सुरु करावयाचा आहे ना मग पर्यावरण हा विषय सुरु करा. शिक्षक तुम्हीच नेमा आणि त्यांचा पगारही तुम्हीच द्या. संगणकशास्त्र हा विषय सुरु करावयाचा असेल तर संगणकशास्त्र हा विषय सुरु करावा, पण शिक्षक संस्थांनीच नेमावयाचा आणि त्यांचा पगारही संस्थांनी द्यावा. तंत्रज्ञान हा विषय सुरु करावयाचा असेल तर तंत्रज्ञान हा विषय सुरु करावा पण शिक्षक संस्थानीच नेमावा आणि त्यांचा पगारही संस्थेनीच द्यावा, अशा प्रकारे सांगण्यात येते. शासन त्याची जबाबदारी घेत नाही. सभापती महोदय, प्रा. सुरेश नवले यांनी उपस्थित केलेला मुद्दा अत्यंत महत्वाचा आहे, त्यासाठी 100 टक्के अनुदान देण्याची गरज आहे. यावर होणारा जो खर्च आहे, तो खऱ्या अर्थाने या क्षेत्रातील इनव्हेस्टमेंट आहे, याची फळे आपल्याला काही वर्षांनी मिळतील. पण ही बचत करण्याची, यामध्ये गुंतवणूक करण्याची नितांत आवश्यकता आहे. आज आपल्या विद्यार्थ्यांना विचारले की, बाळा रे, भविष्यामध्ये तुला काय व्हावेसे वाटते? तर विद्यार्थ्यांकडून आम्हाला दोनच उत्तरे मिळतात. एक तर तो डॉक्टर व्हावयाचे आहे असे सांगतो किंवा इंजिनियर व्हावयाचे आहे असे सांगतो. याच्यापेक्षा तिसरा मार्ग त्याला सूचत नाही आणि त्याला तो माहीतही नसतो. पालकांचाही तोच आग्रह असतो. अनेक पालकांना वेगवेगळे क्षेत्र माहीत नाहीत. ज्या क्षेत्रामध्ये आपल्या क्षमतेनुसार विद्यार्थी जाऊ शकतात, प्रगती करु शकतात, यश मिळवू शकतात, यशस्वी होऊ शकतात अशी अनेक क्षेत्रे आज उपलब्ध आहेत पण त्यांची माहिती पालकांना आणि विद्यार्थ्यांना मिळत नाही. माध्यमिक शाळेच्या स्तरापासून या क्षेत्रांची माहिती विद्यार्थ्यांना होणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, मुंबईत अशा प्रकारचे प्रशासकीय सेवा केंद्र सुरु आहे अन्य ठिकाणीही ही केंद्र सुरु आहेत. या ठिकाणी अन्य भागातून विद्यार्थी येऊन प्रशिक्षण घेतात. या ठिकाणी राहतात. वेगवेगळया क्षेत्रामध्ये ते अधिकारी होणार आहेत. त्या ठिकाणी या विद्यार्थ्यांची राहण्याची व्यवस्था आहे काय, त्यांना चांगल्या प्रकारचे ग्रंथालय उपलब्ध आहे काय, प्रशिक्षणाची सोय उपलब्ध आहे काय? सभापती महोदय, या सेवा केंद्राच्या संदर्भात अनेक तक्रारी आहेत. राज्य शासनाने

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते...

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी जे केंद्र सुरु केलेले आहेत ते स्वंयपूर्ण असावेत, परिपूर्ण असावेत अशा प्रकारची अपेक्षा आहे. सन्माननीय सदस्य श्री. केळकर यांनी या ठिकाणी असा मुद्दा उपस्थित केला आहे की, या सेवा केंद्राची जबाबदारी खाजगी संस्थांनी घ्यावी. हे काम शासनाने करण्यापेक्षा सेवाभावी संस्था हे काम चांगल्या प्रकारे करु शकतील. फक्त या सर्व संस्थांना प्रेरणा आणि प्रोत्साहन देण्याची, त्यांना आर्थिक मदत करण्याची आवश्यकता आहे. केवळ शहरी भागातील विद्यार्थ्यांमध्येच नाही तर ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये आणि आदिवासी भागातील विद्यार्थ्यांमध्ये सुध्दा मोठया प्रमाणात पोटन्शल आहे, म्हणून या विद्यार्थ्यांजवळ असलेले पोटेन्शिअल, त्यांच्याकडे असलेल्या क्षमतांचा उपयोग करुन घ्यावयाचा असेल तर या विद्यार्थ्यांना या स्पर्धा परीक्षांच्या क्षेत्रात आणण्यासाठी अशा प्रकारची केंद्रे फक्त शहरी भागातच नव्हे तर ग्रामीण भागात आणि आदिवासी क्षेत्रात सुरु करण्याची आवश्यकता आहे. मंत्री महोदय उत्तर देत असताना या संदर्भात काय उपाययोजना करण्यात येणार आहे ते सांगतील. पण एकदम ठराव आणला आणि त्याला उत्तर दिल्या नंतर लगेच उद्या काही तरी होऊ शकेल असे नाही. पण या संदर्भामध्ये गाभीर्याने विचार करण्याची आवश्यकता आहे. हा विषय अत्यंत महत्वाचा आहे. वेगवेगळया समित्यांच्या माध्यमातून आढावा घेऊन योग्य त्या पध्दतीने उपाययोजना करुन या विषयाची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. सभापती महोदय, आपण मला या विषयावर बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपल्याला धन्यवाद देऊन मी माझे भाषण पूर्ण करतो.

अशुधारित प्रत / शीघ्रलिपीची नोंद

SMT/

श्री. भगवान साळुंखे (पुणे विभाग शिक्षक) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा. सुरेश नवले यांनी या ठिकाणी जो ठराव मांडलेला आहे त्यासंदर्भात काही शब्दात आणि काही मिनिटात मी माझे मुद्दे मांडणार आहे.

सभापती महोदय,माध्यमिक टप्प्यावरच कॉम्पिटेटिव्ह परीक्षेला विद्यार्थी तयार करण्याच्या दृष्टिकोनातून अभ्यास क्रमात बदल करावा अशी सन्मानीय सदस्यांनी या ठिकाणी मांडलेली स्थूल कल्पना आहे. परंतु अभ्यासक्रम तयार करण्याची जी विद्यमान पध्दती आहे ती पध्दती पहिल्यांदा लक्षात घेतली पाहिजे. इयत्ता आठवीपर्यंतचा अभ्यासक्रम एस.आी.आर.टी.च्या माध्यमातून तयार केला जातो. तर इयत्ता नववी, दहावी, अकरावी आणि बारावीचा अभ्यासक्रम एस.एस.सी. बोर्डाच्या माध्यमातून तयार केला जातो उच्च शिक्षणाचा विद्यापीठातील बोर्ड ऑफ स्टडीज, अकॅडेमिक काऊन्सिल हे अभ्यासक्रम तयार करतात. या तिन्ही अभ्यासक्रमामध्ये दुर्दैवाने एकवाक्यता नाही. त्यामुळे केवळ माध्यमिक टप्प्यावर असा बदल करुन चालेल, अशातला भाग नाही. यामध्ये बदल करावयाचा असेल तर पहिल्यांदा आपल्याला असा बदल करावा लागेल की, देशभरातील अभ्यासक्रम लक्षात घेऊन महाराष्ट्रातील अभ्यासक्रमात तौलनिक बदल घडवून आणावा लागेल. दुसरा बदल असा करावा लागेल की, स्वंयसेवी संस्थांच्या माध्यमातून विद्यार्थी तयार करुन घेण्याचा जो कल आहे,.....

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भगवान साळुंखे ....

त्या पेक्षा आमची जी औपचारिक शिक्षण प्रणाली आहे, आमच्या शासनाची जी शाळा कॉलेजेस आहेत, ज्या ठिकाणी बहुजनांची, हरिजनांची, गिरीजनांची मुले शिकतात, ती मुले तयार होतील अशा पध्दतीचा दर्जेदार अभ्यासक्रम तयार केला तर हे उद्दिष्ट सहजपणाने साध्य होऊ शकेल. दुर्दैवाची गोष्ट अशी आहे की, दर्जेदार अभ्यासक्रम तयार होत नाही आणि झालेल्या अभ्यासक्रमाची योग्य रीतीने अंमलबजावणी होत नाही. शाळेत खडू-फळा शिकविणे याला अंमलबजावणी म्हणता येत नाही. त्याचे मूल्यमापन करण्याची आमची जी पध्दत आहे ती पध्दत स्पर्धात्मक परीक्षा, आयएएसची परीक्षा, आयपीएसची परीक्षा घेण्याच्या पध्दतीशी समांतर असेल तरच आपले उद्दिट सफल होईल. असे दोन मुद्दे मांडून मी माझे भाषण संपवितो.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान (सामान्य प्रशासन राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा. सुरेश नवले यांनी ज्या विषयावर अशासकीय ठराव मांडलेला आहे तो विषय खरोखर खूप महत्वाचा आहे. त्यांनी हा विषय खूप अभ्यासपूर्ण पध्दतीने मांडलेला आहे. या सभागृहातील अनेक सन्माननीय सदस्यांनी या ठरावावरील चर्चेत भाग घेतलेला आहे. सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत, सर्वश्री कपिल पाटील, भाई जगताप, संजय केळकर, रामनाथ मोते आणि भगवान साळुंखे या सर्व सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी उत्कृष्ट सूचना केलेल्या आहेत. मी सभागृहाला सांगू इच्छिते की, आपल्या सूचनांचा योग्य तो सन्मान ठेऊन संबंधित जे खाते असेल त्या खात्यामध्ये त्या कशा अंतर्भूत करता येतील या दृष्टीने जरुर प्रयत्न करु.

सभापती महोदय, या ठिकाणी जो मूळ ठराव मांडलेला आहे त्यामध्ये स्पर्धा परीक्षेला प्रोत्साहन देण्याकरिता माध्यमिक शाळांना अनुदान देण्याच्या बाबतीत हा ठराव आहे. त्यामुळे सुरुवातीला मी त्या बाबत उत्तर देत आहे. खरे तर त्याचा संबंध उच्च शिक्षण विभागाशी जास्त येतो तरी सुध्दा मी आपल्या सर्व प्रश्नांची उत्तरे देण्याचा प्रयत्न करते. उच्च व तंत्रशिक्षण विभागाने राज्य प्रशासकीय प्रशिक्षण संस्था सुरु केली, त्याचा उल्लेख या ठिकाणी करण्यात आला. त्यामुळे राज्यामध्ये प्रशासकीय सेवेमध्ये नक्कीच महाराष्ट्राच्या विद्यार्थ्यांचे प्रमाण वाढलेले आहे. 2010 मध्ये एकूण 875 विद्यार्थ्यांनी भारतीय स्तरावर परीक्षा दिली त्यात महाराष्ट्राचे 75 विद्यार्थी उत्तीर्ण झाले आणि त्यातील 21 विद्यार्थी हे राज्य प्रशासकीय प्रशिक्षण संस्थेत प्रशिक्षण घेतलेले होते. शासन या बाबतीत गंभीर आहे आणि प्रयत्नशील सुध्दा आहे. वेगवेगळ्या विभागाच्या माध्यमातून सुध्दा प्रशासकीय सेवांसाठी आपल्याला कसा चांगला रिझल्ट मिळेल त्या दृष्टीने प्रयत्न होतो. त्यासाठी सुध्दा योजना आहे. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती तसेच मायनॉरिटीच्या विद्यार्थ्यांसाठी योजना आहे. सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी असा मुद्दा उपस्थित केला की, स्वयंसेवी संस्थांच्या मदतीने सुध्दा काही उपक्रम घेण्यात यावेत. मायनॉरिटी कमिशनची सुध्दा स्वयंसेवी संस्थाच्या माध्यमातून अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी योजना आहे. आपण यशदामध्ये प्रशिक्षण घेतो. त्याशिवाय मला या ठिकाणी असा उल्लेख करावयाचा आहे की, सैनिकी शाळेतील विद्यार्थ्यांना जर एनडीएमध्ये प्रवेश मिळाला तर त्यांना 5 लाख रुपयांचे बक्षीस त्या वेळी माननीय मंत्री महोदयांनी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान ....

जाहीर केले होते. त्याचा फायदा असा झाला की, यावेळी एनडीएमध्ये 20 पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेला आहे. त्याचा फायदा जरुर होतो आणि शासन त्यासाठी प्रयत्नशील आहे. सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी वेगवेगळ्या सूचना केलेल्या आहेत.

खासकरुन सन्माननीय सदस्य प्रा. सुरेश नवले आणि इतर सर्व सन्माननीय सदस्यांनी जिल्हा स्तरावर केंद्र असावे, असा मुद्दा या ठिकाणी उपस्थित केला.

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान.....

उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या माध्यमातून ही संस्था उभी करण्यासाठी समिती स्थापन केली होती. त्यावेळी या विषयाची बरीच चर्चा झाली होती. त्या समितीच्या बैठकीत सुध्दा या विषयाला असलेल्या मर्यादांसंबंधी चर्चा झाली होती. कारण यासाठी तज्ज्ञ व्यक्ती उपलब्ध होणे, ग्रंथालयाची सुविधा होणे किंवा चांगले वातावरण निर्माण होण्यासाठी प्रत्येक जिल्हयाच्या स्तरावर मर्यादा आहेत. चांगली जीवनशैली जगण्यासाठी अशा संस्था उभ्या करण्याचे ठरले होते. मुंबई, पुणे, औरंगाबाद, कोल्हापूर, नागपूर येथे ह्या संस्था उभ्या कराव्या. या संस्थांचा विद्यार्थ्यांना फायदा सुध्दा होत आहे. पण या संस्थांची क्षमता वाढविण्यासाठी उच्च शिक्षण विभागाला निश्चितच सूचना देता येतील. या क्षेत्रात तज्ज्ञ व्यक्तींचा अभाव आहे हे खरे आहे. जिल्हा स्तरावर एनजीओच्या माध्यमातून संस्था चालतात त्या संस्थांमध्ये तज्ज्ञ व्यक्तींचा अभाव असल्याचे स्पष्टपणे जाणवते. त्या ठिकाणी शिक्षक किंवा तज्ज्ञ व्यक्ती नसते. त्यामुळे व्हिडिओ कॉन्फरन्सिगद्वारे किंवा ज्ञान वाहिनीच्या माध्यमातून प्रचार करण्याची आवश्यकता आहे असे मला सांगावयाचे आहे. मुंबईचा अपवाद वगळता इतर जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना या परीक्षांमध्ये यश मिळाल्याचे दिसत नाही. कारण त्या ठिकाणी शिक्षण देण्यासाठी तज्ज्ञ व्यक्ती नाहीत. तसेच ग्रंथालयाची व पुस्तकांची सुविधाही नाही. परंतु या प्रश्नाविषयी टप्प्याटप्प्याने विचार सुरु असल्यामुळे आपल्याला यश मिळत असल्याचे दिसून येते. आपल्या प्रशिक्षण केंद्रामध्ये व्हिडिओ रेकॉर्डिंग करुन किंवा मॉक इंटरव्हयूचाही त्यात समावेश केलेला आहे. त्यामुळे त्याचे रिझल्टस् सुध्दा दिसून येत आहेत.

सन्माननीय सदस्यांनी लोकसेवा आयोगामार्फत घेतल्या जाणाऱ्या परीक्षा, आयएएस व आयपीएस या पदांच्या व्यतिरिक्त युपीएससीमार्फत घेतल्या जाणाऱ्या परीक्षांची यादी वाचून दाखविली आहे. या परीक्षांची माहिती राज्यातील सर्व विद्यार्थ्यांना होणे आवश्यक आहे. या विषयाचा प्रसार होण्याची आवश्यकता आहे असे सर्वच सन्माननीय सदस्यांनी मत मांडलेले आहे, त्यांच्या मताशी मी सुध्दा सहमत आहे. यासाठी प्रसार माध्यमांचा वापर करुन किंवा वेब साईटचा वापर करुन घ्यावा किंवा अभ्यासक्रमामध्ये याचा अंतर्भाव करता येईल का याचा विचार होणे गरजेचे आहे असे मला वाटते.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

प्रा.फौजिया खान.....

शालेय शिक्षणाच्या माध्यमातून 'शिक्षण संक्रमण' व 'किशोर' ही मासिके दिली जातात, त्यामध्ये या विषयाची माहिती देण्याच्या सूचना दिल्या जातील.

सभापती महोदय, एमपीएससीचा येथे उल्लेख करण्यात आला आहे. एमपीएससीला शासनाने सूचना कराव्या असे मत मांडले गेले. आजच्या चर्चेच्या निमित्ताने सर्व सन्माननीय सदस्यांच्या सूचना एमपीएससीच्या अध्यक्षांकडे पाठविण्यात येतील. सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी असे म्हटले की, त्यांच्यामार्फत ज्या परीक्षा आयोजित केल्या जातात त्यांचे टाईम टेबल असते. त्यामुळे त्या ठराविक दिवसात घ्याव्याच लागतात. परंतु एमपीएससीचे स्वत:चे काही प्रश्न आहेत. त्यांचे प्रश्न माननीय मुख्यमंत्र्यांनीही गंभीरपणे घेतले आहेत. मंत्रिमंडळाच्या बैठकीत यासंबंधी चर्चा झालेली आहे. एमपीएससीमध्ये असलेल्या रिक्त पदांबाबत माननीय मुख्यमंत्र्यांनी मंत्रिमंडळाच्या बैठकीत विशेष चर्चा करण्यासंबंधी मुख्य सचिवांना आदेश दिलेले आहेत. जेणे करुन त्या चर्चेतून त्यांच्या प्रश्नांचे निवारण करता येईल व रुपरेषा ठरविता येईल.

सन्माननीय सदस्य प्रा.नवले यांनी महाराष्ट्र केडरच्या प्रशासकीय सेवा अंतर्गत 50 टक्के बढतीची पदे ठेवावीत असा मुद्दा उपस्थित केला होता. हे कितपत शक्य होईल या बाबत अभ्यास केल्यानंतरच ठरविता येईल. पण ही बाब केंद्र सरकारच्या अखत्यारितीमध्ये येते. त्यामुळे त्यावर जास्त भाष्य करणे उचित होणार नाही.

यानंतर श्री.शिगम....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

या ठिकाणी रजेच्या संदर्भात मुद्दा मांडलेला आहे. सध्या स्पर्धा परीक्षेसाठी अर्जित व अनर्जित रजा देण्यात येते. त्या शिवाय विशेष शिक्षण घेण्यासाठी अध्ययन रजेची देखील तरतूद एमसीएसआर नियमामध्ये आहे. बँकेकडून शिक्षणासाठी कर्ज मिळावे असा उल्लेख या ठिकाणी करण्यात आला. शालेय शिक्षण, व्यावसायिक शिक्षण किंवा अन्य कोणत्याही प्रकारचे उचच शिक्षण घेण्यासाठी बँकेकडून कर्ज घेण्याची सोय आहे. परंतु अशा स्पर्धा परीक्षांसाठी तयारी करणा-या विद्यार्थ्यांसाठी बँकेकडून कर्ज मिळण्याची व्यवस्था आहे की नाही याची माहिती घेऊन तशी व्यवस्था नसेल तर रिझर्व्ह बँकेला त्याबाबतीत पत्र लिहून कळविता येईल.

सभापती महोदय, या स्पर्धा परीक्षांमध्ये अन्य राज्यातील विद्यार्थ्यांचे उत्तीर्ण होण्याचे प्रमाण जास्त आहे असे येथे सांगण्यात आले. विशेषत: बिहार आणि उत्तर प्रदेश या राज्यातील विद्यार्थी स्पर्धा परीक्षांमध्ये जास्त संख्येने उत्तीर्ण होतात असे सांगण्यात आले. याचे एक कारण असे आहे की, आपल्या राज्यामध्ये बँकिंग सेक्टर, को-ऑप. सेक्टर, प्रायव्हेट बिझिनेस सेक्टर यामध्ये जशा नोकरीच्या संधी आहेत तशा प्रकारच्या संधी त्या राज्यामध्ये नाहीत. त्यामुळे प्रशासकीय सेवेसाठी इच्छुक असणा-या उमेदवारांची संख्या त्या राज्यामध्ये जास्त आहे. सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी अशी सूचना केली की, या संदर्भातील जबाबदारी ही शासनाने, लोकल बॉडीने आणि एनजीओने घेतली पाहिजे. दुस-या राज्यामध्ये याबाबतीत कमर्शियलायझेशन झालेले आहे. मध्यप्रदेशमध्ये या स्पर्धापरीक्षांचे कोचिंग क्लासेस आहेत. त्या कोचिंग क्लासेसचे किमान 25 टक्के उमेदवार उत्तीर्ण होताना दिसतात. तेव्हा या क्षेत्रामध्ये झालेले कमर्शियलायझेशन हा देखील एक महत्वाचा मुद्दा आहे. उप जिल्हाधिकारी व अन्य संवर्गातील अधिकारी तसेच राज्यसेवेमध्ये समावेश होतो अशा अन्य संवर्गाना राज्य नागरी सेवा म्हणून संबोधन्याचा विचार केला जाईल. अलीकडेच युपीएससीच्या धर्तीवर एमपीएससीने देखील सिलॅबस आणि परीक्षा पध्दतीचा अवलंब केलेला आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी स्टायपेंडचा मुद्दा उपस्थित करण्यात आला. हा मुद्दा उच्च शिक्षण विभागाशी संबंधित असल्यामुळे तो त्या विभागाला कळविता येईल. माध्यमिक शाळेच्या बाबतीत येथे उपस्थित करण्यात आलेला मुद्दा खूप महत्वाचा आहे. कारण हायर एज्युकेशन स्तरावर आपण तयारी केली तर ती किती परिणामकारक होऊ शकेल ही बाब देखील विचार

....2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान....

करण्यासारखी आहे. शालेय स्तरावर आपण ॲनालिटिकल तयारी करुन घेतली तरच या पध्दतीच्या स्पर्धा परीक्षामध्ये यशस्वी होण्याची क्षमता विद्यार्थ्यांमध्ये निर्माण हाऊ शकेल. केवळ अध्ययन पध्दतीमध्ये नाही तर परीक्षा पध्दतीमध्ये देखील अशा प्रकारची ॲनॉलिटिकल पध्दत असावयास पाहिजे. आपल्या परीक्षा पेपरमध्ये वेगळा प्रश्न विचारला गेला की त्याबाबतीत सभागृहामध्ये देखील चर्चा होते आणि सांगितले जाते की, सिलॅबसच्या बाहेरचा प्रश्न विचारण्यात आलेला आहे.सिलॅबसच्या बाहेरचा रिझनिंग प्रश्न सोडविण्याची ताकद विद्यार्थ्यामध्ये नसल्यामुळे तो अशा प्रकारचे प्रश्न सोडवू शकत नाही. यासाठी आपण राष्ट्रीय अभ्यासक्रमाच्या धर्तीवर एमसीएफच्या धर्तीवर 9वी आणि 11वी च्या गणित आणि विज्ञान विषयाच्या अभ्यासक्रमात बदल केलेला आहे. एमसीएफ 2010चा देखील आपण खूप अभ्यास केलेला आहे. खरे तर या विषयावर उपस्थित झालेल्या चर्चेला मला उत्तर द्यायचे आहे. त्या उत्तराच्या वेळी मी सविस्तर उत्तर देईन. पण एमसीएफ 2010चा अभ्यासक्रम आराखडा तयार करण्यात येत असून असा विचार केलेला आहे की, विद्यार्थ्यांमध्ये ॲनालिटिकल कपॅसिटी, लॉजिकल थिंकिंग, रिझनिंग या गोष्टी असणे गरजेचे आहे. परीक्षा पध्दतीमध्ये साध्या आणि सरळ प्रश्नाबरोबरच सर्व थिंकिगच्या अनुषंगाने प्रश्न सोडविण्याची क्षमता विद्यार्थ्यांमध्ये निर्माण व्हावी या दृष्टीने आपण विचार करीत आहोत.

...नंतर श्री. गिते...

अशुधारित प्रत / अशुद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान...

आपण या ठिकाणी जरी उल्लेख केला नाही तरी माध्यमिक शाळांना अनुदान देण्याबाबतचा उल्लेख ठरावामध्ये केलेला आहे. मला असे वाटते् की, या राज्यात 18 हजार माध्यमिक शाळा आहेत. त्यातील बहुतांशी शाळांना राज्य शासनाकडून अनुदान दिले जात आहे. राज्यातील सर्व शाळांना अनुदान असावे तसेच या राज्यात कायम विना अनुदानीत शाळा राहू नये या बाबतचा शासनाने निर्णय घेतलेला आहे. राज्यात फक्त 50 शाळा अशा आहेत की, त्या मूल्यांकनामध्ये पात्र ठरलेल्या नाहीत. त्या शाळांनी मूल्यांकनाचे निकष पूर्ण केल्या बरोबर नंतर त्यांना अनुदानावर आणणार आहोत. शालेय स्तरावर दर्जेदार शिक्षण मिळावे, वेगवेगळ्या क्षेत्रातील तज्ज्ञांचे ग्रुप करुन आपण कंटीन्यूअस आणि कॉम्प्रीहेन्सीव्ह रिव्हल्यूशन संदर्भात प्रशिक्षण घेत आहोत. हे काम मोठया प्रमाणात चालू आहे. शिक्षण क्षेत्रात जे तज्ज्ञ आहेत त्यांची देखील मदत शासनाला मिळत आहे. हा खूप मोठा विषय आहे. या विषयाला फार मोठा विस्तार आहे. शालेय शिक्षणापासून ते उच्च शिक्षण घेण्याची कॅपेसिटी विद्यार्थ्यांमध्ये असणे गरजेचे आहे. यासाठी राज्य शासनाच्या माध्यमातून सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येत आहे. सन्माननीय सदस्यांनी या ठरावाच्या अनुषंगाने ज्या काही सूचना केल्या आहेत. त्या सर्व सूचनांचा निश्चितपणे विचार करण्यात येईल असे मी आश्वासन देते आणि माझे मनोगत पूर्ण करते.

प्रा. सुरेश नवले : सभापती महोदय, माननीय शालेय शिक्षण राज्यमंत्र्यांनी अतिशय सविस्तर असे विवेचन या ठिकाणी केले आहे. त्यांनी अनेक मुद्यांचा परामर्श घेऊन उत्तर देण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यांच्याकडून दोन मुद्यासंदर्भात उत्तर देण्याचे राहून गेले आहेत असे मला वाटते. औरंगाबाद,मुंबई, कोल्हापूर आणि नागपूर या ठिकाणी पूर्व परीक्षा केंद्रे सुरु आहेत. त्या प्रत्येक केंद्रामध्ये फक्त 60 विद्यार्थी भाग घेऊ शकतात. त्या केंद्राची क्षमता वाढविण्याचा प्रयत्न केला जाईल काय ? राज्य शासनातर्फे आयएएस् आणि आयपीएस् यांना प्रमोशन दिले जाते. त्यांच्या प्रमोशनची टक्केवारी किती आहे? ही टक्केवारी 25 च्या आत असेल तर आम्ही अशी

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले...

मागणी करतो की, किमान 50 टक्के प्रमोशन या अधिका-यांना दिले तर त्याचा फायदा निश्चितपणे महाराष्ट्रातील गुणवान विद्यार्थ्याला होवू शकतो. या बाबतचे स्पष्टीकरण माननीय राज्यमंत्र्यांनी करावे अशी माझी विनंती आहे.

श्रीमती फौजिया खान : सभापती महोदय, या दोन्ही प्रश्नांची उत्तरे मी पूर्वीच दिलेली आहेत. पूर्व परीक्षा केंद्रातील विद्यार्थ्यांची क्षमता वाढविण्यासंबंधीचा प्रश्न विचारला आहे. त्या बाबत मी सांगू इच्छिते की, या केंद्राची क्षमता वाढविण्यासाठी उच्च व तंत्रशिक्षण विभागास कळविण्यात येईल. सन्माननीय सदस्याच्या दुसऱ्या प्रश्नाच्या बाबतीत सांगू इच्छिते की, केंद्र शासनाच्या रिक्रुटमेंट रुलप्रमाणे आयएएस् आणि आयपीएस् यांना पदोन्नतीचे प्रमाण ठरवून दिलेले आहे. त्यांचे प्रमोशनची बाब राज्य शासनाच्या अखत्यारितील नाही.

प्रा. सुरेश नवले : पदोन्नतीचे प्रमाण काय आहे ?

श्रीमती फौजिया खान : या बाबतची माहिती आता माझ्याकडे उपलब्ध नाही. ती माहिती प्राप्त करुन घेऊन सभागृहासमोर ठेवण्यात येईल. सन्माननीय सदस्यांनी जो अशासकीय ठराव मांडला आहे तो मागे घ्यावा अशी माझी विनंती आहे.

प्रा.सुरेश नवले : माझ्या या ठरावाच्या अनुषंगाने सन्माननीय सदस्य श्री राजन तेली, डॉ.दीपक सावंत, श्री.कपिल पाटील, श्री.भाई जगताप, श्री.भगवानराव साळुंखे, श्री. रामनाथ मोते यांनी अतिशय मौल्यवान सूचना केल्या आहेत. माझ्या या ठरावावर या सर्व मान्यवरांनी मत व्यक्त केले, त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. मला ठराव मागे घेण्याची सभागृहाने परवानगी द्यावी अशी विनंती करतो.

सभागृहाच्या अनुमतीने ठराव मागे घेण्यात आला.

यानंतर श्री. भोगले...

अशुद्धारित प्रत / शुद्धीसाठी नाही

<u>औचित्याचा मुद्दा</u>

तालिका सभापती (श्री.मोहन जोशी) : औचित्याचे मुद्दे मांडण्यासाठी ज्यांना अनुमती देण्यात येणार होती त्यांची यादी माझ्याकडे उपलब्ध आहे. ज्यांची नावे यादीमध्ये आहेत आणि ज्यांना सभागृहात उपस्थित नसल्यामुळे मुद्दा मांडता आला नाही त्यांनाच मी परवानगी देणार आहे.

माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितली आहे. माननीय सदस्यांनी आपला मुद्दा मांडावा.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील औचित्याचा मुद्दा मांडू इच्छितो.

मागील अधिवेशनात मंत्री महोदयांनी स्पष्ट आश्वासन दिले होते की, अनुसूचित जाती, जमातीच्या कर्मचाऱ्यांच्या जात पडताळणी प्रमाणपत्रांविषयी अंतिम निर्णय झालेला नाही. परंतु अनेक कर्मचाऱ्यांना व्हॅलिडीटी सादर न केल्यामुळे सेवेतून कमी करण्यात आले आहे. महादेव कोळी, हलबा, माना इ.जातीच्या कर्मचाऱ्यांचा हा प्रश्न आहे. मागील अधिवेशनात आदिवासी विकास मंत्री यांनी स्पष्टपणे सांगितले होते की, 1995 मध्ये अशा प्रकारचे संरक्षण दिले आहे. 1995 ते 2001 दरम्यान 7 ते 7.5 लाख लोक प्रमाणपत्र घेऊन नोकरीला लागले त्यांच्यावर कार्यवाही सुरु होती. हा विषय मंत्रिमंडळासमोर आला होता. यासाठी स्वतंत्र समिती नेमली असून समितीचा अहवाल आल्यानंतर योग्य तो निर्णय घेतला जाईल. परंतु तोपर्यंत कोणालाही सेवेतून कमी केले जाणार नाही, असे आश्वासन आदिवासी विकास मंत्री श्री.बबनराव पाचपुते यांनी सभागृहात दिले होते. असे असताना मोठया प्रमाणात कर्मचाऱ्यांना सेवेतून कमी करणे सुरु आहे. सभागृहात दिलेल्या आश्वासनाप्रमाणे सरकारने कार्यवाही करावी या दृष्टीने सभापती महोदय, आपण निर्देश द्यावेत. अनेक कर्मचारी आज उपोषणाला बसले आहेत. आपण शब्द दिला तर उपोषण संपेल. सभागृहात दिलेला शब्द पाळला जातो असा संदेश बाहेर जावा एवढी विनंती मी या औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाला करीत आहे.

श्री.आर.आर.पाटील : होय.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>अशासकीय कामकाज</u>

(पुढे सुरु.....

पृ.शी.: राज्यात नक्षलवादी कारवायांमध्ये झालेली वाढ

मु.शी.: राज्यात नक्षलवादी कारवायांमध्ये झालेली वाढ

या विषयावरील श्रीमती शोभाताई फडणवीस यांचा ठराव

श्रीमती शोभाताई फडणवीस (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने खालील ठराव मांडते :-

"राज्यात वाढत चाललेल्या नक्षलवाद्यांच्या कारवाया, यामध्ये अनेक पोलीस कर्मचारी व लोकांचे गेलेले नाहक बळी, नक्षलवादी व पोलीस यांचेकडून आदिवासींची होणारी पिळवणूक विचारात घेऊन नक्षलवाद्यांच्या अत्याचारांना प्रतिबंध घालून आदिवासी जनतेला दिलासा मिळावा म्हणून शासनाने ठोस उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनाला करीत आहे."

नंतर 3ई.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस..

सभापती महोदय, आज खऱ्या अर्थाने नक्षलवाद का वाढत आहे ? आदिवासीं विभागाचा विकास न होणे हेच नक्षलवाद सुरु होण्याचे त्यावेळचे कारण होते आणि आज सुध्दा तेच कारण कायम आहे. महाराष्ट्राच्या सर्व क्षेत्रात हळूहळू नक्षलवाद मोठया प्रमाणावर पाय पसरत आहे असे मी म्हटले तर ते वावगे होणार नाही. आदिवासी मुले कोणते नशीब घेऊन जन्माला आली आहेत ? श्रीमंत व्यक्तीच्या कुत्र्यांना गरम कपडे मिळतात, झोपायला गादी मिळते, खायला बिस्कीटे मिळतात,प्यायला दूध मिळते, सांभाळायला नोकर मिळतात आणि फिरावयाला गाडी मिळते परंतु दुर्गम भागात राहणा-या आदिवासी मुलांना मात्र फाटक्या कपडयावर झोपावे लागते. उन्हाळयामध्ये अंगात कपडे राहतील किंवा नाही अशी स्थिती असते. हिवाळयामध्ये पुरेसे कपडे मिळत नाहीत.अशा अवस्थेत नाल्याच्या जवळ ही आदिवासी मुले खेळत असतात. त्याच स्थितीत वाटीमध्ये भात घेऊन ते दिवसभर खात असतात. अशा वेळी त्यांना आरोग्याचे शिक्षण कोण देणार ? अशा प्रकारे अत्यंत वाईट स्थितीत ते जीवन जगत असतात. या आदिवासी व्यक्तींना न्याय द्यावा अशी मी या अशासकीय ठरावाच्या निमित्ताने मागणी करीत आहे.

सभापती महोदय, आरोग्याचा बळीसुध्दा हेच लोक ठरतात. महात्मा गांधी यांनी जेव्हा या देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले होते त्यावेळी त्यांनी असे सांगितले की, "जो दुर्बल मनुष्य असेल त्याला स्वत:च्या पायावर उभे करुन, त्याच्या पायाला बळ देऊन, समाजाच्या बरोबर आणण्याचे काम शासनाने करावे". अशा प्रकारचे स्वातंत्र्याचे स्वप्न त्यावेळेला महात्मा गांधी यांनी आमच्यापुढे उभे केले होते. त्याचप्रमाणे परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनीसुध्दा हेच स्वप्न उभे केले होते.घटनेने अधिकार दिल्यानंतर आज सुध्दा आदिवासीमध्ये आर्थिक दुर्बलता तशीच असून त्यांच्या पायात बळ आणण्याचे काम कोणी केलेले नाही. उलट गरीब व्यक्ती अधिक गरीब झालेली आहे एवढेच नव्हे तर तो अन्यायाचा बळी सुध्दा ठरत आहे.

सभापती महोदय, राज्यामध्ये 75 लाख 77 हजार एवढी आदिवासीची लोकसंख्या आहे गडचिरोलीतील दरडोई उत्पन्न 24 हजार 115 रुपये आहे. ज्या क्षेत्रामध्ये नक्षलवाद प्रचंड प्रमाणात वाढत आहे त्याच क्षेत्रातील दरडोई उत्पन्न अतिशय कमी आहे. त्यामुळे आदिवासी भागातील गरिबी आम्ही पूर्वी पाहिलेली आहे, आजही पहात आहोत आणि तीच गरिबी भविष्यात त्यांच्या नशिबी येईल काय अशा प्रकारची भीती वाटावयास लागली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस..

गडचिरोली, चंद्रपूर, गोदिया, भंडारा इत्यादी ठिकाणी नक्षलवाद मोठया प्रमाणावर वाढत असून त्या भागात पोलीस आणि आदिवासी मोठया संख्येने मृत्युमुखी पडत आहेत. या गोष्टीचा विचार करण्याची गरज आहे. नक्षलवाद्यांचा बिमोड करण्याचा शासन विचार करते. पोलीस सक्षम असले पाहिजेत, त्याचबरोबर ते सशस्त्र असले पाहिजेत , त्यांचे मनोबल वाढविण्यात आले पाहिजे अशी आमची नेहमीचीच मागणी आहे. या पोलिसांचे मनोबल वाढले तरच ते कोणत्याही प्रसंगाला तोंड देण्यास तयार होतील. त्यांच्याकडून एखादी किरकोळ स्वरुपाची चूक झाली तर त्याला पाठीशी घालण्याचे काम गृह विभागाने केले पाहिजे जेणे करुन त्यांच्यामध्ये लढाई लढण्या इतके सामर्थ्य येईल.

सभापती महोदय, आदिवासी व्यक्तीच्या विकासासाठी नेमके काय केले पाहिजे, आदिवासी व्यक्तीला नेमके काय हवे आहे याचा शासनाने विचार करणे आवश्यक आहे असे मला सांगावयाचे आहे. ज्या क्षेत्रात मोठया प्रमाणावर नक्षलवाद वाढलेला आहे त्या क्षेत्रात आदिवासीना काय मिळालेले आहे ? त्यांच्या विकासासाठी मोठ मोठया योजना तयार केल्या जातात, मोठ मोठया योजना तयार करुन आदिवासी व्यक्तीला मदत करण्याचा प्रयत्न केला जातो परंतु या योजना ठरवत असतांना पोलीस वा महसूल अधिकारी सांगतील त्याच योजना राबविण्यात येतात मात्र आदिवासींना काय हवे आहे याचा कोणीही विचार करीत नाही त्यामुळे ते अत्यंत वाईट अवस्थेत जीवन जगत आहेत.

नंतर श्री.सरफरे

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस...

मला या ठिकाणी मंत्री महोदयांचे कौतुक केले पाहिजे की, आपण गडचिरोली जिल्ह्याचे पालक मंत्री झाल्यानंतर भामरागड, एटापल्ली, सिरोंचाला गेलात. परंतु त्या तालुक्यामधील 50-50 गावे अजूनही 40-40 किलोमीटर लांब असलेल्या मुख्य रस्त्याला जोडण्यात आलेली नाहीत. ज्या तालुक्यामध्ये आज प्रचंड नक्षलवाद वाढला आहे, त्या भामरागड तालुक्याचा आपण विचार करतो. त्या तालुक्यात आपले शासकीय अधिकारी जायला घाबरतात, ते त्या तालुक्यामध्ये जात नाहीत. या तालुक्यामधील 22 गावांमध्ये रस्ता नाही, पाणी नाही, अंगणवाडी नाही, शाळा नाही किंवा अन्य कोणत्याही सोयी दिलेल्या नाहीत. एका बाजूला आपण 100 टक्के विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याचा कायदा करतो तर मग दुसऱ्या बाजूला या 22 गावातील विद्यार्थ्यांचे आपण काय करणार आहात? याचाही विचार करण्याची गरज आहे.

सभापती महोदय, केवळ गडचिरोली आणि गोंदिया नव्हे तर दिनांक 25.1.2011 रोजी मुंबई, पुणे आणि नाशिक या ठिकाणी नक्षलवाद्यांचे जाळे पसरले आहे असे वृत्त वर्तमानपत्रामध्ये छापून आले आहे. त्याचप्रमाणे दिनांक 29.3.2011 रोजी नंदूरबार येथे नक्षलवाद्यांजवळ शस्त्रसाठा सापडला त्याचा विदर्भामध्ये सिपलसेल म्हणून वापर केला जातो. याचा अर्थ असा की, नक्षलवाद्यांनी हळू हळू गडचिरोली जिल्ह्याच्या बाहेर हात पाय पसरायला सुरुवात केली असून महाराष्ट्र हे आपले कायमचे क्षेत्र करण्यासारखी स्थिती निर्माण झाली आहे. एवढया मोठया प्रमाणावर हात पाय पसरण्याकरिता त्यांना मिळणारा शस्त्रसाठा, दारुगोळा आणि मदत ही कुणाकडून मिळते, आदिवासी लोक इतके गरीब आहेत की,त्यांच्या घरामध्ये खायला अन्न नाही तर ते त्यांना पैसे कोठून देणार? त्यामुळे त्यांना व्यापारी, उद्योजक आणि ठेकेदार पैसे पुरवित आहेत. शस्त्रसाठा खरेदी करण्यासाठी त्यांना मदत करीत आहेत. आतापर्यन्त यापैकी आपण किती लोकांवर कारवाई केली आहे, किती लोकांना पकडून त्यांच्याकडून जाणारा पैशाचा स्त्रोत बंद केला आहे? याचाही हिशेब या ठिकाणी करण्याची गरज आहे. म्हणून मला या ठिकाणी विशेष करुन सांगावयाचे आहे की, आज सुध्दा नक्षलवादी आदिवासी गावातील लोकांना घाबरतात हे मंत्री महोदय आपणास सुध्दा माहीत आहे. आदिवासी लोक संघटीत असतील त्या गावावर नक्षलवादी एकदम वार करीत नाहीत. कारण त्या गावकऱ्यांना नक्षलवादी दुखवू इच्छित नाहीत. अशावेळी या आदिवासींना आपण प्रेमाने आणि सहानुभूतीने जवळ करण्याचा प्रयत्न केला तर आज आपल्याला त्याचा फायदा होऊ शकेल. आज नक्षलवाद्यांमध्ये आणि माओवाद्यांमध्ये 3 हजार लोक काम करीत आहेत. पूर्वी आम्ही त्या क्षेत्रामध्ये जात होतो त्यावेळी 12 त 15 लोकांची टोळी होती. आज त्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सरफरे)

श्रीमती शोभा फडणवीस...

ठिकाणी 70-70 लोकांची टोळी झाली आहे. माओवाद्यांचा सहभाग झाल्यामुळे त्यांच्यामध्ये प्रचंड क्रूरता आली आहे. हे माओवादी कुणाचाही विचार करीत नाहीत समोर दिसेल त्याला गोळी घालून ठार मारतात. त्यांची क्रूरता दिवसें दिवस वाढत असल्यामुळे त्या विभागामध्ये एक प्रकारची भीती निर्माण झाली आहे. धानोरा तालुक्यातील गुन्हेकपाळ या गावामध्ये चार दिवसापूर्वी बंदुकीच्या धाकावर नक्षलवाद्यांनी 33 आदिवासींना रस्ता बांधण्यासाठी नेले. नक्षलवाद्यांनी एक रसायनांनी भरलेला टँकर पळविला होता, तो त्यांना अभ्यासासाठी पाठवावयाचा होता त्या करिता त्यांना रस्त्याची गरज होती म्हणून त्यांनी रातो रात त्या आदिवासी गावकऱ्यांकडून रस्ता बांधून घेतला.

सभापती महोदय, या आदिवासी क्षेत्रामध्ये आज एक पैशाचे देखील काम मिळत नाही. गेल्या दोन वर्षापासून वन विभागाने बांबू तोडीचे काम बंद केल्यामुळे त्या कामावर त्यांना रोजगार मिळत होता तो देखील बंद झाला. अशा परिस्थितीत 50 ते 60 नक्षलवाद्यांनी येऊन बंदुकीच्या जोरावर या 33 तरुण आदिवासींना रस्ता बांधण्यासाठी नेले व त्यांच्याकडून रस्ता तयार करुन घेतला. परंतु त्या आदिवासी तरुणांचे दुर्दैव म्हणा, एकीकडे नक्षलवादी बंदुकीने मारतात तर दुसऱ्या बाजूला पोलीस त्यांच्या दंडुक्याने मारतात अशी स्थिती आहे. या 33 आदिवासी तरुणांना तेथील पोलीस अधिकाऱ्याने नक्षलवाद्यांना मदत करुन पोलिसांविरुध्द कट केला म्हणून मारझोड करुन त्या सर्वांना तुरुंगात पाठविले. यामध्ये त्यांचा काय दोष होता हे मी आपणास विचारते? उद्या आमदार म्हणून माझ्या घरी 50 नक्षलवादी आले आणि त्यांनी आपल्याकडे जेवण मागितले तर कोण असा माईचा लाल आहे जो मृत्यूला सामोरा जाईल परंतु त्यांना जेवण घालणार नाही?

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस . . . .

आज त्यांना जीवाची भीती आहे कारण ते नि:शस्त्र आहेत. ते गरीब असून त्यांना मदत करण्यासाठी कोणी नाही. अशा वेळी त्यांना बंदुका दाखवून रस्ता बांधावयास नेले आणि शासनाने मात्र त्यांनी नक्षलवाद्यांना मदत केली म्हणून त्यांना प्रचंड मारझोड केली आणि गेल्या चार महिन्यापासून त्यांना नागपूरच्या जेलमध्ये ठेवलेले आहे. मग या युवकांमध्ये तुमच्याविषयी सहानुभूती कुठून येणार आहे? गावकऱ्यांच्या मनामध्ये पोलिसांच्या बद्दल नम्रता कुठून येणार ? हा प्रश्न आहे. या गावकऱ्यांच्या मनामध्ये नक्षलवाद्यांपेक्षाही तुमच्याबद्दलचा व्देष हळूहळू वाढत असेल तर या महाराष्ट्रासाठी प्रचंड धोक्याचे आहे हे विसरु नका. ही 33 मुलेही धानोऱ्यापासून कोणत्या तरी आदिवासी इंटर्नल एरियामध्ये रहातात. आज ज्या माणसाच्या अंगावर फाटके कपडे आहेत, ज्यांना रोजी मिळत नाही, खाण्याची वानवा आहे अशा मुलांचे आई-आप त्यांना खरेच नागपूरला भेटण्यासाठी जाऊ शकतात काय ? जेव्हा पासून या मुलांना नागपूरच्या जेलमध्ये ठेवण्यात आले आहे,तेव्हापासून त्यांचे आई-वडील त्यांना भेटावयास जाऊ शकत नाहीत.एवढी दिनवाणी परिस्थिती आहे. मग आम्ही कोणत्या तोंडाने म्हणणार आहोत की, आपल्याला आदिवासींनी मदत केली पाहिजे आणि त्यांनी या देशाचा, महाराष्ट्राचा विचार केला पाहिजे.

सभापती महोदय, याठिकाणी विशेषत्वाने आणखी एक गोष्ट सांगू इच्छिते की, लाहेरी भागामध्ये ता.भामरागड येथे 18 पोलीस मारले गेले.सकाळी 11.00 ते 11.30 वाजताच्या दरम्यान नक्षलवाद्यांनी पोलिसांवर हमला केला.मी सदनामध्ये हा विषय अतिशय गंभीरतेने मांडत आहे. पोलीस कमांडोंनी फोन करुन सर्व अधिकाऱ्यांना कळविले की, आम्ही येथे अडचणीमध्ये आहोत, त्यामुळे ताबडतोब कुमक पाठवावी. त्या ठिकाणी पोलिसांचा कॅम्प केवळ दीड कि.मी.अंतरावर होता.11.30 वाजल्यापासून 3.30 वाजेपर्यंत 18 पोलीस लढत होते आणि काही नक्षलवाद्यांना मारण्यामध्येही ते यशस्वी झाले.परंतु पोलिसांची कुमक मात्र 3.00 वाजेपर्यंत आली नाही आणि त्या 18 पोलिसांचा मृत्यू झालेला आहे.शेवटच्या माणसाने जेव्हा फोन केला तेव्हा त्याने अक्षरश: अर्वाच्य शिव्या पोलीस ठाण्यातील अधिकाऱ्यांना दिल्या. आपण असे सांगत असतो की,त्याठिकाणी पोलिसांचा कॅम्प जवळ आहे, त्यामुळे पोलीस ताबडतोब तेथे येऊन एकमेकांना मदत करु शकतील. मग दुपारी 3.00 वाजेपर्यंत या पोलिसांच्या मदतीसाठी आपला फोर्स का पोहोचला नाही हा प्रश्न आहे. जर तेवढ्या वेळामध्ये जर या पोलिसांना मदत मिळाली असती तर खऱ्या अर्थाने आपण 18 पोलिसांना वाचवू शकलो असतो आणि नक्षलवाद्यांना प्रत्युत्तर देऊन त्यांचा बिमोड करु शकलो ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस . . . .

असतो. येथील पोलीस आमच्यापेक्षा श्रेष्ठ आहेत, दमदार आहेत आणि जर आम्ही पोलिसांच्या तावडीमध्ये सापडलो तर पोलीस आम्हाला सोडणार नाहीत अशी जेव्हा नक्षलवाद्यांची मानसिकता होईल तेव्हाच येथील नक्षलवाद कमी होऊ शकतो. जे पोलीस शेवटपर्यंत लढले, त्यांना मी शतश: धन्यवाद देते. कारण ज्या दुर्गम भागामध्ये ते लढत होते, त्याठिकाणी मी पहाणी केलेली आहे, तेव्हा असे दिसले की तेथे हजारो हॅण्ड बॉम्ब सड्यासारखे पडलेले होते. ते उचलण्यासाठी देखील कोणी नव्हते. आम्ही पहाणी करण्यासाठी गेलो, तेव्हाही ते तेथेच होते. मग हे हॅण्ड बॉम्ब कोणी बनविले, ते कुठून आले याची चौकशी करण्यासाठी सॅम्पल नेले आहे काय? जर उद्या कोणी त्या हॅण्ड बॉम्बचा गैरवापर केला तर त्याला कोण जबाबदार आहे? पण आपल्या लोकांनी तेवढे सुध्दा शौर्य दाखविले नाही याचे मला वाईट वाटले. याठिकाणी जे 18 पोलीस मरण पावले आहेत, त्यांच्या आत्म्याला शांती लाभो अशी मी ईश्वर चरणी प्रार्थना करते.परंतु ज्यांनी या पोलिसांच्या मदतीसाठी कुमक पाठविली नाही त्यांनी हे पाप झाकण्यासाठी काय केले हे या ठिकाणी सांगणे माझे कर्तव्य आहे. त्यांनी काय करावे,तर लाहेरी जवळ असलेल्या मल्लनकोड गाव आहे आणि पोलिसांवर ज्याठिकाणी हमला झाला होता, तेथून एक कि.मी.अंतरावर गाव आहे.

यानंतर कु.थोरात . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस...

पोलिसांकडून दुसऱ्या दिवशी मल्लमकोड या गावी 22 आदिवासी तरुणांना पकडण्यात आले. दिनांक 8 ऑक्टोबर आणि त्यानंतर दिनांक 10 ऑक्टोबरला पोलीस त्या गावात गेले आणि त्यांनी 18 ते 25 वर्षे वयोगटातील तरुणांना बांधून पोलीस स्टेशनमध्ये नेले. सभापती महोदय, मला चुकीचे बोलण्याची सवय नाही. पण प्रत्यक्षात या मुलांची स्थिती पाहिल्या नंतर मला असे वाटले की, आपण कुठे आहोत? इंग्रजही आम्हाला असेच झोडपत होते. आज आम्ही स्वातत्र्यांतही असेच झोडपले जात आहोत. आम्हाला या ठिकाणी जगण्याचाही अधिकार नाही, असे म्हटले तर ते वावगे होणार नाही. त्या 22 युवकांना जेव्हा मी भेटायला गेले तेव्हा मी असे पाहिले की, त्यांच्या तळपायावर एवढा प्रचंड मार दिला होता की, त्यांच्या पायाची साले निघाली होती त्यामुळे ती मुले उभी राहू शकत नव्हती. पायाची बोटे फुटली होती. त्यांच्या पाठीवर वळ होते. मी स्वत: एकटी त्या ठिकाणी गेले नव्हते, तर चार पत्रकारांना घेऊन त्या ठिकाणी गेले होते. अशा प्रकारे अमानुषपणे त्यांना मारझोड करण्यात आलेली होती. त्यांना दिनांक 10 ऑक्टोबर, 2010 रोजी पकडण्यात आले होते त्यानंतर आम्ही त्या ठिकाणी दिनांक 1 नोव्हेंबर, 2010 रोजी गेलो होतो पण तो पर्यंत त्यांच्या शरीरावरील जखमा सुकलेल्या नव्हत्या.

सभापती महोदय, या ठिकाणी मला एक गोष्ट विशेषत्वाने सांगावयाची आहे. त्या ठिकाणी नक्षलवादी म्हणून ज्या मुलाला पकडण्यात आले होते त्या मुलाचे नाव श्री. रमेश गुरा वड्डे असे आहे. तो 18 वर्षाचा आहे. त्या दिवशी तो मुलगा गावापासून सात-आठ कि.मी. अंतरावर असलेल्या एका विधवेच्या शेतावर काम करत होता. पण सांगूनही कोणी ऐकण्यास तयार नव्हते. कारण अधिकाऱ्यांना असे वाटते की, एवढा मोठा हमला झाला, इतके पोलीस मेले तर आम्हालाही काही तरी उत्तर दिले पाहिजे म्हणून शेवटी "यज्ञास बळी बोकडाचा" असे म्हणतो तसा आमच्या आदिवासींचा बळी गेला. 1 नोव्हेंबरला त्या मुलाची अटक दाखविलेली आहे. त्या दिवशी आम्ही त्या गावात गेलो होतो, मग 21 दिवस हा मुलगा कुठे होता. 21 दिवस या मुलाचा शोध का लागला नाही. पोलिसांनी जर 10 ऑक्टोबरला पकडून नेले होते तर 1 नोव्हेंबर पर्यंत या मुलाला कुठे ठेवले होते? डॉ. प्रकाश आंबेडकरांचे मी या ठिकाणी अभिनंदन करते. त्यांनी या मुलाला सोडण्याच्या बाबतीत मध्यस्थी केली सभापती महोदय, ज्यांच्या हातात शस्त्र नाहीत ते नक्षलवाद्यांना काय मदत करणार आहेत? उलट पोलिसांनी या आदिवासींना मदत केली तर त्यांना त्यांचा फायदा होणार आहे. परंतु आम्ही इतके नक्षलवादी पकडले असे पोलिसांकडून सांगण्यात येते. या .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस.....

नक्षलवाद्यांमध्ये आदिवासींची मुले किती आहेत? या मुलांना आता नागपूरच्या जेलमध्ये ठेवण्यात आलेले आहे. नागपूरच्या जेलमध्ये आता नक्षलवाद्यांपेक्षा आदिवासी मुलांची भरती केलेली आहे. जी मुले आज पोलिसांच्या उपयोगी पडू शकतात त्या मुलांना आज गुन्हेगार म्हणून जेलमध्ये टाकण्यात येत असेल तर त्या ठिकाणचा नक्षलवाद कमी होईल अशा प्रकारचे स्वप्न शासनाने पाहू नये, असे माझे स्पष्ट मत आहे. या मुलांकडे खरच शस्त्र आहेत काय? या मुलांना बंदुका चालविता येतात काय?या आदिवासींकडून एक चूक झाली. अर्थात त्याला मी चूक म्हणणार नाही. जे नक्षलवादी जखमी झाले होते त्यांना नेण्याकरिता खाटा पाहिजे होत्या. 50-60 नक्षलवादी डोळयामध्ये खून घेऊन त्या गावात शिरले. बंदुका घेऊन गावात शिरले आणि त्यांनी जबरदस्ती खाटा उचलून नेल्या. तो या आदिवासींचा गुन्हा झाला काय? तो त्यांचा गुन्हा आहे असे समजून जर या आदिवासींना अमानुषपणे मारण्यात येत असेल तर यामध्ये या आदिवासींचा काय दोष आहे?

सभापती महोदय, या मुलांना खरच नक्षलवाद्यांमध्ये भरती व्हावयाचे आहे काय? आता या ठिकाणी 14 ते 20 वर्षांची आदिवासींची मुले उचलून नेण्याची पध्दत सुरु झालेली आहे. आदिवासींच्या घरात घुसून, धमकी देऊन, जबरदस्तीने त्यांच्या मुलांचे अपहरण केले जात आहे. म्हणून आदिवासी लोकांनी त्यांची ऐपत नसताना सुध्दा आपली तीन हजार मुले गडचिरोलीच्या बाहेर शिक्षणासाठी पाठविलेली आहेत. आमची मुले नक्षवादी चळवळीत जावयास नको अशी मानसिकता आज आदिवासींची आहे. असे असताना आदिवासींच्या मानसिकतेचा विचार केला जात नाही. त्यांना मदत केली जात नाही. चोर सोडून कुठेही कमी पडले की, पोलिसांना आदिवासी माणूस झोडपायला सापडतो. आदिवासी माणसे भीत्री असतात. जंगलात राहणारी ही माणसे वाघाशी दोन हात करतील पण माणसाशी दोन हात करु शकत नाहीत त्यांना बंदुक चालविता येत नाही. त्यांच्या जवळ शस्त्रे नाहीत. अशा परिस्थितीत त्यांना जर गुन्हेगार ठरविण्यात येत असेल आणि गुन्हेगारांची संख्या केवळ पोलीस अधिकाऱ्यांच्या म्हणण्यावरुन वाढविण्याचा प्रयत्न होत असेल तर, याचा विचार आज या सभागृहात होण्याची गरज आहे.

यानंतर श्री. बरवड....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस ....

नाही तर ही परिस्थिती आपल्या हाताबाहेर जाणार आहे, असे मला सांगितल्याशिवाय राहावत नाही. एखादा व्यापारी मेला असेल, एखादा खून झाला असेल, एखादा ठेकेदार मारला गेला असेल, एखादा पोलीस पाटील मारला गेला असेल, एखादा आदिवासी मारला गेला असेल, एखादा खबऱ्या मारला गेला असेल तर आपले पोलीस त्या ठिकाणी पंचनामा करण्यासाठी जातात का, ते त्या ठिकाणी पोहोचतात का ? त्या लोकांना सांगितले जाते की, ते प्रेत पोलीस स्टेशनपर्यंत आणून द्या. म्हणजे लोकांनी प्रेत पोलीस स्टेशनपर्यंत आणून दिल्यानंतर पोलीस पंचनामा करणार. पंचनामा करण्याची ही पध्दत आहे का ? पंचनामा हा तर जागेवरच केला पाहिजे.

परवा एका मुलाचा मृत्यू झाला. त्या मुलाच्या बाबतीत सुध्दा आपण जागेवर पंचनामा करु शकलो नाही. वेगामेंडी येथे पोलीस पाटलाची रात्री साडेबारा वाजता हत्या झाली. 50-60 नक्षलवाद्यांनी येऊन त्याच्यावर गोळ्या झाडल्या. ते प्रेत पोलीस स्टेशनमध्ये आणून रात्रभर तसेच राहिले पण पोलिसांनी पंचनामा केला नाही. रात्रभर त्याच्याबरोबर त्याचे पालक राहिले. नंतर सकाळी आरामात पोलीस स्टेशनमध्ये त्याचा पंचनामा झाला. पंचनामा करण्यासाठी जर आपले पोलीस घटनास्थळी पोहोचत नसतील, आमचा पंचनामाही होत नसेल आणि मग हे आमच्या आयुष्याचा पंचनामा करण्यासाठी बसत असतील तर ते कितपत योग्य आहे, हे माननीय मंत्री महोदयांनी सांगावे. आपल्यालाही तेथील आदिवासींबद्दल प्रेम आहे, हे मी मान्य करते. त्या ठिकाणी विकास व्हावा अशी आपली सुध्दा मनापासून इच्छा आहे, आपण जीवावर उदार होऊन त्या भागात जाता, हे सुध्दा मी मान्य करते. परंतु आपल्या बरोबर असलेले अधिकारी बुमरँग करतात हे आता विसरता येणार नाही. त्या ठिकाणी आम्हाला कोण लुटत नाहीत ? त्या ठिकाणी महसूल खात्याचे अधिकारी कार्ड देतो असे सांगून आम्हाला तहसील कार्यालयात बोलवतात. दोन वर्षे झाली तरी अजून कार्ड मिळालेले नाही. मेळघाटमध्ये आदिवासींना कार्ड देण्याचा आदेश निघाला. त्या ठिकाणी ताबडतोब स्पेशल पंचनामा करुन आदिवासींना कार्ड दिले गेले. या ठिकाणी तर आम्ही मृत्यूच्या दारात आहोत. आम्हाला कार्ड केव्हा मिळणार ? कशाच्या जोरावर तेथील लोकांनी जगावे असे शासनाला वाटते ? तेथील लोकांचा कोणत्या रोजीरोटीचा प्रश्न शासनाने सोडविला आहे ? त्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस .....

ठिकाणी रोजगार हमीचे कोणते काम सुरु आहे, कोणते फॉरेस्टचे काम सुरु आहे, कोणती मदत त्यांना मिळत आहे, याचा शासनाने विचार करावा. मी त्या लोकांमध्ये फिरत असते. काम नाही तर ते काय करणार ? ते छत्तीसगडमध्ये जातात, आंध्र प्रदेशमध्ये जातात. त्या ठिकाणी काम मिळत नसल्यामुळे आता स्थलांतर करण्याची प्रवृत्ती वाढलेली आहे. त्यामुळे आपण त्यांच्या पोटापाण्याची सुध्दा सोय करण्याची अतिशय गरज आहे, असे मला प्रामुख्याने म्हणावेसे वाटते.

त्या ठिकाणी जर आपल्याला पंचनामा करावयाचा असेल तर तो जागेवर केला पाहिजे असा जो आपला कायदा आहे त्या पध्दतीने जागेवर पंचनामा व्हावा. तेथील आदिवासी आपल्या लोकांना घेऊन येतात आणि मग पंचनामा होतो. आजही त्यांना त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात मदतीची गरज आहे. आदिवासींच्या विकासाची गरज आहे. आज महसूल खाते लुटते, फॉरेस्ट खाते लुटते, आरोग्य खाते लुटते. आरोग्याची काही सोय नाही. अशा परिस्थितीमध्ये आपल्याला जर त्यांना मदत करावयाची असेल तर माझे असे स्पष्ट मत आहे की, त्या ठिकाणी आदिवासींना काय हवे हे आपण आधी त्यांना विचारावे. आपले पोलीस जर तिथपर्यंत जात नसतील तर ते लोक पोलिसांना कोणतीही माहिती देणार नाहीत. म्हणून जे लोक त्या क्षेत्रात काम करतात उदा. श्री. सुरेशजी व्दादशीवार हे पत्रकार आहेत, ते त्या एरियामध्ये फिरत असतात. ज्यांनी त्यांच्या बाबतीत अभ्यास केलेला आहे असे श्री. देवेंद्र गावंडे त्या एरियामध्ये फिरत असतात. आम्हीही त्या ठिकाणी जात असतो. तुमचा आणि त्यांचा जर समन्वय साधून घ्यावयाचा असेल तर त्या ठिकाणी ज्यांच्या जवळ आदिवासी आपले मन मोकळे करतात अशा लोकांचा विचार केला पाहिजे. त्यांचा वापर आपण करण्याची गरज आहे. आपण मोठ्या प्रमाणात विकासाची कामे करतो. त्या ठिकाणी विकासाची कामे करीत असताना पहिल्यांदा रस्ते करा. आदिवासी क्षेत्रात आपण तहसील कार्यालयातून सिलेंडर वाटपाचे काम करतो. त्या लोकांना 20-20 किलोमीटर खांद्यावरुन सिलेंडर आणि शेगडी घेऊन जावे लागते. सिलेंडर संपल्यानंतर परत ते भरण्यासाठी 20 किलोमीटरपर्यंत जावे लागते. सिलेंडर भरण्यासाठी सुध्दा पैसे लागतात. आम्हाला आमचा बाप फुकट गॅस देत नाही.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस.....

त्यांच्याकडे रोजगारच नसेल तर त्या सिलेंडरचा किंवा गॅसचा उपयोग काय आहे ? सर्व योजना अधिकाऱ्यांकडून सुचविल्या जातात आणि शासनाकडून त्या राबविल्या जातात. प्रत्यक्षात आदिवासींना त्याचा काहीही उपयोग होत नाही. आदिवासींसाठी रस्ते बांधून द्यावेत, सिंचनाची व्यवस्था करावी.

सभापती महोदय, मी भामरागड येथे गेले होते, तेथील लोकांची सिंचनाच्या तलावाची मागणी आहे. पण त्यांना अद्याप तलाव मिळालेला नाही. एखाद्या ठिकाणी छोटासा खड्डा खणल्यावर कंत्राटदार त्याचे पैसे सुध्दा घेऊन जातो. परंतु तो तलाव सुध्दा पूर्ण होत नाही. जवाहर विहिरींची कामे सुध्दा पूर्ण झालेली नाहीत. त्यांच्याजवळ शेती आहे, त्यामुळे शेतीसाठी लागणाऱ्या सर्व गोष्टी त्यांच्यापर्यंत पोहोचण्याची आवश्यकता आहे. तेथील आदिवासींचा शासनाने विकास करावा, त्यांना मदत करावी. त्याच्या विकासासाठी त्यांचीच मदत घ्यावी. खऱ्या अर्थाने पोलिसांना युध्दाचे प्रशिक्षण द्यावे अशी मी सूचना करते.

सभापती महोदय, अहेरी येथे 18 पोलीस मरण पावले. त्या भागात नक्षलवादी आले आहेत, त्यामुळे तुम्ही ताबडतोब यावे असा त्यांना कोणी तरी वॉकीटॉकीवर मॅसेज दिला होता. कदाचित नक्षलवाद्यांनीच तो मॅसेज पाठविला असावा. कारण पुढे पोलीस होते आणि नक्षलवादी त्यांच्या मागे होते. वरच्या भागातून या पोलिसांवर गोळ्या झाडून मारले होते. यापूर्वी जे पोलीस मेले ते बाजारात धान्य आणण्यासाठी गेले होते. पोलीस स्टेशनमध्ये धान्य देण्याची, भाजी देण्याची त्यांची शासनाने व्यवस्था केली पाहिजे. त्यांच्या सबलीकरणाची व सुरक्षिततेची जबाबदारी शासनाला घ्यावी लागेल. शासनाने पोलीस ठाणे मजबूत करण्याची व पोलिसांची निवासस्थाने बांधण्याची आता कोठे सुरुवात केली आहे. पण केवळ सुरुवात करुन चालणार नाही तर ही कामे लवकर पूर्ण करावीत.

सभापती महोदय, शासनाने सीमावर्ती भागातील पोलीस ठाण्यांना मजबूत करण्याची गरज आहे. ती पोलीस ठाणी मजबूत केल्याशिवाय शासनाला फार नाही पण थोडा तरी महाराष्ट्र वाचविता येईल. शासनाने गडचिरोली जिल्ह्यातील नक्षलवाद मोडून काढण्यासाठी हेलिकॉप्टरची

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस....

सोय केली आहे. परंतु गेल्या दोन वर्षांपासून कोंबिंग ऑपरेशन सुरु करण्याचे सूतोवाच केले होते. त्या बाबतची कार्यवाही कोठे थांबली आहे, या कामासाठी कोठे माशी शिंकली आहे ? तिन्ही राज्ये मिळून कोंबिंग ऑपरेशन करुन नक्षलवाद्यांमध्ये दहशत निर्माण करीत नाही तोपर्यंत नक्षलवाद संपणार नाही असे मी नमूद करते. मी ज्या काही सूचना केल्या आहेत त्याचा शासनाने गंभीरपणे विचार करावा आणि शासनाने ज्या योजना सुरु केल्या आहेत त्या तातडीने पूर्ण कराव्या अशी विनंती करुन मी माझे भाषण संपविते.

ठराव प्रस्तुत झाला.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी मांडलेल्या अशासकीय ठरावावर माझे विचार मांडण्यासाठी उभा आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी नक्षलवादाच्या निमित्ताने आदिवासींच्या प्रश्नाकडे या सभागृहाचे पुन्हा एकदा लक्ष वेधले असल्यामुळे मी त्यांचे आभार मानतो. त्यांचे आणखी एका गोष्टीसाठी आभार मानतो. त्यांच्या तोंडून आदिवासी हा शब्द ऐकला आहे. त्यांनी वनवासी हा शब्द वापरला नाही. त्यामुळे आपला आभारी आहे आणि हा बदल स्वागतार्ह आहे असे मी मानतो. सभापती महोदय, नक्षलवाद्यांचा हा प्रश्न मुळात नक्षलवादाचा नाहीच. हा प्रश्न आदिवासींच्या शोषणाचा आहे. त्यांच्या गरिबीचा आहे. त्यांच्या आत्मसन्मानाचा आहे. त्यांच्या शिक्षणाचा व रोजगाराचा आहे. सन्माननीय सदस्यांनी त्या परिसराची स्थिती कशी आहे हे विस्तारपूर्वक सांगितली आहे. त्याचा मी पुनरुच्चार करणार नाही. पण तेथे रस्ते नाहीत हे पुन्हा एकदा आवर्जून सांगितले आहे. नंदुरबार जिल्ह्याच्या अक्कलकुवा भागामध्ये त्यावेळी कुपोषणामुळे मुले मेली होती. त्यावेळी तत्कालीन मुख्यमंत्री श्री.शरद पवार हे त्या भागात गेले होते. त्यावेळी तेथे रस्तेच नाहीत असे त्यांच्या लक्षात आले. रस्ते कागदावर होते, नकाशावर होते, रस्ते बांधले आहेत असे सांगितले होते, पण प्रत्यक्षात बांधण्यात आले नव्हते. ही तेथील विकासाची स्थिती होती. गडचिरोली व भामरागड हा संपूर्ण परिसर जंगलाचा आहे हे मान्य असले तरी विकासाचा कोणताच रस्ता तेथे पोहोचलेला नाही ही वस्तुस्थिती मान्य केली पाहिजे. जोवर ते करणार नाही तोवर नक्षलवादाच्या नावाखाली आदिवासी कार्यकर्त्यांना, शोषणाच्या विरोधात लढणाऱ्या कार्यकर्त्यांना झोडपून काढणार असू तर उद्या माओवादी वाढणार आहेत. मी माओवाद्यांचे कधीच समर्थन करणार नाही. संसदीय प्रणालीच्या सर्वोच्च सभागृहात मी बोलत आहे. परंतु माओवाद का वाढत आहे याचे शासनाने उत्तर शोधले पाहिजे.

शोषणाच्या विरोधात कोणी बोलावयास उभे राहिले, आदिवासींच्या पिळवणुकीच्या विरोधात कोणी बोलावयास उभे राहिले की त्याला माओवादी ठरवायचे. त्याला हाणून पाडावयाचे. हा प्रयोग तेथे होत आहे. नक्षलवादाच्या नावाखाली तेथे प्रचंड पैसा जात आहे. जे जीवानिशी गेले आहे त्या बाबत मी बोलत नाही. पण पोलीस यंत्रणेत आता नवीन वर्ग तयार झाला आहे. हा पैसा त्यांना

4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.कपिल पाटील....

पाहिजे. काही लोकांना आता तेथे पोस्टिंग पाहिजे. यापूर्वी तेथे प्रतिनियुक्तीवर जाण्यासाठी तयार होत नव्हते. परंतु आता तेथे प्रतिनियुक्तीवर पोलीस अधिकारी जाण्यास तयार आहेत. मी वरच्या स्तरावरील अधिकाऱ्यांबद्दल बोलत आहे. खालच्या स्तरावरील पोलीस बिचारे मरतात. तेथे आता नवे इंटरेस्ट तयार झालेले आहेत. तेथील शोषणकर्ते, पोलीस आणि राज्यकर्त्यांची एक साठगाठ झाली आहे.

यानंतर श्री.शिगम....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील...

ती मोडून काढण्याची आवश्यकता आहे. माननीय गृहमंत्री श्री. आर.आर.पाटील यांच्याबद्दल शंका घेण्याचे कारण नाही. कारण त्यांची भूमिका सर्वांना मान्य आहे. परंतु त्यांच्या आडून जे प्रयत्न केले जातात त्याकडे मला लक्ष वेधायचे आहेत. सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी एका आदिवासी कार्यकर्त्याची कहाणी सांगितली. त्याला नक्षलवादी ठरवून, महिनाभर पोलीस कस्टडीमध्ये ठेवून काही दिवसांनी अटक केल्याचे दाखवले गेले. सुधीर ढवळे नावाचा एक कार्यकर्ता आहे. सन्माननीय सदस्य श्रीमती शोभा फडणवीस यांनी सांगितले की, श्री. प्रकाश आंबेडकर आणि अन्य अनेक कार्यकर्त्यांनी सांगून सुध्दा सुधीर ढवळेला मुक्त केले नाही. मागच्या वेळा मी यासंबंधी सभागृहामध्ये बोललो होतो आणि माननीय गृहमंत्री त्यावेळी माझ्यावर रागावले देखील होते, सभागृहसुध्दा माझ्या अंगावर आले होते. त्या कार्यकर्त्याला आपण नंतर सोडलेले असले तरी केसेस चालू आहेत. हातामध्ये कार्ल मार्क्स चे पुस्तक आहे, माओचे चरित्र आहे म्हणून मी माओवादी असेन, नक्षलवादी असेन तर मग कोणतेच पुस्तक वाचू नका असे एकदाचे जाहीरपणे सांगून टाका. गरिबांना संघटीत करण्याचे कुणी काम करीत असेल, गरिबांच्या शोषणा विरुध्द कोणी आवाज उठवत असेल तर तो आवाजही उठविण्याचा तुम्हाला अधिकार नाही असे या सभागृहामध्ये सांगून टाका. उलट अशा कार्यकर्त्यांना मदत केली पाहिजे, त्यांना ताकद दिली पाहिजे. पण त्यातले काहीही होत नाही. त्यांना तुम्ही तुरुंगात डांबण्याचा प्रयत्न करीत असाल तर उद्या आदिवासी सुध्दा माओवादी बनले तर आश्चर्य वाटायचे कारण नाही. केवळ गडचिरोलीच नाही तर या पुढच्या अनेक भागात ही चळवळ वाढणार आहे. कारण ज्या पध्दतीने राज्य यंत्रणा राबविली जाते, ज्या पध्दतीने पोलीस आपली दमन यंत्रणा राबवत आहे ती थांबवायला पाहिजे. गोळयांनी हा प्रश्न सुटणार नाही. तुम्हाला चर्चेच्या माध्यमातून, विकासाच्या माध्यमातून हा प्रश्न सोडवावा लागेल.

सभापती महोदय, आपण अतिरेक्यांशी सुध्दा बोलतो. काश्मिर मधील अतिरेक्यांशी बोलण्याची भूमिका देशाच्या पंतप्रधानांनी आणि केन्द्रीय गृह मंत्र्यांनी घेतली. मग हे नक्षलवादी देशाच्या बाहेरचे शत्रू आहेत काय ? ते याच राज्यातील आहेत, ते या देशाचे नागरिक आहेत. ते या व्यवस्थे विरुध्द बंड करुन उठले एवढाच त्यांचा अपराध आहे. त्यांचा मार्ग चुकीचा असेल पण

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील...

त्यांचा हेतू तर चुकीचा नाही. मग त्यांच्याशी चर्चा का करायची नाही, त्यांना लोकशाहीच्या फ्रेमवर्कमध्ये का आणायचे नाही ? त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी जे हिंसेचा मार्ग सोडतील त्यांच्याशी चर्चा केली पाहिजे. जोवर तुम्ही अशी चर्चा करणार नाही तोवर नक्षलवादाचा प्रश्न सुटणार नाही. मग तुम्ही कितीही पोलीस पाठवा, कितीही रणगाडे पाठवा, नक्षलवादाचा आणि माओवादाचा प्रश्न अशा पध्दतीने सुटणार नाही. या निमित्ताने माझी माननीय गृहमंत्र्यांकडे मागणी आहे की, सुधीर ढवळे सारखे जेवढे कार्यकर्ते अडकलेले आहेत त्यांना विनाविलंब सोडवा. तुम्हाला कोणते पुरावे लागतात ? अजून त्या बाबतीत चर्चाच चालू आहे. श्री. प्रकाश आंबेडकरांपासून प्रा.एन.डी.पाटील, श्रीमती मेधा पाटकर यांच्या पर्यन्त प्रत्येक कार्यकर्त्याने सांगितले. माओचे पुस्तक हातात असले की तुम्ही त्याला माओवादी ठरवता. मार्क्सचे पुस्तक हातात असले की त्याला नक्षलवादी ठरवता, उद्या आंबेडकराचे पुस्तक हातात घेतले तरी तुम्ही त्याला नक्षलवादीच ठरवणार... सभापती महोदय, ही जी स्थिती आहे ती अतिशय गंभीर आहे. मी हे एवढयासाठी वारंवार सांगत आहे की, तुम्ही या कार्यकर्त्यांना मोडून काढणार असाल तर तुम्हाला याचे उत्तर कधीच मिळणार नाही.

माझी माननीय गृहमंत्र्यांना विनंती आहे की, त्यांनी या निमित्ताने सभागृहामध्ये सांगावे की, असे जे जे कार्यकर्त आहेत ते अधिवेशन संपण्याच्या आत तुरुंगाच्या बाहेर येतील आणि मुख्य प्रवाहात सामील होतील. तुम्हाला हे करावे लागतील. चौकशीचे गु-हाळ किती काळ चालवणार आहात, किती काळ अधिका-यावर विश्वास ठेवणार ? आपण आपल्या विवेक बुद्धीवर, तारतम्य बुद्धीवर निर्णय घ्यावा अशी माझी माननीय गृहमंत्र्यांना विनंती आहे. राजकीय निर्णय हे पोलिसांच्या हाती देऊन चालत नाहीत. राजकीय प्रश्नांची सोडवणूक ही राजकीय मार्गानेच होऊ शकते. म्हणून माझी अशी विनंती आहे की, ज्यांचा हिंसेशी थेट संबंधी नाही अशा सगळया कार्यकर्त्यांना तुम्ही बाहेर काढा. ज्यांचा माओवाद्यांशी संबंध नाही, केवळ पोलीस सांगतात म्हणून त्यांना तुरुंगात ठेवून चौकशी करणार असाल तर ते काही बरोबर नाही असे आवाहन करुन मी माझे भाषण संपवितो.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, आदरणीय सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी मांडलेल्या अशासकीय ठरावाचे समर्थन करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, ख-या अर्थाने नक्षलवादी चळवळ ही आमच्या गोंदिया जिल्ह्यापासून गडचिरोली, चंद्रपूर आणि भंडारा जिल्ह्यातील आमगावला लागून असलेला मध्यप्रदेशातील लांजीचा भाग, सालेकसाच्या बाजूला असलेला छत्तीसगड आणि चंद्रपूरला लागून असलेला आंध्रप्रदेशचा काही भाग, या सर्व भागामध्ये ही नक्षलवादी चळवळ मोठ्या प्रमाणावर सुरु आहे. मी सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांचे अभिनंदन करतो. त्यांनी ही नक्षलवादी चळवळ रोखण्यासाठी शासनाने ठोस उपाययोजना करण्यासंबंधीचा अत्यंत महत्वाचा ठराव येथे मांडलेला आहे. सभापती महोदय, राज्यातील कायदा आणि सुव्यवस्था तसेच राज्यातील नक्षलवादी चळवळ या विषयावर या सभागृहामध्ये अनेकदा चर्चा झालेली आहे. माननीय गृहमंत्री हे आमच्या गडचिरोली जिल्ह्याचे पालकमंत्री आहेत. आम्ही त्यांच्याकडे अतिशय आदराने पहात आहोत. अनेक प्रश्नाच्या बाबतीत त्यांच्याकडून आम्हाला अपेक्षा आहेत. अनेक प्रश्न सुटण्याच्या मार्गावर आहेत. त्याबद्दल माननीय गृह मंत्र्यांचे अभिनंदन करावे तेवढे ते थोडेच आहे. ही जी नक्षलवादी चळवळ आहे तिला कुठे तरी ब्रेक लागावा अशी आमची इच्छा आहे.

...नंतर श्री. गिते...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर...

सभापती महोदय, या चर्चेच्या निमित्ताने मी थोडक्यात मुद्दे मांडणार आहे. गोंदिया जिल्हयातील चिचगड पोलीस स्टेशन अंतर्गत मगरडोह येथील श्री.कुमार दिसाला उईके यास पोलिसांचा खबऱ्या आहे म्हणून त्याची हत्या करण्यात आली. त्याच्या परिवाराला अजूनपर्यंत न्याय मिळाला नाही. दुसरा जो खबऱ्या होता, त्याचे नाव दिनकर बाळू भोगळा असे होते. तो गडचिरोली जिल्हयातील धानोरा तालुक्यातील गट्टानिधी येथील होता. तो पोलिसांचा खबऱ्या आहे असा संशय घेऊन नक्षलवाद्यांनी त्याची हत्या केली. मला या अनुषंगाने सांगावयाचे आहे की, नक्षलवाद्यांकडून पोलीस कर्मचाऱ्यांची हत्या होते, अशा प्रसंगी पोलीस कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांना शासनाकडून आर्थिक मदत दिली जाते. पोलिसांना सहकार्य मिळावे म्हणून गावातील काही व्यक्ती खबऱ्या म्हणून काम करतात. त्या व्यक्ती अत्यंत गरीब, दिनदुबळे, वनात राहणारे वनवासी आहेत. या खबऱ्यांची नक्षलवाद्याकडून हत्या होते, अशा वेळी त्यांच्या कुटुंबीयांना कोणत्याही प्रकारची आर्थिक मदत दिली जात नाही. ज्याप्रमाणे पोलीस कर्मचाऱ्याच्या कुटुंबीयांना शासनाकडून आर्थिक मदत दिली जाते, त्याप्रमाणे या खबऱ्यांच्या कुटुंबीयांना देखील शासनाच्या वतीने आर्थिक मदत देण्यात यावी. अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, प्रचारगड येथे आदिवासी क्षेत्र आहे, त्या ठिकाणी दरवर्षी यात्रा भरते. संपूर्ण देशातील आदिवासी या यात्रेसाठी येतात. या यात्रेस नक्षलवादी देखील मोठया प्रमाणात येतात. परंतु यात्रेच्या ठिकाणी कोण नक्षलवादी आहे, कोण आदिवासी आहे हे कळत नाही. त्या तीर्थक्षेत्राचा विकास केला गेला पाहिजे. त्या ठिकाणी रस्त्याची तसेच विजेच्या पुरवठयाची व्यवस्था केली तर मला वाटते की, हा फोफावणारा नक्षलवाद आहे, तो काही प्रमाणात थांबू शकतो. नक्षलवाद हा काही शासनाने थांबविला तर थांबेल असे नाही. ते सामाजिक दायित्व देखील आहे. आमचे राष्ट्रीय नेते श्री. नितीनजी गडकरी यांच्या अध्यक्षतेखाली स्व.लक्ष्मणराव मानकर एकलव्य विद्यालये 121 ठिकाणी चालवितो आहोत. विद्यालये चालविण्यासाठी शासनाची कोणत्याही प्रकारची मदत न घेता आम्ही ती विद्यालये चालवित आहोत. इयत्ता 1 ली ते इयत्ता 7 वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना आम्ही शिक्षण आणि प्रशिक्षण देतो आहे. तसेच आदिवासी समाजातील व्यक्तींना जीवनोपयोगी साधन कसे उपलब्ध होईल या दृष्टीने देखील मार्गदर्शन करीत असतो. ते या चळवळीतून बाहेर कसे येतील यासाठी देखील आमच्या संस्था आदिवासी विभागात काम करीत

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर...

आहेत. गोंदिया येथे डॉ. चटर्जी आहेत, त्यांची आधार संस्था आहे. ती संस्था आदिवासी भागामध्ये, नक्षलवादी भागामध्ये मेडीकलच्या माध्यमातून तेथील आदिवासींना सर्वतोपरी मदत करीत असते. आदिवासींना सर्व प्रकारचे औषधे या संस्थेकडून उपलब्ध करुन देण्यात येतात. नक्षलवादाचा विषय हा फार मोठा आहे. जटिल असा हा विषय आहे. तो काही लवकर चर्चा करुन संपणारा विषय नाही. या विषयावर चार तास दिले तरी ती वेळ कमी पडेल.

मला माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील यांना एक सांगावयाचे आहे की, या ठिकाणी शिक्षणाची अवस्था अतिशय वाईट आहे. म्हणून त्या ठिकाणी सैनिकी शाळा सुरु करण्यात आल्या पाहिजेत. या आदिवासी विभागातील तरुण विद्यार्थ्यांना सैनिकी शिक्षण दिले तर तो आपल्या पायावर उभा राहून आपल्या गावाचे रक्षण करु शकतो. म्हणून या आदिवासी विभागातील युवक व युवतींना सैनिकी शिक्षण दिले पाहिजे. आमच्या विभागातील आदिवासी भोळे आहेत. त्यांना काही समजत नाही. त्यांना सैनिकी प्रशिक्षण देऊन योग्य दिशा दिली तर मला वाटते की, या चळवळीमध्ये ते आपल्याला निश्चितपणे मदत करु शकतील. नक्षलग्रस्त भागामध्ये मेडीकलची अवस्था अतिशय वाईट आहे. आजही तेथील आदिवासी, वनवासी वनातील औषधांच्या भरवश्यावर आहे. परंतु पॅरॉसिटीमलची एक रुपयाची गोळी ते घेऊ शकत नाही. नक्षलग्रस्त भागांमध्ये लहान लहान आरोग्य केंद्रे कार्यान्वित केली पाहिजेत. त्या केंद्रात एका प्रशिक्षित व्यक्तीची नेमणूक केली पाहिजे. कोणताही रुग्ण येईल त्यास त्या केंद्रात प्राथमिक उपचार मिळू शकेल अशी व्यवस्था शासनाने निर्माण केली पाहिजे अशी माझी या निमित्ताने मागणी आहे. शिक्षण आणि आरोग्य या दोन गोष्टीकढे शासनाने लक्ष घातले तर या नक्षलक्षेत्रामध्ये आपल्याला चांगल्या प्रकारचे सहकार्य मिळू शकते. माननीय आबासाहेब आपल्याला कल्पना असेल की, सालेकसा क्षेत्रामध्ये विद्यार्थिनी शाळा सोडून गेल्या होत्या. तेथील शाळेत कोणीही विद्यार्थी, विद्यार्थिनी येत नव्हते. शाळा ओसाड झाल्या होत्या. नक्षलवादी हे विद्यार्थिनींना उचलून नेत होते. इयत्ता 7 वी ते इयत्ता 10 वी पर्यंतच्या विद्यार्थिनी शाळेत येत नव्हत्या. तेथील विद्यार्थिनी नक्षलवाद्यांना घाबरुन नागपूर येथे त्यांच्या नातेवाईकांकडे रहावयास गेल्या. नक्षलवाद्यांच्या भीतीमुळे त्यांचे शिक्षण होऊ शकले नाही.

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर...

सभापती महोदय, सालेकसा तालुक्यातील एक छोटीशी घटना मी या ठिकाणी सांगू इच्छितो. नक्षलग्रस्त भागामध्ये खोटे नक्षलवादी मोठया प्रमाणात तयार झालेले आहेत. सालेकसा येथे खोटे नक्षलवादी लोक पकडले गेले होते. परंतु राजकीय दबावामुळे तेथील प्रकरण दाबले गेले. खोटे नक्षलवादी फोफावले आहेत, यांचेवर पायबंद जो पर्यंत घालणार नाही,

यानंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर.....

जोपर्यंत कठोर कायदा करणार नाही तोपर्यंत या आदिवासी लोकांना न्याय मिळणार नाही. लुटण्याचे काम करणारे हे दरोडेखोर आहेत. त्यांचा बिमोड केल्याशिवाय आदिवासींचा त्रास संपणार नाही. निवडणुका जाहीर झाल्या की या चळवळीला उत्तेजन मिळते. यांच्या चळवळीवर पायबंद आणणे आवश्यक आहे. आदिवासींकडे शस्त्रे नाहीत. पोलिसांना निवासाची सोय नाही. या दृष्टीने शासनाच्या वतीने काही चांगले निर्णय घेतले गेले तर आदिवासी जनतेला फार मोठा दिलासा मिळू शकेल. वनवासी भागातील नक्षलवादी चळवळ समाप्त करण्यासाठी सामाजिक आणि सरकारी चळवळ एकत्र आणून या नक्षलवादी चळवळीचा नायनाट करु शकलो तर बरे होईल एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील (गृहमंत्री) : सभापती महोदय, सदनातील ज्येष्ठ सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी अशासकीय ठरावाद्वारे राज्यातील नक्षलवादी समस्येकडे शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला आहे.

सभापती महोदय, नेहमीच या प्रश्नाबाबत खालच्या सभागृहात असो वा वरच्या सभागृहात असो किंवा त्या भागात भेटीला गेल्यानंतर या प्रश्नाबाबत संवेदनशीलपणे त्यांनी आपली भूमिका नेहमीच व्यक्त केली आहे. हा अशासकीय ठराव मलाही अभिप्रेत होता. किमान प्रत्येक अधिवेशनात या प्रश्नावर काही प्रमाणात चर्चा व्हावी असे माझे सुध्दा मत आहे. वेगवेगळ्या अँगलने माननीय सदस्यांनी आपले मते मांडली. ही गोष्ट खरी आहे की, या प्रश्नाला अनेक कंगोरे आहेत. या प्रश्नावरील उत्तर नेमके कोणत्या पध्दतीने शोधायचे या संदर्भातील मार्ग सुध्दा अनेकजण वेगवेगळया पध्दतीने सांगतात. सुरुवातीच्या काळात दुर्गम भागातील विकास झाला नव्हता. आदिवासींचे आर्थिक आणि शारीरिक शोषण होत होते. म्हणून उद्रेकातून काही क्रांतीकारक विचार मांडल्यानंतर काही तरुणांनी त्यांना साथ दिली, ती आपल्या भागाचा विकास होत नाही म्हणून. हळूहळू या चळवळीला पैसा सुध्दा मिळत गेला. त्यातच देशभरात या वन विभागात खनिजाचा मोठा साठा असल्यामुळे मोठया प्रमाणात जसजशी प्रगती होत गेली तसतसे उत्खनन सुध्दा वाढले. या वनातून खनिज काढत असताना या चळवळीचे आणि नक्षलवाद्यांचे उत्पन्न सुध्दा मोठया प्रमाणात वाढले. वाढत्या उत्पन्नाने त्यांनी आपली संख्याही वाढविली. आज त्यांच्याकडे मुबलक पैसा असल्यामुळे एकेकाळी पोलीस दल संख्येने त्यांच्यापेक्षा अधिक असायचे, त्यांनी आपल्या सीमेवर पोलिसांवर जो हल्ला केला त्यात काही ठिकाणी 500 ते 600 जणांनी जाऊन पोलिसांवर हल्ला करताना फार मोठे ग्रूप आढळून आले. पूर्वी पोलीस संख्येने जास्त असायचे आणि त्यांची संख्या आज तितकीच मोठी झालेली आहे.

सभापती महोदय, एकेकाळी आपल्याकडे अत्याधुनिक शस्त्रे होती. त्यांच्याकडे केवळ बर्मार, गावठी बंदुका होत्या. आता पैसा आल्यामुळे आणि ओरिसा व छत्तीसगड राज्यातील पोलिसांची लुटलेली आणि विकत आणलेली पोलीस दलासारखीच अत्याधुनिक शस्त्रे नक्षलवाद्यांकडे सुध्दा आहेत. शासनाचा पैसा अधिक असायचा. आता त्यांच्याजवळही अधिकचा पैसा आला आहे. म्हणजे पैशाने, संख्येने आणि शस्त्राने ही चळवळ थोडी मजबूत झाल्यामुळे केवळ महाराष्ट्रालाच नव्हे तर देशातील अनेक राज्यांना आज नक्षलवादी चळवळीचा मोठा धोका निर्माण झाल्याची स्थिती

..3.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील.....

आहे. देश स्तरावर सुध्दा आदरणीय पंतप्रधान, आदरणीय गृहमंत्री यांनी अतिशय गांभीर्याने या महत्वपूर्ण विषयावर अनेकदा बैठका घेतल्या आहेत. त्यांच्या काही बैठकांना मी स्वत: हजर होतो. पोलिसांना जिल्हा कार्यक्षेत्र असते, राज्याचे कार्यक्षेत्र असते.....

नंतर 3एन.1..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील.....

पण नक्षलवाद्यांना कोणतेही क्षेत्र नसल्यामुळे ते एका राज्यातून दुसऱ्या राज्यात, एका भागातून दुसऱ्या भागात सहज जाऊन आपली मुव्हमेंट सुरु करु शकतात. एका बाजूने या नक्षलाईट चळवळीने थोडासा जोर वाढविल्यानंतर त्या अनुषंगाने काही उपाययोजना शासनालाही करण्याची आवश्यकता होती. ही गोष्ट खरी आहे की, नक्षलवाद्यांना उत्तर देताना ज्याप्रमाणे आपली शस्त्रे मजबूत पाहिजे, आपले पोलीस दल सक्षम पाहिजे तसेच त्या भागातील विकासाला गती देण्याचा प्रयत्न सुध्दा अधिक वेगाने केला पाहिजे. नक्षलवादी चळवळीच्या संदर्भात अलिकडच्या काळात केंद्र शासनाने घेतलेली भूमिका, राज्य शासनाने स्वीकारलेला दृष्टीकोन पाहिल्यानंतर विकास करण्यासाठी निधी कमी पडू द्यायचा नाही याबाबतीत राज्य शासन आणि केंद्र सरकारची भूमिका अगदी सारखीच आहे. सुरुवातीच्या काळात विकास नाही म्हणून या नक्षलवाद्यांच्या चळवळी वाढल्या पण आज या परिसराचा विकास झाला तर आपल्याला आवश्यक असलेले मनुष्यबळ मिळणार नाही म्हणून विकास कामात खीळ घालण्याचे काम, ही विकास कामे बंद पाडण्याचे काम या चळवळींकडून होत आहे. तसेच या भागातील तरुण शिकला तर पुढे नक्षलवादी चळवळीत सहभागी होणार नाही म्हणून शाळा नक्षलवाद्यांकडून बंद पाडल्या जातात. रस्त्यांची सोय झाली तर पोलिसांच्या मुव्हमेंट वाढतील म्हणून रस्ते सुध्दा करु दिले जात नाहीत. ठेकेदारांवर तसेच शासकीय अधिकाऱ्यांवर दबाव निर्माण केला जातो. जेणेकरुन शासनाच्या सुविधा लोकांना मिळू नयेत आणि शासनाबद्दल लोकांच्या मनात असंतोष वाढत रहावा अशी नक्षलवाद्यांनी नवीनच स्ट्रॅटेजी अवलंबिलेली आहे.

महोदय, अशा प्रकारे खूप अडचणीतून सरकारला सुध्दा मार्ग काढावा लागतो. आतापर्यंत देशभरातील पोलिसांनी केलेल्या तपासातून ही माहिती पुढे आली की, नक्षलवाद्यांचे नेते हे जंगलात राहत नाहीत, ते मोठमोठ्या शहरातून राहत असतात, ऐष-आरामाचे जीवन जगतात आणि आपली मुले परदेशात शिकण्यासाठी पाठवितात. तिकडे मात्र गरीब मुलांच्या जीवावर कोट्यवधी रुपये कमावितात. अशा प्रकारे धंदा म्हणून या नक्षलवादी चळवळीकडे हे नेते पाहत आहेत. एका बाजूने नक्षलवादी चळवळ तयार करणारे हे नेते मुळीच जंगलात जात नाहीत. दुसऱ्या बाजूला मात्र जंगलात गरीब आदिवासी मुले असतात, त्यांच्या हातात शस्त्रे दिली जातात. त्यांना मदत

....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील.....

करता यावी तसेच या भागाचा विकास व्हावा म्हणून शासनाच्या वतीने पोलीस भरती करतो तेथेही या गरीब आदिवासी माणसाला नक्षलवाद्यांकडून धमक्या दिल्या जातात. या ठिकाणी सन्माननीय सदस्यांकडून आदिवासी भागात नक्षलवाद्यांना मदत केली म्हणून या भागातील मुलांना अरेस्ट केली व पोलिसांकडून अन्याय झाला असाही उल्लेख करण्यात आला, या गोष्टी मी तपासून घेईन. अशा प्रकारे पोलिसांनी, या परिस्थितीतून मार्ग काढत असताना स्थानिक पातळीवर नक्षलवाद्यांना मदत केली म्हणून अरेस्ट केले पण या गरीब माणसाकडे दुसरा कुठला पर्याय होता की त्याने नक्षलवाद्यांना केवळ जेवण दिले म्हणून त्याला सुध्दा पोलिसांनी रॉंग बॉक्समध्ये उभे केले. अशा सर्व बाबींची चौकशी करण्यात येईल. तसेच पैसा पुरविला म्हणून कोणाला अरेस्ट केले असेही प्रश्न विचारले जातात. वरुन नक्षलवाद्यांना मदत करणाऱ्यांना पकडायचे नाही, आणि खालून मदत करणाऱ्या, पैसे पुरविले म्हणून मोठ्या लोकांनाही पकडायचे नाही असे करुन कसे चालेल. यामध्ये अनेक वेळा फक्त एकच बाजू पोलिसांच्या समोर येते. तसेच पोलिसांच्या भूमिकेबाबतचाही सभागृहात उल्लेख झाला. पण मी सभागृहाला असेही सांगू इच्छितो की, शेजारच्या काही राज्यातून, तुमच्या राज्यातील अमुक अमुक लोक नक्षलवाद्यांना मदत करतात अशीही माहिती मिळाली.. अशा प्रकारे जागरुकपणे त्या राज्याकडून आपल्या सरकारकडे काही जणांच्या बाबतीत माहिती प्राप्त झाल्यानंतर .....अडथळा.....

श्री. कपिल पाटील : माननीय गृह मंत्र्यांनी इतर राज्यांकडून नक्षलवाद्यांना मदत करण्यात येत असल्याची माहिती मिळाल्याचा उल्लेख केला. पण अशी कोणत्या राज्याकडून माहिती मिळाली आहे याची माहिती सभागृहाला त्यांनी द्यावी, अशी मी विनंती करतो.

यानंतर श्री. जुन्नरे ....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलिपीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील :अशा प्रकारची माहिती आल्यानंतर थोडेसे लक्ष ठेवले व त्यामध्ये काही लोकांना अटक केल्यानंतर त्यांच्या इंट्रोगेशननंतर अजून काही लोक पकडले गेले तेव्हा शासनाकडे मोठया प्रमाणात निवेदने प्राप्त झाली व त्यामध्ये असे म्हटले होते की, या व्यक्तींना आम्ही तर रोज शहरामध्ये बघत असतो त्यामुळे तुम्ही यांना ॲरेस्ट का केले ? लोकांना वेगळे दिसेल असे काम आणि परस्पर वेगळे काम असेही काही ठिकाणी असू शकते. त्यामुळे खोलात जाऊन तपास करण्याची आवश्यकता निर्माण होते. आपण खालच्या सर्व लोकांना निर्दोष ठरवणार, अदिवासींना नक्षलवादी बनवितात त्यांना निर्दोष ठरविणार असाल तर ही चळवळ आटोक्यात कशी काय आणावयाची असा प्रश्न पडतों. दुर्गम भागामध्ये आदिवासी राहत असेल व त्याच्या खांद्याला नक्षलवाद्यांनी बंदूक लावली व बळजबरीने एखादे काम करावयास भाग पाडले तर त्याच्या पुढे दुसरा कोणताही पर्याय असूच शकणार नाही. आदिवासी कुटुंबाने नाइलाजास्तव नक्षलवाद्याला जेवण दिले तर त्यात काय चुकले ? गरीब माणसांसमोर काहीच पर्याय नसतो. त्यामुळे मी ही गोष्ट सुध्दा समजू शकतो. दुर्गम भागात राहणा-या लोकांनी दबावापोटी नक्षल चळवळीला अशा प्रकारे मदत केली असेल तर अशा गोष्टीकंडे बघण्याचा शासनाचा दृष्टिकोन नेहमीच सहानुभूतीचा राहिलेला आहे.

या ठिकाणी सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस यांनी सांगितलेल्या प्रत्येक केसच्या बाबतीत वरिष्ठ अधिका-यांना तपास करावयास सांगेन. तसेच वरिष्ठ अधिका-यांसमोर आपल्याला बोलावून चर्चा करण्यास मी तयार आहे. माझ्यावर गडचिरोली जिल्हयाचे पालक मंत्र्याची जबाबदारी सोपविण्यात आलेली आहे. मी पालक मंत्री असल्यामुळे या केसच्या संदर्भात खोलात जाऊन माहिती घेईन असे मी आपल्याला आश्वासन देतो. परंतु प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणाने शहरामध्ये राहून या चळवळीला समर्थन करणा-यांकडे पाहण्याकडे शासनाचे धोरण अधिक गंभीरपणाचे असेल व तसे ते असण्याची नितांत आवश्यकता आहे. नक्षलवादी चळवळ आटोक्यात आणण्यासाठी कोठल्याही निरापराध माणसाला शिक्षा व्हावी, त्रास व्हावा अशी माझी व पोलीस दलाची बिलकुल इच्छा नाही. या उलट सर्व शासकीय अधिकारी त्या परिसरात गेले पाहिजे, या ठिकाणच्या जनतेची कामे सेवाभावी वृत्तीने केली पाहिजेत म्हणून अलीकडच्या काळात शासनाने

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील...

प्रयत्न सुरु केलेले आहेत. जनतेमधून सुध्दा याला खूप चांगला प्रतिसाद मिळत आहे. सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांची इच्छा असेल तर पुढील 26 जानेवारीच्या कार्यक्रमाला गडचिरोलीला घेऊन जाईन. गडचिरोली येथील अनेक कार्यक्रमांना पालक मंत्री म्हणून, मंत्री म्हणून मी उपस्थित राहत असतो. मुंबईमध्ये सुध्दा मी 26 जानेवारीला हजर राहत होतो. परंतु मागील दोन वर्षापासून गडचिरोली येथे 26 जानेवारीच्या कार्यक्रमाला हजर रहावे लागते. गडचिरोली येथे तिरंगा घेऊन गल्ली बोळातून मिरवणुका काढत, लोकशाहीच्या आणि घटनेच्या, देशाच्या घोषणा देत हजारोंची संख्या नक्षलवादापासून बाजूला जावयास लागली आहे. एवढेच नव्हे तर नक्षलवाद्यांच्या समोर उभे राहून घोषणा द्यावयास लागली आहे. अशा प्रकारचे चित्र गडचिरोली जिल्हयातील प्रत्येक तालुक्यामध्ये आपल्याला बघावयास मिळेल. मागील आठवडयातील घटनेमध्ये छत्तीसगडमध्ये "सलवाजुडूम" अभियान यशस्वीपणे राबवले होते त्यामध्ये श्री.के.मधुकरराव यांनी आपल्या 500 कार्यकर्त्यासह गडचिरोलीतील काही तालुक्यांना भेटी दिलेल्या आहेत. दंडकारण्य शांतता समिती असे त्यांच्या समितीचे नाव आहे. नक्षलवाद्यांनी आतापर्यंत त्यांच्यावर 29 वेळा हल्ले केलेले आहेत. परंतु आदिवासी जनतेनेच त्यांचे संरक्षण केलेले आहे. त्यांनी ज्यावेळेस गडचिरोलीमध्ये दौरे केले त्यावेळी संपूर्ण गाव त्यांची वाट बघत स्वागत करीत होते. 3-3,4-4 हजार लोक त्यांच्या सभांना हजर राहून नक्षलवाद्यांच्या टीकेला दाद देऊन उत्स्फूर्त प्रतिसाद देत होते. याचा स्पष्ट अर्थ असा होतो की, नक्षलग्रस्त एरियातील आदिवासींना आता नक्षलवाद नको आहे, त्यांना लोकशाही व आपले सरकार हवे आहे. एका बाजूने जनतेने प्रतिसाद द्यावयास सुरुवात केलेली असून दुस-या बाजूने आम्ही प्रतिसाद देण्याची आवश्यकता आहे.

मी खेदाने कबूल करतो की, नक्षलग्रस्त जनतेच्या आमच्याकडून अपेक्षा असतांना सुध्दा त्यांना प्रतिसाद द्यावयास आपली व्यवस्था सरकार म्हणून निश्चितपणे कमी पडतो आहे व कमी पडलो आहे ही गोष्ट मला मान्य करावी लागेल. वरिष्ठ अधिकारी त्या परिसरात जाऊन नोकरी करावयास तयार नाही हे अनेक वेळेला सिध्द झालेले आहे.

यानंतर श्री. गायकवाड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ही गोष्ट मला मान्य करावी लागेल. वरिष्ठ अधिकारी त्या परिसरात जाऊन नोकरी करण्यास तयार नाहीत हे अनेक वेळा सिध्द झालेले आहे. त्या भागात 40 टक्के पदे रिक्त आहेत.अशासकीय ठरावाच्या निमित्ताने मी सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस यांना सांगू इच्छितो की आपणही कॅबिनेट मंत्री होता . सभागृहामध्ये उत्तर देत असतांना काय उत्तर द्यावयाचे यासंबंधी कॅबिनेटमध्ये अगोदर चर्चा होत असते. गडचिरोली जिल्हयातील जास्तीत जास्त रिक्त पदे भरण्यात आली पाहिजेत. अशा प्रकारच्या सूचना माननीय मुख्यमंत्र्यांनी काल मुख्य सचिवांना दिल्या आहेत. प्रशासनामध्ये थोडीशी कमतरता असतांनासुध्दा आदिवासीना वन हक्क जमिनीचे पट्टे देण्यामध्ये गडचिरोली जिल्हा महाराष्ट्रामध्ये पहिल्या क्रमांकावर आहे. गेल्या वर्षी 26 जानेवारीला सामाजिक न्याय अभियान त्या जिल्हयामध्ये सुरु केले होते. त्यावेळी दुर्गम भागातील 1 लाख 52 हजार लोकांनी वेगवेगळया योजनेखाली अर्ज केले होते. त्यापैकी 1 लाख 47 हजार अर्ज शासनाच्या वेगवेगळया विभागांनी मंजूर केले आहेत .अन्य कोणत्याही जिल्हयापेक्षा गडचिरोली जिल्हयातील प्रशासनाने ही कामे अधिक गतीने केलेली आहेत असा माझा विनम्र दावा आहे.कोठे तरी प्रशासनाकडून अनुकूलता निर्माण व्हावयास लागली आहे. दोन राज्याला जोडणा-या पुलासाठी केन्द्र सरकारने निधी देखील मंजूर केला आहे. त्या कामाची टेंडर प्रक्रियासुध्दा पूर्ण झालेली आहे.त्या भागात रस्ते करणे, दळणवळणाच्या सुविधा करणे, नागरी सुविधा वाढविणे, आरोग्य सुविधा आदिवासीपर्यत पोहोचविणे या संदर्भात प्रशासनाकडून अतिशय कसोशीने प्रयत्न सुरु आहेत. लोकशाहीला विरोध करणारा विचार नक्षलवादी मांडत आहेत त्याला सर्व राजकीय पक्षांनी एकत्र येऊन, लोकशाही पध्दतीने त्यांच्या चुकीच्या विचाराचे खंडण आपण करु शकलो, त्या भागातील विकासाला आपण गती देऊ शकलो, तरुण आदिवासीच्या मनामध्ये जर आपण विश्वास निर्माण करु शकलो तर अन्य कोणत्याही राज्यापेक्षा या जिल्हयातील नक्षल चळवळ नेस्तनाबूत करु शकतो असे मला निश्चितपणे वाटते. सभापती महोदय, त्या संदर्भातील काही अनुकूल परिणामसुध्दा आपल्याला आता पहावयास मिळत आहेत.

सभापती महोदय, 2009 च्या तुलनेने 2010 मध्ये शासकीय आणि सार्वजनिक मालमत्तेचे किती नुकसान झालेले आहे हे जर आपण पाहिले तर आपल्याला असे दिसून येईल की, 2009 च्या तुलनेने 2010 मध्ये केवळ 39 टक्के नुकसान झालेले आहे. 2009 मध्ये 52 पोलीस शहीद

2.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

झाले होते आणि 2010 मध्ये ही संख्या 10 वर आलेली आहे. या वर्षाच्या पहिल्या दोन महिन्यातील आकडेवारी जर आपण पाहिली तर आपल्याला असे दिसून येईल की,मागील दहा वर्षा पेक्षा या वर्षीच्या पहिल्या दोन महिन्यामधील हे प्रमाण अत्यंत कमी आहे. एका बाजूला पोलिसांचे अभियान वाढलेले असून विकास कामानी गती घेतलेली आहे, लोक साथ द्यावयास लागले आहेत, तसेच विकासाच्या बाबतीत ज्या काही उणिवा आहेत त्या निश्चितपणे दूर केल्या जातील.शासन या संदर्भात अत्यंत सतर्क तर आहेच परंतु देशातील अन्य राज्यामध्ये नक्षलवाद डोके वर काढत आहे अशा स्थितीत नक्षलवाद्यांच्या तावडीतून गडचिरोली जिल्हयाला मुक्त करण्याचे काम संपूर्ण देशामध्ये सर्वात अधिक महाराष्ट्रातच केले जाईल याचा मला निश्चितपणे विश्वास आहे.

सभापती महोदय, आज मोठया प्रमाणावर नक्षल चळवळीमध्ये जबरदस्तीने जे लोक गेले होते किंवा अविचाराने गेले होते ते तरुण सुध्दा सरेन्डर व्हावयास लागले आहेत.आम्हाला त्या भागातील माहिती पूर्वी फारशी मिळत नव्हती परंतु आता ती माहिती देखील मिळू लागली आहे.सभापती महोदय, पोलिसांच्या जोडीला केन्द्र सरकारने त्यांच्या बटालीयन्स दिल्या आहेत ब-याच दिवसापासून आम्ही हेलिकॉप्टरची मागणी करीत होतो . तिचीसुध्दा पूर्तता झालेली आहे. गरजेच्या वेळी कुमक पाठविण्यासाठी, एखादा जवान जर जखमी झाला असेल तर त्याला तातडीने रुग्णालयात पोहोचविण्यासाठी हेलिकॉप्टरची आवश्यकता होती आता त्याची देखील पूर्तता झालेली आहे.

सभापती महोदय, गडचिरोली जिल्हयाकडे एका वेगळया दृष्टीकोनातून पाहण्याचे सर्वच विभागाने ठरविलेले असल्यामुळे आतापर्यंत खोळंबलेली विकास कामे निश्चितपणे गतीमान होतील असे आश्वासन मी सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांना देतो. अनेक वेळा चर्चेच्या निमित्ताने त्या माहिती सांगत असतात . ज्या संपादकांच्या आणि सिनिअर पत्रकाराच्या नावाचा त्यांनी उल्लेख केला होता त्यांच्याशी माझ्या वेळोवेळी गाठीभेटी होत असतात, त्यांचेही मार्गदर्शन आम्ही घेत आहोत. मागील सहा महिंन्यात पोलिसांनी आणि प्रशासनाने घेतलेल्या मेळाव्याची संख्या पाहिली तर उत्स्फूर्तपणे आदिवासी या मेळाव्यांमध्ये सहभागी होत आहेत असे दिसून येईल.

नंतर श्री.सरफरे

अशुद्धीत प्रत / शीघ्रलिपीसाठी नाही

श्री.आर.आर. पाटील...

प्रशासन आणि आदिवासी यांच्यामध्ये जवळीक निर्माण करण्याचा आमचा प्रयत्न आहे त्यामध्ये शासनाला चांगल्या प्रकारचे यश मिळायला लागले आहे. त्यामुळे हे संकट मोठे असले तरी या बाबतीत शासन अतिशय संवेदनशीलपणे पहात असल्यामुळे काही काळातच हे संकट आपल्याला नष्ट झालेले दिसेल. तेथील संपूर्ण आदिवासी समाज आपल्या प्रक्रियेबरोबर आणि शासनाच्या विचाराबरोबर आलेला असेल.

सभापती महोदय, चिडून जाऊन म्हणा किंवा नैराश्यामधून काही कृत्ये केली जातात. माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, मी आपल्या एका गोष्टीशी सहमत आहे. याचे कारण शासनाकडून तशा प्रकारच्या सूचना दिल्या होत्या. मध्यंतरी कुठे तरी रस्त्यावर झाड तोडून टाकले जायचे, त्यानंतर पोलिसांना फोन केले जायचे आणि पोलिसांच्या वाटेवर कुठेतरी सुरुंग लावले जायचे, त्यांचे स्फोट करुन खूप मोठी मनुष्य हानी केली जायची. सन 2009 मध्ये अशा घटनेमुळे अधिक मनुष्यहानी झाली आहे. सभापती महोदय, झाड त्यांनीच तोडायचे, फोन त्यांनीच करावयाचा आणि घटनास्थळी पोलीस पोहोचतांना ते ट्रॅकमध्ये फसले पाहिजेत अशाप्रकारची व्यूहरचना त्यांनीच करावयाची. या करिता काही सावधानतेच्या उपाय योजना करीत असतांना व सुरक्षिततेच्या दृष्टीने काही आखणी करीत असतांना त्या ठिकाणी रस्ता मोकळा केल्याशिवाय, रोड ओपनिंगशिवाय पोलिसांनी घटनास्थळी तातडीने जाऊ नये अशा शासनाने सूचना दिल्या आहेत. यामध्ये आपण खूप मोठे मनुष्यबळ गमाविले असून आणखीन प्राणहानी होऊन पोलिसांचे मनोबल खचता कामा नये याकरिता शासनाने काही उपाय योजना केली आहे. काही ठिकाणी पोलिसांना पोहोचण्यास विलंब होत आहे. परंतु त्याचबरोबर मी हे देखील आपल्या लक्षात आणून देतो की, अनेक पध्दतीच्या मोहिमा, कोंबिंग ऑपरेशन्स पोलिसांनी यशस्वीपणे राबविल्या आहेत. काही आदिवासींच्या नेत्यांना नक्षलवाद्यांनी पळवून नेल्यानंतर त्यांचा पाठलाग करुन त्या नेत्यांना ताब्यात घेण्यामध्ये पोलिसांनी यश मिळविले आहे.

सभापती महोदय, या संपूर्ण नक्षलवादी चळवळीमध्ये शेजारची राज्ये आपल्या बरोबर सतत संपर्क साधून आहेत आणि आपण देखील त्यांच्या सान्निध्यात असतो. आज एकमेकांच्या सहकार्याने पोलीस त्या ठिकाणी व्यवस्थितपणे काम करीत आहेत. सर्व यंत्रणा कार्यरत आहेत, परंतु त्यामध्ये सुध्दा थोडया उणिवा आहेत त्या नजिकच्या काळात आम्ही दूर करु. गडचिरोली जिल्ह्यामध्ये विकासाच्या बाबतीत बॅकलॉग निर्माण झाला आहे, हा जिल्हा प्रत्येक क्षेत्रामध्ये मागे राहिला आहे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री. आर. आर. पाटील ...

तो संपूर्ण बॅकलॉग दूर केला जाईल. निधीच्या कमतरतेचा प्रश्न गडचिरोली जिल्ह्यापुढे राहणार नाही या गोष्टीची मी ग्वाही देतो आणि आश्वासन देतो. या जिल्ह्यामध्ये खूप मोठी खनिज संपदा असून तेथील पर्यावरणाला हात न लावता किंवा पर्यावरणाचे नुकसान होऊ न देता तेथील खनिज संपत्तीवर त्या ठिकाणीच प्रक्रिया होऊन तेथील रोजगार निर्मितीमध्ये वाढ होईल यादृष्टीने शासनाने उपाय योजना हाती घेतली आहे. सभापती महोदय, अशाप्रकारच्या अनेक असलेल्या उपाय योजना या अशासकीय ठरावाच्या निमित्ताने सांगणे योग्य नाही. सरकारने वेळोवेळी घेतलेल्या निर्णयाची माननीय सदस्यांना पूर्णपणे माहिती व जाणीव आहे. म्हणून मी फक्त एवढीच सूचना करतो की, आपण केलेल्या सूचनांची अंमलबजावणी करण्यास शासनाने यापूर्वीच सुरुवात केली आहे. ज्या निरपराध माणसांबाबतची माहिती आपणाकडे आहे त्या बाबत पुन्हा तपास करण्याची भूमिका शासन निश्चितपणे घेईल. माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांना एवढेच सांगतो की, कोणत्याही निरपराध माणसाला दोषी ठरविण्याचे काम पोलीस दलाकडून केले जाणार नाही. एखादा अधिकारी कुठे चुकला असेल तर वरिष्ठ अधिकाऱ्यांना त्याबाबत तपासणी करण्यास सांगू. तसेच, जे दोषी आहेत त्यांना सोडण्याची भूमिका घेतली जाणार नाही आणि जे निरपराध आहेत त्यांना त्रास देण्याची भूमिका घेतली जाणार नाही. अशाप्रकारची ग्वाही या सभागृहाला देतो आणि माननीय सदस्यांच्या प्रत्येक प्रश्नाबाबत मी अनुकूल भूमिका घेतली असल्यामुळे आपण हा ठराव मागे घ्यावा अशी मी विनंती करतो.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. मंत्री महोदयांनी उत्तर देतांना मला मध्ये अडवू नका असे सांगितल्यामुळे मी थांबलो. त्यांच्या चांगुलपणाबद्दल माझ्या मनामध्ये शंका नाही. परंतु अति चांगुलपणा हा कधी कधी धोकादायक असतो. त्यांनी उच्चारलेले शेवटचे "अनुकूल" हे वाक्य मला अधिक धोकादायक वाटते. माननीय सदस्यांनी जी भूमिका मांडली नाही ती तुम्ही मांडली म्हणून मला अधिक धोका वाटतो. मध्य प्रदेश आणि छत्तीसगडमध्ये ज्या पध्दतीने शोषणाविरुध्द उभ्या राहणाऱ्या कार्यकर्त्यांना नक्षलवादी ठरवून गोळया घातल्या जात आहेत, त्याचा छळ होत आहे. त्याचे समर्थन तुमच्याकडून होत आहे याचे मला अधिक दु:ख होत आहे. तुम्ही चुकून केले असेल किंवा तुम्हाला तशी माहिती दिली असेल परंतु तुम्ही कृपा करुन समर्थन करु नका.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील . . ..

तेथे आदिवसींचे शोषण करणारी जी मंडळी आहेत, त्यांची ती मोहीम आहे. त्या मोहिमेचे आपल्या कडून समर्थन होता कामा नये. आपण एक भूमिका घेतली की, जे निरपराध आहेत, त्यांना त्रास दिला जाणार नाही. पण अडचण अशी आहे की, या राज्यामध्ये नथुरामचे नाटक मोकाट आहे पण चळवळीतील सगळे कार्यकर्ते श्री.विनायक सेन यांच्याप्रमाणे तुरुंगात आहेत ही अडचण आहे. आपण अनेक वेळा असे आश्वासन दिले आहे की, त्यांना त्रास देणार नाही. पण अडचण अशी आहे की, सांगलीमधील तीन मुलांना तुरुंगातून बाहेर काढले पण त्यांच्यावरील खटले काढण्यात आलेले नाहीत. श्री.सुधीर ढवळे हे अजूनही तुरुंगामध्ये आहेत आणि अशा अनेक कार्यकर्त्यांची उदाहरणे देता येतील. मघाशी सन्माननीय सदस्यांनी देखील एक उदाहरण दिलेले आहे, त्यांच्याबद्दल काय? माझा मुख्य आक्षेप हा छत्तीसगढ आणि मध्य प्रदेशच्या संदर्भातील तारीफ आपल्याकडून होऊ नये एवढीच माझी अपेक्षा आहे किंवा मग आपण असे सांगावे की आमचे आणि त्यांचे धोरण एक आहे.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, मी तारीफ केलेली नाही. ही संकल्पना ज्यांनी यशस्वी केली त्या दंडकारण्य समितीने शासन पुरस्कृत नव्हे तर त्यांनी आपण होऊन जो मार्च काढला होता, त्याला गावा-गावातील लोकांनी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिला हे मी पूर्ण माहितीच्या आधारावर बोलत आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मघाशी येथे असे सांगण्यात आले की, नथुराम मोकाट फिरत आहे म्हणजे मला काही कळले नाही. बोर्डाने स्क्रुटीनी करुन त्या नाटकाला मान्यता दिलेली आहे. पण श्री.विनायक सेन हा नक्षलवादी आहे की नाही ?

श्री.कपिल पाटील : नाही.

श्री.दिवाकर रावते : तुम्ही हे कोण ठरविणार ?

श्री.कपिल पाटील : हे तुम्ही कसे ठरविणार ?

श्री.दिवाकर रावते : हे मी ठरवत नाही. मी बोलत नाही.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, श्री.विनायक सेन हे छत्तीसगढ मध्ये आहेत. त्यामुळे ते नक्षलवादी आहेत की नाही हे तुम्हालाही माहिती नाही, मलाही माहिती नाही आणि सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनाही माहिती नाही. सभापती महोदय, कशासाठी बोलावयाचे. जर माहिती हवी असेल तर छत्तीसगढच्या विधानसभेमध्ये जाऊन बोलू.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर : सभापती महोदय, हे सर्व रेकॉर्डवरुन काढून टाकावे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, रेकॉर्डवरुन कशासाठी काढावयाचे ? मी आक्षेपार्ह काय बोललो आहे ? मी अपशब्द वापरत नाही, गैरही बोलत नाही आणि असंसदीयही बोलत नाही.

(सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते व सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील आपसात बोलतात.)

तालिका सभापती (श्री.मोहन जोशी) : सन्माननीय सदस्यांनी आपसात बोलू नये.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, महाराष्ट्रातील नक्षलवाद हा कोणत्याही पक्षाचा नाही किंवा कोणत्या सरकारचाही नाही. माझीही हीच भूमिका आहे. हा जो विषय आहे, त्याबाबतीत त्यांनी सहानुभूतीने मुद्दे मांडले तेही आम्ही ऐकले. तसेच आमचे ही मुद्दे आहेत. आम्ही माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील यांच्याशी नेहमी बोलतो की, ज्यांना संशयावरुन छळले जात आहे ते कमी करावे. तसेच जे गुन्हेगार असतील त्यांच्याबाबतीत सुध्दा तिखटपणा घेऊ नये. कारण ते सगळे तेथील स्थानिक नागरिक आहेत. नक्षलवादाच्या विरोधात तुम्ही पालकमंत्री म्हणून काम करीत आहात. नक्षलवाद हा आपल्या सर्व पक्षांचा विषय आहे. जर सरकार नक्षलवादाशी सामना करीत असेल मग ते कोणतेही सरकार असू दे. त्यासाठी आपण सर्व पक्षांनी एक होऊन या महाराष्ट्रावरील संकट दूर करण्यासाठी विधायक मार्गानेच काम केले पाहिजे. मला माननीय गृह मंत्री श्री.आर.आर.पाटील साहेब यांना नक्षलवादाच्या संदर्भात विनंती करावयाची आहे की, प्रत्येक अधिवेशनामध्ये तुमच्या वतीने सुमोटो तेथे जे काही झाले असेल त्याबाबत चर्चा घडावी. आता तेथील जनतेला शासनाच्या एकेक योजनेच्या माध्यमातून आधार मिळालेला आहे. मी स्वत: त्या भागामध्ये जात असतो, तेथील लोकांशी संपर्क साधत असतो. त्यामुळे याठिकाणी सांगत आहे. आता तेथील जनता हळूहळू लांब जावयास लागली आहे अशा वेळी सर्व पक्षांनी एकत्र येऊन काम केले तर या महाराष्ट्रावरील संकट टळू शकेल. बाकीच्या राज्यामध्ये काय होत आहे तो त्या राज्याचा विषय आहे एवढीच मी विनंती करु इच्छितो.आपण सर्वांनी मिळून तेथील नक्षलवादाचा बिमोड करण्यासाठी सरकारच्या योग्य प्रयत्नांना समर्थन दिले पाहिजे अशी माझी भूमिका आहे.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्यांच्या भूमिकेचे स्वागत करतो.

श्रीमती शोभा पडणवीस : सभापती महोदय,मी गेल्या दोन-तीन वर्षापासून भामरागड मधील ज्या 22 गावांचा उल्लेख करीत आहे, त्यांचा आजही विकास झालेला नाही. म्हणून याठिकाणी त्या

श्रीमती शोभा फडणवीस . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

22 गावांचा विकास करण्याच्या बाबतीत हमी देण्यात यावी. मी जेव्हा मल्लमकोड या गावामध्ये गेले होते. तेथील 22 तरुणांना पोलिसांनी मारले होते.त्याठिकाणी सिंचनाच्या तलावाची मागणी करण्यात आलेली आहे. या कामाला सुरुवात केली होती, परंतु ते काम बंद झालेले आहे. म्हणून माझे असे म्हणणे आहे की, आदिवासींना काय पाहिजे, तर रस्ता, पिण्याचे पाणी, सिंचनाचा तलाव आणि त्याचबरोबर त्यांच्या रोजीरोटीचा प्रश्न देखील सुटला पाहिजे. त्याठिकाणी आपण आदिवासींसाठी आश्रमशाळा दिलेल्या आहेत. पण तेथील जेवणाच्या हॉलमध्ये बकऱ्या चरतात आणि बाथरुम मध्ये कोंबड्या बांधल्या जात असतील तर काय बोलावयाचे, असा प्रश्न आहे.

यानंतर कु.थोरात.. . ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस.....

म्हणून हा केवळ गृह विभागाच्या बाबतीतील ठराव नाही. आदिवासीं बरोबर चर्चा करुन सगळयाच सिस्टिममधून आदिवासींच्या विकासाचा विचार होण्याची गरज आहे. आदिवासी भागातील सिंचनाचा, रस्त्यांचा आणि पाण्याचा प्रश्न सोडविण्याच्या दृष्टिकोनातून शासनाने प्रयत्न करावा आणि हा प्रश्न सोडवावा अशी या ठिकाणी विनंती करुन, मंत्री महोदयांच्या विनंती वरुन मी हा ठराव मागे घेत आहे. भविष्यात अशा प्रकारचा ठराव या सभागृहात येण्याची वेळ येणार नाही, एवढीच अपेक्षा करुन मी माझा ठराव मागे घेण्यास सभागृहाची अनुमती मागतो.

तालिका सभापती (श्री. मोहन जोशी) : सभागृहाच्या अनुमतीने ठराव मागे घेण्यात आला.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: औचित्याचे मुद्दे

तालिका सभापती : सन्माननीय सदस्य श्री. चंद्रकांत पाटील यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, कोल्हापूर महानगरपालिका 1972 ला शासनाच्या अधिसूचनेने निर्माण झाली. सन 1972 ते 2010 पर्यंत जवळ जवळ 38 वर्षामध्ये या शहराची हद्दवाढ झालेली नाही. कोल्हापूर महानगरपालिकेने दोन वेळा हद्द वाढीचा प्रस्ताव पाठविला परंतु शासनाने त्याची कुठलीही दखल घेतली नाही. त्यामुळे कोल्हापूर शहराची हद्दवाढ न झाल्यामुळे कोल्हापूर सारख्या शहराची लोकसंख्या ही 4 लाख 92 हजार येथ पर्यंतच रेंगाळत राहिलेली आहे. कोल्हापूर शहराची हद्दवाढ न झाल्यामुळे आणि लोकसंख्या न वाढल्यामुळे वारंवार केंद्र शासनाकडून येणारा निधी कोल्हापूर महानगरपालिकेला मिळत नाही, त्यामुळे मी या औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून शासनाचे लक्ष वेधू इच्छितो की, 1972 पासून आता पर्यंत कोल्हापूर शहराची हद्दवाढ न झाल्यामुळे ती हद्दवाढ होण्यासाठी शासनाने प्रयत्न करावेत,.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/

तालिका सभापती : सन्माननीय सदस्य श्री. केशवराव मानकर यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. केशवराव मानकर : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, शेतकऱ्यांचा अत्यंत गभीर असा हा प्रश्न आहे. गोंदिया आणि भंडारा जिल्ह्यात रब्बी पिकांची रोवणी सुरु झालेली आहे. या ठिकाणच्या शेतकऱ्यांची रासायनिक खताची मोठया प्रमाणात मागणी आहे. मागे सुफला आणि युरिया खताची मोठया प्रमाणात मागणी असून सुध्दा या जिल्ह्यामध्ये रासायनिक खतांचा पुरवठा केला गेला नाही. मागील 18 फेब्रुवारी, 2011 रोजी गोंदिया आणि भंडारा जिल्ह्याला फक्त 900 टन रासायनिक खतांचा पुरवठा करण्यात आला होता. परंतु आता मार्च महिना संपला असून एप्रिल महिना सुरु झालेला आहे. तरी देखील खताची रॅक अद्याप प्राप्त झालेली नाही. म्हणून मला शासनाला विनंती करावयाची आहे की, रासायनिक खतांच्या बाबतीत शेतकऱ्यांसमोर प्रश्न निर्माण झालेला आहे. म्हणून मार्च महिन्याचा आणि एप्रिल महिन्याचा कोटा पंधरा एप्रिलपूर्वी या ठिकाणी पाठविण्यात यावा, जेणे करुन रासायनिक खतांचा जो काळा बाजार होत आहे तो थांबेल तसेच शेतकऱ्यांच्या मनामध्ये रासायनिक खतांच्या अभावी पिके नष्ट होण्याची जी भीती निर्माण झालेली आहे ती दूर करण्यासाठी गोंदिया जिल्हयात लवकरात लवकर खतांचा पुरवठा करण्यात यावा, अशी मी शासनाला विनंती करतो.

सभापती महोदय, या संदर्भात मंत्री महोदय तसेच प्रधान सचिवांना सुध्दा पत्र लिहिलेले आहे. त्या पत्राची शासनाने तत्काळ दखल ध्यावी, अशा प्रकारची मी विनंती करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती : सन्मानीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, कोकणात ओरोस येथे म्हाडा बांधत असलेल्या कमी उत्पन्न गटातील वर्गदारांना कमीत कमी किंमतीमध्ये म्हाडाच्या सदनिका मिळण्याकरिता दिनांक 26/3/2011 रोजी सर्व वृत्तपत्रातून जाहिराती देऊन त्या जाहिराती द्वारे अर्ज विक्री करण्याचे ठिकाण मुंबई येथे दिलेले आहे. कोकणातील कमी उत्पन्न गटातील मागणी धारकांनी त्याच ठिकाणी अर्ज मिळण्याची मागणी केली असता, जिल्हाधिकाऱ्यांनी अर्ज विकीसाठी आपल्या कार्यालयात जागा उपलब्ध करुन देण्याचे मान्य केलेले आहे. हा प्रकल्प सिंधुदुर्ग जिल्ह्यातील असल्याने अर्जाची उपलब्धता सिंधुदुर्ग जिल्हयात होण्याकरिता आणि सिंधुदुर्ग जिल्हयातील लोकांना सदनिका मिळण्याकरिता त्या ठिकाणी अर्ज विक्री केंद्र सुरु करावे, अशा प्रकारचा मुद्दा मी, या औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून या ठिकाणी मांडीत आहे.

...5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/

तालिका सभापती : सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी जिल्हयाला जोडणारा सागरी महामार्ग आणि या महामार्गावर नाहटे-जैतापूर हा भूसंपादन प्रश्नामुळे ॲप्रोच रोड न झाल्यामुळे आचरा, मालवण, देवगड तालुक्यातील विजयदुर्ग, पडेल या भागातील लोकांना रत्नागिरी 40 कि.मी. अंतराने कमी होऊन मुंबईचे अंतरही 40 कि.मी. ने कमी झाल्याने, एस.टी. प्रवासाचे तिकीट कमी होण्याची शक्यता असल्याने या रस्त्यावर असलेला ॲप्रोच ब्रिज लवकरात लवकर तयार होऊन तो वाहतुकीसाठी खुला करण्यात यावा, त्याचप्रमाणे आंबेरी, दांडा-पांगेरी येथे असलेल्या ब्रिजचे काम पूर्ण झाले असून त्याच्या रंगरंगोटीचे कामही पूर्ण झालेले आहे. तेव्हा या ब्रिजवरुन वाहतूक करण्याकरिता सार्वजनिक बांधकाम विभागाने एस.टी.ला लागणारा दाखला द्यावा. या पुलावरुन वाहतूक सुरु झाली तर या दोन जिल्ह्यातून जाणाऱ्या रस्त्याचें अंतर कमी होणार आहे. त्यामुळे हा ब्रिज लवकरात लवकर व्हावा आणि त्यातून वाहतूक सुरु व्हावी, अशा प्रकारचा मुद्दा मी या औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून मांडीत आहे.

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती (श्री. मोहन जोशी) : सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. राज्यातील अनुदानित संस्थांमधील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वेळेवर पगार होत नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. म्हणून शासनाने या संदर्भामध्ये सर्व विभागीय, क्षेत्रीय अधिकाऱ्यांना सूचना दिलेल्या आहेत की, कोणत्याही परिस्थितीमध्ये 31 मार्च पूर्वी मायनस बीडीएस घेऊन सर्वांचे नियमित वेतन आणि थकीत वेतन तातडीने द्यावे. अशा प्रकारचे आदेश संचालक, महाराष्ट्र राज्य यांनी दिलेले आहेत. जे अधिकारी शिक्षकांना वेळेवर वेतन देणार नाहीत त्या अधिकाऱ्यांवर तातडीने कारवाई करण्यात येईल, अशा प्रकारचे निर्देश सुध्दा शासनाने दिलेले आहेत. मुंबईमध्ये अद्यापपर्यंत अनेक शाळांचे पगार झालेले नाहीत. ठाणे आणि रायगड जिल्ह्यामध्ये सुध्दा अनेक शाळांचे पगार झालेले नाहीत. काल 31 मार्च हा आर्थिक वर्षाचा शेवटचा दिवस होता. आज मला अनेक शाळांचे फोन आले. मी संबंधित अधिकाऱ्यांकडून माहिती घेतली. त्यांच्याकडे शिल्लक असलेली रक्कम काल रात्री त्यांनी शासनाला समर्पित केली पण शिक्षकांचे पगार मात्र दिले नाहीत. म्हणून ज्या ज्या जिल्ह्यामध्ये शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन आणि थकीत वेतन दिले गेले नाही त्याला जे अधिकारी जबाबदार असतील त्यांच्यावर कारवाई होण्याच्या संदर्भात आणि या शिक्षकांचे व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन तातडीने होण्याच्या संदर्भात शासनाने तातडीने उपाययोजना करावी यासाठी मी हा औचित्याचा मुद्दा मांडत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती : सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. आज जेव्हा औचित्याचे मुद्दे पुकारले गेले त्या वेळी आम्ही सभागृहामध्ये उपस्थित नव्हतो तरी देखील आपण आम्हाला औचित्याचे मुद्दे मांडण्यास अनुमती दिली त्याबद्दल मी आपली मन:पूर्वक आभारी आहे.

सभापती महोदय, माझा जो औचित्याचा मुद्दा आहे तो उद्याच्या अगोदर सभागृहात उपस्थित करणे गरजेचे होते त्यामुळे थोडी प्रतीक्षा करत थांबावे लागले, पण हरकत नाही. उद्या वानखेडे स्टेडियमवर वर्ल्ड कप क्रिकेटचा अंतिम सामना होणार आहे. मुंबई येथील 20 वर्षाची मॉडेल पूनम पांडे यांनी जाहीर केलेले आहे आणि त्याबद्दल आज माहिती सुध्दा आलेली आहे की, जर भारतीय संघाने तो सामना जिंकला तर ती वानखेडे स्टेडियम येथे स्वत:चे नग्न अवस्थेमध्ये प्रदर्शन करणार आहे. इतकेच नव्हे तर तिने वृत्तपत्र प्रतिनिधींना मुलाखतीव्दारे सुध्दा कळविले आहे. तिने हेही जाहीर केले आहे की, याला तिच्या आई-वडिलांचा विरोध नाही. तिच्या फेसबूकवर तिने ही प्रसिध्दी केलेली आहे. आज तिने मोठ्या प्रमाणात असे कळविले आहे की, ती आयसीसीची सुध्दा परवानगी मागणार आहे. म्हणून मी या औचित्याच्या मुद्याव्दारे या ठिकाणी मागणी करते. खरे तर माननीय गृह मंत्री सभागृहात उपस्थित असताना हा औचित्याचा मुद्दा मांडता यावा एवढ्यासाठी माझा मघापासून प्रयत्न चालू होता. कारण भारतासाठी एवढ्या गौरवाचा सामना असताना तसेच संपूर्ण देशामध्ये आनंद, प्रतिष्ठा आणि सन्मान या दृष्टीने या सामन्याकडे पाहिले जात असताना तसेच ज्या कार्यक्रमासाठी स्वत: राष्ट्राध्यक्ष येणार आहेत अशा ठिकाणी जर कोणी कायदा, नैतिकता याचा भंग करीत असेल तर ती शोभादायक गोष्ट नाही. म्हणून मी या औचित्याच्या मुद्याव्दारे या अयोग्य गोष्टीकडे शासनाने लक्ष वेधत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती : सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी आणखी एक औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. आपण स्वत: पुण्यातील विधान परिषदेचे सदस्य असल्यामुळे टोलच्या संदर्भात आपण जाहीर केलेले आहे. मी नवीन काही मांडणार नाही पण ही टोलवाढ रद्द करावी म्हणून मुंबई पुणे एक्स्प्रेस-वे वर शिवसेनेचे जिल्हाप्रमुख श्री. मच्छिंद्र खराडे यांनी रास्ता रोको आंदोलन केले. मुंबई-पुणे एक्स्प्रेस-वे अर्धा तास बंद होता. दुर्दैवाने मुंबईकरांना आणि पुणेकरांना सातत्याने आंदोलने करावी लागत असतील तर त्या संदर्भात आपण निदेश द्यावेत.

तालिका सभापती : मी याच विषयावर औचित्याचा मुद्दा उपस्थित केला होता त्यावर माननीय सभापतींनी या संदर्भात शासनाला निदेश दिलेले आहेत.

डॉ. नीलम गोऱ्हे : टोलवाढ रद्द होणार आहे काय ?

तालिका सभापती : माननीय सभापतींनी या संदर्भात शासनाला निदेश दिलेले आहेत.

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती : सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. संजय केळकर : सभापती महोदय,आमदार निधीच्या संदर्भामध्ये माझा औचित्याचा मुद्दा आहे. अर्थसंकल्पावरील चर्चेच्या उत्तरामध्ये आमदार निधी आणखी 50 लाख रुपयांनी वाढलेला आहे. हा आमदार निधी आम्ही वेगवेगळ्या कामांवर खर्च करतो. विशेषत: ज्यांचे 4-4, 5-5 जिल्ह्यांचे मतदारसंघ आहेत त्या त्या ठिकाणी आम्ही जी कामे नियोजन मंडळाला सुचवितो त्या कामांचे एस्टिमेट्स येत नाहीत, वेळेवर प्रोग्रेस होत नाही त्यामुळे निधी समर्पित होण्याची फार मोठी भीती असते. असा अनुभव अनेक आमदारांचा असेल. त्यामुळे त्या त्या जिल्ह्याचे जे नियोजन मंडळ असते आणि जी संबंधित एजन्सी असते, मग सार्वजनिक बांधकाम विभाग असेल, महानगरपालिका असेल,

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर....

त्या माध्यमातून एस्टिमेट वेळेवर येत नाही, त्याला किती निधी द्यावयाचा ते ठरत नाही. त्यामुळे निधी समर्पित करण्याचे प्रकार दरवर्षी होत आहेत. मी ठाणे महानगरपालिकेला 2010 मध्ये महिलांच्या वसतिगृहात बोअरवेल घेण्याचे काम सुचविले होते. त्या वसतिगृहाचा महानगरपालिकेला 8 महिने पत्ताच मिळत नव्हता. त्या बाबत खूप पाठपुरावा केल्यानंतर मागील महिन्यामध्ये त्या कामाचे एस्टिमेट पाठविले आहे. 31 ही तारीख काल होऊन गेलेली आहे. माझ्या मतदार संघात मी सुचविलेल्या किंवा अन्य सन्माननीय सदस्यांनी सुचविलेल्या कामांमध्ये 8-8 महिने एस्टिमेट मिळण्यासाठी दिरंगाई झाली असेल तर त्या कामाचा निधी समर्पित न होता नवीन आर्थिक वर्षात शिल्लक वापरण्यास शासनाने परवानगी द्यावी अशी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाला विनंती करतो.

2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

तालिका सभापती : सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. महाराष्ट्र राज्यामध्ये अनधिकृत बांधकामे होणे हा विषय नवीन नाही. त्याचे उत्तम उदाहरण या औचित्याच्या मुद्याद्वारे मी मांडत आहे. नांदेड शहरामध्ये साई डेव्हलपर्स यांचे अनधिकृत बांधकाम सुरु आहे. या अनधिकृत बांधकामा बाबत अधिनियम,1966 च्या कलम 53 (1) अन्वये सदर इमारतीचे बांधकाम ताबडतोब पाडण्यात यावे आणि अनधिकृत उपयोग बंद करावा तसेच बांधकाम बंद ठेवावे असा आदेश दिलेला आहे. शासनाच्या अधिनियमानुसार ही कारवाई करावयास पाहिजे होती. परंतु दुर्दैवाने आज एक महिना झाला तरी या विकासकावर कोणतीही कारवाई झालेली नाही, सदर बांधकाम निर्धोकपणे सुरु आहे. यासाठी महानगरपालिकेचे अधिकारी अर्थपूर्ण व्यवहार करुन विकासकाला पाठीशी घालत आहेत. ज्या विकासकाने अधिनियमातील तरतुदीला धुडकावले आहे त्या विकासकावर ताबडतोब कारवाई व्हावी आणि यासाठी प्रशासकीय सेवेतील जे अधिकारी जबाबदार आहेत त्यांच्यावर सुध्दा कारवाई व्हावी व कलम 53 (1) चे पालन व्हावे, अशी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाला विनंती करीत आहे.

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

विशेष उल्लेखाच्या सूचना

पृ.शी.: श्रीवर्धन तालुक्यातील विविध पदे रिक्त असणे

मु.शी.: श्रीवर्धन तालुक्यातील विविध पदे रिक्त असणे याबाबत श्री.संजय केळकर, वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

तालिका सभापती : सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

श्रीवर्धन (जि.रायगड) तालुक्यातील महसूल विभागाअंतर्गत इंदिरा आवास योजना या खात्यात 5 कर्मचारी तसेच बोर्डी पंचायत व वाळवटी येथे मंडल अधिकारी तर कोडवली, दिघी, जसवली व मर्वे येथील तलाठी पदाबरोबरच तहसीलदार यांच्या शासकीय वाहनावरील वाहन चालकांसह एकंदरीत 21 पदे रिक्त आहेत. ही पदे रिक्त असल्याने जनतेची कामे खोळंबलेली आहेत. श्रीवर्धन तालुका अति दुर्गम असल्याने दूर दूरवर वाड्या, पाडे व गावे वसलेली आहेत. अशा ठिकाणी तातडीच्या शासकीय कामासाठी जावयाचे असल्यास तहसीलदार स्वत:च जीप चालक बनतात. खडतर रस्त्याने वाहन चालवावे लागू नये म्हणून शासकीय दौरच होत नाहीत. पर्यायाने ग्रामीण व अति दुर्गम भाग विकास कामापासून वंचित रहात आहे. तालुक्याच्या विकासाच्या दृष्टीने ही बाब घातक आहे. तहसील कार्यालयातील रिक्त पदे प्राधान्यक्रमाने भरण्यात यावीत यासाठी सदरची बाब मी विशेष उल्लेखाद्वारे मांडत आहे.

अशुद्धीत प्रत / शोधनीसाठी नाही

NTK/

पृ.शी.: राज्यातील प्रकल्पग्रस्तांच्या कुटुंबातील व्यक्तींना नोकऱ्या न मिळणे

मु.शी.: राज्यातील प्रकल्पग्रस्तांच्या कुटुंबातील व्यक्तींना नोकऱ्या न मिळणे याबाबत श्री.केशवराव मानकर वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

तालिका सभापती : मा□□य सदस्य श्री.केशवराव मानकर यां□ विशेष उल्ले□ संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री.केशवराव मानकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ संबंधीची सूच□ मांडतो.

"राज्यातील अनेक प्रकल्पग्रस्त, त्यांची संपूर्ण जमीन तलावात, धरणात आणि कालव्यात गेल्यामुळे पूर्णपणे बेरोजगार झाले असणे, त्यामुळे त्यांच्या जीवनाचा आधार हिसकावल्यामुळे त्यांना हलाखीचे जीवन जगावे लागत असणे, पूर्वीपासून आरक्षणामध्ये 3 टक्के भूकग्रस्तांना आणि 2 टक्के प्रकल्पग्रस्तांना नोकरी देण्याचे प्रावधान असल्यामुळे प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांना नोकरी मिळणे अडचणीचे होणे, अनेक प्रकल्पग्रस्तांची जमीन प्रकल्पात जाऊन 20 ते 25 वर्षे लोटूनही त्यांच्या कुटुंबातील व्यक्तींना योग्यता असूनही नोकरी न मिळणे, त्याचप्रमाणे वयाची 45 वर्षे ओलांडणाऱ्या प्रकल्पग्रस्त उमेदवाराच्या कुटुंबातील व्यक्तींना नोकरीसाठी अर्ज करता येऊ शकणे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर...

परंतु त्यांना प्रकल्पग्रस्त असल्याचा नवीन नोंदणी क्रंमांक घेणे आवश्यक असणे, त्यामुळे त्यांचा क्रमांक मागे आल्यामुळे नोकरी मिळणे पुन्हा त्रासदायक ठरणे, शासनाने 2009च्या अधिवेशनात, जे उमेदवार 45 वर्षाची वयोमर्यादा ओलांडलेले असतील त्यांच्या कुटुंबातील व्यक्तींना नोकरीसाठी जुना नोंदणी क्रमांक गृहीत धरुन नोकरी देण्यात यावी, अशी मागणी मान्य करुन यापुढे उमेदवार जिल्ह्याबाहेरील रिक्त पदासाठी अर्ज करु शकत असल्याचे मान्य करणे, त्याचप्रमाणे प्रकल्पग्रस्तांच्या आरक्षणामध्ये तीन टक्क्या ऐवजी पाच टक्के आरक्षण करण्यात आले असून भूकंपग्रस्तांसाठी वेगळा जीआर काढण्याचा निर्णय शासन स्तरावर घेण्यात येणे, परंतु अद्यापही यासंबंधी कोणताही शासन निर्णय शासनाकडून काढण्यात न येणे, त्यामुळे वयाच्या 45 वर्षानंतर प्रकल्पग्रस्तांच्या कुटुंबातील सदस्याला जुन्या नोंदणीक्रमांकाच्या आधारावर नोकरीत सामावून घेणे आणि प्रकल्पग्रस्तांना नोकरीत सामावून घेणे आणि प्रकल्पग्रस्तांना नोकरीत दोन टक्क्याऐवजी पाच टक्के आरक्षण देण्यासंबंधीचा शासन निर्णय तात्काळ काढण्यासंबंधी शासनाने करावयाची कार्यवाही, यावर शासनाची प्रतिक्रिया."

(सभापतीस्थानी तालिका सभापती ॲड. उषा दराडे)

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : मेढा, ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग येथील मौनी महाराजांच्या मंदिराचा जीर्णोद्धार करण्याबाबत

मु. शी. : मेढा, ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग येथील मौनी महाराजांच्या मंदिराचा जीर्णोद्धार करण्याबाबत श्री.परशुराम उपरकर,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

तालिका सभापती : मा□□य सदस्य श्री.परशुराम उपरकर यां□ विशेष उल्ले□ संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. परशुराम उपरकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ संबंधीची सूच□ मांडतो.

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचे आध्यामिक गुरु श्री मौनी महाराज यांचे शिवकालीन मंदिर मालवण, जिल्हा सिंधुदुर्ग येथील मेढाभागामध्ये साडेतीनशे वर्षापासून म्हणजे इ.स.1664 सालापासून आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांनी ज्या थोर सत्पुरुषाचा आशीर्वाद घेतला त्या मौनी महाराजांचे हे मंदिर आहे. हे मंदिर रजनीकांत पुसे यांच्या मालकीचे असून पुसे घराण्याने शिवकालापासून या मंदिरातील मूर्तीची इमानेइतबारे सेवा केली आहे. ब्रिटीशांनी 1869 साली या मंदिरावर पुसे घराण्याचे शिक्कामोर्तब करुन या मंदिराच्या पूजाअर्चा व दीवाबत्तीसाठी वार्षिक 46 रुपये दिले होते. या मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी राज्य शासनाने आजपर्यन्त कोणत्याही प्रकारचा निधी उपलब्ध करुन दिलेला नाही. मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी पुसे घराण्याने शासनाला वेळोवेळी निवेदने देऊनही कोणतीही आर्थिक मदत केलेली नाही. म्हणून स्थानिक लोकवर्गणीतून मंदिराच्या जीर्णोद्धाराचे पहिल्या टप्प्याचे काम करण्यात आलेले आहे. मंदिराच्या जीर्णोद्धाराच्या दुस-या व तिस-या टप्प्यासाठी रु. 20 लाख निधीची आवश्यकता आहे. या मंदिरामध्ये दिवाबत्ती लावण्यासाठी या महागाईचा विचार करुन निधी देण्याची गरज आहे. तसेच या पुसे घराण्यातील लोकांना शासनाकडून मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी मदत करण्याची आवश्यकता आहे. यासाठी मी हा विशेष उल्लेख याठिकाणी मांडत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : कोल्हापूर जिल्ह्याच्या नियोजनातील आरोग्यासाठी असलेला निधी खर्च न होणे

मु. शी. : कोल्हापूर जिल्ह्याच्या नियोजनातील आरोग्यासाठी असलेला निधी खर्च न होणे याबाबत श्री.चंद्रकांत पाटील,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

तालिका सभापती : मा□□□य सदस्य श्री.चंद्रकांत पाटील यां□ विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. चंद्रकांत पाटील (पुणे विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ मांडतो.

"सन 2005 ते 2010 या सालामध्ये कोल्हापूर जिल्ह्याच्या नियोजनामध्ये आरोग्यासाठी असलेला निधी कोणत्याही वर्षी खर्च केला गेला नाही. प्रत्येक वर्षी आरोग्यासाठी जो निधी नियोजित केला होता तो परत गेला. म्हणून या अतिशय महत्वाच्या विषयाकडे मी विशेष उल्लेखाद्वारे शासनाचे लक्ष वेधीत आहे."

...4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशासकीय कामकाज -ठराव

(चर्चा पुढे सुरु)

पृ.शी.: ज्येष्ठ नागरिकांसाठी मूलभूत सोयी-सुविधा करणे

मु.शी.: ज्येष्ठ नागरिकांसाठी मूलभूत सोयी-सुविधा करणे या विषयावरील श्री. चंद्रकांत पाटील, वि.प.स. यांचा ठराव

श्री. चंद्रकांत पाटील (पुणे विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने खालील ठराव मांडतो.

"महाराष्ट्र राज्याची व देशाची प्रगती साधण्यासाठी ज्येष्ठ नागरिकांचा सहभाग मोलाचा ठरणे, ज्येष्ठ नागरिकांची काळजी घेण्याची गरज निर्माण होणे, त्यांना 60 वर्षापासूनच ज्येष्ठ नागरिक हे ओळखपत्र देणे, त्याच्या आधारे संपूर्ण देशात त्या ओळखपत्राचा फायदा होणे, त्यांना मूलभूत सोयीसुविधा उपलब्ध करणे, वृद्धावस्थेत होणा-या आजारावर उपचार करण्यासाठी, शासनाच्या जीवनदायी योजनेत त्यांचा समावेश करणे, यादी मधील दवाखान्यांमध्ये मोफत उपचार करणे, त्यांना वेगवेगळया सवलती देणे, त्यांना पेन्शन योजना लागू करणे, त्यांची काळजी त्यांच्या मुलांनी सक्तीने घेण्यासाठी कायदा तयार करणे, तसेच लेक वाचवा अभियान व तंटा मुक्ती अभियानाप्रमाणे ज्येष्ठ नागरिक अभियान सुरु करुन त्यांना दिलासा देणे या सर्व बाबींचा साकल्याने विचार करुन शासनाने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

सभापती महोदय, या अशासकीय ठरावाच्या माध्यमातून समाजातील एका महत्वाच्या विषयाच्या संदर्भात चर्चा उपस्थित करीत आहे. आपल्या समाज रचनेमध्ये समाजातील सगळया घटकांचा विचार केलेला आहे. या मधील तिस-या घटकाकडे आपल्याला अधिक लक्ष देण्याची आवश्यकता आहे. पहिला घटक हा लहान मुले आहेत, महिला हा दुसरा घटक आहे आणि ज्येष्ठ नागरिक हा तिसरा घटक आहे. मला असे वाटते की, अलीकडच्या काळामध्ये महिला जागरुक झाल्यामुळे, संघटित झाल्यामुळे त्याना अनेक प्रकारच्या सुविधा मिळत आहेत. त्या पुरेशा आहेत असे मला म्हणावयाचे नाही. लहान मुलांचे संगोपन, शिक्षण आणि संरक्षण याकडे सर्वांचे लक्ष आहे. ज्येष्ठ नागरिक हा समाजातील तिसरा महत्वाचा घटक आहे. ज्येष्ठ नागरिकामुळे समाजाची जडणघडण होते. उत्तम शिक्षण, उत्तम संस्कार देणारे जे जे काही घटक आहेत त्यामध्ये ज्येष्ठ

श्री. चंद्रकांत पाटील...

नागरिकांचा सहभाग मोठ्या प्रमाणावर असतो. या ज्येष्ठ नागरिकांची आजकाल समाजामध्ये असलेली स्थिती पाहता आपल्याला दोन तीन महत्वाच्या मुद्यांचा विचार करण्याची आवश्यकता आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती महोदय, सर्वात महत्वाचा मुद्दा हा आहे की, या ज्येष्ठ नागरिकांकडे त्यांच्याच घरातील त्यांची मुले लक्ष देत नाहीत. समाजामध्ये देखील त्यांच्या बाबतीत योग्य तो आदर ठेवला जात नाही त्यामुळे या ज्येष्ठ नागरिकांची मानसिक कुचंबणा होत असते. म्हणून त्यांच्या बाबतीत तीन गोष्टींचा विचार केला पाहिजे. एक म्हणजे त्यांची मन:स्थिती, दुसरी गोष्ट म्हणजे त्यांची सुरक्षितता आणि तिसरी गोष्ट म्हणजे वयोमानामुळे, त्यांचे शरीर थकल्यामुळे त्यांना द्याव्या लागणा-या सोयीसुविधा, या तीन गोष्टींचा विचार करणे आवश्यक आहे.

...नंतर श्री. गिते...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत पाटील.....

मला असे वाटते की, केंद्र सरकारने ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षेसंबंधीच्या कायद्याचा विचार केलेला आहे. त्या आधारे ज्येष्ठ नागरिकांना त्यांच्या मुलांकडून काही ना काही प्रमाणामध्ये संरक्षण देणे आणि त्यांचा सांभाळ करणे, या कर्तव्याची जाणीव करुन देणे अभिप्रेत आहे. जसजसे वय वाढत जाते, तसतसे ज्येष्ठ नागरिकांचे हळुवार होणारे मन लक्षात घेता मला असे वाटते की, मोठ्या प्रमाणावर महाविद्यालयीन विद्यार्थी आणि तरुण सुशिक्षित विद्यार्थी जे अजूनही नोकरी व्यवसायाकडे गेले नाहीत, त्यांचा विचार या कामासाठी करु शकलो तर ज्येष्ठ नागरिकांना नक्कीच काही प्रमाणात दिलासा मिळू शकेल. जे ज्येष्ठ नागरिक एकटे राहतात, आपल्या रचनेमधून त्यांच्याकडे जाण्याची, त्यांच्या समवेत गप्पा मारण्याची, वर्तमानपत्रे वाचून दाखविण्याची, जगात नवीन गोष्टी घडल्या त्या सांगण्याची व्यवस्था आपण करु शकलो तर बरे होईल, असे मला वाटते. काही ज्येष्ठ नागरिकांना मुले नसणे, त्यामुळे त्यांच्या संपर्कात तरुण मुले भेटत नाहीत. काहींना मुले आहेत, परंतु ती मुले आपल्या पालकांकडे पहात नाहीत, त्यांना सांभाळत नाहीत. त्यामुळे त्यांच्या ठिकाणी एक प्रकारचा एकटेपणा निर्माण होतो. अशा परिस्थितीत या ज्येष्ठ नागरिकांच्या मन:स्थितीचा विचार करणे महत्वाचे आहे.

सभापती महोदय, दुसरा मुद्दा त्यांच्या सुरक्षिततेबाबतचा आहे. योगायोगाने हा विषय सभागृहात उपस्थित करीत असताना सकाळ वृत्तपत्रात श्रीमती उर्जिता जोशी या लेखिकेने लिहिलेला "आधारवड" या सदराखाली अत्यंत चांगला लेख प्रसिध्द झालेला आहे. त्या लेखाचे अवलोकन केले तर मला वाटते की, ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षिततेवर अधिक भाष्य करण्याची आवश्यकता नाही. त्याचबरोबर दररोज वृत्तपत्रामध्ये शहरामध्ये घडणाऱ्या घटना, जिल्हयामध्ये घडणाऱ्या घटना आपण वाचतो. त्यात प्रामुख्याने वृध्द असल्याचा फायदा घेऊन ज्येष्ठ नागरिकांना गुन्हेगारांकडून लुटण्याचा प्रकार होतो, तर कुठे तरी देव दर्शनाला जाताना किंवा मार्केटमध्ये भाजीपाला खरेदीला वयोवृध्द महिला गेल्यानंतर तिच्या गळयातील मंगळसूत्र खेचून नेण्याचे प्रकार घडतात. तर कधी अशा वयोवृध्द व्यक्ती घरात एकटया आहेत अशी माहिती काढून, त्यांच्या घरावर लक्ष ठेवून त्यांना लुटण्याचे प्रकार सर्रास होतात. त्यांनी लुटण्यास प्रतिकार केला तर त्यांना जीवे मारण्याचे प्रकार घडत असल्याचे ऐकायला व वाचायला मिळते. अशा

...2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत पाटील.....

बातम्या वाचून मन विषण्ण होते. अशा परिस्थितीत या वयोवृध्दांच्या सुरक्षिततेच्या बाबतीत शासनाने जास्त लक्ष घालण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, पुण्यामध्ये परांजपे नावाची मोठी बांधकाम कंपनी आहे. त्या कंपनीने ज्येष्ठ नागरिकांसाठी विशेषत: ज्यांचे पाल्य विदेशात आहेत, त्यामुळे त्यांच्याकडे लक्ष देण्यास कोणी नाही अशासाठी एक कॉलनी डेव्हलप केलेली आहे. हा प्रकार कदाचित कमर्शियल व्हेंचर असेल, पण ज्येष्ठ नागरिकांसाठी लागणाऱ्या लहान लहान गोष्टींचा विचार केला, त्यांच्या मानसिकतेचा विचार केला तर या ज्येष्ठ नागरिकांना एकटेपणा जास्त जाणवतो. या कॉलनीस वृध्दाश्रम म्हणता येणार नाही, कारण शेवटी या ज्येष्ठ नागरिकांनी आयुष्यभर नोकरी केल्यामुळे त्यांची आर्थिक स्थिती चांगली आहे. त्यांना शासनाच्या वृध्दाश्रमासारख्या शासनाच्या सवलती पाहिजेत अशातला भाग नाही. पण त्यांची आर्थिक परिस्थिती पाहून या ज्येष्ठ नागरिकांसाठी कॉलनी बांधून परांजपे कंपनीकडून त्यांची अतिशय चांगल्या प्रकारे सुरक्षा केली जाते. त्याचबरोबर ज्येष्ठ नागरिकांसाठी कोणकोणत्या गोष्टींची आवश्यकता आहे, त्याचा देखील कॉलनी निर्माण करताना विचार केला आहे. त्यांना मार्केटमध्ये जाता येत नाही, म्हणून या कॉलनीतच मार्केटची व्यवस्था करण्यात आली आहे. याच धर्तीवर शासनाने मोठ-मोठया विकासकांशी समन्वय साधून ज्येष्ठ नागरिकांना कॉलनी बांधून त्यांची व्यवस्था करण्याबाबतचा आग्रह धरावा. अशा प्रकारे या विकासकांनी अशा ज्येष्ठ नागरिकांसाठी राज्यात कॉलनीज उभ्या केल्या तर त्यात हे ज्येष्ठ नागरिक अत्यंत सुरक्षित राहू शकतील. यादृष्टीने शासनाने प्रयत्न करावेत असे मला वाटते. या कॉलनीच्या माध्यमातून त्यांना नवनवीन साधने उपलब्ध करुन देऊ शकतो. त्यातील एक सहजपण उपलब्ध करुन देता येईल असे साधन म्हणजे मोबाईल आहे. या ज्येष्ठ नागरिकांना आयुष्यातील सर्व जबाबदा-या पूर्ण करण्याकरिता इतर साधनांचा उपयोग करुन घेता आला नाही. अशा गोष्टींचा विचार करता त्यांना कमी दर असलेला मोबाईल उपलब्ध करुन देऊ शकतो काय, याचा देखील शासनाच्या वतीने विचार करुन त्यांना मोबाईल उपलब्ध करुन दिले तर ते त्यांची स्वत:ची सुरक्षितता करु शकतात. तसेच त्यांना इतर नातेवाईकांशी देखील संपर्क साधता येऊ शकेल. म्हणून या संदर्भात शासनाने लक्ष घालून त्यांना कोणत्या प्रकारच्या सुविधा उपलब्ध करुन देता येतील याचा गांभीर्याने विचार केला पाहिजे.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत पाटील.....

सभापती महोदय, वयाची 60 वर्षे असलेल्या ज्येष्ठ नागरिकांना त्यांच्या नातेवाईकाकडे अथवा तीर्थक्षेत्रास जावयाचे असल्यास नुकतीच केंदीय रेल्वे मंत्रालयाने रेल्वेमध्ये ज्येष्ठ नागरिकांसाठी 50 टक्के सूट जाहीर केलेली आहे. महाराष्ट्र शासनाने देखील आपल्या राज्यातील ज्येष्ठ नागरिकांची वयोमर्यादा 65 वर्षे घालून दिलेली आहे आणि त्याप्रमाणे त्यांना ज्येष्ठ नागरिकांच्या सुविधा उपलब्ध करुन दिलेल्या आहेत.

यानंतर श्री. भोगले.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत पाटील.....

महाराष्ट्र सरकार मात्र 65 वर्षे पूर्ण झाल्यानंतर ज्येष्ठ नागरिक मानते. हा भेद असण्याचे काही कारण नाही. महाराष्ट्रामध्ये सुध्दा 60 वर्षे पूर्ण झालेल्यांना ज्येष्ठ नागरिक संबोधून ज्येष्ठ नागरिकत्वाचे कार्ड दिले पाहिजे. 65 वर्षे पूर्ण झाल्यानंतर एस.टी.प्रवासामध्ये 50 टक्के सवलतीच्या संदर्भात सुविधा दिली आहे, ती 60 वर्षे पूर्ण झाल्याबरोबर दिली पाहिजे. त्याच बरोबरीने ज्येष्ठ नागरिकांना वेगवेगळ्या शहरांमध्ये किंवा अन्य गावांमध्ये जाण्याचा प्रसंग कमी येतो परंतु ज्या ठिकाणी राहतात त्या ठिकाणी मोबिलीटी असणे महत्वाचे आहे. उदाहरण द्यायचे झाले तर कोल्हापूरमध्ये राहणारे ज्येष्ठ नागरिक टोकाच्या कॉलनीत वास्तव्य करीत असून त्यांना अंबाबाईच्या मंदिरात जायचे असेल तर केएमटीच्या बसमध्ये सवलत मिळण्यासाठी वेगळे रजिस्ट्रेशन करावे लागते. महाराष्ट्र सरकारने ज्येष्ठ नागरिक म्हणून कार्ड दिले असले तरी ते कार्ड पुणे किंवा कोल्हापूर महानगरपालिकेच्या बस सेवेमध्ये सवलत मिळण्यास ग्राह्य धरले जात नाही. दरवर्षी वेगळी नोंदणी करावी लागते, त्यासाठी 25 रुपये फी भरावी लागते.

सभापती महोदय, कोल्हापूर महानगरपालिकेचे बजेट नुकतेच मांडले गेले. त्या बजेटमध्ये निधी कमी असल्याचे कारण दाखवून कोल्हापूर महानगरपालिकेच्या बस सेवेतील ज्येष्ठ नागरिकांची 50 टक्के सवलत रद्द करण्यात आली आहे. एका बाजूला शासन अनेक गोष्टींवर खर्च करीत असताना दुसरीकडे किरकोळ स्वरुपात लाभ द्यायला हात आखडता घेतला जात आहे. एका शहरामध्ये किती ज्येष्ठ नागरिक असतील याचा मी अभ्यास केला. अनेक ज्येष्ठ नागरिक स्वाभिमानी आहेत, ज्यांच्याकडे पैसे आहेत ते या प्रकारची सवलत घेत नाहीत. मला असे दिसून आले की, वर्षासाठी काही लाखाची तरतूद करावी लागेल. केवळ 3 ते 4 लाख रुपयांची व्यवस्था करणे शक्य नसल्याचे सांगून केएमटीने ज्येष्ठ नागरिकांची 50 टक्के सवलत रद्द केली.

सभापती महोदय, आजारी पडल्यानंतर औषधाची गरज असते. ज्येष्ठ नागरिक कार्डाच्या आधारे मेडिकल स्टोअरमध्ये त्यांना विशिष्ट सवलत मिळावी. ती सवलत किती असावी, ती कोणी बेअर करावी हा मुद्दा आहे. परंतु ज्येष्ठ नागरिकांकडे आयुष्यात सर्व जबाबदाऱ्या पूर्ण केल्यानंतर स्वत:साठी खर्च करण्यास पैसे नसतात. आरोग्यासाठी त्यांना अधिक खर्च करावा लागतो. त्याचा विचार करुन वेगवेगळया हॉस्पिटलमध्ये त्यांची व्यवस्था करता येऊ शकते का, औषधांच्या किंमतीमध्ये सूट देऊ शकतो का? याचा विचार झाला पाहिजे. पूर्वी मी मुंबईमध्ये रहात होतो.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत पाटील.....

आपल्याला कल्पना असेल की, मुंबईच्या लोकल ट्रेनमधून तरुणांना प्रवास करणे कठीण झाले आहे. समाजातील अतिशय संरक्षित म्हणून काळजी घेतली पाहिजे अशा महिला आहेत, त्यांच्यासाठी स्वतंत्र लेडीज कम्पार्टमेंटची सोय केलेली आहे. मागणी केल्यानंतर अपंगांसाठी सुध्दा काही व्यवस्था करावी लागली आहे. ज्येष्ठ नागरिक दिवसभरात विशिष्ट वेळेत लोकल ट्रेनमधून प्रवास करतात. ज्येष्ठ नागरिकांसाठी वेगळा डबा राखीव ठेवता येईल का? एस.टी.बस स्टॅण्डवर आल्यानंतर खूप प्रवासी एकत्रपणे बसमध्ये घुसण्याचा प्रयत्न करतात. अशा वेळी ज्येष्ठ नागरिकांना बसमध्ये प्रवेश करणे शक्य होत नाही. शासनाने बसमध्ये अपंगांसाठी काही सीट रिझर्व्ह ठेवल्या आहेत. ज्येष्ठ नागरिकांसाठी काही सीट राखीव ठेवता येतील का? एका अर्थाने ज्येष्ठ नागरिकांनी आयुष्यभर खस्ता खाल्ल्या, समाजाच्या उभारणीमध्ये सहभागी झाले. त्यांच्या प्रती आपले ऋण आहे, देणे आहे हे लक्षात घेऊन या प्रश्नाकडे पाहिले पाहिजे. उपकार म्हणून पाहता कामा नये. या अर्थसंकल्पामध्ये ज्येष्ठ नागरिकांच्या दृष्टीने शासनाने काही तरतूद केली आहे का किंवा करता येईल का? अन्यथा इतर गोष्टी मांडणे निरर्थक ठरेल. ज्येष्ठ नागरिक समाजाचा महत्वाचा घटक आहे. त्यासाठी काही कायदे करता येतील. सुरक्षा, मनस्थिती आणि वेगळ्या प्रकारच्या सुविधांचा आपण विचार करु शकतो का या निमित्ताने सभागृहाचे मी या महत्वाच्या विषयाकडे लक्ष वेधू इच्छितो, एवढे बोलून माझे भाषण संपवितो.

ठराव प्रस्तुत झाला.

नंतर 3वाय.1...

अशुधारित प्रत/ शुद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई (नामनियुक्त) : सभापती महोदय, ज्येष्ठ नागरिकांच्या अत्यंत ज्वलंत आणि अत्यंत महत्वाच्या प्रश्नावर सन्माननीय सदस्यांनी अशासकीय ठराव आणून शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला त्याबद्दल मी त्यांचे आभार मानते.

महोदय, या विषयाच्या अनुषंगाने मी दोन तीन गोष्टींबाबत सूचना करणार आहे. ज्येष्ठ नागरिकांचे आयुर्मान आता चांगल्या औषधोपचार तसेच इतर गोष्टींमुळे वाढलेले आहे, ही आनंदाची गोष्ट आहे. त्यात काही सुशिक्षीत तर काही अशिक्षीत तसेच शेतकरी वर्ग असे तीन चार वर्ग असतील. त्यात प्रामुख्याने मुंबईतील ज्येष्ठ नागरिकांचे प्रश्न प्रामुख्याने मी मांडणार आहे. मुंबई, ठाणे, कल्याण, डोंबिवली, नागपूर, नवी मुंबई किंवा नाशिकसारखी शहरे नोकरी करणाऱ्या वर्गाची शहरे म्हणून मानली जातात. ज्यावेळी एकाच घरातील दोन माणसे नोकरीसाठी घराबाहेर पडतात तेव्हा आपले लहान मूल एक तर मोलकरीणकडे सोपवितात अन्यथा पाळणा घरात ठेवतात. या अनुषंगाने माझी अशी सूचना आहे की, पाळणा घरात मुलाला ठेवणे हे तसे फार सोईचे असते असे नाही. पण शासनाने जर बालवाडीसदृश्य बांधकाम करुन त्यात ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांना राहण्याची सोय केली तर त्या मुलांनाही आजी-आजोबांचे प्रेम मिळेल आणि आजी आजोबांनाही लहानग्यांच्या सहवासात दिवस घालविता येईल. एरवी ही मुले टी.व्ही. चॅनेल्स लावून बसलेले असतात किंवा इंटरनेटवर तरी बसतात. त्याऐवजी ज्येष्ठ नागरिकांबरोबर ठेवले तर त्यांनाही प्रेम मिळेल व ज्येष्ठ नागरिकांचाही वेळ जाईल, ते मुलांमध्ये रमून जातील. अर्थात त्यांच्या वेगवेगळ्या समित्या तयार होतील पण हे सुध्दा शासनानेच करुन द्यावे अशी माझी सूचना आहे. कारण तामिळनाडू सरकारने अशाच प्रकारची अतिशय चांगली योजना ज्येष्ठ नागरिकांसाठी आणली व तिची अंमलबजावणी सुरु केली. त्या राज्यात या योजनेला अत्यंत चांगला प्रतिसाद सुध्दा मिळतो, हे सांगण्यास मला आनंद वाटतो.

महोदय, मागील रविवारच्या वर्तमान पत्रात एका ज्येष्ठ नागरिकाने लेख लिहून अशीच मागणी केली व त्या अनुषंगाने सभागृहात ठराव सुध्दा आला, ही आनंदाची बाब आहे. अशा प्रकारे ज्येष्ठ नागरिकांना रिक्रिएशन ग्राऊंड तयार करुन ज्याप्रमाणे व्यायामशाळा बांधतो तसे बांधकाम त्यांना करुन द्यावे. ते शासनाच्या ताब्यात राहतील, त्याचे वृध्दाश्रमात रुपांतर होणार नाही याचीही काळजी घेण्याची गरज आहे. याच विषयावर मी काही निवृत्त आयएएस, आयपीएस व वर्ग-1 च्या

....2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई .....

दर्जाच्या अधिकाऱ्यांबरोबर चर्चा केली. त्यांनी देखील असे मत व्यक्त केले की या सर्व शहरांमध्ये अशा प्रकारची सोय शासनाने केली तर आम्ही सुध्दा आमचा दिवसभरातून ठराविक वेळ त्या केंद्रात जाऊन या लहान मुलांवर संस्कार व्हावेत म्हणून प्रयत्न करु. त्यांना संस्काराचे धडे देऊ, लिहिणे व वाचणे शिकवू तसेच मनोरंजनासाठी गोष्टी सुध्दा सांगण्यास मदत करणार. जेणेकरुन त्या ज्येष्ठ नागरिकांचाही वेळ चांगला जाईल व मुलांनाही प्रेम मिळेल.

यानंतर श्री. जुन्नरे .....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई....

याबाबतीत मी जी पहेल केली ती मी आपल्याला सांगते. केंद्रीय गृह राज्यमंत्री यांच्याकडे या विषयाचा मी ऊहापोह केला होता. त्यावेळेस मी एका निवृत्त आयएएस अधिका-यांना बरोबर घेऊन गेले होते. मी त्यांना सांगितले की, मुंबईमध्ये अशा गोष्टीची आता नितांत गरज आहे. केंद्रीय गृह राज्यमंत्र्यांनी सुध्दा माझे म्हणणे मान्य केले. ज्येष्ठ नागरिकांना औषधे मिळाली पाहिजेत, प्रवास पास मिळाला पाहिजे, त्यांना संपूर्ण देशात जाण्याची मुभा असली पाहिजे. त्यामुळे या गोष्टीचाही माननीय मंत्रीमहोदयांनी विचार करावा असे मी आपल्याला नम्रता पूर्वक सांगते.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. चंद्रकांत पाटील यांनी ज्येष्ठ नागरिकांच्या संदर्भात महत्वपूर्ण ठराव मांडलेला आहे. या विषयावर बोलण्यासाठी मुद्दे बरेच आहेत परंतु शेवटी वेळेची मर्यादा आहे. प्रघाताप्रमाणे माननीय समाज कल्याण मंत्री हा ठराव मागे घेंण्याची सन्माननीय सदस्यांना विनंती करतील व सन्माननीय सदस्य सुध्दा त्यांच्या विनंतीला मान देऊन आपला अशासकीय ठराव मागे घेतील. परंतु ठराव मांडण्याच्या मागे शासनाच्या उपक्रमाने लक्ष द्यावे असा त्यामागील हेतू असतो. केंद्र सरकारने ज्येष्ठ नागरिकांसाठी कायदा केलेला आहे परंतु महाराष्ट्र शासनाने हा कायदा अंमलात आणण्यासाठी कोणती उपाययोजना केली आहे याची माहिती मंत्री महोदयांनी देण्याची आवश्यकता आहे. समाज कल्याण अधिकारी ज्येष्ठ नागरिकांच्या संघाना एकत्र आणण्याचे काम करतात काय ? ज्येष्ठ नागरिकांसाठी मातोश्री वृध्दाश्रमाची योजना सुरु करण्यात आली होती व त्यासाठी वृध्दाश्रमांना अनुदान मिळत होते परंतु या शासनाने गेल्या 5 वर्षापासून वृध्दाश्रमांचे अनुदान बंद केलेले आहे. काही संस्थानी काम योग्य केले नसेल म्हणून अनुदान बंद केले असावे किंवा समाजात वृध्दाश्रम वाढू नये असा शासनाचा हेतू जरी असला तरी अनेक मोठ मोठया यात्रा ज्या ठिकाणी होतात अशा यात्रेच्या ठिकाणी प्रत्येक यात्रेनंतर 10-15 वृध्द त्या ठिकाणी सापडतात. या वृध्दांना कुटुंब आपल्या बरोबर घेऊन येतात परंतु यात्रेच्या ठिकाणी सोडून जात असतात. अशावेळी या वृध्दांना कोणत्या तरी आश्रमात न्यावे लागते ही वस्तुस्थिती आहे.

सभापती महोदय, काल मुलींच्या जन्म दराच्या संदर्भातील आकडेवारी वर्तमानत्रात आलेली आहे. मुलींची संख्या कमी होत असली तरी एकूण आयुमर्यादा वाढल्यामुळे ज्येष्ठ स्त्रियांची संख्या वाढलेली आहे. 60 वर्षापेक्षा जास्त वृध्दांमध्ये स्त्रियांची संख्या जास्त आहे. 60 च्या वरील व दारिद्रय रेषेच्या खालील आकडेवारीमध्ये स्त्रियांची संख्या अधिक आहे. त्यामुळे केंद्र सरकार व राज्य सरकारचे धोरण व कायदे अंमलात आणण्यासाठी नोडल अधिकारी किंवा आयुक्तालय नेमके काय करीत आहे यासंदर्भात अधिक माहिती मिळण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, प्रत्येक जिल्हयामध्ये ज्येष्ठ नागरिक संघ आहेत त्यांना एकत्र करुन त्यांच्या काय अडचणी आहेत यासंदर्भात महानगर पालिकांबरोबर आपण पाऊल उचलू शकतो.

सभापती महोदय, ज्येष्ठ नागरिकांना जे आजार होतात त्या आजारामध्ये काही आजार किरकोळ वाटतात परंतु तेच आजार खूप त्रासदायक ठरतात. यासाठी मानसिक तयारी आवश्यक

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे ...

असते. स्मृती कमी होणे, ऐकू न येणे, लक्षात न राहणे अशा आजारांना ज्येष्ठांना तोंड द्यावे लागते. केंद्र सरकारने अतिवृध्द अशी संज्ञा केलेली आहे. आज अनेक कुटुंबामध्ये अतिवृध्दांची काळजी नववृध्दांना घ्यावी लागत आहे. नव वृध्दांची मुले मोठया शहरात किंवा परदेशात गेलेली असतात. आता अतिवृध्द व नववृध्दच कुटुंबात राहत आहेत. मानसिकता वृध्द होत असतांना आपली मानसिकता कशी वाढेल याकडे सुध्दा लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, मी आपल्याला उदाहरण देते की, चीन मध्ये वयाच्या 55 व्या वर्षी तुम्हाला महिला मित्र हवा असेल किंवा पुरुष मित्र हवा असेल तर त्याने मेल द्वारे आपल्या सहका-याशी संवाद ठेवायचा असतो. जेव्हा कुटुंबात आधार राहत नाही त्यावेळी लोकांना एक साथीदार मिळत असतो. एकटयाला बाहेर फिरता येत नाही किंवा दवाखान्यात गेले तर औषधांची नावे मोती बिंदुचा आजार झाल्यामुळे वाचता येत नाही अशी परिस्थिती असते.

यानंतर श्री. गायकवाड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशा अडचणीच्या वेळी एकमेकांची साथ मिळू शकते. यामध्ये सरकारच्या बजेटचा प्रश्न येत नाही फक्त सरकारने त्याकडे चांगल्या दृष्टीकोनातून पाहिले तर त्याचा निश्चितपणे उपयोग होऊ शकेल असे मला वाटते.

सभापती महोदय, सुनेच्या जाचामुळे मुलगा आणि आई - वडील यांनी पुण्यामध्ये सामूहिक आत्महत्या केल्याची घटना पंधरा दिवसापूर्वी घडली आहे.वृध्द व्यक्तींना त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती मारहाण करीत असतात.असे वृध्दाश्रमातील अनेक वृध्द सांगत असतात. त्याचबरोबर कुटुंबातील व्यक्तीकडून वृध्दांना मारहाण केली जाते ही वस्तुस्थिती आहे.लहान लहान कारणामुळे मुलगा आणि सून आई - वडिलांना मारहाण करीत असतात अशा प्रकारचे समाजामध्ये आज विदारक चित्र आहे. त्यामुळे कुटुंबांतर्गत मारहाण ज्या ठिकाणी होत असते अशा व्यक्तींना मदत मिळण्याकरिता पोलिसांची हेल्पलाईन सुरु करण्यात आल्याचे सांगण्यात येते परंतु आज पोलिसांवर मोठया प्रमाणावर कामाचा ताण आहे. अशा घटनांचा फोन आल्यानंतर पोलिसांनी जर तो उचलला तर ती वृध्द व्यक्ती किती माहिती सांगत असेल याबद्दल शंका वाटते म्हणून समाज कल्याण विभागाने या संदर्भात हेल्प लाईन सुरु करावी याकडे माझे माननीय मंत्र्यांचे लक्ष वेधावयाचे आहे .

सभापती महोदय,कै. प्रमोद नवलकर यांनी नाना नानी पार्क सुरु करण्याची एक चांगली संकल्पना मांडली होती त्यामुळे त्यांचा येथे उल्लेख करणे मला अपरिहार्य वाटते . आपण दोघांनी थोडया वेळ बोलावे असे वृध्द आजी आजोबांनासुध्दा वाटत असते. अशा वेळी त्यांना कुटुंबात बोलता येत नाही म्हणून नाना नानी पार्क महाराष्ट्रामधील इतरही काही शहरांमध्ये सुरु करण्यात आली आहेत. परंतु लहान लहान गावामध्ये या वृध्द व्यक्तींना देवळात जाण्या शिवाय दुसरा कोणताही पर्याय राहत नाही.

सभापती महोदय, प्रत्येक वयोवृध्द माणसाला फक्त अध्यात्मच आवडले पाहिजे अशीच आपली मानसिकता आहे. अर्थात आपण सर्व अध्यात्मवादी असल्यामुळे अध्यात्मा बद्दल आवड असली पाहिजे परंतु काही जणांना नाटक बघावेसे वाटत असेल, कोणाला संगीताची आवड असेल , कोणाला चित्रपट बघावयाचा असेल, कोणाला चित्रकलेची आवड असेल तर त्यासाठी या वृध्दांनासुध्दा समाजामध्ये वैचारिक आणि मानसिक जागा असली पाहिजे ही भूमिका शासनाने लक्षात घेतली पाहिजे. त्याचप्रमाणे महानगरपालिकेने काही ठिकाणी विरंगुळा केन्द्रे सुरु केलेली आहेत त्यांना शासनाने अनुदान दिले पाहिजे असे मला सांगावयाचे आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे.....

सभापती महोदय, मी स्वत: स्त्रियांच्या चळवळीमध्ये काम करीत असल्यामुळे माझ्या परिचयाच्या पुण्यातील एक महिला आहेत त्यांना तीन मुले आहेत. या तीन मुलांकडे तीन तीन आठवडे रहावयाचे असे त्यांनी ठरविले होते. परंतु प्रत्यक्षात तसे जमत नव्हते म्हणून त्यांनी असे ठरविले की, सकाळी एका मुलाकडे, रात्री एका मुलाकडे आणि दुस-या दिवशी सकाळी एका मुलाकडे जेवायचे. काही वेळा सुनांना पिझ्झा खावयाचा असतो, पाव भाजी खावयाची असते त्यामुळे त्यांना वृध्द मंडळी घरी आलेली आवडत नाही.काही वेळेस वृध्द व्यक्तींना दात नसल्यामुळे पदार्थ चावण्याची अडचण होत असते. एके दिवशी ही महिला सुनेकडे जेवणासाठी गेली असता तिने असे सांगितले की, जेवणाच्या वेळी तुम्ही याल असे मला वाटलेच होते. परंतु आज आम्ही बाहेर जाणार आहोत. त्यानंतर या महिलेने त्या दिवशी आत्महत्या केली होती ही वस्तुस्थिती मी आपल्याला सांगत आहे.

सभापती महोदय, मुलांवर चांगले संस्कार घडविलेले असतांनासुध्दा हा प्रश्न आज निर्माण होत आहे. आज आपण संस्काराच्या विरोधात नाही. या मुलांवर जर कायद्याचे बंधन आणावे लागत असेल तर तरुण मुलांची ही मानसिकता बदलणे आवश्यक आहे .असे मला सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, या निमित्ताने मला एक उदाहरण द्यावयाचे आहे की आपण नेहमीच विधान भवनात येत असतो. श्री प्रकाश मोहाडीकर सर हे माझे गुरु आहेत .काही दिवसांपूर्वी श्री प्रकाश मोहाडीकर सर आणि श्री एन.डी. पाटील विधान भवनाच्या पाय-या चढत असतांना त्यांनी डाव्या बाजूचा कठडा पकडला होता. तेव्हा माझ्या असे लक्षात आले की, त्या ठिकाणी एक कठडा डावीकडे आहे आणि दुसरा कठडा उजवीकडे आहे. एवढे मोठे अंतर चढून जाण्यासाठी एखाद्या वृध्द माणसाला हाताला धरण्यासाठी दुसरा एक आधार लागत असतो त्या माणसाला दुसरा आधार न घेता दहा बारा पाय-या चढून यावे लागते तेव्हा याचासुध्दा विचार होणे आवश्यक आहे. काही जणांची तब्येत जर चांगली असेल तर त्याही अवस्थेत ते पटापट पाय-या चढून येत होते. परतु ज्या ठिकाणी पाय-या आहेत त्या ठिकाणी हाताला धरण्यासाठी आधार सुलभपणे उपलब्ध करुन दिला पाहिजे तसेच ज्याच्यावरुन हात सटकणार नाही असा आधार ठेवला पाहिजे व यासंबंधीची संवेदनशीलता आपण लक्षात ठेवली पाहिजे एवढे बोलून मी माझे भाषण संपविते.धन्यवाद

नंतर श्री.सरफरे

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदया, माननीय सदस्य श्री. चंद्रकांत पाटील यांनी मांडलेल्या अशासकीय ठरावावर मी फक्त दोन तीन महत्वाचे मुद्दे सांगून माझे भाषण संपविणार आहे.

सभापती महोदया, जे ज्येष्ठ नागरिक आपल्या कुटुंबातील मुला-मुलींपासून वेगळे रहात आहेत त्यांच्या दृष्टीने हा विषय अत्यंत महत्वाचा आहे. मुला-मुलींचे लग्न झाल्यानंतर ती मुले आपल्या आई-वडिलांपासून दूर गेल्यामुळे एकटे राहणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांच्या दृष्टीने हा प्रश्न महत्वाचा आहे. त्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न सुध्दा अत्यंत महत्वाचा आहे. या विषयासंदर्भात सभागृहामध्ये एकदा झालेल्या चर्चेच्यावेळी शासनाने धोरणात्मक निर्णय घेतला होता. या मेट्रोपॉलिटन शहरामध्ये अनेक ठिकाणी ज्येष्ठ नागरिक एकटेच रहातात त्यांच्या संदर्भात दर एक दोन दिवसांनी वर्तमानपत्रांमध्ये छापून आलेली बातमी वाचावयास मिळते. आजी आणि आजोबा किंवा एकटेच आजोबा रहात असलेल्या घरामध्ये चोरी करण्याच्या उद्देशाने आलेल्या चोरांनी त्यांचा गळा चिरुन त्यांना ठार मारले किंवा त्यांचा खून केल्याच्या बातम्या वाचावयास मिळतात. अशा एकटे राहणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांची नोंद ठेवण्याचे काम त्या विभागातील पोलीस स्टेशनने करावे अशाप्रकारचा एक निर्णय झाला होता. त्या निर्णयाचे पुढे काय झाले हे मला माहीत नाही. परंतु अशाप्रकारे त्या विभागातील इमारतीमध्ये राहणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांची माहिती संबंधित पोलीस स्टेशनला असली पाहिजे, तशी नोंद त्या पोलीस स्टेशनमध्ये झाली पाहिजे. त्यांना जर अडचण निर्माण झाली किंवा मदतीची गरज निर्माण झाली तर निश्चितपणे त्यांना तात्काळ मदत मिळू शकेल अशी व्यवस्था निर्माण झाली पाहिजे.

सभापती महोदया, माणसाचे वय जस जसे वाढत जाते तस तशा त्याला अनेक प्रकारच्या व्याधी सुरु होतात. मी सुरुवातीला सांगितल्याप्रमाणे आपल्या मुला-मुलींपासून वेगळे राहणाऱ्या अशा ज्येष्ठ नागरिकांच्या आजारपणामध्ये होणाऱ्या औषधोपचारावरील खर्चामुळे ते अधिक त्रस्त झालेले असतात. यापूर्वी आपण या सभागृहामध्ये जीवनदायी योजनेच्या माध्यमातून चर्चा केली असून शहरांमध्ये असलेल्या चॅरिटेबल हॉस्पिटल्समध्ये दारिद्रय रेषेखालील लोकांवर उपचार करण्याची व्यवस्था निर्माण केली आहे. त्या प्रमाणे कुणाचाही आधार नसलेल्या या ज्येष्ठ नागरिकांना चॅरिटेबल ट्रस्टच्या हॉस्पिटलमधून वैद्यकीय उपचारामध्ये काही सवलत मिळेल काय, त्यांच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सरफरे)

श्री. रामनाथ मोते....

आजारपणामध्ये हॉस्पिटलकडून काही मदत मिळू शकेल काय, त्यांच्या वैद्यकीय बिलामध्ये काही सूट मिळू शकेल काय? या संदर्भात शासनाने विचार करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदया, माननीय सदस्या डॉ. नीलमताई गोऱ्हे यांनी ज्या मुद्दयाचा उल्लेख केला तो तिसरा व शेवटचा मुद्दा मला या ठिकाणी मांडावयाचा आहे. आज गावा गावामध्ये आणि शहरा शहरामध्ये ज्येष्ठ नागरिकांसाठी काम करणाऱ्या अनेक सेवाभावी संस्था पुढे आलेल्या आहेत. अशाप्रकारे त्या ठिकाणी ज्येष्ठ नागरिकांनी एकत्र येऊन आपली मंडळे स्थापन केली आहेत. त्यांची एवढीच अपेक्षा आहे की, आपण कुठेतरी एकत्र आले पाहिजे. घरामध्ये कुणीच नसल्यामुळे ही सर्व समवयस्क मंडळी एकत्र येऊन गप्पागोष्टी करतात, चर्चा करतात, एकमेकांची सुख-दु:खे वाटून घेतात. परंतु त्यांना एकत्र येण्यासाठी कुठेतरी जागेची आवश्यकता असते. माझ्या माहितीप्रमाणे् अशा ज्येष्ठ नागरिकांच्या मंडळांनी शहरामध्ये अनेक ठिकाणी असलेल्या जागांबाबत शासनाकडे मागणी केली आहे. शासनाकडून ती जागा मिळाल्यास त्या ठिकाणी एखादे भवन बांधून आम्हा सर्व मंडळींना एकत्र येण्यासाठी एक केंद्र निर्माण करता येईल असे त्यांना वाटत असते. याबाबत मी अंबरनाथ येथील एक उदाहरण आपणास सांगत आहे. अंबरनाथमधील एका ज्येष्ठ नागरिक संघाने गेल्या दहा वर्षापासून आपल्याला जागा देण्यात यावी याकरिता शासनाकडे प्रयत्न केले आहेत. अंबरनाथमध्ये कोणत्याही प्रकारचे आरक्षण नसलेली जागा उपलब्ध आहे, ती आपल्याला मिळावी अशी शासनाकडे मागणी केली आहे. परंत ती जागा देण्याबाबत शासनाने अद्यापि कोणताही विचार केलेला नाही किंवा कोणताही निर्णय घेऊन या ज्येष्ठ नागरिकांना दिलासा दिलेला नाही. अशाप्रकारे हे ज्येष्ठ नागरिक एकत्र येण्यासाठी प्रयत्न करीत आहेत, आपले आयुष्यमान वाढविण्याचा प्रयत्न करीत आहेत, आरोग्यदायी जीवन जगण्याचा प्रयत्न करीत आहेत त्यांच्या संघाला जागा उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाने निश्चित स्वरुपामध्ये विचार करण्याची आवश्यकता आहे. हा कायदेशीर नसून एक सामाजिक प्रश्न असल्यामुळे अनेक सेवाभावी संस्था मानवतेच्या भावनेतून या ज्येष्ठ नागरिकांना मदत करण्यासाठी पुढे येत आहेत.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते . . ..

त्यांच्यासाठी वेगवेगळया प्रकारचे उपक्रम राबविले जात आहेत, काही कार्यक्रम हाती घेत आहेत. त्यामुळे अशा या संवेदनशील माणसांकडून, सेवाभावी संस्थाकडून ज्येष्ठ नागरिकांसाठी ज्या काही उपाययोजना केल्या जातात आणि या संस्थांच्या निधीतून किंवा अन्य काही मार्गाव्दारे त्यांना मदत करण्याचा प्रयत्न करतात.पण जशी या सेवाभावी संस्थांची जबाबदारी आहे,संवेदनशील नागरिकांची आहे. त्याचबरोबर शासनाने याची दखल घेण्याची आवश्यकता आहे. या ज्येष्ठ नागरिकांच्या संदर्भात काही दखल घेऊन ज्या सेवाभावी संस्था ज्येष्ठ नागरिकांसाठी वेगवेगळे उपक्रम राबवितात, त्यांच्यासाठी काही काम करतात, त्यांना प्रेरणा आणि प्रोत्साहन देण्यासाठी अशा संस्थांना टोकन स्वरुपामध्ये आपण अनुदान देणार आहोत काय, आर्थिक मदत करणार आहोत काय या दृष्टीकोनातून सुध्दा विचार होण्याची आवश्यकता आहे. मला याठिकाणी भाषण करण्यासाठी संधी दिली, त्याबद्दल मी आभार व्यक्त करतो. धन्यवाद.

---

4 सी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.चंद्रकांतदादा पाटील यांनी ठराव क्र.87 अन्वये ज्येष्ठ नागरिकांचा विषय अशासकीय ठरावाच्या माध्यमातून मांडलेला आहे, जो अत्यंत महत्वाचा आणि ज्वलंत आहे.

सभापती महोदय, यासंबंधात मी पाचच मुद्दे मांडू इच्छितो. आपल्याला विशेष करुन शहरामध्ये असे पहावयास मिळते की, येथे मोठ्या प्रमाणात ज्येष्ठ नागरिक संघ निर्माण झालेले आहेत आणि त्या संघाचे फेडरेशनही झालेले आहे. या फेडरेशनचे हजारो सदस्य आहेत. काही ठिकाणी त्यांची छोटी-छोटी कार्यालये देखील आहेत आणि त्याची नोंदणीही केलेली आहे. मधल्या काळामध्ये ज्येष्ठ नागरिकांचा कलेक्टर कार्यालयावर मोर्चा सुध्दा निघाला होता. मी स्वत: त्यावेळी ज्येष्ठ नागरिकांच्या मोर्चाला मदत करण्यासाठी, जिल्हाधिकाऱ्यांची भेट घडवून देण्यासाठी गेलो होतो. त्यामुळे त्यांच्या देखील काही मागण्या आहेत की ज्या समाजाच्या मागण्या आहेत. प्रत्येक माणूस कधी ना कधी ज्येष्ठ नागरिक होणार आहे. त्यामुळे आपल्याला त्यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही. माझी अशी माहिती आहे की, राज्याच्या सुवर्ण महोत्सवी वर्षामध्ये आपण या ज्येष्ठ नागरिकांच्या संबंधात धोरण करणार होतो, ते कधी जाहीर करण्यात येणार आहे की अगोदरच ते जाहीर झालेले आहे काय ? याची माननीय मंत्री महोदयांनी माहिती द्यावी.

सभापती महोदय, माझा दुसरा मुद्दा असा आहे की, ज्येष्ठ नागरिकांना ओळखपत्र देण्यासाठी विविध राजकीय पक्षाकडून किंवा विविध संघटनांच्या माध्यमातून कॅम्प घेतले जाते. त्यावेळी "ओळखपत्र वितरण" असे लिहिलेले मोठमोठे बॅनरही लावले जातात. पण माझे असे म्हणणे आहे की, ज्येष्ठ नागरिकांनी स्वत:ची आवश्यक ती माहिती दिल्यानंतर त्यांना घरपोच ओळखपत्र देऊ शकतो काय यादृष्टीने विचार केला पाहिजे. आपण एका बाजूला ऑन लाईनच्या गप्पा मारतो आणि दुसरीकडे ज्येष्ठ नागरिकांना ओळखपत्र मिळण्यासाठी खेपा माराव्या लागतात हे बरोबर नाही. त्यामुळे याबाबत काही उपाययोजना करु शकतो काय याबाबत देखील समाजकल्याण विभागाने विचार करण्याची गरज आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.चंद्रकांत पाटील यांनीही हेच सांगितले. या विषयाच्या बाबतीत मी गेल्या दीड-दोन वर्षापासून सरकारबरोबर झगडत आहे. एका बाजूला केंद्र शासनाने ज्येष्ठ नागरिकांची वयोमर्यादा 60 निश्चित केली आहे आणि महाराष्ट्र शासनाने ज्येष्ठ नागरिकांची वयोमर्यादा 65 जाहीर केली आहे. त्यानुसार 65 वर्षाच्या ज्येष्ठ नागरिकांना एस.टी. महामंडळाच्या बसमधून प्रवास करताना सवलत दिली जाते. त्यामुळे संपूर्ण देशामध्ये केंद्र शासनाने

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर . . ..

ज्येष्ठ नागरिकांचे वय 60 असावे असे जाहीर केलेले असल्याने महाराष्ट्र शासनाने देखील ही वयोमर्यादा 60 वर्षे अशी निश्चित करावयास पाहिजे. जेणेकरुन ज्येष्ठ नागरिक रेल्वेने आणि एस.टी.ने प्रवास करु शकतील आणि ओळखपत्राचा देखील त्याला उपयोग होऊ शकेल.याचा शासनाने गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे.तसेच ज्येष्ठ नागरिकांच्या प्रवासाबाबत परिवहन खात्याने मेख मारलेली आहे म्हणजे ज्येष्ठ नागरिकांना एस.टी.मधून प्रवास करावयाचा असेल तर त्यांना साध्या एस.टी.तून प्रवास करताना सवलत मिळू शकते. आता त्यांनी अपग्रेड केलेले आहे. पण एस.टी.च्या जेवढया प्रकारच्या गाडया असतील त्यामध्ये त्यांना सवलत मिळाली पाहिजे. कारण ज्येष्ठ नागरिक उगाच रिकामटेकडे फिरण्यासाठी बाहेर जात नाहीत.त्यांच्या गरजेनुसार ते बाहेर जात असतात. त्यामुळे एस.टी.च्या शिवनेरी किंवा नवीन प्रकारच्या गाडया आहेत, त्यामध्ये त्यांना सवलत देण्याची व्यवस्था केली पाहिजे. त्याच अनुषंगाने एखाद्या शहरामध्ये 20 कि.मी.पर्यंत त्यांना सवलत मिळत नाही.

यानंतर कु.थोरात . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर.....

त्यामुळे एखादी महापालिका असेल किंवा आजूबाजूचा परिसर असेल त्या परिसरामध्ये या ज्येष्ठ नागरिकांना सवलतीच्या दरात प्रवास करावयास मिळत नाही. तेव्हा या ठिकाणी देखील त्यांना प्रवास सवलत दिली पाहिजे. कितीही कि.मी. लांबीचा प्रवास असला तरी ज्येष्ठ नागरिकांना प्रत्येक प्रवासामध्ये ही सवलत मिळाली पाहिजे. त्यामुळे राज्याच्या तिजोरीवर फार मोठा बोजा पडणार नाही.

सभापती महोदय, मला या ठिकाणी औषधोपचाराच्या दृष्टीने सूचवावयाचे आहे. ज्येष्ठ नागरिकांना मोतीबिंदूचे ऑपरेशन करावेच लागते,तसेच दाताच्या कवळया बसवाव्या लागतात. वयाच्या 60-65 व्या वर्षानंतर दाताच्या संदर्भातील तसेच इतर अनेक तक्रारी सुरु होतात आणि त्याबाबतीत त्यांना उपचार घ्यावेच लागतात. त्यामुळे शासकीय रुग्णालयात उपचार घेत असताना ज्येष्ठ नागरिकांना सवलत दिली पाहिजे. दारिद्रय रेषेखालील नागरिकांना जशी सवलत देण्यात येते, तशी ज्येष्ठ नागरिकांना सुध्दा शासकीय रुग्णालयामध्ये सवलत देण्याची गरज आहे. निरनिराळया ठिकाणी कॅम्प घेतले जातात. परंतु शासकीय रुग्णालयामध्ये उपचाराच्या दृष्टीने नियमितपणे एक वेगळे प्राधान्य दिले तर त्याचा निश्चितपणे त्यांना उपयोग होऊ शकतो.

सभापती महोदया, पेन्शन घेणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यांची संख्या फार मोठी आहे. परंतु त्यांना पेन्शन घेण्यासाठी चकरा माराव्या लागतात, ते त्यांना अतिशय त्रासदायक होते. त्या करिता देखील काही उपाययोजना करता येऊ शकतील काय, जेणे करुन डायरेक्ट त्यांच्या बँकेच्या खात्यामध्ये पेन्शन जमा करता येईल. त्यांना दर सहा महिन्याने किंवा वर्ष भराने ओळखपत्र द्यावे लागते, आयडेन्टीफिकेशन द्यावे लागते, सहयांचे आयडेन्टीफिकेशन द्यावे लागते, त्यामध्ये काही सुसूत्रता आणता येईल काय हे बघण्याची गरज आहे.

सभापती महोदय, माझा शेवटचा मुद्दा असा आहे की, हे ज्येष्ठ नागरिक निरनिराळया क्षेत्रामधून आलेले असतात, कोणी शैक्षणिक क्षेत्रामधून आलेले आहेत, कोणी सार्वजनिक उपक्रमामधून आलेले असतात, त्यामुळे यांचा उपयोग सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात करता येईल काय याचा विचार केला पाहिजे. कारण हे ज्येष्ठ नागरिक चालते-फिरते असतात, ते ज्येष्ठ नागरिक संघात काम करीत असतात. स्वत: काही योजना आखतात, स्वत: सामाजिक संस्था

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर.....

निर्माण करतात आणि लोकसेवा करण्याचा प्रयत्न करीत असतात. त्यांचा जो जो म्हणून एक्स्पर्टाईज आहे, तो आपल्याला त्या त्या ठिकाणी उपयोगात आणता येऊ शकतो काय, याचा विचार केला तर निश्चितपणे त्याचा आपल्याला उपयोग होऊ शकतो. तो या ज्येष्ठ नागरिकांच्या माध्यमातून करुन घ्यावयास हरकत नाही. ग्रामीण भागातील ज्येष्ठ नागरिकाची संकल्पना वेगळी असते आणि शहरी भागातील ज्येष्ठ नागरिकाची संकल्पना वेगळी असते. शहरी भागात रिकामी जागा नसली तरी कुठेनाकुठे त्यांचे कार्यक्रम चाललेले असतात. काही ठिकाणी नाना-नानी पार्क आहेत. त्या ठिकाणी ज्येष्ठ नागरिकांचे कट्टे निर्माण झालेले आहेत. त्यांच्याकडे अवगत असलेले कलागुण, त्यांच्याकडे अवगत असलेल्या सांस्कृतिक क्षेत्रातील गुणांचा किंवा सामाजिक क्षेत्रातील गुणांचा परफॉर्मन्स करण्याची त्यांना कुठेनाकुठे वेगळया प्रकारची व्यवस्था करु शकलो, त्यासाठी अधिकाधिक सोयी, अधिकाधिक सवलती देऊ शकलो तर त्यांचे उर्वरित आयुष्य अधिकाधिक सुखकर होईल, अशा पध्दतीने शासनाने प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. सभापती महोदय, औषेधोपचाराच्या निरनिराळया सुधारणांमुळे ज्येष्ठ नागरिकांची संख्या देखील वाढत आहे. जसा भारत देश हा जगामध्ये सर्वात तरुण देश आहे, तशी या देशातील ज्येष्ठ नागरिकांची संख्या देखील वाढत आहे. त्यामुळे सामाजिक आणि सर्वांगीण विकासामध्ये त्यांचा सहभाग करुन घेत असताना त्यांना समाजकल्याण विभागा मार्फत अधिकाधिक सोयी-सवलती कशा देता येतील याकडे या निमित्ताने शासनाने लक्ष द्यावे, अशा प्रकारचे मी या ठिकाणी सूचित करतो आणि माझे वक्तव्य संपवितो. धन्यवाद.

यानंतर श्री. बरवड....

अशुद्धारित प्रत / शीघ्रलिपी नोंद

श्री. हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. चंद्रकांत पाटील यांनी मानवतेच्या दृष्टीकोनातून एक अतिशय महत्वाचा विषय सभागृहामध्ये चर्चेसाठी आणला आहे. योगायोग असा आहे की, 1 एप्रिल हा दिवस मराठी रंगभूमीवरील एक गाजलेले नटसम्राट दत्ता भट यांचा जयंती दिन आहे. कै. वि. वा. शिरवाडकर यांच्या नटसम्राट नाटकातील गणपतराव बेलवलकर या भूमिकेमुळे ते गाजले. त्यांनी त्यांच्या 'झाले मृगजळ जलमय' या आत्मचरित्रामध्ये एक उल्लेख केला आहे की, नटसम्राट गणपतराव बेलवलकर या वृध्द नटाचे आयुष्य रंगमंचावर सादर केल्यानंतर ठिकठिकाणी त्यांना प्रेक्षकांचा प्रतिसाद मिळावयाचा. विदर्भात कोठे तरी एके ठिकाणी असाच प्रयोग होता. प्रयोगाला असाच एक वृध्द आलेला होता. प्रयोग संपल्यानंतर तो आतमध्ये रंगपटामध्ये जाऊन गणपतराव बेलवलकर यांची भूमिका करणाऱ्या दत्ता भट यांना भेटला आणि त्यांच्या पाया पडला. त्या वेळी कदाचित तो दत्ता भट यांच्यापेक्षा वयाने ज्येष्ठ असण्याची शक्यता होती. दत्ता भट त्यांना म्हणाले की, तुम्ही माझ्यापेक्षा ज्येष्ठ आहात, तुम्ही कशाला माझे पाय धरता ? त्यांनी सांगितले की, तुमचे नाटक आणि अभिनय पाहून मी आज घरी गेल्यानंतर माझे मृत्युपत्र बदलण्याचे ठरविले आहे. मी या अगोदर माझे जे काही होते ते सर्व माझ या मुलाबाळांच्या नावे केले होते पण आता माझ्या लक्षात आले आहे की, गणपतराव बेलवलकरांना त्यांची पत्नी, जेव्हा ते आपल्या संसाराची सगळी व्यवस्था लावून घेतात त्या वेळेला ती फक्त तिच्या अनुभवातून त्यांना एका वाक्याचा सल्ला देते की, भुकेल्या माणसाला समोर असलेले अन्नाचे ताट द्यावे पण बसायचा पाट देऊ नये. त्यामुळे शेवटपर्यंत आपल्या स्वत:साठी जागा असावी हा मन अस्थिर करणारा एक विचार आहे. कारण कित्येक लोक कर्तेसवरते असताना मोठ्या उमेदीने, मोठ्या जिद्दीने आपल्या आयुष्याचा प्रवास करीत असतात आणि कोठे तरी संध्याकाळच्या सावल्या दिसावयास लागल्यानंतर त्यांची क्षमता कमी कमी होत जाते हे त्यांच्या लक्षात आल्यानंतर त्यांना वेगवेगळ्या चिंता आणि काळज्या मग त्या शारीरिक असतील, कुटुंबासंबंधी असतील, आर्थिक विवंचनेच्या असतील, या सगळ्यांच्या प्रश्नांचा गुंता त्यांच्या भोवती फेर धरुन नाचत असतो. मानसिकदृष्ट्या खचणे हा जो एक प्रकार त्यामधून तयार होतो त्यामुळे आपल्या असे लक्षात येते की, अरे, कालपरवापर्यंत खूप मजेत फिरणारे, बोलणारे, गप्पा मारणारे,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले .....

हसणारे अचानक अबोल झालेत. कोणाशीही बोलण्याची त्यांची इच्छा नाही. त्यांना सांगायलाच कोणी उरलेले नाही. त्यांची झोप वयाप्रमाणे कमी झालेली आहे. त्यांना काही व्याधी झालेल्या आहेत. त्यांच्या मनात असते ते पदार्थ त्यांना खायला मिळणे अवघड होते. मोठे मोठे पदार्थ नसतात पण दात असतात तेव्हा चणे खायला नसतात आणि जेव्हा ते काहीच खाऊ शकत नाहीत तेव्हा सगळी पक्वान्ने जरी समोर आली तरी त्यांच्यासाठी ते काही महत्वाचे नसते.

या सगळ्या प्रवासामध्ये शेवटी एकटेपण हा सगळ्यात मोठा मानसिक संतुलन घालविणारा प्रकार असतो आणि शेवटपर्यंत त्यांना वाटत असते की, आपली सहचारिणी किंवा जोडीदार, हे जोडीने जगण्याचे आपल्या संस्कृतीमध्ये असेल, कदाचित पाश्चात्य देशात वेगळे प्रश्न असू शकतील पण आपल्याकडे आपण कित्येक अशा जोड्या बघतो की, जोडीदार गेल्यानंतरची जी अवस्था असते ती अतिशय क्लेशदायक असते. अशांसाठी मग उपचार म्हणून कोठे तरी एखादी जागा असणे ही महत्वाची बाब असते. वृध्दाश्रम ही बदलत्या काळाची गरज होऊ बसली आहे. कारण कुटुंब आणि वाडा आज कोठे शिल्लकच नाही. एकत्र कुटुंब पध्दतीमध्ये घरातील वृध्दांची काळजी घेण्यासाठी पुरेसे मनुष्यबळ घरामध्ये उपलब्ध असावयाचे. त्यांना चिंता नसावयाची आणि ती चिंता नसल्यामुळे सगळी मंडळी एकमेकांच्या आधाराने राहून पुढे चालायची. आता आम्ही दोघे आणि आमचे दोन, पाचव्या माणसाला जागाच नसते, अशी परिस्थिती असते. त्यांनी जायचे कोठे, त्यांनी फिरायचे कोठे ?

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले.....

एकदा त्या वयाच्या टप्यावर आल्यानंतर ज्या गरजा असतात त्या पूर्ण होत नाहीत.

वार्धक्य हे दुसरे बालपण असते असे म्हणतात. वृध्द माणसांसाठी आवश्यक असलेले डायपर या देशात तयार होत आहेत. त्याची रंगीत जाहिरात सध्या वर्तमानपत्रातून येत आहे. ही जाहिरात म्हणजे स्वत:बद्दलची घृणा निर्माण होणारी ही अवस्था आहे ? म्हणून तो बऱ्याच वेळा असे म्हणत असतो की, देवा मला आजारी पाडू नकोस, मला यातून लवकर मुक्त कर. तो मुक्तता शोधत असतो. ही सर्व अवस्था आहे आणि त्याच्या भोवताली असलेल्या परिस्थितीतून बाहेर पडण्यासाठी तो विरंगुळा शोधत असतो. तो विरंगुळा अनेक प्रकारे मिळू शकतो. तो विरंगुळा केवळ देवळात जाऊन मिळतो असे नाही. तो विरंगुळा बागेत मोकळी जागा असेल तेथे शांतपणे बसला आले तरी सुध्दा मिळू शकतो. ज्यावेळी माणसाच्या इस्टेटीवर, त्याला मिळणा-या पेन्शनच्या पैशावर डोळा ठेवून त्याच्याच घरची मंडळी वागायला लागतात. त्यावेळी त्याच्याच घरात होणारे त्याच्यावर होणारे अत्याचार थांबवायास कोण पुढे येणार आहे ? अशी ही जी अवस्था आहे. त्यातून मग भ्रमिष्ट होणे, काही तरी वेडेवाकडे करुन घेणे, अपघात करुन घेणे या सगळया गोष्टींच्या मालिकेला सुरुवात होते. हे सर्व जे वास्तव आहे, त्याच्यापासून दूर जायची इच्छा असते. 'नटसम्राट' नाटकामध्ये असा एक संवाद आहे की, ज्यांना आम्ही जन्म दिला ते आम्हाला विसरले आणि ज्याने आम्हाला जन्म दिला तोही आम्हाला विसरला. इतकी निराधार होण्याची ही अवस्था आहे. या निराधार अवस्थेतून आपल्या सगळया ज्येष्ठांनी वेगवेगळया क्षेत्रामध्ये, वेगवेगळया विषयामध्ये, वेगवेगळया कामामध्ये त्यांच्या परीने जे शक्य होते ते योगदान दिलेले असते. त्याची कृतज्ञता पुढच्या पिढीने ठेवणे आवश्यक असते. ती एका घरापुरती मर्यादित नसते, एखाद्या कुटुंबापुरती मर्यादित नसते, समाजातील जागरुकता, सजगता, जाणीव आणि त्या जाणीवेतून निर्माण होणारे एक भावविश्व की, ज्याच्यामध्ये चैत्रातील सोनेरी संध्याकाळ माझ्या आयुष्यात उगवली असे समाधानाने म्हणण्याची अपेक्षा असते. मदर तेरेसा यांनी आयुष्यभर जे कार्य केले त्या कार्याचे एका वाक्यात त्यांनी वर्णन केले होते. ते वाक्य असे होते की, I help people to die peacefully. मृत्यूचा सामना करताना अतिशय शांतपणे व धीराने त्याला सामोरे

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.हेमंत टकले.....

कसे जावे यासाठी मी ह्या जीवनात कामाचा ध्यास घेतलेला आहे. मला वाटते की, आपल्या समाजाने केवळ शासन नव्हे तर सगळयांनीच आपल्यातील या ज्येष्ठांकडे बघण्याची सहृदयता दाखविली पाहिजे. त्यांना ज्या छोट्या छोट्या गोष्टींची आवश्यकता असते त्या दिल्या पाहिजेत. याला आयसोलेशन असे म्हणतात.

एखादे चांगले नाटक गावात आलेले असते. गावातील किंवा घरातील सगळेजण ते नाटक बघण्याचे ठरवितात. त्यावेळी घरातील माणसे त्या आजीबाईंना किंवा आजोबांना असे सांगतात की, तुमचे जेवणाचे ताट ठेवलेले आहे. आम्ही नाटकाला जाऊन येतो, तोपर्यंत तुम्ही जेवण करु घ्या. एवढेच नाही तर घराला बाहेरुन कुलूप लावले जाते. एक प्रकारची ही तुरुंग बंदी आहे. त्यांच्या मनात हे का येत नाही की, त्यांनाही अजून त्या कलेसाठी कुठे तरी जावेसे वाटणे शक्य आहे. तोही विरंगुळा होऊ शकतो.

सभापती महोदय, वृध्दाश्रमे ठिकठिकाणी निर्माण करणे हे समाजाच्या प्रगतीचे लक्षण नाही. आपण आपल्या कुटुंबामध्ये आपल्या घरामध्ये आपल्याच वृध्दांची, आपल्या ज्येष्ठ नागरिकांची काळजी घेणे हेही आपल्या दृष्टीने कर्तव्य आहे.

यानंतर श्री.शिगम....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले...

कारण केव्हा तरी त्या सूर्यास्ताकडे आपलीही वाटचाल होणार आहे म्हणून तुम्ही जर आज ते उदाहरण घालून दिले तर कदाचित तुमच्या वाट्याला जे समाधान तुम्हाला अपेक्षित आहे ते निश्चितच मिळू शकेल. यासाठी फार मोठ्या जनजागृतीची, लोकमानसात त्यादृष्टीने विचार प्रवृत्त करण्याची गरज आहे. मला वाटते या निमित्ताने याबाबतीत आपणच समाजाला एक दिशा देऊ शकू. यासाठी शासन कुठे तरी अदृश्य स्वरुपात असावे, शासनाचा सहभाग असावा पण तो शासकीय चौकटीतील नसावा. मघाशी सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी सांगितले की, ते अंधासाठी काम करतात, अंधासाठी एस.टी.मध्ये सवलत दिली जाते. मला आठवते, एकदा मी प्रवास करीत असताना एक अंध एस.टी. वाहकाशी सवलतीने प्रवास करण्यासाठी भांडत होता. त्यावेळी त्या वाहकाने त्या अंधाला विचारले की, तुझे आयडेण्टिटी कार्ड कुठे आहे ? तो अंध म्हणाला, आयडेण्टिटी कार्ड घरी राहिले आहे. त्यावेळी वाहकाने सांगितले की, तुला सवलत मिळणार नाही. येथे वाहकाला डोळे आहेत, समोरचा माणूस अंध आहे हे त्याला दिसत आहे, दिसत असूनही त्या वाहकाला सवलत द्यावीशी वाटत नाही. अशी जर यंत्रणा असेल तर मग सरकारी दवाखान्यामध्ये मोफत उपचार मिळण्याच्या ठिकाणी जर हे गेले आणि त्यांना जर भिका-या सारखे वागवले गेले तर आत्मसन्मान ठेवण्यासाठी ही मंडळी त्या वाटेला फिरकणार सुध्दा नाही. त्यामुळे शेवटाकडे जाणा-या या सगळया ज्येष्ठ नागरिकांकडे शासनाने आणि आपण सर्वांनी वेगळया दृष्टीने बघायला सुरुवात केली तर "संध्या छाया भिवविती हृदया" असे म्हणण्याची वेळ त्यांच्यावर येणार नाही असे मला वाटते, एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती दिप्ती चवधरी (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. चंद्रकांत पाटील यांनी मांडलेल्या अशासकीय ठरावावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभी आहे.

सभापती महोदय, आज खरोखरच वद्धांची अवस्था फारच वाईट झालेली आहे. पूर्वी आपल्या देशामध्ये एकत्र कुटुंब पध्दती होती. सर्व भाऊ एकत्र राहिल्यामुळे त्यांची लग्ने झाल्यानंतर देखील एकमेकांकडे आदराने पाहिले जात होते. परंतु हल्ली कायदे देखील महिलांच्या बाजूने इतके आहेत की घरामध्ये नवीन सुना आल्या की त्या कायद्यांचा गैरफायदा घेतला जातो, पोलीस स्टेशनपर्यन्त सासूसास-यांना ओढून नेले जाते. अशा प्रकारच्या भीतीमुळे पुण्यातील दोन भावांनी आणि सासूसास-यांनी आत्महत्या केल्याची हृदयद्रावक घटना घडलेली आहे. आपली पूर्वीची एकत्र कुटुंब पध्दती ही खूप चांगली होती. आता मुंबई आणि पुणे सारख्या शहरामध्ये माणसे छोट्याशा घरामध्ये राहातात, आपल्या मुलांची लग्ने करतात, दुसरे घर घेणे त्यांना अशक्य नसते. घरोघरी मातीच्या चुली या म्हणी प्रमाणे प्रत्येक घरामध्ये अशीच अवस्था असते. लग्न होऊन घरात आलेल्या सुनेचे प्रेम तिच्या आईवडिलांवर असते, सासूसास-यांवर तेवढे प्रेम ती करु शकत नाही. त्यातून हे सगळे वादविवाद निर्माण होतात. रिटायमेण्ट नंतर प्रत्येक वृध्द माणसाला आपले पुढे कसे होणार याची काळजी असते. आयुष्यात 12-15 तास काम केल्यानंतर आता एकदम रिकामे होणार असे त्यांना वाटू लागते. काही काम नसल्यामुळे त्यांच्या मनात अनेक प्रकारचे विचार येत असतात. काही निवृत्त माणसे अतिशय विद्वान असतात, त्यांच्या आयुष्यभराच्या अनुभवाचा,ज्ञानाचा समाजाला खूप फायदा होऊ शकतो. तो फायदा आपण करुन घेतला तर त्यांना देखील असे वाटेल की, आपल्या अनुभवाची आणि ज्ञानाची समाजाला गरज आहे, परिणामी ते निराशेच्या गर्तेत जाणार नाहीत. त्यांच्या मनामध्ये जगण्याची उर्मी निर्माण होईल. म्हणून या दृष्टीने शासनाने वृद्धांना मदत केली पाहिजे.

घरामध्ये लहान मुले असतात त्यावेळी ती सर्वांना हवीहवीशी वाटतात,त्यांना आधाराची गरज असते...

...नंतर श्री.गिते...

अशुधीत प्रत / शीघ्रलिपी नोंद

श्रीमती उषा चव्हाण...

वृध्दावस्था ही देखील बालपणासारखी असते. लहान मुले ही सगळयांना हवीहवीशी असतात. पण वृध्द माणसे कोणालाही हवीशी वाटत नाही ही दुर्देवाची गोष्ट आहे. वृध्दांना ज्या गोष्टींची आवश्यकता आहे, त्या गोष्टी उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे. खाणे पिणे वेळेवर मिळाले पाहिजे. वेळोवेळी औषधोपचार मिळाले पाहिजेत. या वृध्दांना केईएम किंवा सायन सारख्या रुग्यालयात वृद उपचार घेण्यासाठी गेले तर, त्यांना इतर रुग्णांप्रमाणे लाईनमध्ये उभे राहणे शक्य नसते. या ज्येष्ठ नागरिकांना वैद्यकीय सुविधा कशा पध्दतीने उपलब्ध करुन देणार आहात, हा माझ्या समोर मोठा प्रश्न निर्माण झालेला आहे. वृध्दांसाठी प्रत्येक शासकीय रुग्णालयात वैद्यकीय सुविधा उपलब्ध असणे आवश्यक आहे, व या वृध्दांना प्राधान्याने औषोधोपचार कशा पध्दतीने मिळेल यासंबंधी एखादी योजना आखून संबंधित वैद्यकीय अधिका-यांना तशा सूचना दिल्या पाहिजेत, एवढी सूचना करतो आणि माझे मनोगत पूर्ण करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मनिष जैन (जळगांस स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदया, मी व्यापारी व्यक्ती आहे, मला आपण एक मिनिटांचा वेळ दिला आहे, त्या वेळेतच मी माझे मनोगत पूर्ण करीन. या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी जो अशासकीय ठराव मांडला आहे, त्या अनुषंगाने अनेक सन्माननीय सदस्यांनी मते व्यक्त केली, त्या मतांशी मी सहमत आहे. या सभागृहात नऊ ते दहा सदस्य उपस्थित आहेत, त्यापैकी सहा ते सात सन्माननीय सदस्य सिनियर सिटीझन्स आहेत. या ठिकाणी सन्माननीय सदस्या श्रीमती विद्याताई चव्हाण यांनी ज्येष्ठ नागरिकांना वैद्यकीय सुविधा शासनाच्या वतीने मोठया प्रमाणात उपलब्ध करुन दिल्या पाहिजेत असा मुद्दा उपस्थित केला.

सभापती महोदया, मी चायना, युरोप, अमेरिका येथे दौऱ्यावर गेलो होतो. त्या ठिकाणी 60 वर्षाच्या वरील व्यक्ती कधीही काठी हातात धरत नाहीत. आपण इकडे म्हणतो की, साठीच्यावर गेलो तर हातात काठी धरावी लागते. त्या ठिकाणी 60 वर्षे वयाचे ज्येष्ठ नागरिक आहेत, त्यात कोणी प्रोफेसर आहेत, कोणी शिक्षण क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्ती आहेत, तसेच इतर क्षेत्रातही काम करणाऱ्या व्यक्ती आहेत, त्या व्यक्ती कधीही घरात बसून रहात नाहीत. ते स्वत:हून पुढे येतात आणि ते त्यांच्या क्षेत्रातील कामे स्वत:हून करतात. उदाहरण द्यावयाचे झाले तर एखादा ट्रॅफीक पोलीस असेल व तो सेवानिवृत्त झाला असेल तर तो घरी थांबत नाही. तो स्वत: रस्त्यावर जाऊन उभा राहतो आणि ट्रॅफिक पोलिसाचे काम करतो. ते काम करण्याचा त्याला एक्स्ट्रा मोबदला मिळतो. कोणी शिक्षक असेल तर, तो शाळेत जाऊन शिक्षणाच्या बाबतीत मार्गदर्शन करतो. अशा प्रकारे त्यांचा वेळ जातो तसेच त्यांना त्यांच्या कामाचा मोबदला मिळतो. या ठिकाणी शासनाने अशा प्रकारची योजना केली तर या ठिकाणच्या ज्येष्ठ नागरिकांचा वेळ जाईल, तसेच त्यांना एक्स्ट्रा पैसे देखील मिळतील. तसेच त्यांच्या अनुभवाचा फायदा शासनाला पर्यायाने जनतेला मिळेल. या सभागृहातील ज्येष्ठ नागरिकांचा फायदा आमच्या सारख्या युवकांना मिळतो. म्हणून ज्येष्ठ नागरिकांचा अनुभवाचा शासनाला तसेच समाजाला फायदा मिळेल म्हणून या गोष्टीकडे शासनाने लक्ष घालावे, एवढे बोलून मी माझे मनोगत पूर्ण करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश बिनसाळे (विधानसभेने निवडलेले) सभापती महोदया, आमचे सहकारी श्री. चंद्रकांत पाटील यांनी या ठरावाच्या अनुषंगाने अतिशय चांगली चर्चा उपस्थित केली, त्याबद्दल मी त्यांचे सुरुवातीलाच अभिनंदन करतो. या विषयावर अनेक सन्माननीय सदस्यांनी आपापाले विचार व्यक्त केलेले आहे. सर्वांनी चांगले विचार मांडले आहे. या ठरावाच्या बाबतीत सर्वांची भावना सारखी आहे. ज्येष्ठ नागरिकांना देण्यात येणाऱ्या सोयी-सुविधा देण्यामध्ये सुधारणा झाल्या पाहिजेत. माझी देखील तशीच भावना सन्माननीय सदस्यांप्रमाणेच आहे. मी केवळ एकच सजेशन देण्यासाठी उभा आहे. या ठिकाणी वृध्दाश्रमाच्या बाबतीत उल्लेख झाला, खरे म्हणजे आई-वडिलांना आपली मुले वृध्दाश्रमात पाठवितात ती एक मनाला क्लेश देणारी घटना असते. परंतु दुर्देवाने काळाची महिमा असा आहे की, या काळात असे प्रकार मोठया प्रमाणात होत आहेत. माझी शासनाला विनंती राहील की, ज्येष्ठ नागरिकांना हे वृध्दाश्रम जेल सारखे वाटू नये. म्हणून हे वृध्दाश्रम कशा प्रकारचे असले पाहिजेत, त्यामध्ये काय सुविधा असल्या पाहिजेत, ज्येष्ठ नागरिकांसाठी करमणुकीची साधने काय असली पाहिजे. त्या वृध्दाश्रमांना आपण घरपण देऊ शकत नाही. परंतु त्याला घरपण देण्याचा निश्तिचपणे प्रयत्न आपण करु शकतो. या वृध्दाश्रमांसाठी काही मार्गदर्शक सूची, मार्गदर्शक तत्वे शासनाने बनवून त्या माध्यमातून या वृध्दाश्रमांवर नियंत्रण आणणे ,त्यांच्यावर देखरेख ठेवून त्या त्या ठिकाणी .....

यानंतर श्री. भोगले.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश बिनसाळे.....

चांगल्या सुविधा मिळतात की नाही हे पाहिले पाहिजे. त्या ठिकाणी कोणी इच्छेने जात नाही. अनेकदा परिस्थितीमुळे जावे लागते. त्यासाठी वृध्दाश्रमांकडे वेगळ्या दृष्टीने पाहून मदतीच्या भूमिकेतून अस्तित्वात असलेल्या वृध्दाश्रमांमध्ये सुधारणा घडवून आणणे आणि नवीन वृध्दाश्रम होणार असतील तर ती परफेक्ट मार्गदर्शक तत्वानुसार तयार झाली तर त्याचा फायदा निश्चितपणे या ज्येष्ठ नागरिकांना होईल. मी ईश्वराजवळ प्रार्थना करतो की, अशी वेळ कोणावर येऊ नये आणि आलीच तर त्या माणसाच्या मनाला अधिक क्लेश होऊ नयेत एवढीच अपेक्षा व्यक्त करुन माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शिवाजीराव मोघे (सामाजिक न्याय मंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.चंद्रकांत पाटील यांनी अतिशय महत्वाचा आणि जिव्हाळ्याचा विषय या ठिकाणी अशासकीय ठरावाच्या माध्यमातून उपस्थित केला आहे.

सभापती महोदय, हा प्रश्न अतिशय महत्वाचा, जिव्हाळ्याचा आणि गंभीर स्वरुपाचा आहे. वृध्दत्व हे माणुसकीला एक आव्हान आहे. हे वय असेच असते, जो श्रीमंत असतो त्यालाही भोगावे लागते आणि ज्याच्याकडे काही नाही त्याला तर खूपच त्रास सहन करावा लागतो. माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी सांगितल्याप्रमाणे आपल्या देशामध्ये वृध्दांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. आपण सर्व काही आपल्या मुलांसाठी करतो, परंतु भविष्यात मुले काय करतील हे सांगता येत नाही. शारीरिक आरोग्य ही नैसर्गिक बाब आहे. वृध्दत्वाच्या काळात आपल्याला सहाय्याची गरज असते. सहानुभूतीची सुध्दा खूप गरज असते. त्यानंतर संरक्षणाची सुध्दा आवश्यकता असते. या वयात मानसशास्त्र कमकुवत झालेले असते. जुन्या व्याधींनी त्रस्त केलेले असते. अनेक प्रकारचे अपंगत्व येत असते. या सर्व समस्यांना सामोरे जायचे असेल तर मी असे म्हणेन की, फक्त कायदा महत्वाचा नाही. कायद्यापेक्षा समाज व्यवस्था, संस्कार अधिक मदत करु शकतात असे माझे मत आहे.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.चंद्रकांत पाटील यांनी जो अशासकीय ठराव मांडला आहे त्या ठरावावर माननीय सदस्य सर्वश्री संजय केळकर, हेमंत टकले, मनिष जैन, प्रकाश बिनसाळे, रामनाथ मोते, श्रीमती विद्या चव्हाण, श्रीमती अलका देसाई, डॉ.नीलम गोऱ्हे अशा जवळजवळ दहा सदस्यांनी आपले विचार मांडले आहेत, काही चांगल्या सूचना केल्या आहेत. आपल्याला कल्पना आहे की, महाराष्ट्रामध्ये ज्येष्ठ नागरिकांना अनेक प्रकारच्या सवलती दिल्या जातात. एस.टी.प्रवासामध्ये सवलत दिली जाते. परंतु एस.टी.चा पास शहरांमध्ये दिला जात नाही. तो सर्वत्र मिळाला पाहिजे. एक्स्प्रेस बस प्रवासाकरिता सवलत दिली जात नाही. यामध्ये सुधारणा करण्याची गरज आहे हे मला मान्य आहे. त्या दृष्टीने जरुर प्रयत्न करु.

सभापती महोदय, ज्येष्ठ नागरिकांसाठी संजय गांधी निराधार योजना आहे. श्रावण बाळ योजना आहे. या योजनेमध्ये 100 रुपये वाढ करुन 600 रुपये इतकी आर्थिक मदत दिली जाते. केंद्र शासनाने 2004 चा एक कायदा केला आहे. त्याचा भाग-1 हा अखर्चिक आहे. त्यामध्ये काहीही खर्च करावा लागत नाही. त्या कायद्याच्या भाग-2 मध्ये महाराष्ट्र शासनाच्या धोरणाची पूर्ण

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शिवाजीराव मोघे....

तयारी झाली आहे. पुढील तीन महिन्यात शासनाचे धोरण येईल आणि त्याची अंमलबजावणी होईल असा मला विश्वास आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्राचे वैशिष्ट्य असे की, मागील दोन-तीन वर्षात ज्येष्ठ नागरिकांच्या अनेक संघटना खूप चांगल्या पध्दतीने पुढे येत आहेत. तालुका पातळीवर संघटना उभ्या रहात आहेत. या संघटना सवलतींविषयी चर्चा न करता त्यांचे म्हणणे आहे की, आम्ही आमचे अनुभव आमच्या भागाच्या विकासासाठी, आमच्या भागाचा चांगुलपणा वाढविण्यासाठी देत आहोत.

नंतर 4जे.1...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. शिवाजीराव मोघे .....

ही खूप चांगली गोष्ट आहे. तसेच काही चांगल्या संस्थाही या क्षेत्रात काम करीत असल्याचे आपण पाहतो. शासनाच्या कारभारात आमच्या अनुभवाचा फायदा व्हावा अशी त्यांची इच्छा आहे. या ज्येष्ठ नागरिकांचे शिष्ट मंडळ कॉंग्रेस पक्षाच्या अध्यक्षा माननीय सोनिया गांधी तसेच माननीय पंतप्रधान यांनाही जाऊन भेटले. त्याचा परिणाम असा झाला की, केंद्र शासनाने ज्येष्ठ नागरिकांची वयोमर्यादा 65 वर्षावरुन 60 वर्षावर आणली. पुढील काळात ही वयोमर्यादा आपल्या राज्यात सुध्दा होईल, असा मला विश्वास आहे.

महोदया, शासनाने ज्येष्ठ नागरिकांसाठी राज्यात जीवनदायी योजना सुरु केली आहे त्यात ज्या व्यक्तिचे वार्षिक उत्पन्न 25 हजारपेक्षा कमी असेल त्यांना या योजनेचा लाभ मिळू शकतो. कदाचित उत्पन्नाची मर्यादा असल्यामुळे राज्यातील सर्वच ज्येष्ठ नागरिकांना फायदा मिळेल असे नाही. पण आता नव्याने स्व. राजीव गांधी यांच्या नावाने एक योजना राज्यातील सहा जिल्ह्यात प्रथम सुरु केली आहे, पुढील काळात ती संपूर्ण राज्यात राबविली जाणार आहे. या योजनेचा मात्र राज्यातील सर्वच ज्येष्ठ नागरिकांना फायदा मिळू शकतो. तसेच या योजनेत फाईव्ह स्टार हॉस्पिटलमध्ये सुध्दा उपचार घेता येतील, अशी तरतूद आहे.

महोदया, ज्येष्ठ नागरिकांना त्यांच्या उतारवयात "विरंगुळा" हा फार महत्वाचा घटक मानला जातो. या अनुषंगाने सन्माननीय सदस्यांनी सूचना केल्या त्यादृष्टीनेही पुढील काळात विचार करण्यात येईल. बांधकामचा खर्च आमदार निधी किंवा अन्य प्रकारे करता येईल पण महत्वाचा विषय म्हणजे जागा मिळाली पाहिजे. कारण आज जागेच्या किमती भरमसाठ आहेत. त्यातूनही मार्ग काढण्याचा प्रयत्न केला जाईल. कारण ज्येष्ठ नागरिकांचे अनुभव अत्यंत चांगले असतात. देशाला स्वातंत्र्यपूर्व काळात ज्या ज्येष्ठ नागरिकांचा फायदा झालेला आहे अशा नागरिकांना सर्व प्रकारचे सहाय्य मिळणे आवश्यक आहे. तसेच सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे सर्वच मुले आई-वडीलांना सांभाळतात असे नाही. मी तर असे म्हणेन की ज्यांना दोन मुले असतात त्यांच्यातील एकाने जरी आई-वडीलांना सांभाळले आणि दुसरा सांभाळत नाही म्हटले तरी या वृध्दांना क्लेश होतात. उद्वेगाने ते असेही म्हणतात की या मुलाला जन्म दिला नसता तर बरे झाले असते. पण हे म्हणणे क्षणिक असते, त्याच्या प्रेमापोटी ते असे बोलतात.

...2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. शिवाजीराव मोघे .....

असे प्रकार होऊ नयेत म्हणून मुलांवर संस्कार करणेही तितकेच गरजेचे असते. कायद्याच्या पलिकडे जाऊन संस्कार घडविण्याचे काम करावयाचे असते. हे संस्कार नव्या पिढीत कमी प्रमाणात दिसून येतात. पूर्वी एकत्र कुटुंब पध्दती होती तेव्हा मुलांवर घरातील ज्येष्ठांकडूनच असे संस्कार होत होते. पण आता ज्येष्ठांना सांभाळण्याचे प्रमाण कमी झाल्याने संस्कार घडविण्याचे प्रकारही समाजात दिसून येत नाहीत. माझ्या मतदारसंघात मिलिटरीत नोकरीला असलेली एक व्यक्ती मरण पावली. त्याच्या पश्चात घरात आई-वडील, पत्नी आणि मुले असा परिवार होता. त्या व्यक्तिला पेंशन मंजूर झाल्यानंतर सहाजिकच ते पत्नीला मिळते. पण पत्नी जर मुलांना घेऊन दुसरीकडे राहू लागली तर अशा वेळेस या ज्येष्ठ आई-बाबांची काय परिस्थिती होणार याचाही विचार करणे आवश्यक आहे. अशा परिस्थितीत या वृध्द आईबाबांचा विचार जरुर केला पाहिजे, असा शासनाचा विचार आहे. या ठरावाच्या अनुषंगाने सन्माननीय सदस्यांनी ज्या ज्या उपयुक्त व चांगल्या सूचना केल्या त्यांचा अंतर्भाव ज्येष्ठ नागरिकांसाठी धोरण तयार करताना त्यात केला जाईल. राज्यातील ज्येष्ठ नागरिकांची एक चळवळ झाली पाहिजे अशीही सूचना या निमित्ताने करण्यात आली. खरोखरच अशा चळवळीमुळे घराघरात हे पोहचेल असे वातावरण निर्माण करणे आवश्यक आहे. या मताशी मी सहमत आहे. या देशात ज्येष्ठ नागरिकांच्या संघटना झालेल्या आहेत, त्यांच्या माध्यमातून मुलांवर चांगले संस्कार झाले पाहिजेत. यासाठी चांगल्या प्रकारे काम करणाऱ्या सेवाभावी संस्थांची गरज मोठ्या प्रमाणात आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखापाठी नाही

श्री. शिवाजीराव मोघे...

आपल्या राज्यात चांगल्या एनजीओंची संख्या मोठया प्रमाणात आहे. व्यसन मुक्तीचे धोरण वरिष्ठ नागरिकांच्या दृष्टीने अतिशय आवश्यक आहे. घरात जर पिणारा माणूस असेल तर त्याचा पहिला अटॅक महिलावर होतो तसेच ज्येष्ठ नागरिकांवर सुध्दा होतो. त्यामुळे व्यसन मुक्तीचे काम सुध्दा या कार्यक्रमातून मोठया प्रमाणात झाले पाहिजे असे मला वाटते. आजच्या अशासकीय ठरावाच्या अनुषंगाने ज्या काही चांगल्या सजेशन झालेल्या आहेत त्या सजेशन मंत्रिमंडळापुढे ठेवल्या जातील. ज्येष्ठ नागरिकांसाठी महाराष्ट्र शासन धोरण आखणार आहे त्यामुळे या धोरणात या सूचनांचा नक्की विचार केला जाईल हे मी या निमित्ताने सांगू इच्छितो. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. चंद्रकांत पाटील यांनी चांगल्या प्रकारचा ठराव आणल्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो व धन्यवाद देतो. या चर्चेमध्ये 9 सदस्यांनी भाग घेऊन अमूल्य सूचना केलेल्या आहेत त्यामुळे त्यांचेही मी आभार मानतो. मी सन्माननीय सदस्य श्री. चंद्रकांत पाटील यांनी आपला अशासकीय ठराव मागे घ्यावा अशी मी त्यांना विनंती करतो.

श्री. चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, ज्येष्ठ नागरिकांच्या संदर्भात अशासकीय ठराव मांडण्याची संधी माननीय सभापतींनी दिल्याबद्दल मी प्रथम त्यांचे आभार मानतो. या चर्चेमध्ये अनेक सन्माननीय सदस्यांनी भाग घेऊन चांगल्या सूचना केलेल्या आहेत. सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांनी या विषयावर विचार मांडून या विषयाला एक उंची दिलेली आहे त्यामुळे मी त्यांचेही आभार मानतो. सरकार या विषयाच्या संदर्भात आगामी काळात काही तरी उपाययोजना करेल अशी आशा व्यक्त करतो.

सभापती महोदय, मी माझा ठराव मागे घेण्यासाठी सभागृहाची अनुमती मागतो.

सभागृहाच्या अनुमतीने ठराव मागे घेण्यात आला.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती (श्रीमती उषा दराडे) : सभा□ह□पुढील □म□ज संपलेले आहे. सभा□ह□ची बैठ□ आता स्थ□□त होऊ□मंगळवार, दि□□□ 5 एप्रिल, 2011 रोजी स□ळी 11.00 ते दुपारी 1.00 या वेळेत सभागृहाची विशेष बैठक घेण्यात येईल. या विशेष बैठकीमध्ये "नागरिकांच्या मूलभूत गरजा" या विषयावरील सत्तारूढ पक्षाच्या प्रस्तावावर नियम 260 अन्वये चर्चा करण्यात येईल. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 1 वाजून 15 मिनिटांनी पु□ भरेल.

(सभा□ह□ची बैठ□ सायंकाळी 5 वाजू□37 मि□□टां□□, मंगळवार, दि□□□ 5 एप्रिल,2011 च्या स□ळी 11.00 वाजेपर्य□त स्थ□□त झाली)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही